ऊ/५५



# शासन संस्था
## आणि
# क्रान्ति

लेनिन

# शासनसंस्था आणि क्रान्ति

(या विषयावरील सिद्धांतांत स्टालीननें घातलेल्या भरीसह)

मूळ लेखक

**लेनिन**

अनुवादक

**वसंत हरि तुळपुळे**

बी. ए., बी. कॉम्., एल्‌एल्. बी.

★

प्रथम आवृत्ति

१९४९

किंमत २ रुपये

प्रकाशक
के. पी. भागवत
८४६ सदाशिव
पुणें २

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय
१९६/४६ सदाशिव पुणें २

ऊ।५५

## निवेदन

प्रस्तुत पुस्तक हें लेनिनच्या The State and Revolution या सुप्रसिद्ध ग्रंथाचें भाषांतर आहे. भाषांतरासाठीं सदर ग्रंथाची मॉस्को येथील 'मार्क्स, एंगल्स, लेनिन इन्स्टिट्यूट' या संस्थेनें प्रसिद्ध केलेली १९४७ मधील प्रत उपयोगांत आणली आहे.

या भाषांतराचें हस्तलिखित माझे मित्र श्री. वसंतराव तुळपुळे यांनीं माझ्याकडे वास्तविक १९४८ च्या जानेवारींतच दिलें होतें. परंतु अनेक कारणांमुळें मला तें प्रसिद्ध करतां आलें नाहीं. शेवटीं तें या 'मे'त प्रसिद्ध करावयाचेंच असा मी निश्चय केला व तो आनंद मुद्रणालयाचे श्री. दादा जोशी यांच्या मदतीनें पार पाडला आहे. पुस्तकाचें काम सुबक व लवकर केल्याबद्दल श्री. जोशी यांचा मी फार आभारी आहे. मराठी वाचक या पुस्तकाचा स्वीकार करतील अशी आशा आहे.

के. पी. भागवत
२८।४।१९४९

# अनुक्रमणिका

★

| | पान |
|---|---|
| **लेनिनची प्रस्तावना** | |
| पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीची ... .... ... ... | |
| **प्रकरण पहिलें** | |
| वर्गीय समाज आणि शासनसंस्था ... ... | १ |
| **प्रकरण दुसरें** | |
| शासनसंस्था आणि क्रांति— | |
| १८४८ ते १८५१ या कालांतील अनुभव ... ... | २३ |
| **प्रकरण तिसरें** | |
| १८७१ सालांतील पॅरीस कम्यूनचे अनुभव | |
| आणि त्यांचें मार्क्सनें केलेलें विश्लेषण ... ... | ३९ |
| **प्रकरण चवथें** | |
| पुढें चालू—एंगल्सनें केलेलीं पूरक स्पष्टीकरणें ... | ६४ |
| **प्रकरण पांचवें** | |
| शासनसंस्था विरून जाण्याच्या क्रियेची | |
| आर्थिक पार्श्वभूमि ... ... ... ... | ९५ |
| **प्रकरण सहावें** | |
| संधिसाधूंनीं मार्क्सवादाला दिलेलें विकृत स्वरूप ... | १२१ |

६६३८



प्रकरण सातवें

रशियांतील १९०५ आणि १९१७ सालांतील क्रांत्यांचा अनुभव ... ... ... ... १४४

परिशिष्ट पहिलें

मार्क्सवादाच्या शासनसंस्थेवरील सिद्धांतांत स्टालीननें घातलेली भर ... ... ... १४५

परिशिष्ट दुसरें

क्रांतीसंबंधीं एंगल्सचे विचार ... ... १५६

परिशिष्ट तिसरें

क्रांतिकालासंबंधीं लेनिनचें विवेचन ... ... १५८

# शासनसंस्था आणि क्रान्ति

## ( शासनसंस्थेबद्दलचे मार्क्सवादाचे सिद्धांत आणि कामगारवर्गाचें क्रांतिकालांतील कर्तव्य )

★

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

तात्त्विक दृष्टीनें, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीनें, शासनसंस्थेच्या प्रश्नाला आज विशेष महत्व प्राप्त झालें आहे. साम्राज्य-शाही युद्धामुळें मक्तेदारी भांडवलशाहीचे, राज-मक्तेदारी भांडवलशाहींत रूपांतर होण्याच्या क्रियेची गति व तिची तीव्रता यांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. शासनसंस्था आणि मोठमोठ्या मक्तेदारी कंपन्या यांचें जास्त जास्त प्रमाणांत विलिनीकरण होत आहे आणि शासनसंस्थेकडून श्रमजीवि वर्गावर केली जाणारी भेसूर दडपशाही जास्तच भेसूर स्वरूप धारण करीत आहे. प्रत्येक युद्धमान् राष्ट्रांतील कामगार वर्ग हा त्या राष्ट्राची युद्धाची 'पिछाडी'च असतो. आणि हीं मोठमोठीं पुढारलेलीं राष्ट्रें हीं तेथील कामगार वर्गाच्या दृष्टीनें विचार करतां, 'लष्करी कैद-खानें' बनलीं आहेत.

दीर्घकाल चाललेल्या युद्धाची भयानकता आणि वाढत्या हालअपेष्टा यामुळें कामगारांची परिस्थिती असह्य झाली आहे, आणि त्यांच्या रागाचा पारा सारखा वाढत आहे. अन्तरराष्ट्रीय क्रान्तीची नांदी येऊं लागली आहे हें उघड आहे. म्हणूनच या क्रान्तीचें आणि शासनसंस्थेचे संबंध कसे असतात या प्रश्नाला प्रत्यक्ष राजकारणांत फार महत्व प्राप्त झालें आहे.

एकोणिसाव्या शतकांतील प्रदीर्घ शांततेच्या कालांत ज्या संधिसाधु प्रवृत्ति सांचत आल्या त्यांचें आतां 'अतिरेकी राष्ट्रवादी' वृत्तींत रूपांतर

झालें असून त्यानें सर्व जगांतील अधिकृत सोशल डेमोक्रॅटिक पक्षांना ग्रासलें आहे. तोंडानें सोशालिस्ट परंतु कृतीनें अतिरेकी राष्ट्रवादी असलेल्या या गटाचे पुढारी, रशियांत प्लेखनॉव्ह, पोट्रेसॉव्ह, ब्रेश्को-व्हस्काया, रुबॅनोव्हिच आणि थोड्या सुप्त प्रमाणांत सरटेली, चरनॉव्ह, इत्यादींचा गट; जर्मनींत श्चिडिमन, लीजन, डेव्हिड फ्रान्स आणि बेल्जियममध्यें रेनॉडेल, ग्यूसेड, व्हँडरव्हल्डे आणि इंग्लंडमध्यें हिंडमन आणि फेबियन हे आहेत. या गटाचें वैशिष्ट्य असें आहे कीं, या 'सोशालिझमच्या' 'पुढाऱ्यांनीं' 'आपल्या' राष्ट्रांतील भांडवलदारांच्या हितसंबंधांचीच केवळ नव्हे तर 'आपल्या' राष्ट्रीय शासनसंस्थेची नीच गुलामगिरी पत्करली आहे. हीं सर्व मोठमोठीं राष्ट्रें पुष्कळ लहान लहान देशांची पिळणूक करण्याचें आणि त्यांना गुलाम बनवून ठेवण्याचें काम गेलीं कित्येक वर्षें करीत आहेत. आणि या लुटीची वांटणी आणि फेरवांटणी करण्याकरतांच आजचें साम्राज्यशाही युद्ध लढलें जात आहे. श्रमजीवि बहुजनसमाजाला जर भांडवलदारांच्या आणि विशेषतः साम्राज्यशाही भांडवलदारांच्या दडपणाचें जूं झुगारून द्यावयाचें असेल, तर त्याकरितां शासनसंस्थेसंबंधीं जो संधिसाधु दृष्टिकान आहे त्याविरुद्ध लढा देणें अपरिहार्य आहे.

प्रस्तुत पुस्तकांत आम्ही प्रथमतः मार्क्स–एंगल्स यांच्या शासनसंस्थेसंबंधींच्या मतांचा–आणि विशेषतः त्यांचीं जीं मतें विसरलीं गेलीं आहेत किंवा ज्यांना संधिसाधूपणानें विकृत स्वरूप दिलें गेलें आहे अशा मतांचा–विचार केला आहे. त्यानंतर आम्ही कार्ल काउट्स्की–आजच्या महायुद्धाच्या कालांत दिवाळें वाजलेल्या दुसऱ्या इंटरनॅशनलचा ( १८८९ ते १९१४ ) सर्वमान्य पुढारी–सारख्या या गटाच्या प्रमुख प्रतिनिधींचा स्वतंत्रपणें समाचार घेतला आहे. आणि शेवटीं रशियांतील १९०५ आणि १९१७ सालांतील क्रान्त्यांतून जो अनुभव मिळाला त्याचें समालोचन केलें आहे. वरवर पाहतां या दुसऱ्या क्रांतीनें आपल्या प्रगतीची पहिली अवस्था आज ( ऑगस्ट १९१७ ) संपविली आहे. परंतु सर्वसाधारणपणें विचार करतां ही क्रांति म्हणजे, साम्राज्यशाही

युद्धानें कामगार-सोशालिस्ट क्रांत्यांची जी एक मालिकाच निर्माण केली त्या मालिकेंतील एक दुवा आहे. म्हणून कामगार-सोशालिस्ट क्रांति आणि शासनसंस्था यांच्या परस्पर संबंधांच्या प्रश्नाला व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीनें महत्व प्राप्त झालें आहे. एवढेंच नव्हें तर आजच्या परिस्थितींत त्याला अत्यंत तांतडीचा प्रश्न—नजीकच्या भविष्यकालांत भांडवलशाही जोंखडाखालून आपली मुक्तता करून घेण्याकरितां बहुजनसमाजाला काय करावें लागेल हाच तो प्रश्न होय—म्हणून महत्व प्राप्त झालें आहे.

ऑगस्ट १९१७

लेनिन

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ही आवृत्ति छापतांना दुसऱ्या प्रकरणांतील तिसरा परिच्छेद नवीन घातला आहे.

मॉस्को १७ डिसेंबर १९१८

लेनिन

# शासनसंस्था आणि क्रान्ति

## प्रकरण पहिलें

## वर्गीय समाज आणि शासनसंस्था

### १ शासनसंस्था ही कधींही न मिटणाऱ्या वर्ग-विरोधाचा परिणाम आहे

मार्क्सच्या सिद्धांन्तांची आज जी गत होत आहे तीच गत आपल्या स्वतःच्या मुक्ततेकरितां झगडणाऱ्या दलितवर्गाच्या आतांपर्यंत होऊन गेलेल्या क्रान्तिकारक पुढाऱ्यांच्या आणि विचारवन्तांच्या सिद्धान्तांची झालेली आहे. हे पुढारी जिवन्त असेपर्यंत पिळणारे वर्ग त्यांचा छळ करतात आणि रानटी दुष्टपणानें, जळजळीत द्वेषानें आणि निंदायुक्त प्रचाराचा बेमुर्वतखोरपणें उपयोग करून त्यांच्या तत्त्वज्ञानावर हल्ला चढवितात. आणि त्यांच्या मृत्यूनंतर मात्र दलितवर्गाचें समाधान करून त्यांना फसविण्याचे हेतूनें त्या पुढाऱ्यांना ‘ संत ’ मालिकेंत बसवून त्यांच्या ‘ प्रतिमा ’ तयार करतात आणि त्यांचें नाममहात्म्य वाढविण्याचा प्रयत्न करतात. परंतु, त्याचबरोबर त्यांच्या तत्त्वज्ञानांतील क्रान्तिकारक गाभा काढून घेऊन, त्याला विकृत स्वरूप देऊन आणि त्याची धार बोथट करून त्याला निरुपद्रवी बनविण्याचे प्रयत्नही चालू असतात. याप्रमाणें मार्क्सवादांत ‘ सुधारणा ’ घडवून आणण्याचे प्रश्नावर आज भांडवलदार आणि मजूर चळवळींतील संधिसाधु पुढारी या दोघांचेंही एकमत आहे. असें करतांना ते मार्क्सच्या सिद्धान्तांचा क्रान्तिकारक भाग, त्यांचा क्रान्तिकारक आत्माच नष्ट करीत आहेत आणि त्यांना विकृत स्वरूप देत आहेत. मार्क्सवादांतील भांडवलदारांना मानवणारा किंवा त्यांना मानवेल

असें वाटणारा जेवढा भाग आहे, तेवढ्याचेच स्तुतिपाठ ते गात आहेत. सर्वच राष्ट्रीय दुरभिमानी (Social-chauvinist) आज स्वतःला मार्क्स-वादी म्हणवीत आहेत. मार्क्सवादाचा खून पाडणें हाच ज्यांचा कालपर्यंत पेशा होता ते जर्मनींतील भांडवलदारांचे हस्तक असलेले पंडित आज मार्क्सचा ‘ जर्मनीचा राष्ट्रपुरुष ’ म्हणून उदो उदो करीत आहेत, आणि भांडवलदारांना आजच्या लुटारू युद्धांत ( १९१४ ते १९१८ ) उप-योगी पडत असलेली कामगार संघटना मार्क्सनेंच निर्माण केली, असें मोठ्या आग्रहानें सांगत आहेत.

वरील प्रमाणें मार्क्सवादाला फार मोठ्या प्रमाणावर विकृत स्वरूप दिलें जात आहे. अशा परिस्थितींत मार्क्सचे शासनसंस्थेवरील सिद्धांत त्यांच्या मूळ स्वरूपांत जनतेसमोर मांडणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे. याकरितां मार्क्स आणि एंगल्स यांच्या लिखाणांतील या विषयींचे सवि-स्तर उतारे देणें जरूर आहे. असें करण्यानें ग्रंथ वाचावयास सुलभ होणार नाहीं हें खरें, परंतु त्याला इलाज नाहीं. शास्त्रीय समाजवादाच्या संस्थापकांच्या सिद्धांतांचें साकल्यानें आकलन व्हावें, त्यांचा विकास कसा होत गेला हें समजावें व त्यासंबंधीं वाचकाला स्वतःचें मत बन-वितां यावें, तसेंच प्रचलित ‘ काउट्स्की-वादानें ’ त्या सिद्धांतांना विकृत स्वरूप दिलें आहे ही गोष्ट पुराव्यानिशीं सिद्ध व्हावी, या दृष्टीनें मार्क्स आणि एंगल्स यांनीं शासनसंस्थेसंबंधीं जें लिहिलें तें सर्व, निदान त्यांतील महत्त्वाचें आहे तेवढें तरी सर्व, उधृत करणें आवश्यक आहे.

एंगल्सच्या ‘ कुटुंब, खासगी मालकी आणि शासनसंस्था यांचा उगम’ ( The Origin of The Family, Private Property and The State ) या प्रसिद्ध ग्रंथापासून आपण सुरवात करूं. या ग्रंथाची ६ वी आवृत्ति स्टटगार्ड येथें १८९४ सालीं प्रसिद्ध झाली. या ग्रंथाचीं रशियन भाषेंत पुष्कळ भाषांतरें आहेत परंतु तीं अपूर्ण तरी आहेत किंवा असमाधानकारक तरी आहेत. म्हणून मूळ जर्मन ग्रंथावरून स्वतंत्र भाषांतर करूनच आम्हीं खालीं दिलेलें आहे.

शासनसंस्थेच्या इतिहासाचें समालोचन करतांना एंगल्स म्हणतो :

" आणि म्हणून शासनसंस्था ही हेगेलनें म्हटल्याप्रमाणें 'नैतिक कल्पनांचें मूर्त स्वरूप' नाहीं किंवा 'तर्कशुद्ध विचाराचें साकार आणि प्रत्यक्ष स्वरूप' नाहीं. त्याचप्रमाणें ती समाजावर बाहेरून लादली गेलेली एकादी सत्ताही नाहीं. मानवी समाज प्रगतीच्या एका विशिष्ट अवस्थेला पोंचला म्हणजे त्यांत शासनसंस्था निर्माण होते. मानवी समाज कधींही न मिटणाऱ्या अन्तर्गत विरोधांत गुरफटला गेला आहे, या अटळ विरोधामुळें समाजाचे विभाग पडले आहेत आणि हे विरोध नाहींसे करणें अशक्य झालें आहे, याचें शासनसंस्थेचें आस्तित्व ही कबुली आहे. या वर्गविरोधामुळें आणि परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या वर्गांच्या आस्तित्वामुळें निष्फळ झगडे निर्माण होऊन त्यांत त्यांचा आणि सर्व समाजाचा नाश होऊं नये म्हणून, या विरोधांची तीव्रता कमी करून त्यांना 'कायदा आणि सुव्यवस्था' यांच्या बंधनांत ठेवण्याकरितां, समाजापासून बाह्यतः अलग असणाऱ्या एकाद्या शक्तीची आवश्यकता निर्माण होते. समाजांतच निर्माण झालेली, परंतु समाजावर सत्ता गाजविणारी आणि समाजापासून जास्त जास्त अलग होत जाणारी ही शक्ति म्हणजेच शासनसंस्था होय." [पा. १७७-१७८].

शासनसंस्थेचा अर्थ आणि तिचें इतिहास-प्रणित कार्य यासंबंधीं मार्क्सवादाच्या मूलभूत कल्पना वरील उताऱ्यांत पूर्णपणें व्यक्त झाल्या आहेत. शासनसंस्था ही वर्गविग्रहाच्या अनिवार्यतेचें फळ आहे, त्याचप्रमाणें त्या अनिवार्यतेचें मूर्तस्वरूपही आहे. विरोधी वर्गांच्या हितसंबंधांचा समन्वय घालतां येत नाहीं, अशी परिस्थिति ज्या वेळेला, ज्या ठिकाणीं आणि ज्या प्रमाणांत निर्माण झाली त्या वेळेला, त्या ठिकाणी आणि त्याप्रमाणांत शासनसंस्थाही आस्तित्वांत आलेली आहे. उलट पक्षीं बोलावयाचें तर वर्गविग्रह अनिवार्य आहे ही गोष्टही शासनसंस्थेच्या अस्तित्वामुळेंच सिद्ध होत असते.

मार्क्सवादाला विकृत स्वरूप देण्याची क्रिया मुख्यतः याच महत्वाच्या आणि मूलभूत सिद्धान्तांचे बाबतींत सुरू आहे. हें विकृत स्वरूप दोन निरनिराळ्या पद्धतींनीं दिलें जातें.

पहिली पद्धत : ज्या ठिकाणीं वर्गविग्रह आणि वर्गविरोध अस्तित्वांत असतात त्याच ठिकाणीं शासनसंस्था अस्तित्वांत असते ही गोष्ट ऐतिहासिक घटनांमुळें निर्विवादपणें मान्य करावी लागल्यानें भांडवलदार आणि मुख्यतः मध्यमवर्गीय तत्त्वज्ञ मार्क्सवादांत अशा रीतीनें 'दुरुस्ती' करण्याचा प्रयत्न करतात कीं, ज्यामुळें शासनसंस्था वर्गसमन्वय घडवून आणण्याचें साधन वाटावी. परंतु, याबद्दल मार्क्सचें असें म्हणणें आहे कीं जर वर्गविरोधाचा निरास घडवून आणणें शक्य असतें तर शासनसंस्था निर्माण झाली नसती आणि टिकून पण राहिली नसती. मध्यमवर्गीय विद्वानांच्या आणि लेखकांच्या मतें मात्र शासनसंस्था वर्गसमन्वय घडवून आणते. आणि या आपल्या मताला आधार म्हणून ते बरेच वेळेला मार्क्सच्या नांवाचा उल्लेख करतात. मार्क्सच्या मतानें शासनसंस्था ही वर्गीय सत्तेचें—एका वर्गानें दुसऱ्या वर्गाला दडपून टाकण्याचें--साधन आहे. शासनसंस्था जी 'सुव्यवस्था' निर्माण करते तिच्यामुळें वर्गावर्गांतील विरोधांची तीव्रता कमी होते आणि एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या दडपशाहीला कायम आणि कायदेशीर स्वरूप दिलें जातें. मध्यमवर्गीय राज्यशास्त्रज्ञ मात्र 'सुव्यवस्था' याचा अर्थ एका वर्गाची दुसऱ्या वर्गावर दडपशाही असा न करतां 'वर्गसमन्वय' असा करतात. वर्गविग्रहाची तीव्रता कमी करणें म्हणजे दडपल्या गेलेल्या वर्गाचे हातीं असलेली दडपणाऱ्या वर्गाला उलथून टाकण्याचीं साधनें नष्ट करणें आणि त्यांचे लढ्याचे मार्ग बंद करणें होय, हें त्यांस मान्य नाहीं; तर वर्गविग्रहाची तीव्रता कमी करणें म्हणजे 'समन्वय' घडवून आणणें होय असें या राज्यशास्त्रज्ञांचें मत आहे.

उदाहरणार्थ : १९१७ सालच्या क्रान्तींत ज्या वेळीं शासनसंस्थेचा अर्थ काय आणि तिचें कार्य काय याचा प्रत्यक्ष व्यवहारांत साकल्यानें विचार करण्याची जरुरी निर्माण झाली, एवढेंच नव्हें तर त्याला अनुसरून प्रत्यक्ष कृति करण्याची वेळ आली, त्या वेळेला सर्व 'सोशलिस्ट रेव्होल्यूशनरी' आणि 'मेन्शेविक' यांनीं तत्काळ 'शासनसंस्था ही वर्गसमन्वय घडवून आणते' या मध्यमवर्गीय विचारसरणीचा आश्रय

घेतला. या दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांनीं जे अनेक लेख लिहिले आणि ठराव पास केले ते सर्व या मध्यमवर्गीय आणि 'समन्वयी' विचारसरणीनें ओतप्रोत भरलेले आहेत. शासनसंस्था ही एका विशिष्ट वर्गाच्या सत्तेचें साधन असतें आणि हा सत्ताधारी वर्ग आणि दुसऱ्या टोकाला असलेला, या सत्तेनें दडपला गेलेला वर्ग यांचा समन्वय घालतां येत नाहीं ही गोष्ट या मध्यमवर्गीय लोकशाहीवाल्यांना कधींच समजूं शकणार नाहीं. 'सोशलिस्ट रेव्होल्यूशनरी' आणि 'मेन्शेविक' यांचा शासनसंस्थेकडे बघण्याचा जो दृष्टिकोन आहे त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, हे पक्ष समाजवादी नसून समाजवादाची केवळ भाषा बोलणारे मध्यमवर्गीय लोकशाहीवाले आहेत. ( आम्हीं 'बोल्शेविक' फार पूर्वीपासून हेंच म्हणत आलेले आहोंत ).

दुसरी पद्धत : याचे उलट काउट्स्कीनें मार्क्सवादाला दिलेलें विकृत स्वरूप सूक्ष्म आणि फारच कौशल्यपूर्ण आहे. शास्त्रीय दृष्टीनें 'शासनसंस्था ही वर्गीय सत्तेचें साधन आहे' किंवा 'समाजांतील वर्गविग्रह हा कधींही न मिटणारा आहे' ही गोष्ट काउट्स्की अमान्य करीत नाहीं. हा सिद्धांत आपण एकदां मान्य केला म्हणजे त्यापासून खालील निष्कर्ष निघतो. शासनसंस्था ही जर 'अटळ वर्गविग्रहाचा परिणाम आहे' आणि जर ती 'समाजावर सत्ता गाजविणारी आणि समाजापासून जास्त जास्त अलग होत जाणारी शक्ति आहे,' तर हेंही स्पष्ट आहे कीं दडपलेल्या वर्गाची मुक्तता सुद्धां सशस्त्र क्रान्तीशिवाय अशक्य आहे, एवढेंच नव्हे तर सत्तारूढ वर्गानें निर्माण केलेले आणि जनता विन्मुख असलेलें शासनसंस्थेचें यंत्र मोडून टाकल्याशिवायही ती अशक्य आहे. परंतु या निष्कर्षाचा काउट्स्कीला विसर तरी पडतो किंवा त्याकडे तो दुर्लक्ष तरी करतो: तात्विकदृष्ट्या अत्यंत तर्कशुद्ध असलेला हा निष्कर्ष मार्क्सनें क्रान्तीच्या प्रत्यक्ष कार्याचें ऐतिहासिक विवेचन करूनच काढला आहे असें आपणांस आढळून येईल. आणि नेमक्या याच निष्कर्षाकडे काउट्स्कीनें दुर्लक्ष केलें आहे आणि त्याला विकृत स्वरूप दिलें आहे हें आम्ही सविस्तरपणें दाखविणार आहोंत.

## २ सैन्य, तुरुंग इत्यादि विशिष्ट संस्था

एंगल्स पुढें लिहितो : " आजच्या शासनसंस्थेचें हें वैशिष्टय आहे कीं, तिच्या अमलाखालीं येणाऱ्या जनतेची प्रादेशिक विभागणी झालेली असते. पुरातनकालीन टोळीप्रधान समाजव्यवस्थेंत अशी परिस्थिति नव्हती."

अशा तऱ्हेची प्रादेशिक विभागणी आपणांस आज नैसर्गिक वाटते परंतु त्याकरितां जुन्या टोळी आणि जमातप्रधान समाजव्यवस्थेविरुद्ध प्रदीर्घ लढा लढावा लागला आहे.

" दुसरें वैशिष्टय म्हणजे ' लोक-शासन-यंत्राची ' निर्मिती. परंतु आतां हें ' यंत्र ' आणि ' आम जनतेची सशस्त्र संघटना ' या दोन्ही एक नसतात. समाजांत वर्गविग्रह निर्माण झाल्यानें आम जनतेच्या स्वयंप्रेरित सशस्त्र संघटनेचें अस्तित्व अशक्य होतें. आणि म्हणूनच या नवीन तऱ्हेच्या ' लोक-शासन-यंत्राची ' आवश्यकता भासूं लागते... अशा तऱ्हेची ' संघटित शक्ति ' सर्व शासनसंस्थांत अस्तित्वांत असते. आणि त्यांत फक्त सैन्याचाच अन्तर्भाव होतो असें नव्हे तर त्याला पूरक असणाऱ्या तुरुंग आणि दडपशाही करणाऱ्या इतर संघटना यांचाही समावेश होतो. प्राचीन जमातसमाजांत यांतील कांहींच अस्तित्वांत नव्हतें."

शासनसंस्था म्हणून ओळखली जाणारी ही शक्ति समाजांतूनच निर्माण झालेली असते, ती समाजावर सत्ता गाजविते आणि समाजापासून जास्त जास्त अलग होत असते. या शक्तिसंबंधीं जास्त विवेचन एंगल्सनें केलें आहे. ही शक्ति मुख्यतः कशांत सामावलेली असते ? सशस्त्र लोकांचीं खास संघटना आणि तिला मदत करणाऱ्या तुरुंगासारख्या इतर संस्था यांच्यांतच ती सामावलेली असते.

वर जो आम्हीं सशस्त्र लोकांच्या विशिष्ट संघटनेचा उल्लेख केला तो रास्तच आहे. कारण प्रत्येक शासनसंस्थेचें वैशिष्टय असलेली ही ' खास संघटना ' आणि ' आम सशस्त्र जनता, ' तिची ' स्वयंप्रेरित सशस्त्र संघटना, ' या दोन्ही एकच नसतात.

ज्या गोष्टी प्रचलित संधिसाधु तत्त्वज्ञान, फारशा विचारांत न घेण्या-सारख्या, सर्वसम्मत आणि त्यांच्या दीर्घकाल आस्तित्वामुळें किंवा दृढ-मूल पूर्वग्रहामुळें म्हणा पाहिजेतर 'पवित्र' मानतें, त्याच गोष्टींकडे, इतर मोठमोठ्या क्रान्तिकारकांप्रमाणें एंगल्सनेंही वर्गजागृत कामगारांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शासनसंस्थेच्या शक्तीची प्रमुख साधनें खडे सैन्य व पोलीस ही आहेत. परंतु याशिवाय दुसरें काय असणें शक्य आहे?

एंगल्स ज्यांना उद्देशून लिहीत होता त्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या कालांतील युरोपमधील जनतेच्या दृष्टीनें यापेक्षां निराळें कांहीं असणेंच शक्य नव्हतें, कारण क्रान्तीच्या प्रत्यक्ष अनुभवांतून ती कधीं गेली नव्हती किंवा क्रान्तीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधीही तिला कधीं मिळाली नव्हती. 'आम जनतेची स्वयंप्रेरित सशस्त्र संघटना' म्हणजे काय हें तिला समजतच नाहीं. समाजावर सत्ता गाजविणाऱ्या आणि समाजापासून जास्त जास्त अलग होत जाणाऱ्या शासनसंस्थेची आणि तिचा आधार असलेल्या सशस्त्र सैनिकांच्या संघटनेची (पोलीस, खडें सैन्य इ०) जरुरी कां निर्माण होते या प्रश्नाला उत्तर म्हणून पश्चिम युरोपमधील आणि रशियांतील संधिसाधु लोक सामाजिक जीव-नांतील गुंतागुंत, कामाची विभागणी इत्यादि गोष्टींचा उल्लेख करतात आणि आपल्या मताला आधार म्हणून स्पेन्सर आणि मेकॅलोव्हस्की यांचीं चार उसनीं वाक्यें उधृत करतात.

त्यांनीं दिलेलीं हीं कारणें प्रथमदर्शनीं 'शास्त्रीय' वाटतात, त्यामुळें बहुजनसमाजाची मति गुंग होते आणि 'ज्यांच्या हितसंबंधांचा कधींही समन्वय घालतां येणार नाहीं अशा परस्परविरोधी वर्गांत समाजाची विभागणी झाली आहे' हा मूलभूत आणि महत्त्वाचा प्रश्न बाजूला पडतो.

अशा रीतीनें जर समाज विभागला गेला नसता तर 'आम जन-तेची स्वयंप्रेरित सशस्त्र संघटना' आणि झाडांच्या फांद्यावरून उड्या मारणाऱ्या माकडांची, इतिहासपूर्व मानवाची किंवा जमातीच्या समा-जांतील मनुष्यांची संघटना या दोन्ही संघटनांत गुंतागुंत आणि तांत्रिक

श्रेष्ठत्व या दृष्टीनें फरक पडला असता हें खरें, परंतु अशी संघटना निश्चित् शक्य झाली असती.

आज ही गोष्ट अशक्य आहे, कारण 'सुसंस्कृत' समाज, ज्यांच्या हितसंबंधांचा कधींही समन्वय घालतां येणार नाहीं अशा परस्परविरोधी वर्गांत विभागला गेला आहे. आणि असा समाज जर 'स्वयंप्रेरित सशस्त्र' बनला तर त्यामुळें या विरोधी वर्गांत सशस्त्र लढा होईल. या परिस्थितीमुळेंच शासनसंस्था निर्माण होते आणि 'सशस्त्र सैनिकांच्या खास संघटनेच्या' स्वरूपांत एक शक्ति निर्माण केली जाते. प्रत्येक क्रान्ति शासनसंस्थेचा नाश करून, सत्ताधारी वर्ग आपल्याच फक्त उपयोगी पडेल अशी 'सशस्त्र सैन्याची खास संघटना' पुन्हां स्थापन करण्याचा प्रयत्न कसा करतो, आणि पिळला जाणारा वर्ग आपल्याला –पिळणाऱ्या वर्गाला नव्हे–उपयोगी पडेल अशी संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न कसा करतो, हें आपणांस प्रत्यक्षपणें दाखवून देते.

प्रत्येक क्रान्तींत 'सशस्त्र सैनिकांची खास संघटना' आणि 'आम जनतेची स्वयंप्रेरित सशस्त्र संघटना' यांच्या परस्पर संबंधांचा जो प्रश्न प्रत्यक्षपणें, उघडपणें आणि जनतेच्या प्रत्यक्ष कृतीच्या स्वरूपांत निर्माण होतो तोच प्रश्न एंगल्सनें वरील विवेचनांत तात्त्विक स्वरूपांत निर्माण केला आहे. युरोपांतील आणि रशियांतील क्रान्त्यांतून ही गोष्ट प्रत्यक्षपणें कशी सिद्ध होते हें आपण पाहूंच.

परंतु त्याचे आधीं आपण पुन्हां एकदां एंगल्सच्या विवेचनाकडे वळूं:

त्यानें असें दाखवून दिलें आहे कीं, कांहीं वेळेला, उदा० उत्तर अमेरिकेच्या कांहीं संस्थानांतून, हें 'लोक-शासन-यंत्र' कमकुवत असलें तरी सर्वसाधारणपणें बलिष्ठ होण्याकडेच त्याची प्रवृत्ती असतें. (असें म्हणतांना एंगल्सच्या डोळ्यासमोर भांडवलशाहींत क्वचित् आढळणारे अपवाद आणि साम्राज्यशाहीच्या पूर्वीच्या कालांतील, स्वतंत्र वसाहतवाल्यांचें वर्चस्व असलेलीं उत्तर अमेरिकेंतील कांहीं संस्थानें होतीं.)

"...देशांतील अन्तर्गत विरोध ज्या मानानें तीव्र होत जातो आणि जवळच्या देशांचें क्षेत्रफळ आणि लोकसंख्या ज्या मानानें वाढत जाते

त्या मानानें हें ( लोक-शासन-यंत्र ) बलिष्ठ होत जातें. आजचा युरोप हें याचें उत्तम उदाहरण आहे. युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांतून वर्गयुद्ध आणि नवीन नवीन प्रदेश जिंकण्याची स्पर्धा यामुळें हें 'लोक-शासन-यंत्र' इतकें बलिष्ठ झालें आहे कीं, तें सर्व समाजालाच नव्हें तर शासन-संस्थेलाही गिळून टाकील अशी भीति निर्माण झाली आहे."

वरील मजकूर १८९१ सालानंतर लिहिला असणें शक्य नाहीं. कारण एंगल्सच्या शेवटच्या प्रस्तावनेची तारीख १६ जून १८९१ ही आहे. भांडवलशाहीचें साम्राज्यशाहींत रूपांतर होणें याचा अर्थ मोठ-मोठे औद्योगिक ट्रस्ट निर्माण होऊन त्यांचे सर्व उद्योगधंद्यांवर प्रभुत्व निर्माण होणें, बँकांची प्रचंड प्रमाणावर वाढ होऊन त्या सर्वशक्तिमान् बनणें, नवीन वसाहती मिळविण्याचें धोरण फार मोठ्या प्रमाणावर आंखलें जाणें, असा आहे. या कालांत फ्रान्समध्यें साम्राज्यशाहीला नुकतांच परंतु स्पष्टपणें आरंभ झाला होता, जर्मनी आणि उत्तर अमेरिका या ठिकाणीं मात्र या आरंभाचें स्वरूप अत्यंत अस्पष्ट होतें. तेव्हां-पासून आतांपर्यंतच्या आणि विशेषतः १९१० सालापर्यंतच्या, सर्व जगाची 'साम्राज्यशाही चढाओढींतील' प्रतिस्पर्ध्यांत म्हणजेच मोठ-मोठ्या लुटारू राष्ट्रांत, वाटणी झाल्यानंतरच्या कालांत या 'नवे प्रदेश जिंकण्याच्या स्पर्धेनें' बराच दूरचा पल्ला गांठला आहे. त्या कालांत लष्करी आणि नाविक युद्ध साधनांत भयानक प्रमाणांत वाढ झाली आणि इंग्लंड आणि जर्मनी यांनीं जगाच्या स्वामित्वाकरितां, लुटीची फेरवांटणी करून घेण्याकरितां १९१४ सालीं लुटारू युद्धाला सुरुवात केली. या महायुद्धाकरितां सर्वभक्षक शासनसंस्थेनें समाजाच्या सर्व शक्तींचा जो संहार चालविला आहे त्यामुळें तो भयंकर अरिष्टाच्या कांठाला येऊन पोंचला आहे.

'नवे नवे प्रदेश जिंकण्याची स्पर्धा' हें इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाचें एक महत्वाचें वैशिष्ट्य असल्याचें एंगल्सनें १८९१ सालींच प्रतिपादन केलें होतें. परंतु १९१४ ते १९१७ या कालांत जेव्हां ही स्पर्धा अनंत पटीनें वाढली आणि तिनें साम्राज्यशाही युद्धाला जन्म दिला तेव्हां मात्र

' राष्ट्रीय दुरभिमानी ' सोशलिस्टांनीं बदमाषपणानें आपापल्या देशांतील भांडवलदारांच्या लुटारू वृत्तीला संरक्षण देऊन ' मातृभूमीचें संरक्षण, ' ' लोकशाहीचें आणि क्रान्तीचें रक्षण ' यासारख्या फसव्या घोषणा करून आपल्या संधिसाधूपणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला.

## ३ शासनसंस्था म्हणजे दडपलेल्या वर्गांची पिळणूक करण्याचें साधन होय.

समाजावर सत्ता गाजविणाऱ्या या ' खास संघटित शक्तीला ' पोसण्याकरितां जनतेवर कर लादण्याची आणि सरकारी कर्ज उभारण्याची आवश्यकता निर्माण होते.

एंगल्स म्हणतो, " कर वसूल करण्याचा हक्क ' आणि या ' खास संघटित शक्तीवर ' ताबा या दोन गोष्टी प्राप्त झाल्यानंतर सरकारी अधिकारी हे समाजाचे, समाजावर सत्ता गाजविणारे ' घटक ' बनतात. पूर्वीच्या जमातसमाजांत जमातीच्या प्रमुखांना जो मान आणि मोठेपणा स्वखुषीनें आणि सहजपणें दिला जाई तो मान आणि मोठेपणा या अधिकाऱ्यांना मिळाला तरी तेवढ्यानें त्यांचें समाधान होत नाहीं..."

सरकारी अधिकाऱ्यांचे विशेष हक्क आणि त्यांची इभ्रत यांचें संरक्षण करण्याकरितां कायदे केले जातात. " टोळीच्या सर्व पुढाऱ्यांना मिळून जेवढे अधिकार असत त्याहीपेक्षां जास्त अधिकार यःकश्चित् शिपायाला असतात. परंतु टोळीच्या प्रमुखाला जो मान सहजपणें आणि स्वखुषीनें दिला जाई त्याचा आजच्या पुढारलेल्या देशांतील सरसेनापतीलासुद्धां हेवा वाटला असता. "

शासनसंस्थेच्या शक्तीची केंद्रें या दृष्टीनें सरकारी अधिकाऱ्यांच्या विशेष हक्कांचा प्रश्न या ठिकाणीं निर्माण केला गेलेला आहे. मुख्य मुद्दा असा आहे कीं, या अधिकाऱ्यांना समाजाच्यापेक्षांही वरचें स्थान कशामुळें प्राप्त होतें ! हा तात्विक प्रश्न १८७१ सालीं पॅरिस कम्यूननें प्रत्यक्ष व्यवहारांत कसा सोडविला आणि काऊट्स्कीनें १९१२ सालीं आपल्या प्रतिक्रान्तिकारक वर्तनानें तो कसा डावलला हें आपण पाहूं.

"...वर्गकलह काबूंत ठेवण्याची आवश्यकता भासूं लागल्यामुळें शासनसंस्था निर्माण झाली. परंतु त्याचबरोबर समाजांत वर्गविग्रह अस्तित्वांत आल्यानंतर ती निर्माण झालेली असल्यानें साधारणतः ती समाजांत आर्थिक दृष्ट्या सर्वांत श्रेष्ठ आणि बलिष्ठ वर्गाची शासनसंस्था असते. हा बलिष्ठ वर्ग शासनसंस्थेच्या साहाय्यानें राजकीय दृष्ट्याही सत्ताधारी बनतो आणि अशा रीतीनें त्याला दडपलेल्या वर्गाला काबूंत ठेवण्याचें आणि त्याची पिळवणूक करण्याचें, एक नवीनच साधन प्राप्त होतें.

प्राचीन काळांतील आणि सरंजामशाहीच्या काळांतील शासनसंस्थाच तेवढ्या गुलामांची आणि भूदासांची पिळणूक करण्याचें साधन होत्या असें नव्हे तर :

"......आजची प्रातिनिधिक शासनसंस्था ही सुद्धां भांडवलाच्या ( म्हणजेच भांडवलदारांच्या ) हातांतले मोलमजुरी करणाऱ्यांची पिळणूक करण्याचें एक साधनच आहे. परंतु कांहीं वेळेस अशी अपवादात्मक परिस्थिती येते कीं, सतत लढणारे समाजांतील वर्ग तुल्यबल होतात आणि अशा वेळेला शासनसंस्था ही बाह्यतः या दोन वर्गांत तडजोड घडवून आणणारी संस्था वाटूं लागते आणि तेवढ्यापुरतें शासनसंस्थेला या दोन्ही वर्गांपासून अलग अस्तित्व प्राप्त होतें..."

सतराव्या आणि अठराव्या शतकांतील अनिर्बंध राजेशाही, पहिल्या आणि दुसऱ्या फ्रेंच साम्राज्यांतील बोनापार्टचें सरकार आणि जर्मनींतील बिस्मार्कचें सरकार हीं याचीं उदाहरणें आहेत.

गणराज्य असलेल्या आजच्या (१९१७) रशियांतील केरेन्स्कीच्या सरकारचीहि अशीच परिस्थिती आहे. आज रशियांतील सोव्हिएट संघटना, तींत असलेल्या मध्यमवर्गीय लोकशाहीवाल्यांच्या पुढारीपणामुळें दुर्बल झाली आहे आणि ती बरखास्त करून टाकण्याची ताकद भांडवलदारांच्यांत अजून आली नाहीं अशी परिस्थिती असतांना या केरेन्स्की सरकारनें क्रान्तिकारक कामगारांच्यावर दडपशाही करण्यास प्रारंभ केला आहे.

एंगल्स पुढें म्हणतो, " लोकशाही गणराज्य सरकार आस्तित्वांत असतांना पैसा आपली सत्ता अप्रत्यक्षपणें परंतु जास्त परिणामकारक रीतीनें गाजवितो." हें करण्याचे दोन मार्ग असतात. एक, 'सरकारी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष लांच देणें.' हा प्रकार मुख्यत: अमेरिकेंत आढळतो. आणि दुसरा, सरकार आणि सट्टेबाजार यांची गट्टी होणें. हा प्रकार फ्रान्स व अमेरिका या दोन्ही ठिकाणीं आढळतो.

लोकशाही गणराज्याचें निरनिराळें स्वरूप असलेल्या सर्व देशांतून पैशाचें प्रभुत्व प्रस्थापित करण्याचें आणि त्याचें संरक्षण करण्याचे वरील दोनही मार्ग साम्राज्यशाहीनें आणि बँकांच्या सत्तेनें आज असाधारण कौशल्यानें उपयोगांत आणले आहेत. उदाहरणार्थ, रशियांत लोकशाही सरकार स्थापन झाल्यानंतर पहिले कांहीं महिने, सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी, मेन्शेविक आणि भांडवलदार यांचा संबंध जुळून आल्यानंतरच्या या 'मधुचंद्राच्या' कालांत, भांडवलदारांचेवर, त्यांचे लुटारूपणावर आणि लढाईतील कंत्राटांच्या द्वारें सरकारी तिजोरीवर हात मारण्याच्या त्यांच्या पद्धतिवर बंधनें घालण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला, सर्वपक्षीय मंत्रिमंडळांत, पालिचिन्स्कीनें सतत आणि कसून विरोध केला. पुढें पालिचिन्स्कीनें राजिनामा दिल्यानंतर (त्याचे जागीं दुसरा एक 'पालिचिन्स्की' आला एवढेंच !), त्याला भांडवलदारांनीं दरसाल १ लक्ष २० हजार रूबल्स पगाराची सुखासीन नौकरी बहाल केली. याला आपण काय म्हणणार ? प्रत्यक्ष लांच कीं अप्रत्यक्ष ? यावरून सरकार व भांडवलदार यांचें 'संगनमत' झालें होतें म्हणावयाचें कीं त्यांचा केवळ 'स्नेह' होता असें म्हणावयाचें ? पालिचिन्स्की सारखेच चरनॉव्ह, सरटेलिस, ॲव्हकार्सेंटव्हिस, स्कोबेव्हिस हे जे लोक आहेत त्यांचें कार्य काय ? राष्ट्रीय तिजोरीची भरमसाट लूट करणाऱ्या लक्षाधिशांचे ते प्रत्यक्ष हस्तक आहेत कीं अप्रत्यक्ष ?

अशा रीतीनें लोकशाही गणराज्याखालीं पैशाचें समाजावरील प्रभुत्व जास्त सुरक्षित असतें कारण ते भांडवलशाहीच्या सदोष राजकीय बाह्य स्वरूपावर अवलंबून नसतें. 'लोकशाही सरकार' हें भांडवशाहीचें

सर्वोत्तम राजकीय कवच आहे आणि हें कवच एकदां हस्तगत झाल्यानंतर भांडवलशाही, समाजावरील आपली सत्ता इतक्या अभेद्य आणि भक्कम रीतीनें प्रस्थापित करतें (अर्थात् पालिचिन्स्की, चरनॉव्ह, सरटेलिस इत्यादींच्या सहाय्यानें) कीं या भांडवली–लोकशाही सरकारचें स्वरूप, त्यांतील व्यक्ती आणि पक्ष यांच्यांत कितीही बदल झाला तरी त्यामुळें या सत्तेला धोका पोंचत नाहीं.

'प्रौढमतदान पद्धति' ही सुद्धां भांडवली सत्तेच्याच हातांतील एक साधन असल्याचें एंगल्सनें स्पष्टपणें म्हटलें आहे, हेंही आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. जर्मनींतील लोकशाहीच्या दीर्घकालच्या अनुभवाचें समालोचन करून एंगल्स म्हणतो कीं, प्रौढमतदान पद्धतीचें अस्तित्व ही "कामगार वर्ग वयांत आल्याची खूण आहे एवढेंच. शासनसंस्थेच्या आजच्या स्वरूपांत यापेक्षां जास्त अर्थ त्यांतून आजही निघूं शकत नाहीं आणि पुढेंही निघूं शकणार नाहीं."

'सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी' आणि 'मेन्शेविक' यांच्यासारखे मध्यमवर्गीय लोकशाहीवाले आणि त्यांच्याच जातीचे युरोपमधील इतर राष्ट्रीय दुरभिमानी सोशालिस्ट आणि सुधारणावादी यांच्या, या प्रौढमतदान पद्धतीपासून जास्त अपेक्षा असतात. 'वर्तमान शासनसंस्थेच्या' अंमलाखालींसुद्धां प्रौढमतदान पद्धतीचा उपयोग, कष्ट करणाऱ्या बहुजनसमाजाच्या आशा आकांक्षा जाहीर करून त्या पूर्ण करून घेण्याकडे करतां येईल अशी त्यांची चुकीची कल्पना असते. आणि हीच कल्पना इतरांच्याही डोक्यांत भरवून देण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात.

या 'चुकीच्या कल्पनेचा' आम्ही या ठिकाणीं फक्त उल्लेख केला आहे. कारण आम्हांस हें दाखवावयाचें आहे कीं अधिकृत (म्हणजेच संधिसाधु) सोशालिस्ट पक्षांनीं चालविलेल्या प्रचारांत एंगल्सच्या या अत्यंत स्पष्ट आणि निश्चित् विधानाला पदोपदीं विकृत स्वरूप दिलें जात आहे. वरील 'कल्पना' किती संपूर्णपणें 'चूक' आहे आणि एंगल्सनेंही ती कशी त्याज्य ठरविली आहे याचें संपूर्ण विवेचन पुढें मार्क्स आणि एंगल्स यांच्या अर्वाचीन शासनसंस्थेबद्दलच्या मतांचें परीक्षण करतांना करूं.

आपल्या मतांचा सर्वसाधारण गोषवारा एंगल्सनें आपल्या वरील प्रसिद्ध ग्रंथांत खालीलप्रमाणें दिलेला आहे.

" ... म्हणून शासनसंस्था अनादि कालापासून चालत आलेली नाहीं. तिच्याशिवाय कारभार चालणारे समाज, फार काय ज्यांना शासनसंस्था आणि शासनशक्ति यांची कल्पनासुद्धां नव्हती असे समाज अस्तित्वांत होते. आर्थिक प्रगति आणि समाजाची परस्परविरोधी वर्गांत विभागणी होणें या गोष्टी निश्चितपणें परस्परांशीं निगडित आहेत. आर्थिक प्रगतीनें एक विशिष्ट मर्यादा गाठल्यानंतर, समाजांतील वर्ग-विभागणीमुळेंच शासनसंस्थेची आवश्यकता निर्माण झाली. आज उत्पादनशक्तीची प्रगति अत्यंत झपाट्यानें, अशा एका अवस्थेला पोंचत आहे कीं, त्या अवस्थेंत समाजांत वर्गविभागणी असण्याची जरुरी रहात नाहीं. एवढेंच नव्हें तर त्यांचें अस्तित्व निश्चितपणें उत्पादनांत अडथळा निर्माण करतें. पहिल्या अवस्थेंत जितक्या अटळपणें वर्गांची निर्मिती झाली तितक्याच अटळपणें आतां त्यांचा नाशही होईल; आणि त्यांच्या नाशाबरोबर शासनसंस्थेचाही अटळपणें नाश होईल. समाजानें उत्पादनाची पुनर्घटना, उत्पादकांच्या राजीखुषीच्या आणि समान सहकार्याच्या पायावर केल्यानंतर शासनसंस्थेची योग्य ठिकाणीं म्हणजे चरका आणि परशु यांचे बरोबर पुराणवस्तुसंग्रहालयांत रवानगी केली जाईल."

आजच्या 'सोशल डेमोक्रॅटिक' पक्षाच्या प्रचारांत आणि चळवळी-वरील वाङ्मयांत वरील उतारा आपणांस सहसा आढळत नाहीं. आणि ज्या वेळेला तो आढळतो त्यावेळीं त्याचा उल्लेख देवळांत भजन करण्या-प्रमाणें, म्हणजे एंगल्सचा जाहीरपणानें 'मान' राखण्याकरितां म्हणून, केलेला असतो. परंतु 'सर्व शासनयंत्र... पुराणवस्तुसंग्रहालयांत' पाठविण्याच्या कल्पनेपाठीमागें केवढी विशाल आणि सखोल क्रांति एंगल्सनें गृहित धरलेली आहे याचा ते विचारच करीत नाहींत. खरें म्हणजे बरेच वेळेला एंगल्स शासनयंत्र कशाला म्हणतो हेंच त्यांना समजत नाहीं, असें आपणास आढळून येईल.

### ४ शासनसंस्था ' विरून जाणें '
### आणि बलाधिष्ठित क्रान्ति (Violent Revolution)

'शासनसंस्था विरून जाईल' हे एंगल्सचे शब्द फार प्रसिद्ध आहेत, त्यांचा उल्लेखही फार वेळेला केला गेलेला आहे, आणि त्यावरून आज मार्क्सवादाच्या नांवाखालीं विकलें जाणारें तत्त्वज्ञान किती संधिसाधु आहे हेंही स्पष्ट होतें आणि म्हणून या शब्दांचा सांगोपांग विचार करणें जरूर आहे. ज्या उताऱ्यांत हे शब्द आले आहेत तो सर्वच उतारा खालीं उधृत केला आहे.

"राजकीय सत्ता हस्तगत केल्यानंतर कामगार प्रथमतः उत्पादनाचीं साधनें सरकारच्या मालकीचीं करतात. परंतु असें करण्यानें कामगार, समाजांतील एक वर्ग या दृष्टीनें कामगार वर्गाचा शेवट करतात. ते समाजांतील वर्गीय विभागणी आणि वर्गविग्रह याचा नाश करतात एवढेंच नव्हे तर शासनसंस्था या दृष्टीनें शासनसंस्थेचाही नाश करतात. समाजाची आतापर्यंतची प्रगति वर्गयुद्धांतून झालेली असल्यानें त्याला उत्पादनाची बाह्य चवकट कायम ठेवण्याकरितां म्हणजेच विद्यमान उत्पादनपद्धतींत (गुलामपद्धती, भूदासपद्धती, मोलमजुरीपद्धती) पिळल्या जाणाऱ्या वर्गांना पिळवणुकीच्या त्याच सामाजिक परिस्थितींत दडपून ठेवण्यासाठीं त्या त्या पद्धतींतील पिळणाऱ्या वर्गाच्या संघटनेची, म्हणजेच शासन-संस्थेची, जरूरी होती. शासनसंस्था हे एकंदर समाजाचें अधिकृत प्रातिनिधिक स्वरूप आणि संघटनात्मक प्रत्यक्ष मूर्त स्वरूप होतें. परंतु विशिष्ट कालांत जो वर्ग समाजाचा प्रातिनिधिक असतो (मध्ययुगाचें पूर्वी गुलामांचे मालक, मध्ययुगांत सरंजामदार आणि आज भांडवलदार) त्या वर्गाचीच शासनसंस्था असते. एवढ्याच दृष्टीनें वरील विधान बरोबर आहे. शेवटीं शासनसंस्था जेव्हां खरोखरच सर्व समाजाची प्रतिनिधी बनते तेव्हां तिचें अस्तित्वच अनवश्यक होतें. दडपून टाकण्यासारखा वर्गच समाजांत अस्तित्वांत राहिला नाहीं, आणि उत्पादनांतील अनागोंदीपणामुळें निर्माण झालेली प्रत्येक व्यक्तीची जीवनाकरितां चाललेली धडपड आणि वर्गीयसत्ता यापासून निर्माण होणारे तीव्र संघर्ष नाहींसे केले गेले म्हणजे

असा वर्ग रहातही नाहीं, म्हणजे मग सहाजीकच त्याकरितां आवश्यक असणाऱ्या विशिष्ट शक्तीची म्हणजेच शासनसंस्थेची जरूरी रहात नाहीं. समाजाची खरीखुरी प्रतिनिधी या नात्यानें, समाजाच्या नांवानें उत्पादनाची साधनें ताब्यांत घेणें ही जी पहिली गोष्ट शासनसंस्था करते तीच गोष्ट शासनसंस्था या स्वतंत्र नात्यानें तिची शेवटची कृती ठरते. सामाजिक संबंधांच्या एकामागून एक निरनिराळ्या क्षेत्रांत राजकीय हस्तक्षेप अनवश्यक होऊं लागतो आणि शेवटीं आपोआप बंद होतो. जनतेवर गाजविल्या जाणाऱ्या सत्तेची जागा, वस्तूवरील देखरेख आणि उत्पादन क्रियेचें मार्गदर्शन यांनीं घेतली जातें. शासनसंस्था 'नष्ट' केली जात नाहीं तर ती 'विरून' जाते. 'स्वतंत्र लोकांची शासनसंस्था' या घोषणेचा अर्थ, चळवळीचे दृष्टीनें कांहीं वेळेला त्या घोषणेची आवश्यकता आणि शास्त्रीय दृष्ट्यां तिचें अपूर्णत्व; त्याचप्रमाणें अराज्यवाद्यांची 'एका रात्रींत शासनसंस्था नाहींशी करण्याची' मागणी, या दोहोंचा विचार, आपण वरील विवेचनाला अनुसरूनच केला पाहिजे." [एंगल्स—अँटी डयूहरिंग पा० ३१४-३१५ ].

एंगल्सच्या वरील विचारपरिप्लुत उताऱ्यांतील एकाच मुद्याला आजच्या निरनिराळ्या सोशलिस्ट पक्षांच्या मतप्रणालींत स्थान आहे असें जर आपण म्हटलें तर तें मुळींच चूक होणार नाहीं. तो मुद्दा असा. शासनसंस्था एकदम नष्ट केली पाहिजे या अराज्यवाद्यांचें मताचें उलट मार्क्सचें असें म्हणणें आहे कीं, शासनसंस्था विरून जाते. परंतु अशा रीतीनें मार्क्सवादाला कमजोर करणें म्हणजे त्याला संधिसाधु तत्त्वज्ञान बनविणें आहे. असा अर्थ करण्यानें हळू हळूंच नव्हे तर क्रमशः बदल होत जातो या कल्पनेचें अस्तित्व आणि टप्पे, वादळ, क्रान्ति या कल्पनांचा अभाव हे अस्पष्टपणें सूचित केले जातात. शासनसंस्था विरून जाण्यासंबंधीं आज ज्या प्रचलित कल्पना आहेत त्या क्रांतिविरोधी नसल्या तरी क्रांतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या खास आहेत.

मार्क्सवादाचा असा अर्थ लावणें म्हणजे त्याला अत्यंत अशिष्टपणानें विकृत स्वरूप देण्यासारखें आहे. ही गोष्ट भांडवलदारांच्याच फायद्याची

असते. तात्त्विक दृष्टीनें ही ‘ विकृती ’ वर उधृत केलेल्या एंगल्सच्या उताऱ्यांत जी अत्यंत महत्त्वाची परिस्थिती आणि महत्वाचे इतर मुद्दे सांगितले आहेत त्या सर्वांकडे संपूर्णपणें दुर्लक्ष करण्यावरच आधारलेली आहे.

एक : वरील उताऱ्यांत प्रारंभींच एंगल्सनें असें म्हटलें आहे कीं, राजकीय सत्ता हस्तगत करून कामगार वर्ग ‘ शासनसंस्थेचा शासन–संस्था या दृष्टीनें ’ नाश करतो. या वाक्याचा अर्थ काय याचा विचार करणें ‘ शिष्टसम्मत ’ मानलें जात नाहीं. त्याच्या अर्थाकडे संपूर्णपणें दुर्लक्ष तरी केलें जातें किंवा तो एंगल्समधील ‘ हेगेलवादी ’ दोषाचा नमुना तरी मानला जातो. खरें पाहतां या एकाच वाक्यांत जगांतील एका महान् कामगार क्रांतीच्या, १८७१ सालांतील पॅरिस-कम्यूनच्या, अनुभवाचें सार सांठविलेलें आहे. या क्रान्तीचें सांगोपांग विवेचन आम्ही पुढें योग्य ठिकाणीं करूं. या ठिकाणीं एंगल्सला असें सांगावयाचें आहे कीं, कामगारक्रांति भांडवलदारांच्या शासनसंस्थेचा नाश करते. उलट ‘विरून जाणें’ हा शब्दप्रयोग समाजवादी क्रांतिनंतर कामगारांच्या शासनसंस्थेचें जे अवशेष शिल्लक रहातात त्यांना उद्देशून केला आहे. एंगल्सचें असें म्हणणें आहे कीं भांडवदारांची शासनसंस्था ‘ विरून ’ जात नाहीं तर क्रांतिकालांत कामगारांनीं तिचा नाशच करावा लागतो. क्रांतीनंतर जी विरून जाते ती कामगारांची शासनसंस्था किंवा अर्धवट शासनसंस्था असते.

दोन : शासनसंस्था ही ‘ दडपशाही करणारी खास संघटना आहे. ’ शासनसंस्थेची ही अत्यंत सुंदर आणि विचारपूर्ण व्याख्या एंगल्सनें फार सोप्या शब्दांत दिलेली आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, भांडवलदारांचे फायद्याकरितां कामगारांचेवर, मूठभर श्रीमंतांच्या हिताचें संरक्षण करण्याकरितां कष्ट करणाऱ्या लक्षावधी लोकांवर दडपशाही करणाऱ्या या ‘ खास शक्तीची ’ जागा भांडवलदारांचेवर दडपशाही करणाऱ्या खास शक्तीनें, म्हणजेच कामगारांच्या हुकूमशाहीनें घेणें आवश्यक असते. ‘शासनसंस्थेचा शासनसंस्था म्हणून नाश करणें’ या वाक्याचा हाच अर्थ आहे. समाजाच्या नांवानें उत्पादनाच्या साधनावर मालकी प्रस्थापित करण्याची क्रिया ती हीच होय. अशा रीतीनें ‘ दडपशाही करणाऱ्या

एका खास शक्तीची ' ( भांडवलदारांच्या शासनसंस्थेची ) जागा ' दडपशाही करणाऱ्या दुसऱ्या खास शक्तीनें ' ( कामगारांच्या हुकूमशाहीनें ) घेण्याची क्रिया ' विरून जाण्याच्या ' पद्धतीनें होणें शक्य नाहीं.

तीन : एंगल्सनें शासनसंस्थेला उद्देशून ' विरून जाणें ', किंवा त्याहीपेक्षां जास्त विचारपूर्ण आणि सुंदर ' आपोआप नाहींशीं होणें ' हा जो शब्दप्रयोग केला आहे तो स्पष्टपणें आणि निश्चितपणें, शासनसंस्थेनें समाजाच्या नांवानें उत्पादनाच्या साधनावर मालकी हक्क प्रस्थापित केल्यानंतरच्या म्हणजेच समाजवादी क्रांतीनंतरच्या कालाला अनुलक्षून केला आहे. या कालांत शासनसंस्थेचें स्वरूप ' संपूर्ण लोकशाहीचें ' असतें हें आपणांस माहीतच आहे. परंतु मार्क्सवादाला बेमुर्वतखोरपणानें विकृत स्वरूप देण्याचा प्रयत्न करणाऱ्या संधिसाधूंच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं, एंगल्स या ठिकाणीं ' लोकशाही ' ' विरून ' जाण्यासंबंधीं किंवा ' आपोआप नाहींशीं ' होण्यासंबंधीं लिहीत आहे. प्रथम दर्शनीं हें जरा ' विचित्र ' वाटते; परंतु, लोकशाही हा सुद्धां शासनसंस्थेचाच एक प्रकार आहे आणि म्हणून शासनसंस्था ज्या वेळेला नाहींशीं होईल त्या वेळेला ' संपूर्ण लोकशाही ' शासनसंस्था सुद्धां नाहींशीं होईल ही गोष्ट ज्यांनीं लक्षांत घेतली नाहीं त्यांनाच फक्त हें समजणार नाहीं. भांडवलशाही शासनसंस्थेचा नाश फक्त क्रांतीच करूं शकेल आणि सर्वसाधारण शासनसंस्था म्हणजेच 'संपूर्ण लोकशाही' मात्र ' विरून ' जाईल.

चार : ' शासनसंस्था विरून जाईल ' हा आपला प्रसिद्ध सिद्धान्त मांडल्यानंतर लगेच एंगल्सनें हेंही स्पष्ट केलें कीं हा सिद्धान्त संधिसाधु आणि अराज्यवादी या दोघांच्याही विचारसरणीला सारखाच विरोधक आहे. परंतु असें म्हणून एंगल्सनें या सिद्धान्तापासून संधिसाधूंना उत्तर देणारा जो निष्कर्ष निघतो तोच फक्त स्पष्टपणें पुढें मांडला आहे.

' शासनसंस्था विरून जाते ' हा सिद्धान्त ज्यांनीं वाचला किंवा ऐकला आहे त्यांतील हजारांतील नऊशे नव्वद लोकांना हें माहीत नसतें किंवा त्यांच्या तें लक्षांत तरी नसतें कीं या सिद्धान्तापासून

एंगल्सनें जो निष्कर्ष काढला तो केवळ अराज्यवाद्यांच्याच विचारसरणीला विरोध करणारा नव्हता. उरलेल्या दहापैकीं नऊ लोकांना ' स्वतंत्र लोकांची शासनसंस्था' या विधानाचा अर्थ समजत नाहीं आणि या विधानावर केलेला हल्ला हा एंगल्सनें 'संधिसाधूंवर' चढविलेला हल्ला आहे हेंही त्यांना कळत नाहीं. इतिहास हा असा लिहिला जातो ! महान् क्रान्तिकारक सिद्धान्तांना, ध्यानांत येणार नाहीं इतक्या सूक्ष्म रीतीनें, खोटे स्वरूप देऊन त्यांना मध्यमवर्गीय तत्वज्ञानांत सामावण्याची हीच पद्धत असते ! जे निष्कर्ष अराज्यवाद्यांचे विरुद्ध होते त्यांचा मात्र हजारों वेळेला उल्लेख केला जातो, त्यांना आणखी विकृत स्वरूप दिलें जातें, कान किटेपर्यंत तें लोकांना पुन्हां पुन्हां ऐकविले जातात आणि त्यामुळें जनतेच्या मनावर त्यांचा घट्ट पगडा बसतो. परंतु जे निष्कर्ष संधिसाधूंच्या विरुद्ध आहेत ते ' दडपून ' ठेवले जातात आणि ' विसरले ' जातात.

' स्वतंत्र लोकांची शासनसंस्था ' हीं १८७० चे सुमारास जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यक्रमांतील एक मागणी आणि त्या पक्षाची राजकीय घोषणा होती. लोकशाहीच्या कल्पनेचें भारदस्त शब्दांत केलेलें मध्यमवर्गीय वर्णन एवढाच त्या घोषणेचा राजकीय अर्थ होता. यांत ' लोकशाही गणराज्याची ' कल्पना कायद्याच्या चवकटींत बसेल अशा रीतीनें सूचित केलेली होती. येवढ्याच करितां आणि केवळ प्रचाराच्या दृष्टीनें ' कांहीं काळ ' या घोषणेला 'पाठिंबा' देण्यास एंगल्स तयार होता.असें असलें तरी ही घोषणा मध्येमवर्गीयच होती. कारण त्यांत भांडवली लोकशाहीचा उदो उदो केलेला होता. एवढेंच नव्हे तर सर्वसाधारण शासनसंस्थेवर समाजवाद्यांनीं जी टीका केली होती त्या टीकेबद्दलचें संपूर्ण अज्ञानही त्यांत स्पष्टपणें दिसून येत होतें. भांडवली समाजव्यवस्था कायम असतांना, कामगारांचे दृष्टीनें सर्वांत फायद्याची शासनसंस्था या दृष्टीनें ' लोकशाही गणराज्याला ' आमचा संपूर्ण पाठिंबा आहे. परंतु जास्तींत जास्त लोकशाही प्रधान ' भांडवली गणराज्यां ' खालीं सुद्धां जनतेच्या कपाळीं असलेली मजुरीची गुलामगिरी टळत नाहीं हें आपण विसरतां कामा नये. शिवाय प्रत्येक शासनसंस्था ही

पिळल्या जाणाऱ्या जनतेला दडपून ठेवणारी एक ‘खास शक्ति’ असते आणि म्हणून कोणतीही शासनसंस्था ‘स्वतंत्र’ किंवा ‘स्वतंत्र जनतेची’ असूंच शकत नाहीं. ही गोष्ट मार्क्स आणि एंगल्स यांनीं १८७० चे सुमारास आपल्या अनुयायांना पुन्हां पुन्हां समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

पांच : ज्या ग्रंथांतील शासनसंस्था विरून जाण्यासंबंधीचा मुद्दा सर्वांच्या परिचयाचा आहे त्याच ग्रंथांत एंगल्सनें बलाधिष्ठित क्रान्तीच्या महत्वा-बद्दलसुद्धां चर्चा केली आहे. बलाधिष्ठित क्रान्तीच्या कार्याचें एंगल्सनें केलेले ऐतिहासिक विवेचन अत्यंत काव्यमय आहे. हें विवेचन कोणा-च्याच ध्यानांत नसतें एवढेंच नव्हे तर या विवेचनाचें महत्त्व काय या संबंधीं बोलणें किंवा चर्चा करणें हें आजच्या सोशालिस्ट पक्षांत ‘शिष्ट-सम्मत’ मानलें जात नाहीं आणि या पक्षानें जनतेमध्यें चालविलेल्या प्रचारांत आणि चळवळींत त्याचा मागमूसहीं नसतो. खरी गोष्ट अशी आहे कीं, ‘शासनसंस्था विरून जाणें’ ही संपूर्ण कल्पना आणि ‘बला-धिष्ठित क्रान्तीची’ कल्पना या एकमेकींशीं अलग करतां न येण्याइतक्या निगडित आहेत.

एंगल्स म्हणतो, “ही जबरदस्ती इतिहासांत एक निराळेंच (निव्वळ सैतानी शक्तीपेक्षां निराळें) कार्य, क्रान्तिकारक कार्य, करीत असतें. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणें ‘प्रत्येक जुन्या समाजाच्या पोटीं नव्या समा-जाचा जन्म होत असतांना ही शक्ति सुइणीचें कार्य करते, या शक्तीच्या सहाय्यानेंच सामाजिक प्रगति आपला मार्ग आक्रमण करते. आणि आपल्या वाटेंत येणारी जुनी, निर्जीव, दगडाप्रमाणें घट्ट बनलेली राज-कीय कवचें फोडून टाकते.’–ड्युहरिंगच्या लिखाणांत याचा कोठेंही उल्लेख नाहीं. पिळणुकीची विद्यमान आर्थिक पद्धत मोडून काढण्याकरितां ‘जबरदस्तीचा’ उपयोग करावा लागण्याची शक्यता आहे हें तो कण्हत कुंथत मान्य करतो. परंतु त्याचबरोबर तो असेंही म्हणतो कीं, ही ‘दुर्दै-वाची’ गोष्ट आहे कारण ‘जबरदस्ती’ आपला उपयोग करणाऱ्या माणसाला नेहमीच अधोगतीला नेत असते. तरी बरें कीं, प्रत्येक यशस्वी

क्रान्ति समाजाच्या नैतिक आणि भौतिक प्रगतीला पूरकच झालेली आहे. आणि हें त्यानें जर्मनींत राहून म्हणावें हेंही आश्चर्यच आहे. कारण 'तीस वर्षांच्या' युद्धांत सहन कराव्या लागलेल्या अपमानामुळें जर्मनीच्या राष्ट्रीय जीवनांत जी गुलामी वृत्ती आलेली आहे, ती घालविणें एवढा तरी तेथें बलाधिष्ठित क्रान्तीचा–जी जर्मनीवर लादली जाईल अशी शक्यता दिसत आहे–निश्चित फायदा होणार आहे. आणखी आश्चर्य असें कीं ही निर्जीव, नेभळट, निष्क्रीय आणि भिक्षुकी विचारसरणी इतिहासांतील सर्वांत क्रान्तिकारक पक्षावर आपलें प्रभुत्व गाजवूं पहात आहे." [अँटीड्युहरिंग–भाग २ रा. चवथ्या प्रकरणाचा शेवटचा भाग].

बलाधिष्ठित क्रान्तीकडे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें लक्ष वेधण्याचा एंगल्सनें १८७८ सालांपासून १८९४ सालांपर्यंत, म्हणजे त्याच्या मृत्यू-पर्यंत, सतत प्रयत्न केला. या क्रान्तीची वर केलेली स्तुति आणि 'शासनसंस्था विरून' जाण्यासंबंधींचा सिद्धान्त यांचा समन्वय कसा घालावयाचा ?

यांचा समन्वय सहसा स्वहितावर लक्ष ठेऊन, तत्त्वशून्यपणानें आणि तर्कदुष्टपणानें एकाद्याच, आणि विशेषतः अधिकारी वर्गाला रुचेल अशा मुद्यावर जास्त भर देऊन घातला जातो. आणि शंभरांतील नव्याण्णव वेळेला 'शासनसंस्था विरून जाणें' याच मुद्यावर भर दिला जातो. विरोध-विकास-वादाची जागा स्वहितवादानें घेतली जाते—आणि विद्यमान सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या मार्क्सवादावरील अधिकृत वाङ्मयांत ही गोष्ट नेहमीं आणि फार मोठ्या प्रमाणावर आढळते. अशी गल्लत करणें यांत नवीन कांहींच नाहीं, ग्रीक तत्त्वज्ञानाच्या बाबतींतही ती आढळून येते. मार्क्सवादाला जर संधिसाधु तत्त्वज्ञान बनवावयाचें असेल तर विरोध–विकास–वादाची जागा स्वहित–वादाला देणें हाच जनतेला फसविण्याचा सर्वांत सोपा मार्ग असतो; त्यामुळें एक प्रकारें खोटें समाधान लाभतें, प्रगतीच्या सर्व बाजू आणि सर्व अवस्था विचारांत घेतल्याचा आभास निर्माण होतो, परंतु खरें पहातां त्यामुळें सामाजिक प्रगतीच्या मार्गासंबंधीं कोणतीच निश्चित आणि क्रान्तिकारक कल्पना मांडली जात नाहीं.

मार्क्स आणि एंगल्स यांचा बलाधिष्ठित क्रान्तीच्या अटळत्वाचा जो सिद्धान्त आहे तो भांडवली शासनसंस्थेला लागू आहे हें आम्ही वर म्हटलेंच आहे. त्याचें सविस्तर विवेचन पुढें करूं. भांडवली शासनसंस्थेची जागा कामगारांच्या शासनसंस्थेनें, कामगारांच्या हुकूमशाहीनें, घेणें ही गोष्ट 'विरून' जाण्याच्या पद्धतीनें होणार नाहीं. सर्वसाधारणपणें ही गोष्ट बलाधिष्ठित क्रान्तीनेंच होईल. एंगल्सनें बलाधिष्ठित क्रान्तीच्या कार्याचें जें काव्यपूर्ण वर्णन केलें तें मार्क्सच्या विचारसरणीशीं पूर्णपणें जुळणारें आहे. ('तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' आणि 'कम्यूनिस्टांचा जाहीरनामा' या ग्रंथांच्या शेवटच्या भागांत मार्क्सनें बलाधिष्ठित क्रान्ति अटळ असल्याचें मोठ्या अभिमानानें आणि उघडपणें जाहीर केलें आहे. या दृष्टीनें पुढें १८७५ सालीं म्हणजे जवळ जवळ तीस वर्षांनीं, गोथा कार्यक्रमावर टीका करतांना मार्क्सनें त्या कार्यक्रमाच्या संधिसाधूपणावर जे कोरडे ओढले तेही लक्षांत घेण्यासारखे आहेत ). हें काव्यमय वर्णन एंगल्सनें केवळ 'भावना विवश' होऊन किंवा निव्वळ टीकेच्या किंवा 'प्रत्युत्तर देण्याच्या' भरांत केलेलें नाहीं. बलाधिष्ठित क्रान्तीबद्दलचा हा आणि फक्त हाच दृष्टिकोन जनतेच्या मनांत पुरतेपणीं ठसविणें हाच मार्क्स आणि एंगल्स यांच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा पाया आहे. सर्व राष्ट्रीय दुरभिमानी—समाजवादी आणि आज सर्वत्र चलती असलेल्या 'काउट्स्की-वादाचे' अनुयायी हा प्रचार करण्याकडे आणि अशा चळवळींकडे दुर्लक्ष करतात यावरून त्यांनीं मार्क्सवादाशीं केलेली बेइमानी स्पष्ट होते.

भांडवली शासनसंस्थेचे जागीं कामगारांच्या शासनसंस्थेची स्थापना बलाधिष्ठित क्रान्तीशिवाय होणें अशक्य आहे आणि कामगारांच्या शासनसंस्थेचा, म्हणजेंच सर्वसाधारण शासनसंस्थेचा नाश मात्र ' विरून जाण्याच्या पद्धतीनेंच ' होणें शक्य आहे.

प्रत्येक क्रान्तिकारक परिस्थितीचा स्वतंत्रपणें विचार करून आणि प्रत्येक क्रान्तीच्या अनुभवांतून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून मार्क्स आणि एंगल्स यांनीं वरील सिद्धान्तांना विस्तृत आणि निश्चित स्वरूप दिलेलें आहे. या अत्यंत महत्त्वाच्या सिद्धान्तांचा आतां आपण विचार करूं.

———

प्रकरण दुसरें

# शासनसंस्था आणि क्रान्ति–१८४८ ते १८५१ या कालांतील अनुभव

## १ क्रान्तीचे थोडे पूर्वी

'तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' आणि 'कम्यूनिस्टांचा जाहीरनामा' हीं आपल्या तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक पूर्ण झाल्यानंतर मार्क्सनें लिहिलेलीं दोन पुस्तकें १८४८ चे क्रान्तीचे जरा आधीं प्रसिद्ध झालीं. त्यामुळें या ग्रंथांतून मार्क्सवादाचे मूलभूत सिद्धान्त तर आहेतच परंतु त्याचबरोबर त्या काळच्या विशिष्ट क्रान्तिकारक परिस्थितीचें प्रतिबिंबही कांहीं प्रमाणांत त्यांत पडलें आहे. तेव्हां या ग्रंथांच्या लेखकानें १८४८ ते १८५१ सालांतील अनुभवांतून कांहीं निष्कर्ष काढण्याचे आधीं त्याचें शासनसंस्थेसंबंधीं काय म्हणणें होतें हें पहाणें अयोग्य होणार नाहीं.

"कामगार वर्ग आपल्या प्रगतीचा मार्ग आक्रमित असतांना विद्यमान समाजव्यवस्थेचें जागीं एक नवी समाजव्यवस्था निर्माण करील. या नव्या समाजव्यवस्थेंत वर्ग आणि वर्गयुद्ध यांना आस्तित्व असणार नाहीं, त्याचप्रमाणें तेथें खऱ्या अर्थानें राजकीय सत्ताही अस्तित्वांत रहाणार नाहीं. कारण राजकीय सत्ता ही समाजांत अस्तित्वांत असलेल्या वर्गविरोधाचें अधिकृत स्वरूप असतें." [ तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य-जर्मन प्रत, पान १८२ ].

समाजांतील वर्ग नाहींसे झाले म्हणजे शासनसंस्थाही नाहींशी होईल या कल्पनेची ही सर्व साधारण मांडणी आहे. याची आणि मार्क्सनें कांहीं महिन्यानंतर ( नवंबर १८४७ ) 'कम्यूनिस्ट जाहीरनाम्यांत' मांडलेल्या सिद्धांतांची तुलना करणें उद्बोधक ठरेल.

"कामगारवर्गाच्या उत्क्रान्तींतील महत्त्वाच्या ढोकळ अवस्थांचें परीक्षण करतांना आपण, विद्यमान समाजांत थोडया फार अप्रत्यक्ष आणि अदृश्य स्वरूपांत चाललेल्या वर्गयुद्धाचा शेवट प्रत्यक्ष क्रान्तींत होऊन त्यांत भांडवलदारांची सत्ता कशी झुगारून दिली जाते आणि त्या जागीं कामगारांच्या सत्तेचा पाया कसा घातला जातो, हें पाहिलें......

"...आपण वर हें पहिलेंच आहे कीं कामगार वर्गानें सत्ताधारी वर्ग म्हणून आपली स्थापना करणें, लोकशाहीची लढाई जिंकणें, ही कामगारक्रान्तीची पहिली पायरी आहे.

"भांडवलदारांचे हातांतून सर्व भांडवल हळूंहळूं हिसकावून घेणें, उत्पादनाचीं सर्व साधनें सरकारच्या–अधिकारी वर्ग बनलेल्या कामगारांच्या राजकीय संघटनेच्या ताब्यांत घेणें आणि एकंदर उत्पादन शक्तीची शक्य तितक्या झपाट्यानें वाढ करणें, यांकडे कामगार वर्ग आपल्या राजकीय अधिपत्याचा उपयोग करील." [कम्यूनिस्टांचा जाहीरनामा; जर्मनप्रत– पा. ३१ व ३७].

मार्क्सवादाच्या शासनसंस्थेसंबंधीं ज्या मूलभूत कल्पना आहेत त्यांतील अत्यंत महत्त्वाच्या कल्पनेचा, म्हणजे कामगारांच्या हुकूमशाहीच्या कल्पनेचा (हा शब्दप्रयोग मात्र मार्क्स आणि एंगल्स हे पॅरीस कम्यूननंतर करूं लागले) उल्लेख यांत बीजरूपानें आहे. शिवाय वरील उताऱ्यांत शासनसंस्थेची एक सोपी आणि सुटसुटीत व्याख्याही आहे. 'शासनसंस्था म्हणजे अधिकारी वर्ग बनलेल्या कामगार वर्गाची राजकीय संघटना होय.' शासनसंस्थेची ही व्याख्या मार्क्सच्या विसरलेल्या शब्दांपैकींच एक आहे.

अधिकृत सोशलिस्ट पक्षाच्या चळवळीच्या आणि प्रचाराच्या वाङ्मयांत वरील व्याख्येचें विवेचन कधींच केलेलें नसतें. खरें म्हणजे ही व्याख्या ते विसरलेच आहेत. कारण तिचा आणि सुधारणावादाचा मेळ घालतां येणें अशक्य आहे. शिवाय 'लोकशाहीची प्रगति शांततेच्या मार्गानें होईल' अशा संधिसाधु आणि मध्यमवर्गीय स्वप्नसृष्टींत वावरणाऱ्या सर्व लोकांना ही व्याख्या म्हणजे खरमरीत उत्तर आहे.

सर्व संधिसाधु, राष्ट्रीय दुरभिमानी सोशालिस्ट आणि काऊटस्कीवादी लोक 'कामगारांना शासनसंस्थेची जरुरी असते' असें पुन्हां पुन्हां सांगत असतात आणि हीच मार्क्सची शिकवण आहे असेंही ते आग्रहानें प्रतिपादन करीत असतात. परंतु दोन गोष्टी सांगण्याचे ते विसरून जातात. एक म्हणजे, मार्क्सच्या मतानें कामगारांना 'विरून जाणाऱ्या', म्हणजे जी अशा रीतीनें संघटित झालेली आहे कीं जिच्या आस्तित्वांत येण्याबरोबरच तिच्या 'विरून' जाण्याच्या क्रियेस आरंभ होतो, अशा शासनसंस्थेचीच जरुरी असते. आणि दुसरी म्हणजे कामगारांना ज्या शासनसंस्थेची जरुरी असते ती 'अधिकारी वर्ग बनलेल्या कामगारवर्गाची राजकीय संघटना असते.'

शासनसंस्था ही विशिष्ट रीतीनें संघटित झालेली शक्ति आहे, एका विशिष्ट वर्गाला दडपून टाकणारी ती बलाधिष्ठित संघटना आहे. कामगारांना कोणता वर्ग दडपून टाकावयाचा असतो ? अर्थात् त्यांना पिळणारांचा, भांडवलदारांचा वर्ग. या पिळणाऱ्या वर्गाचा विरोध दडपून टाकण्याकरितां कामगारवर्गाला शासनसंस्थेची जरुरी असते. दडपून टाकण्याच्या या क्रियेचें मार्गदर्शन करणें आणि ती यशस्वी करणें हें कार्यही कामगारच करूं शकतात. कारण फक्त हाच वर्ग सतत क्रान्तिकारक असतो. तसेंच भांडवलदार वर्गाचें संपूर्ण निर्मूलन करून टाकण्याच्या लढ्यांत श्रमजीवी आणि इतर पिळल्या गेलेल्या जनतेची एकजूट घडवून आणण्याचें कार्यही फक्त तोच करूं शकतो.

पिळणाऱ्या वर्गाला पिळणूक चालू ठेवण्याकरितां, म्हणजेच बहुजनसमाजाच्या हितसंबंधांविरुद्ध मूठभर लोकांच्या स्वार्थी हितसंबंधांचें संरक्षण करण्याकरितां, शासनसंस्थेची जरुरी लागते. उलट पिळल्या गेलेल्या वर्गाला, पिळणूक संपूर्णपणें नाहींशी करण्याकरितां, म्हणजेच बहुजनसमाजाच्या हितसंबंधांचे रक्षणाकरितां आणि मूठभर अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचा नाश करण्याकरितां शासनसंस्थेची जरुरी लागते.

वर्गयुद्धाचे जागीं वर्गसमन्वयाच्या स्वप्नसृष्टीची स्थापना करणाऱ्या मध्यमवर्गीय डेमोक्रॅटिक पक्षाच्या लोकांचें, समाजवादी पुनर्घटनेचें

चित्रही स्वप्नरम्यच असतें. पिळणाऱ्या वर्गाची सत्ता झुगारून दिली जाणार नाहीं तर बहुसंख्य जनता जागृत झाली म्हणजे तिच्या समोर पिळणारा अल्पसंख्य वर्ग शांतपणें आणि आपण होऊन लोटांगण घालील, ही मध्यमवर्गीय स्वप्नसृष्टि आणि शासनसंस्था 'वर्गातीत' असते ही कल्पना या दोन्ही गोष्टी एकमेकींशीं निगडित आहेत. या कल्पनांचा स्वीकार केलेल्या लोकांनीं व्यवहारांत 'श्रमजीवी' वर्गाचा सतत विश्वासघातच केला आहे. १८४८ आणि १८७१ सालांतील क्रान्त्यांचा इतिहास आणि एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं आणि विसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंड, फ्रान्स, इटली इत्यादि राष्ट्रांतून सोशालिस्टांनीं भांडवलदारांच्या मंत्रिमंडळांत केलेला प्रवेश यावरून हीच गोष्ट सिद्ध होत नाहीं काय?

मार्क्सनें आयुष्यभर ज्या मध्यमवर्गीय सोशालिझमच्या विरुद्ध लढा दिला त्याच मध्यमवर्गीय सोशालिझमचें पुनरुज्जीवन 'सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी' आणि 'मेन्शेविक' हे पक्ष रशियांत करीत आहेत. मार्क्सनें मात्र आपला राजकीय सत्तेबद्दलचा, शासनसंस्थेबद्दलचा सिद्धान्त वर्गयुद्धाचे सिद्धान्तापासून तर्कशुद्ध रीतीनें काढला आहे.

भांडवलदार वर्गाची सत्ता उखडून टाकणें फक्त कामगार वर्गालाच शक्य आहे. कारण या वर्गाचें आर्थिक जीवन त्याला हें कार्य करण्यास तयार करीत असतें, त्याचप्रमाणें हें कार्य करण्यास जरूर असणारी ताकद आणि संधीही त्यालाच मिळत असते. भांडवलशाही जुन्या समाजांतील इतर मधल्या थरांचा, शेतकरी आणि मध्यमवर्गाचा' नाश करते, परंतु कामगार वर्गाला मात्र एकत्र आणून ती त्यांच्यांत एकजूट आणि संघटना निर्माण करते. मोठ्या प्रमाणांवरील उत्पादनांत कामगार वर्गाला असलेल्या विशिष्ट आर्थिक स्थानामुळें तोच फक्त कष्ट करणाऱ्या आणि पिळल्या जाणाऱ्या इतर वर्गाचें पुढारीपण करण्यास लायक असतो. कष्ट करणाऱ्या इतर वर्गाची, कित्येक वेळेला, कामगार वर्गापेक्षांही जास्त पिळणूक होत असते परंतु, स्वतःच्या मुक्ततेकरितां स्वतंत्र लढा ते उभारूं शकत नाहींत.

मार्क्सप्रमाणें वर्गयुद्धाचा सिद्धान्त, शासनसंस्था आणि समाजसत्तावादी क्रान्ति यांना लावला, म्हणजे त्यांपासून कामगारांच्या राजकीय सत्तेचा, त्यांच्या हुकूमशाहीचा, आणि या हुकूमशाहीची प्रस्थापना अटळ असल्याचा निष्कर्ष निघतो. या राजकीय सत्तेची इतर कोठल्याही वर्गाबरोबर वांटणी झालेली नसते आणि ती उघडपणें आणि जाहीरपणें सशस्त्र शक्तीवर आधारलेली असते. कामगार वर्ग सत्ताधारी वर्ग बनल्यानंतर तोच भांडवलशाही नष्ट करील, कारण भांडवलदारांचा अटळ आणि कडवा विरोध मोडून काढण्याची ताकद आणि दडपल्या गेलेल्या इतर सर्व वर्गांना नवी अर्थव्यवस्था निर्माण करण्याकरितां संघटित करण्याची शक्ति फक्त याच वर्गात असते.

पिळणूक करणाऱ्या वर्गाचा निश्चितपणें होणारा विरोध मोडून काढण्याकरितां आणि आर्थिक पुनर्घटनेच्या कार्यांत बहुजनसमाजाचें म्हणजे, शेतकरी, मध्यमवर्ग आणि निम-कामगार यांचें, पुढारीपण करण्याकरितां कामगार वर्गाला राजकीय सत्तेची, दडपशाही करणाऱ्या मध्यवर्ती संघटनेची, बलाधिष्ठित संघटनेची, आवश्यकता लागत असते.

कामगारांच्या राजकीय पक्षाला शिक्षण देऊन मार्क्सवाद कामगार वर्गाच्या पुढारलेल्या विभागाला शिक्षण देत असतो. सत्ता हस्तगत करण्याची, आम जनतेला समाजसत्तावादाकडे नेण्याची, नव्या समाजव्यवस्थेचें संघटन आणि मार्गदर्शन करण्याची, पिळलेल्या आणि दडपलेल्या वर्गांच्या जीवनाची, भांडवलदारांचे शिवाय आणि भांडवलदारांना विरोधी अशी पुनर्घटना करण्याचें कार्यांत त्यांचा शिक्षक, मार्गदर्शक आणि पुढारी बनण्याची ताकद याच पुढारलेल्या विभागांत असते. उलट आज जो सर्वत्र संधिसाधूपणा बोकाळला आहे त्यामुळें कामगार-पक्षाच्या संघटनेंत, चांगला पगार मिळणाऱ्या कामगारांच्या प्रतिनिधींची भरती होत असते. या प्रतिनिधींचा सर्वसाधारण कामगारांशीं संबंध राहिलेला नसतो; भांडवलशाहीच्या अमलाखालीं त्याचें 'बरें' चाललेलें असतें आणि भाकरीच्या तुकड्याकरितां त्यांनीं आपल्या जन्मसिद्ध

हक्कावर, भांडवलदारांचे विरुद्ध जनतेच्या क्रान्तीचे पुढारी बनण्याच्या हक्कावर, पाणी सोडलेलें असतें.

"...शासनसंस्था म्हणजे अधिकारी वर्ग बनलेल्या कामगार वर्गाची राजकीय संघटना", हा मार्क्सचा सिद्धान्त, त्यानें कामगार वर्गाच्या इतिहासप्रणित क्रान्तिकार्याबद्दल जें सर्व लिहिलें त्याचा एक अविभाज्य भाग आहे. कामगारांची हुकूमशाही, कामगारांनीं राजकीय सत्ता हस्तगत करणें ही त्यांच्या या कार्याची परिणती आहे.

भांडवलदारांचे विरुद्ध उपयोग करण्याकरितां कामगारांना शासनसंस्थेची, बलाधिष्ठित विशिष्ट संघटनेची, जरुरी लागते हें जर खरें तर त्यावरून सहाजीकच असा निष्कर्ष निघतो कीं, भांडवलदारांनीं स्वतःच्या फायद्याकरितां निर्माण केलेलें शासनयंत्र मोडून टाकून नाहींसें केल्याशिवाय आपल्याला पाहिजे तशी संघटना निर्माण करणें कामगारांना शक्य होणार नाहीं. हा साधा आणि सरळ निष्कर्ष मार्क्सनें 'कम्यूनिस्ट जाहीरनाम्यांत' काढला आहे आणि १८४८ ते १८५१ सालांतील क्रान्तीच्या अनुभवानें समालोचन करतांनाही हाच निष्कर्ष पुढें मांडला आहे.

## २ क्रांतीचें समालोचन

१८४८ ते १८५१ सालांतील क्रांतीचें, आपण विचार करीत असलेल्या शासनसंस्थेच्या सिद्धांतांच्या दृष्टीनें, समालोचन, मार्क्सनें 'लुई बोनापार्टची अठरावी ब्रुमेअर' या ग्रंथांत केलें आहे.

"......परंतु क्रांति आपलें कार्य संपूर्णपणें करीत असते. अजूनही तिची शुद्धीकरणाची क्रिया सुरूच आहे. आणि ती आपलें काम अत्यंत पद्धतशीरपणें करीत आहे. २ डिसेंबर १८५१ पर्यंत ( लुई अधिकार घेईपर्यंत) क्रांतीनें आपल्या कार्याचा पूर्वार्ध पुरा केला. आतां ती उत्तरार्ध पुरा करीत आहे. प्रथम तिनें पार्लमेंटची सत्ता पूर्णत्वाला नेली परंतु ती उखडून टाकतां यावी म्हणून तें झाल्यानंतर आतां ती अम्मलबजावणी खात्याची सत्ता पूर्णावस्थेला नेत आहे, ती अलग करीत आहे, तिला

विशुद्ध स्वरूप देत आहे, आणि तेंच एक ध्येय तिनें आपणांसमोर ठेवलें आहे. कारण क्रान्तीला आपल्या ' सर्व विनाशक शक्ति ' शेवटीं तिच्या विरुद्ध केंद्रित करावयाच्या आहेत. ( जाड ठसा लेखकाचा ). अशा रीतीनें क्रान्तीचें उत्तरार्धाचें प्राथमिक कार्य पुरें झाल्यानतर युरोप खडबडून जागा होईल आणि ओरडेल–ठीक झालें ! भले शाबास !!

" अबाढव्य नौकरशाही आणि लष्कर, समाजाच्या सर्व निरनिराळ्या थरांना ग्रासणारें सरकारी यंत्र. पांच लक्ष निरनिराळे अधिकारी आणि पांच लक्ष लष्कर ( फ्रान्सच्या समाजवृक्षावर वाढलेलीं हीं भयंकर बांडगुळें आहेत आणि त्यांत गुरफटला जाऊन फ्रेंच समाजाचा कोंडमारा होत आहे ) यावर आधारलेलें सरकारी यंत्र, एकतंत्री राजेशाहीच्या कालांत आणि सरंजामशाहीचा नाश होत असतांना निर्माण झालें; आणि त्यानें सरंजामशाहीच्या विनाशाला मदतच केली." फ्रान्समधील पहिल्या राज्यक्रांतीनें सरकारी सत्तेचें केन्द्रीकरण घडवून आणलें; " परंतु त्याच बरोबर तिनें या सत्तेचें क्षेत्र, अधिकार आणि अधिकारी वर्गाची संख्या यांतही वाढ केली. हें राज्ययंत्र नेपोलियननें पूर्णावस्थेला नेलें. " सनदशीर राजेशाही आणि जुलै राजशाही " यांनीं या सरकारी यंत्राची खातेंविभागणी वाढविली एवढेंच..."

" क्रान्तीविरुद्ध लढत असतांना शेवटीं 'पार्लमेंटरी गणराज्याला' दडपशाहीचीं साधनें जोरदार बनवावीं लागतात आणि त्याच बरोबर सरकारचें केन्द्रीकरण आणि सरकारी उत्पन्न यांतही वाढ करावी लागते. आतांपर्यंतच्या सर्व क्रान्त्यांनीं हें राज्ययंत्र मोडून टाकण्याचें ऐवजीं जास्त जास्त पूर्णावस्थेला नेलें आहे. ( जाड ठसा लेखकाचा ). सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या निरनिराळ्या पक्षांनीं या प्रचंड सरकारी यंत्रावर ताबा मिळविणें हाच आपला सर्वांत मोठा विजय मानला. " [ कित्ता पा. ९८-९९ ].

वरील वैशिष्ट्यपूर्ण उताऱ्यांत मार्क्सवादानें जाहीरनाम्याचे नंतरचा बराच पुढचा टप्पा गांठला आहे. जाहीरनाम्यांत शासनसंस्थेचा प्रश्न अत्यंत सामान्य स्वरूपांत आणि मोघम शब्दांत मांडला आहे. वरील

उताऱ्यांत हा प्रश्न अत्यंत निश्चित स्वरूपांत मांडला असून त्यापासून खालील स्पष्ट, व्यवहार्य आणि उघड दिसणारा सिद्धान्त काढला आहे– ‘आतांपर्यंत झालेल्या सर्व क्रान्त्यांनीं हें राज्ययंत्र पूर्णावस्थेला नेण्याचा प्रयत्न केला, परंतु तें मोडून टाकलें पाहिजे, त्याचा चुराडा केला पाहिजे.’

मार्क्सवादाचे शासनसंस्थेसंबंधीं जे सिद्धान्त आहेत त्यांतील हा सर्वांत महत्त्वाचा आणि मूलभूत सिद्धान्त आहे. अधिकृत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे पुढारी हाच मूलभूत सिद्धान्त पूर्णपणें ‘विसरले’ आहेत. एवढेंच नव्हें तर दुसऱ्या इंटरनॅशनलच्या काउट्स्की सारख्या विचारवन्तानें तर या सिद्धान्ताला निश्चितपणें ‘विकृत’ स्वरूप दिलें आहे. ( कसें तें आपण पुढें पाहूं ).

कम्यूनिस्ट जाहीरनाम्यांत एकंदर इतिहासाचा जो सर्वसाधारण आढावा घेतला आहे त्यावरून शासनसंस्था ही वर्गीय सत्तेचें साधन आहे ही गोष्ट मान्य करणें आपणांस भाग पडतें आणि त्यापासून असा निष्कर्ष निघतो कीं, प्रथम राजकीय सत्ता हस्तगत केल्याशिवाय, राजकीय प्रभुत्व मिळविल्याशिवाय आणि शासनसंस्थेला, अधिकारी वर्ग बनलेल्या कामगार वर्गाच्या राजकीय संघटनेचें स्वरूप दिल्याशिवाय कामगारांना भांडवलशाहीचें अधिपत्य झुगारून देतां येणार नाहीं. त्यांतून दुसरा असाही निष्कर्ष निघतो कीं, कामगारांच्या शासनसंस्थेचा विजय झाल्याबरोबर ती ‘ विरून ’ जाऊं लागेल. कारण ज्या समाजांत वर्गविग्रह नष्ट झालेला असतो त्या समाजांत शासनसंस्थेची जरूरी रहांत नाहीं आणि ती अस्तित्वांतही राहूं शकत नाहीं. ऐतिहासिक प्रगतीचे दृष्टीनें भांडवलशाही शासनसंस्थेचे जागीं कामगारांची शासनसंस्था येण्याचा मार्ग कोणता हा प्रश्न या ठिकाणीं निर्माणच केलेला नाहीं.

मार्क्सनें हा प्रश्न १८५२ सालीं उपस्थित करून त्याचें उत्तरही दिलें. याकरितां आपल्या विरोध-विकास-वादी तत्त्वज्ञानाला अनुसरून मार्क्सनें १८४८ ते १८५१ या क्रान्तिकालांतील अनुभवाचाच आधार घेतला आहे. इतर ठिकाणांप्रमाणेंच येथेंही मार्क्सची शिकवण म्हणजे अनुभवाचें सार आहे आणि त्यांत मार्क्सचा जगाकडे पहाण्याचा सखोल

तात्त्विक दृष्टिकोन आणि इतिहासाचें त्याचें संपूर्ण ज्ञान हीं स्पष्टपणें दिसून येतात.

या ठिकाणीं शासनसंस्थेचा प्रश्न निश्चित स्वरूपांत मांडला आहे. भांडवलशाही शासनसंस्था, भांडवलदारांची सत्ता कायम ठेवण्यास लागणारें यंत्र, ऐतिहासिक दृष्ट्या कशी अस्तित्वांत आली ? निरनिराळ्या भांडवली क्रान्त्यांमुळें आणि दडपल्या गेलेल्या वर्गांनीं स्वतंत्रपणें केलेल्या उठावामुळें त्यांत काय काय बदल झाले आणि त्याची उत्क्रान्ति कशी होत गेली ? या शासनसंस्थेसंबंधीं कामगार वर्गाचें कर्तव्य काय ?

भांडवलशाहीचें वैशिष्ट्य असलेली केंद्रित शासनसंस्था ही एकतंत्री राजेशाही नष्ट होत असतांना अस्तित्वांत आली. या शासनसंस्थेची दोन वैशिष्ट्यें आहेत. एक, नोकरशाही आणि दुसरें, खडें सैन्य. या दोन संस्था भांडवलदार वर्गाशीं हजारों बंधनांनीं निगडित झालेल्या आहेत हें मार्क्स आणि एंगल्स यांनीं आपल्या लिखाणांतून अनेक वेळेला दाखवून दिलें आहे. यांचे संबंध असल्याचा उघड उघड आणि स्पष्ट पुरावा प्रत्येक कामगाराला वेळोवेळीं त्याच्या अनुभवांतूनच आलेला असतो. आपल्या कटु अनुभवांतूनच कामगाराला या संबंधांचें प्रत्यक्ष ज्ञान झालेलें असतें आणि म्हणूनच ज्या सिद्धान्तावरून असे संबंध असल्याचा निष्कर्ष निघतो आणि जे सिद्धान्त, मध्यमवर्गीय लोकशाहीवाले अजाणतेपणानें किंवा मूर्खपणानें नाकारतात, किंवा आणखी मूर्खपणा म्हणजे ते सामान्यपणें मान्य करतात परंतु, त्यापासून साहजिकपणें निघणाऱ्या निष्कर्षांकडे मात्र दुर्लक्ष करतात, तेच सिद्धान्त कामगार वर्ग फार लवकर शिकतो आणि आत्मसात करतो.

नौकरशाही आणि खडें सैन्य हीं भांडवली समाजवृक्षावरील बांडगुळें आहेत. समाजाची फाटाफूट करणाऱ्या समाजांतील वर्गविग्रहामुळेंच या बांडगुळांची निर्मिती झालेली असली तरी तीं बांडगुळें समाजाची जीवन-द्वारें बंद करून समाजाचा कोंडमारा करीत असतात. अधिकृत सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत सर्वत्र पसरलेल्या काउटस्की प्रतिपादित संधिसाधूपणाचें असें मत आहे कीं, ‘ शासनसंस्था समाजवृक्षावरील बांडगूळ आहे ’ हा

सिद्धान्त फक्त अराज्यवादि विचारसरणीचेंच वैशिष्ट्य आहे. परंतु 'पितृ-देशाचें संरक्षण' या फसव्या घोषणेखालीं आजच्या (१९१४-१९१८) साम्राज्यशाही युद्धाचा न्यायीपणा आणि रास्तपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न करून समाजवादाशीं पूर्णपणें बेइमानी करणाऱ्या मध्यमवर्गीयांना, वरील प्रमाणें मार्क्सवादाला विकृत स्वरूप देणें अत्यंत सोयीचें वाटलें; तरी सुद्धां त्यामुळें ते मार्क्सवादाला दिलेलें 'विकृत' स्वरूप आहे ही गोष्ट कांहीं खोटी ठरत नाहीं.

युरोपमध्यें, सरंजामशाहीचा नाश झाल्यानंतर, ज्या अनेक भांडवली क्रान्त्या झाल्या त्यांचे मधूनच नोकरशाही आणि खडें सैन्य यांची प्रगती झाली, त्यांची ताकद वाढली आणि त्या पूर्णावस्थेला पोंचल्या. या दोन संस्थांमार्फतच मध्यमवर्ग भांडवलदार वर्गाकडे खेचला जातो आणि त्यांचा गुलाम बनतो. श्रीमंत शेतकरी, कारागीर आणि व्यापारी यांना या संस्थामधून विनाकष्टाच्या, बिनकटकटीच्या आणि मानाच्या लहान-मोठ्या नौकऱ्या मिळतात आणि त्यामुळें या नौकऱ्या करणाऱ्या व्यक्तींना समाजांत श्रेष्ठ स्थान प्राप्त होतें. २७ फेब्रुवारी १९१७ नंतर सहा महिने रशियांत ज्या घटना घडल्या त्या याचें उत्तम उदाहरण आहेत. ज्या सरकारी नौकऱ्या आतांपर्यंत 'ब्लॅक हंड्रेड'च्या सभासदांनाच मुख्यतः मिळत असत त्या 'केडेट्स,' 'मेन्शेविक' आणि 'सोशालिस्ट रेव्हो-ल्यूशनरी' यांच्या वांट्याला येऊं लागल्या. महत्वाच्या सुधारणा घडवून आणण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याचें कोणाच्या ध्यानांतच राहिलें नाहीं; या सर्व गोष्टी घटना समितीची बैठक होईपर्यंत पुढें ढकलण्याचा आणि घटना समितीची बैठक युद्ध संपेपर्यंत पुढें ढकलण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला ! परंतु लुटीची वाटणी करणें, प्रधान, उपप्रधान, गव्हर्नर जनरल इत्यादि जागा मिळविणें या गोष्टी मात्र घटना समितीची बैठक होईपर्यंत थांबविण्यांत आल्या नाहींत. निरनिराळ्या पक्षांचे निरनिराळ्या रीतीनें प्रधानमंडळ बनविण्याचें जे अनेक प्रयत्न झाले त्या सर्वांचा हेतु 'लुटीची' व्यवस्थित वांटणी हाच होता. ही 'वांटणी' सर्व देशभर, मध्यवर्ति आणि प्रांतिक सरकारच्या प्रत्येक खात्यांत

सर्वत्र चालू होती. २७ फेब्रुवारी नंतरच्या सहा महिन्यांतील कार्याचें (?) वर्णन खालीलप्रमाणें करतां येईल; आणि वास्तविक दृष्ट्या हें वर्णन मुळींच चूक होणार नाहीं: सुधारणा बाजूला सारणें, सरकारी नोकऱ्यांची 'वांटणी' पूर्ण करणें आणि वांटणी करण्यांत झालेल्या चुका 'फेर-वांटणी' करून दुरुस्त करणें.

परंतु ज्या मानानें नोकरशाही आणि लष्कर यांतील जागांची फेर-वांटणी फक्त भांडवलदार आणि मध्यमवर्गीय पक्षांत (रशियांतील केडेट्स, सोशलिस्ट रेव्होल्यूशनरी, मेन्शेविक) होते त्या मानानें कामगार वर्गाच्या पुढारीपणाखालीं असलेल्या सर्व दलित जनतेला आपला लढा सर्वच भांडवली समाजाविरुद्ध आहे, आणि तो कधींही न मिटणारा आहे, याची स्पष्टपणें जाणीव होऊं लागते. म्हणूनच भांडवलशाही पक्षांना, अत्यंत लोकशाहीनिष्ठ आणि 'रेव्होल्यूशनरी डेमोक्रॅटिक' पक्षांना सुद्धां, क्रांतिकारक कामगार वर्गाचे विरुद्ध दडपशाहीचे जास्त कडक कायदे करावे लागतात, आणि दडपशाही करणारी संघटना, म्हणजेच आपण विचार करीत असलेली शासनसंस्था, जास्त बळकट करावी लागते. या घटनांमुळें क्रांतीला आपल्या 'सर्व विनाशक शक्ति' शासनसंस्थेच्या विरुद्ध केंद्रित कराव्या लागतात आणि राज्ययंत्र पूर्णावस्थेला नेण्याच्या नव्हे तर तें मोडून टाकून नाहींसें करण्याच्या प्रश्नाचा विचार करावा लागतो.

तर्कशुद्ध विचारसरणीमुळें नव्हे तर १८४८ ते १८५१ या कालांतील प्रत्यक्ष घटना आणि त्यांतून मिळालेला अनुभव यामुळेंच हा प्रश्न अशा रीतीनें मांडावा लागला. ज्या शासनसंस्थेचा नाश करावयाचा तिचे जागीं दुसरी कोणती शासनसंस्था आणावयाची या प्रश्नाचें उत्तर मार्क्सनें १८५१ सालीं दिलें नाहीं, यावरून मार्क्सचे सिद्धांत प्रत्यक्ष अनुभवाच्या भक्कम पायावर कसे आधारलेले होते हें ध्यानांत येईल. या कालांत मिळालेल्या अनुभवावरून वरील प्रश्नाला उत्तर देणें शक्य नव्हतें. पुढें १८७१ सालीं ऐतिहासिक परिस्थितीमुळें हा प्रश्न प्रत्यक्ष स्वरूपांत मांडला गेला. १८५२ सालीं शास्त्रशुद्ध रीतीनें एवढेंच सिद्ध करणें शक्य

होतें कीं, कामगार क्रांति ' अशा एका अवस्थेला येऊन पोंचली आहे कीं तिनें आपल्या सर्व विनाशक शक्ति शासनसंस्थेच्या विरुद्ध केंद्रित केल्या पाहिजेत ' आणि ती शासनसंस्था मोडून टाकली पाहिजे.

या ठिकाणीं असा प्रश्न विचारला जाणें शक्य आहे कीं मार्क्सचे वेळीं घडलेल्या घटना, त्याला आलेला अनुभव आणि त्यावरून त्यानें काढलेले निष्कर्ष यांना सर्वसाधारण स्वरूप देणें, १८४८ ते १८५१ या कालांत फ्रान्सच्या इतिहासांतून मिळालेला अनुभव सर्वत्र आणि सारखाच लागूं करणें कितपत शक्य होईल ? या प्रश्नाला उत्तर देण्याचे अगोदर एंगल्सचें या बाबतींत काय म्हणणें होतें तें आपण पाहूं आणि मगच या प्रश्नाचा विचार करूं. ' नेपोलियनची अठरावी ब्रुमेअर ' या मार्क्सच्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेंत एंगल्स म्हणतो;

" युरोपमधील सर्व देशांत फ्रान्स हाच एक असा देश आहे कीं, जेथें ऐतिहासिक वर्गयुद्ध नेहमींच निर्णायक स्वरूपांत लढलें गेलें आहे. आणि म्हणूनच त्यानें वेळोवेळीं धारण केलेलें निरनिराळें स्वरूप, त्याच्या एकंदर परिणामांचें सारस्वरूप, फ्रान्समध्यें निर्भेळ स्वरूपांत आपल्या दृष्टीस पडतें. मध्ययुगांत सरंजामशाहीचें केंद्रस्थान आणि विद्येच्या पुनरुज्जीवनानंतरच्या कालांत मोठ्या प्रमाणावरील जमीनदारींवर आधारलेल्या मध्यवर्ती राजेशाहीचा आदर्श नमुना असलेल्या फ्रान्स देशानें महान् क्रांतींत ( १७८९ ) सरंजामशाहीचा नाश करून त्या ठिकाणीं भांडवलदारांची सत्ता अत्यंत विशुद्ध स्वरूपांत स्थापन केली. इतकें विशुद्ध स्वरूप तिला इतर कोणत्याही देशांत प्राप्त झालें नाहीं. आतां सुद्धां आपल्या मुक्ततेकरितां प्रयत्न करणाऱ्या फ्रान्स देशांतील कामगार वर्गाचा, अधिकारारूढ भांडवलदारांचे विरुद्ध, जो लढा चालला आहे त्या लढ्यानें इतर कोठल्याही देशांतील लढ्यापेक्षां जास्त तीव्र स्वरूप धारण केलें आहे. "

[ पा० ४ ].

यांतील शेवटचीं वाक्यें फ्रान्समधील आजच्या परिस्थितीला लागूं नाहींत; कारण १८७१ पासून तेथील कामगारांच्या लढ्याला शिथि-

लता प्राप्त झाली आहे. परंतु ही शिथिलता जरी फार काल टिकून राहिली असली तरी त्यावरून आगामी कामगार क्रान्तींत ' फ्रान्स हा असा देश आहे कीं ज्या ठिकाणीं वर्गयुद्ध निर्णायक स्वरूपांत लढलें जातें, ' हें एंगल्सचें विधान खरें ठरणारच नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

पुढारलेल्या देशांच्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या आणि विसाव्या शतकाच्या आरंभींच्या कालांतील सर्वसाधारण इतिहासाकडे आपण आतां लक्ष देऊं. त्यांत आपणांस असें आढळून येईल कीं, सर्व मोठमोठ्या देशांतून हीच क्रिया मंदपणें, अत्यंत निरनिराळ्या स्वरूपांत, परंतु फार मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. गणराज्य पद्धति असलेल्या राष्ट्रांतून (फ्रान्स, अमेरिका स्विझरलंड ), त्याच प्रमाणें राजा असलेल्या राष्ट्रांतून ( इंग्लंड व कांहीं प्रमाणांत जर्मनी, इटली इत्यादि ), एकीकडे विधिमंडळाच्या अधिकाराची वाढ चालू आहे आणि दुसरीकडे भांडवलदार आणि मध्यमवर्गीय पक्ष यांची सत्ता मिळविण्याकरितां चढाओढ सुरू आहे आणि ते वर्ग आपापसांत ' लुटीची ' वाटणी करीत आहेत. परंतु असें असतांना सुद्धां भांडवली समाजाचा पाया मात्र आहे तसाच कायम आहे आणि अम्मलबजावणी खात्याची, खडें सैन्य आणि नौकरशाही यांची सत्ता पूर्णावस्थेला पोंचून दृढ होत आहे.

आजच्या उत्क्रान्त स्थितीला पोंचलेल्या निरनिराळ्या सर्व भांडवली शासनसंस्थांतून वरील गोष्टी सर्वसाधारणपणें आढळतात, यांत मुळींच शंका नाहीं. फ्रान्समध्यें १८४८ ते १८५१ या तीन वर्षांत, भांडवली समाजाच्या प्रगतीच्या निरनिराळ्या विशिष्ट अवस्था अत्यंत जलद, स्पष्ट आणि तीव्र स्वरूपांत दिसून आल्या आहेत.

बँक भांडवलाचें अधिपत्य, भांडवली मक्तेदारी कंपन्यांत प्रचंड प्रमाणांत वाढ आणि भांडवलदारांच्या मक्तेदारीचें भांडवली सरकारच्या मक्तेदारींत रूपांतर हीं साम्राज्यशाही अवस्थेचीं वैशिष्ट्यें आहेत. भांडवलशाहीला साम्राज्यशाही अवस्था प्राप्त झाल्यानंतरच्या कालांत सरकारी यंत्राच्या शक्तींत, त्याच प्रमाणें नोकरशाही आणि खडें सैन्य यांच्यांत

प्रचंड प्रमाणांत वाढ झाली. आणि राजेशाही असलेल्या देशांतून, आणि अत्यंत ‘ स्वतंत्र ’ लोकशाही असलेल्या देशांतून सुद्धां, कामगारांवरील दडपशाहीच्या कायद्यांत वाढ झाली.

कामगार क्रान्तीच्या सर्व शक्ति, शासनसंस्थेचा नाश करण्याकरितां केन्द्रित करण्याचें कार्य आजची ऐतिहासिक परिस्थिति करीत आहे. आणि ही गोष्ट १८५२ सालापेक्षां किती तरी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

या भांडवली राज्ययंत्राचे जागीं कामगार वर्ग कशाची स्थापना करणार हें पॅरीस कम्यूनच्या कालांतील घडामोडींनीं सूचित केलें.

## ३ या प्रश्नाची मार्क्सनें १८५२ सालीं केलेली मांडणी

( हा भाग लेनिननें १९१९ सालीं, दुसऱ्या रशीयन आवृत्तीचे वेळीं लिहिला ).

मार्क्सनें ५ मार्च १८५२ रोजीं वेडिमियरला लिहिलेल्या पत्राचा कांहीं भाग मेहेरिंगनें १९०७ सालीं ‘ न्यू–झेट ’ या मासिकांत प्रसिद्ध केला आहे. इतर अनेक गोष्टींबरोबर सदर पत्रांत खालील महत्वाचा मजकूर आहे.

“ माझ्या दृष्टीनें विचार करतां, आजच्या समाजांतील निरानिराळ्या वर्गांचें अस्तित्व किंवा या वर्गांत चाललेला झगडा शोधून काढण्याचें श्रेय मला नाहीं. माझे आधीं किती तरी वर्षें भांडवलशाहीच्या इतिहासकारांनीं वर्गयुद्धाच्या अस्तित्वाचें ऐतिहासिक विवेचन आणि तिच्या अर्थशास्त्रज्ञांनीं या युद्धाच्या आर्थिक स्वरूपाचें विवेचन केलें होतें. मी नवीन अशा खालील तीन गोष्टी सिद्ध केल्या. ( १ ) वर्गांचें अस्तित्व उत्पादनाच्या प्रगतीच्या एका विशिष्ट अवस्थेशीं निगडीत आहे; ( २ ) वर्गयुद्धाचा शेवट निश्चितपणें कामगारांची हुकुमशाही अस्तित्वांत येण्यांत होतो; ( ३ ) समाजांतील सर्व वर्ग नाहींसे करून नवा वर्गविहीन समाज निर्माण करण्याच्या मार्गांतील ‘कामगारांची हुकूमशाही’ हा एक केवळ टप्पा आहे. ”

वरील उताऱ्यांत, मार्क्सनें आपल्या आणि प्रमुख भांडवलदारी विचार-

वन्तांच्या सिद्धांन्तांतील महत्त्वाचा आणि क्रान्तिकारक फरक अत्यंत स्पष्ट शब्दांत दिलेला आहे. आणि त्याच बरोबर आपल्या शासनसंस्थेवरील सिद्धान्तांचें सारही त्यांत दिलें आहे.

वर्गयुद्ध हें मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे असें फार वेळेला बोललें आणि लिहिलें जातें. परंतु तें खरें नाहीं. या चुकीच्या कल्पनेपासून पुढें मार्क्सवादाला संधिसाधु, विकृत आणि भांडवलदारांना मान्य होईल असें असत्य स्वरूप दिलें जातें. वर्गयुद्धाचा सिद्धान्त मार्क्सनें शोधून काढलेला नसून भांडवलशाही विचारवन्तांनींच शोधून काढला आहे आणि म्हणूनच, तो सर्वसाधारणपणें भांडवलदारांना मान्य होण्यासारखा असतो. त्यामुळें जे फक्त वर्गयुद्ध मान्य करतात ते मार्क्सवादी नाहींत; कारण असे लोक भांडवली विचारसरणीच्या आणि भांडवलशाही राजकारणाच्या चौकटींत बसूं शकतात. मार्क्सवादाला वर्गयुद्धाच्या चौकटींत मर्यादित करणें म्हणजे त्याला खच्ची करून विकृत आणि भांडवलदारांना मान्य होईल असें स्वरूप देणें आहे. वर्गयुद्ध मान्य करून त्यापासून निघणारा कामगारांच्या हुकूमशाहींचा सिद्धान्त जो मान्य करतो तोच खरा मार्क्सवादी होय. मार्क्सवाद खरोखरच समजला आहे किंवा नाहीं हें पहाण्याचाही हाच निकष आहे. म्हणूनच ज्या वेळीं इतिहासानें हा प्रश्न युरोपमधील कामगारांच्या पुढें प्रत्यक्ष कृतीच्या स्वरूपांत मांडला त्या वेळीं सर्व सुधारणावादी, संधिसाधू, फार काय काउट्स्कीवादी सुद्धां (सुधारणावाद आणि मार्क्सवाद यांचे मध्यें घोटाळणारे लोक) कामगारांच्या हुकूमशाहीला विरोध करणारे मध्यमवर्गीय, निर्बुद्ध लोकशाहीवाले असल्याचें आढळून आलें. १९१८ च्या ऑगस्ट महिन्यांत–प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर किती तरी दिवसांनीं–काउट्स्कीनें प्रसिद्ध केलेली 'कामगारांची हुकूमशाही' ही पुस्तिका, त्यानें मार्क्सवादाला मध्यमवर्गीय विकृत स्वरूप दिल्याचा आणि ढोंगीपणानें या हुकूमशाहीच्या तत्त्वाला तोंडीं मान्यता देऊन प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र त्याला नीचपणानें हरताळ फासल्याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. (लेखकाची 'कामगार क्रान्ति आणि बेइमान काउट्स्की' ही पुस्तिका पहा).

मार्क्सनें वर जी भांडवलदारांची भूमिका सांगितली तिच्याशीं आजच्या संधिसाधूंची, एकेकाळीं मार्क्सवादी असलेला काउट्स्की यांत प्रमुख आहे, भूमिका जुळणारी आहे. कारण हें संधिसाधू सुद्धां वर्गयुद्धाला भांडवली समाजाच्या चौकटींतच फक्त मान्यता देत आहेत. (कोणताही सुशिक्षित उदारमतवादी भांडवलशाहीच्या चौकटींत वर्गयुद्धाला 'तत्त्वत:' मान्यता देण्यास कचरत नाहीं !) हे संधिसाधू लोक, वरील सिद्धान्त, भांडवलशाहीचें कम्यूनिझममध्यें रूपांतर होत असतांना किंवा भांडवलशाही सत्ता झुगारून दिल्यानंतर तिचा संपूर्ण नाश करीपर्यंतच्या महत्वाच्या संक्रमण कालाला लागूं करीत नाहींत. खरें पहातां हा काल म्हणजे अभूतपूर्व आणि उग्र वर्गयुद्धाचा काल असतो आणि या वर्गयुद्धाचें स्वरूपही अत्यंत तीव्र असतें. यामुळें या कालांत आस्तित्वांत असलेली शासनसंस्था एका नव्याच अर्थानें लोकशाही (कामगारांना आणि सर्वसाधारण गरीब वर्गांना) आणि एका नव्याच अर्थानें हुकूमशाही (भांडवलदारांचे विरुद्ध) असते.

म्हणून सर्वसाधारणपणें, वर्गीय समाजाला किंवा भांडवलदारांची सत्ता झुगारून दिलेल्या कामगार वर्गालाच फक्त नव्हें तर भांडवलशाहीचा नाश आणि वर्गविहीन समाजाची, कम्यूनिझमची, स्थापना यामध्यें जो संक्रमणकाल जाईल त्या सबंध कालाला 'एकाच' वर्गाच्या हुकूमशाहीची जरूरी असते हें ज्यांना पटलें आहे त्यांनींच फक्त मार्क्सवादाचे सिद्धान्त आत्मसात् केले आहेत असें म्हणावयाचें. भांडवली शासनसंस्थेचीं अनेक निरनिराळीं स्वरूपें आहेत. परंतु या सर्वांचा गाभा, त्यांचें खरें मूळ स्वरूप एकच आहे. या सर्व शासनसंस्था कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें शेवटीं 'भांडवलदारांची हुकूमशाही' असतात. त्याचप्रमाणें भांडवलशाही आणि कम्यूनिझम यांचें संक्रमण कालांतसुद्धां शासनसंस्थेला निरनिराळीं अनेक रूपें प्राप्त होतील; परंतु त्यांचें अंतिम स्वरूप, त्यांचा गाभा शेवटीं एकच असेल. ती कामगारांची हुकूमशाही असेल.

---

## प्रकरण तिसरें

# १८७१ सालांतील पॅरीस कम्यूनचे अनुभव आणि त्यांचें मार्क्सनें केलेलें विश्लेषण

### १ पॅरीस कम्यूनच्या प्रणेत्यांचें शौर्य कशांत आहे ?

सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न म्हणजे अविचारी आततायीपणा होईल अशी धोक्याची सूचना मार्क्सनें पॅरीसच्या कामगारांना १८७० च्या वसंत ऋतूंतच दिलेली होती, हें सर्वश्रुतच आहे. असें असतांना सुद्धां १८७१ च्या मार्च महिन्यांत जेव्हां पॅरीसच्या कामगारांचेवर लढा लादला गेला आणि कामगारांनीं त्याचा धैर्यानें स्वीकार केला, त्या वेळेला, या लढ्यामुळें शेवटीं कामगारांचा तोटा होणार आहे हें दिसत असतांनासुद्धां मार्क्सनें या कामगारक्रान्तीचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. एकाद्या पाढित विद्वानाप्रमाणें, "हा उठाव अकालीं केलेला आहे," असें म्हणून मार्क्सनें त्याचा निषेध केला नाहीं. उलट मार्क्सवादाशीं बेइमान झालेला कुप्रसिद्ध प्लेकेनॉव्ह यानें १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यांत 'कामगार-शेतकऱ्यांच्या उठावाबद्दल' उत्साहानें लिहिलें; परंतु १९०५ च्या डिसेंबर महिन्यांत मात्र त्यानें 'कामगारांनीं सशस्त्र उठाव करावयास नको होता,' अशी सुधारणावाद्याला साजेशी ओरड केली.

कम्यूनच्या 'आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या' प्रणेत्यांनीं दाखविलेल्या शौर्याचें उत्साहानें कौतूक करून मार्क्स थांबला नाहीं. जनतेचा हा महान् क्रान्तिकारक उठाव यशस्वी झाला नाहीं ही गोष्ट खरी असली तरी मार्क्स मात्र त्यांकडे, एक अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक प्रयोग, जागतिक कामगार-क्रान्तीच्या प्रगतींतील एक टप्पा, हजारो ठराव आणि कार्यक्रम यापेक्षांही जास्त महत्व असलेली प्रत्यक्ष कृति, या दृष्टीनें पहात होता. या क्रान्तींतून मिळालेल्या अनुभवाचें विश्लेषण करणें, त्यावरुन आपल्या धोरणाचे आडाखे बसविणें, आणि

त्या अनुभवांचें निकषावर आपले सिद्धान्त पडताळून पहाणें हें मार्क्स आपलें कर्तव्य समजत होता.

‘कम्यूनिस्टांच्या जाहीरनाम्यांत’ जी ‘एकच दुरुस्ती’ करावयास पाहिजे, असें मार्क्सनें सुचविलें ती ‘दुरुस्ती’ सुद्धां पॅरीस कम्यूनच्या अनुभवावरच आधारलेली होती.

कम्यूनिस्ट–जाहीरनाम्याच्या शेवटच्या जर्मन आवृत्तीला, २४ जून १८७२ रोजीं लिहिलेल्या प्रस्तावनेखालीं मार्क्स आणि एंगल्स या दोघांच्याही सह्या आहेत. या प्रस्तावनेंत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, जाहीरनाम्यांतील कार्यक्रम हा बरेच ठिकाणीं ‘जुना’ झाला आहे. नंतर ते म्हणतातः

“पॅरीस कम्यूननें विशेषतः एक गोष्ट निश्चितपणें सिद्ध केली आहे. आणि ती म्हणजे, ‘अस्तित्वांत असलेलें तयार राज्ययंत्र ताब्यांत घेऊन त्याचाच उपयोग कामगारवर्ग आपल्या फायद्याकरितां करूं शकत नाहीं.”

वरील वाक्य मार्क्सच्या ‘ फ्रान्समधील यादवी ’ या ग्रंथांतील आहे.

पॅरीस–कम्यूनमधून मिळालेला अनुभव मार्क्स आणि एंगल्स यांना इतका महत्त्वाचा आणि मूलभूत वाटला कीं, त्याचा त्यांनीं ‘महत्त्वाची दुरुस्ती’ म्हणून जाहीरनाम्यांत अन्तर्भाव केला.

त्यांतल्या त्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, मार्क्स आणि एंगल्स यांनीं ही जी ‘ दुरुस्ती ’ सुचविली, तिलाच संधिसाधूंनीं विकृत स्वरूप दिलें आहे. जाहीरनामा वाचणाऱ्या शंभरांतील नव्याण्णव लोकांना या ‘ दुरुस्तीचा ’ अर्थ माहीत नसतो. मार्क्सवादाला ठिकठिकाणीं जें विकृत स्वरूप दिलें आहे, त्या सर्वांची एकत्र चर्चा आम्हीं एका स्वतंत्र प्रकरणांत करणार आहोंत. येथें आम्हाला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, वर जें मार्क्सचें वाक्य उधृत केलें, त्याचा पाजीपणानें असा अर्थ लावला जातो कीं, या ठिकाणीं मार्क्सला ‘ सत्ता काबीज करणें ’ या कल्पनेच्या विरुद्ध ‘ हळूं हळूं प्रगति होणें ’ या कल्पनेवर भर द्यावयाचा आहे.

खरी परिस्थिति याच्या अगदीं उलट आहे. मार्क्सचें असें म्हणणें आहे कीं, ' तयार राज्ययंत्र ' केवळ ताब्यांत घेऊन कामगारांचें भागणार नाहीं, तर तें मोडून टाकलें पाहिजे,नेस्तनाबूत केलें पाहिजे.

पॅरीस कम्यूनचे वेळीं, १२ एप्रिल १८७१ रोजीं; कुगलमन याला धाडलेल्या पत्रांत मार्क्स लिहितो :

" 'अठरावी ब्रुमेअर ' या माझ्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत मी असें म्हटलें आहे कीं, फ्रान्समध्यें यापुढें होणाऱ्या क्रान्तींत, नौकरशाही-प्रधान लष्करी यंत्राचा पूर्वीप्रमाणें केवळ हातपालट होणार नाहीं, तर तें मोडूनच टाकलें जाईल. या नंतर तर युरोपमध्यें होणाऱ्या प्रत्येक खऱ्या जनक्रान्तीची ती पहिली पायरी असणार आहे. आपल्या पक्षाचे शूर सभासद पॅरीसमध्यें हीच गोष्ट करीत आहेत. " [ मार्क्सनें कुगलमनला लिहिलेल्या पत्रांचीं रशियन भाषेंत दोन भाषांतरें आहेत. त्यांपैकीं एक लेनिननें केलेलें असून त्यांस त्यानें प्रस्तावनाही लिहिली आहे. ]

क्रान्तिकालांत कामगारांचें शासनसंस्थेसंबंधीं कर्तव्य काय या बद्दलच्या मार्क्सवादाच्या शिकवणीचें सार 'लष्करी नौकरशाहीप्रधान लष्करी-शासनयंत्र नेस्तनाबूद करणें ' या वाक्यांत आहे. काउट्स्कीप्रणित मार्क्स-वादांत हें सार ' विसरलेलें ' आहे एवढेंच नव्हें तर त्याला निश्चितपणें विकृत स्वरूप दिलें गेलें आहे.

येथें ' अठरावी ब्रुमेअर ' मधील ज्या उताऱ्याचा उल्लेख आहे तो आम्हीं वर ( प्रकरण २ रें, परिच्छेद २ रा ) दिलाच आहे.

मार्क्सनें आपल्या पत्रांत केलेल्या विवेचनांतील दोन मुद्दे ध्यानांत घेण्यासारखे आहेत. एकः मार्क्सनें आपला निष्कर्ष युरोप पुरताच मर्यादित केला आहे. १८७१ सालांतील इंग्लंडकडे पहातां मार्क्सनें असें करणें सहाजिक होतें. त्या कालीं इंग्लंड हें अत्यंत विशुद्ध स्वरूपांत भांडवलशाही आस्तित्वांत असलेलें राष्ट्र असून सुद्धां, तेथें अजून लष्करशाही आणि बऱ्याच प्रमाणांत नौकरशाही सुद्धां, निर्माण झाली नव्हती. त्यामुळें त्या कालांतील इंग्लंडमध्यें क्रान्ति, आणि ' जन-क्रान्ति ' सुद्धां, ' तयार राज्ययंत्राचा ' प्रथम नाश केल्याशिवाय, शक्य झाली असती

आणि म्हणूनच मार्क्सनें आपल्या सिद्धान्ताच्या कक्षेंतून इंग्लंड वगळलें.

परंतु आज, १९१७ सालीं, पहिलें साम्राज्यशाही युद्ध सुरू असतांना मार्क्सप्रमाणें इंग्लंडचा अलग विचार करण्याची जरुरी राहिली नाहीं. ज्यांत नौकरशाही आणि लष्करशाही यांचा अभाव आहे अशा 'अँग्लो–सॅक्सन' पद्धतीच्या स्वातंत्र्याचे महत्त्वाचे आणि अखेरचे आधारस्तंभ इंग्लंड आणि अमेरिका होते. परंतु त्यांनीं सुद्धां आतां युरोपमधील रक्तानें लडबडलेल्या, घाणेरड्या नौकरशाही–लष्करीयंत्रांचा स्वीकार केला आहे, त्याला पहिलें स्थान दिलें आहे आणि त्या खालीं इतर सर्वांचा चुराडा होत आहे. म्हणून आतां इंग्लंड आणि अमेरिकेंतसुद्धां 'तयार राज्य–यंत्राचा संपूर्ण नाश' हीच खऱ्या 'लोक–क्रान्तीची' पहिली पायरी आहे. [ हें राज्ययंत्र १९१४ ते १७ या कालांत इतर यूरोपीय राष्ट्रांप्रमाणेंच ब्रिटन आणि अमेरिकेंतही साम्राज्यशाही–पूर्णावस्थेला पोंचलें आहे ].

दोन : 'नौकरशाही-लष्करी राज्ययंत्राचा संपूर्ण नाश हीच खऱ्या लोकक्रान्तीची पहिली पायरी आहे,' या मार्क्सच्या अत्यंत अर्थपूर्ण विधानाकडेही आपण जास्त लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. यांतील 'लोक-क्रान्तीची' कल्पना मार्क्सकडून यावी याचें आश्चर्य वाटतें. रशियांतील मेन्शेविक, प्लेकेनोव्हचे अनुयायी आणि स्वतःला मार्क्सवादी म्हणवून घेण्याची इच्छा करणारे स्ट्रूव्हचे अनुयायी, कदाचित् असेंही म्हणतील कीं, ही शब्दयोजना हा हस्तदोष आहे. परंतु या लोकांनीं मार्क्सवादाला इतकें 'विकृत' स्वरूप दिलें आहे कीं, त्यांना 'भांडवलशाही क्रान्ति' आणि 'कामगार क्रान्ति' या परस्पर विरोधी आहेत या पलीकडे जास्त कांहीं समजेनासेंच झालें आहे. आणि या 'परस्पर विरोधाचा' अर्थही ते अत्यंत निर्जीव तांत्रिकतेनें लावीत असतात.

उदाहरणार्थ : विसाव्या शतकांत पोर्तुगाल आणि तुर्कस्थान या दोन देशांत ज्या क्रान्त्या झाल्या त्या भांडवलशाही क्रान्त्या होत्या, हें निर्विवाद आहे. परंतु त्यांतील कोणतीच लोकक्रान्ति नव्हती, कारण त्यापैकीं कोणत्याच क्रान्तींत जनतेनें, आपल्या आर्थिक आणि राजकीय

मागण्याकरितां फार मोठ्या संख्येनें आणि स्वतंत्रपणें फारसा भाग घेतला नव्हता. उलट १९०५–१९०७ या कालांत रशियांत जी क्रान्ति झाली, तीही भांडवली क्रान्ति होती, तींत पोर्तुगाल आणि तुर्कस्थानमधील जनतेला मिळाले त्याप्रमाणें डोळे दिपवून टाकणारे विजयही रशियांतील जनतेला मिळाले नाहींत आणि तरी सुद्धां, ती क्रान्ति खरी लोक-क्रान्ति होती कारण त्यांत पिळणूक व दडपशाहीखालीं भरडल्या गेलेल्या लोकांनीं, बहुसंख्य जनतेनें, समाजांतील अगदीं खालच्या थरांतील लोकांनीं, भाग घेतला, स्वतंत्रपणें उठाव केला आणि सर्वच क्रान्तीवर आपल्या मागण्यांचा, नष्ट करीत असलेल्या समाजव्यवस्थेच्या जागीं, नवी समाजव्यवस्था आपल्या पद्धतीनें स्थापन करण्याच्या आपल्या प्रयत्नांचा ठसा उमटविला.

१८७१ सालीं युरोपमध्यें असा एकही देश नव्हता कीं जेथें कामगारवर्ग हा बहुसंख्य होता. त्यामुळें बहुसंख्य जनतेला आपल्याबरोबर खेंचून नेणाऱ्या क्रान्तींत कामगार आणि शेतकरी असे दोन्ही वर्ग जर सामील झाले असते तरच ती खरी ' लोक क्रान्ति ' झाली असती. त्या कालीं हे दोन वर्ग म्हणजेच ' जनता ' होती. हे दोन्ही वर्ग ' लष्करी-नौकरशाही राज्ययंत्राखालीं ' भरडले जात होते. या दृष्टीनें त्यांची ' एकजूट ' होती. लोकांच्या, बहुसंख्य जनतेच्या, कामगार आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें हें राज्ययंत्र मोडणें, त्याचा चुराडा करणें हेंच आवश्यक होतें; गरीब शेतकरी आणि कामगार यांची खरी एकजूट होण्यास हीच आवश्यक प्राथमिक परिस्थिति असते. आणि अशी एकजूट जर नसेल तर लोकशाही डळमळीत रहाते आणि समाजवादी समाजरचना निर्माण करणें अशक्य होतें.

अशा तऱ्हेची एकजूट घडवून आणण्याचा पॅरीस कम्यूननें प्रयत्न केला. परंतु अन्तर्गत आणि बाह्य अशा अनेक कारणांनीं कम्यूनला आपल्या प्रयत्नांत यश आलें नाहीं.

म्हणून खऱ्या ' लोक-क्रान्तीचा ' विचार करतांना मार्क्सनें, १८७१ सालीं युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांतून, निरनिराळ्या राष्ट्रांचे जे परस्पर

संबंध होते तें लक्षांत घेतले आहेत परंतु, असें करतांना तो मध्यमवर्गाचें वैशिष्ट्य विसरला नाहीं. ( त्याबद्दल बरीच चर्चा मार्क्सनें वेळोवेळीं केली आहे ). उलट त्यानें असेंच सांगितलें कीं, शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें, राज्ययंत्र मोडून टाकणेंच आवश्यक आहे; त्यामुळें त्यांच्यांत एकजूट निर्माण होते, आणि 'बांडगुळें' नाहींशीं करून त्यांचे जागीं 'नवी' गोष्ट स्थापन करण्याचें समान ध्येय त्यांच्यांत निर्माण होतें.

पण ही 'नवी' गोष्ट कोणती ?

## २ मोडून टाकलेल्या राज्ययंत्राचे जागीं काय येणार ?

या प्रश्नाला मार्क्सनें १८४७ सालीं जाहीरनाम्यांत जें उत्तर दिलें त्याचें स्वरूप सर्वसामान्य आहे. खरें म्हणजे मार्क्सच्या या उत्तरानें आपलेपुढील प्रश्नांचें स्वरूप स्पष्ट झालें परंतु त्या प्रश्नाला उत्तर मात्र मिळालें नाहीं. या यंत्राची जागा 'अधिकारी वर्ग बनलेल्या कामगार वर्गाची राजकीय संघटना' किंवा 'लोकशाहीकरितां यशस्वी लढा' घेईल एवढेंच जाहीरनाम्यांत म्हटलें आहे.

मार्क्स स्वप्नसृष्टींत वावरत नव्हता. 'अधिकारी वर्ग बनलेल्या कामगार वर्गाच्या राजकीय संघटनेचें' निश्चित स्वरूप काय असेल, आणि या संघटनेचा उपयोग, लोकशाही युद्ध सतत आणि निश्चित जिंकण्याकडे कसा होईल, या प्रश्नांना जनतेच्या चळवळींच्या अनुभवांतून काय उत्तर मिळतें याची मार्क्स वाट पहात राहिला.

पॅरीस कम्यूनमधून जो थोडासा अनुभव मिळाला त्याचें अत्यंत सखोल विवेचन मार्क्सनें आपल्या 'फ्रान्समधील यादवी' या ग्रंथांत केलें आहे. त्यांतील अत्यंत महत्वाचा भाग खालीं दिला आहे.

"शासनसंस्थेची निर्मिती मध्ययुगांत होऊन एकोणिसाव्या शतकांत तिला खडें सैन्य, पोलीस, नोकरशाही, धर्मगुरू, न्यायखातें इत्यादि, निरनिराळीं उपांगें असलेल्या सर्वव्यापी केंद्रित शासनसंस्थेचें स्वरूप प्राप्त झालें." भांडवलदार आणि कामगार यांचेमधील वर्गविग्रहाची तीव्रता वाढल्यानंतर, "शासनसंस्थेला जास्त जास्त प्रमाणांत, कामगारांचेवरील

भांडवलदारांच्या सर्वव्यापी शक्तीचें, बहुजन समाजावर सामाजिक गुलामगिरी लादण्याकरितां संघटित केलेल्या लोक–शासनयंत्राचें, वर्गीय जुलमाच्या यंत्राचें, स्वरूप प्राप्त झालें. प्रत्येक क्रान्ति ही वर्गयुद्धाच्या प्रगतीच्या मार्गावरील एक एक टप्पा असते आणि प्रत्येक क्रांतीनंतर शासनयंत्राचें हें दडपशाही स्वरूप जास्त जास्त स्पष्ट होत गेलें आहे." १८४८–४९ सालांतील क्रांतीनंतर शासनयंत्र हें, "कामगारांच्या विरुद्धच्या लढयांत भांडवलदारांच्या हातांतलें एक राष्ट्रीय युद्ध–यंत्र बनलें." "दुसऱ्या साम्राज्यानें ( १८५२ ते १८७० ) तें हत्यार सुसंघटित केलें."

"साम्राज्याचें विरुद्ध टोंक म्हणजे 'कम्यून' होय. वर्गीय सत्तेचें राजेशाही स्वरूपच केवळ नव्हे, तर सर्वच प्रकारची वर्गीय सत्ता नष्ट करणाऱ्या गणराज्याचें ( Republic ) 'कम्यून' हें 'मूर्त—स्वरूप' होतें."

कामगार किंवा समाजवादी गणराज्याचें ( Socialist Republic ) हें मूर्त स्वरूप कसें होतें ? कोणत्या तऱ्हेची शासनसंस्था त्यांतून निर्माण होत होती ?

"आपल्या पहिल्याच वट–हुकुमानें कम्यूननें 'खडें सैन्य' रद्द करून त्याचें ऐवजीं सर्वच जनतेच्या हातांत शस्त्रें दिलीं."

सोशालिस्ट म्हणविणाऱ्या प्रत्येक पक्षाच्या कार्यक्रमांत आतां या मागणीचा अंतर्भाव केलेला असतो. तरी सुद्धां २७ फेब्रुवारी १९१७ रोजीं झालेल्या क्रांतीनंतर, 'मेन्शेविक' आणि 'सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी' पक्ष, वरील कार्यक्रम प्रत्यक्ष अमलांत आणण्यास नकार देत आहेत. या घटनेवरून या पक्षांच्या कार्यक्रमाला किती महत्व द्यावयाचें हें आपल्या लक्षांत येईल.

"शहराच्या निरनिराळ्या विभागांतून प्रौढ मतदान पद्धतीनें निवडून आलेल्या आणि मतदारसंघाला जबाबदार असलेल्या प्रतिनिधींचे कम्यून बनलें होतें, आणि त्याची मुदत फार थोडी ठेवली होती. सहाजीकच यांतील बहुसंख्य सभासद प्रत्यक्ष कामगार किंवा कामगारांचे सर्वमान्य प्रतिनिधी होते......मध्यवर्ती सत्तेचें प्रतिनिधी, हें पोलिसांचें स्थान

कायम ठेवण्याऐवजीं, त्यांचें राजकीय स्वरूप एकदम नाहींसें करून, त्यांना कम्यूनला जबाबदार असलेले आणि ज्यांना केव्हांही काढून टाकण्याचा कम्यूनला अधिकार होता, असे कम्यूनचे प्रतिनिधी बनविण्यांत आले. कम्यूनच्या सभासदापासून तों अगदीं खालच्या कामगारापर्यंत सर्वांना, कामगाराला मिळणाऱ्या मजुरीच्या दरांत काम करावें लागे. मोठमोठे अधिकारी नाहींसे झाल्याबरोबर त्यांना दिले जाणारे भत्ते आणि त्यांचे विशिष्ट हितसंबंध हेही नाहींसे झाले......"

"लष्कर आणि पोलीस नाहींसे करून सरकारची पाशवी शक्ति नष्ट केल्यानंतर, जुन्या सरकारची अध्यात्मिक शक्ति, 'धर्मगुरूंची सत्ता', नाहींशी करण्याची कम्यूनची इच्छा होती......"

"न्यायाधिशांचें बाह्यात्कारी 'स्वतंत्र' स्थान नष्ट व्हावयाचें होतें... त्यांच्या निवडणुकी होऊन ते जनतेला जबाबदार बनणार होते आणि त्यांना 'परत बोलाविण्याचा' अधिकार जनतेला असणार होता."

अशा रीतीनें लष्कर नष्ट झालें, सर्वच सरकारी अधिकाऱ्यांच्या निवडणुकी होऊं लागल्या आणि त्यांना 'परत बोलाविण्याचा हक्क' जनतेला मिळाला, यामुळें कम्यूननें, मोडून टाकलेल्या राज्ययंत्राचें जागीं 'केवळ' संपूर्ण लोकशाहीची संस्थापना केली असें वाटतें. परंतु या 'केवळ' शब्दांत, कांहीं जुन्या संघटना, त्यांच्यापेक्षां मूलतःच निराळ्या असलेल्या दुसऱ्या नव्या संघटनांकडून फार मोठ्या प्रमाणावर दडपल्या जाण्याची क्रिया सामावलेली आहे. 'परिमाणात्मक' फरकांतून 'गुणात्मक' फरक घडून येण्याचें हें उदाहरण आहे. लोकशाही, जितकी कल्पना करणें शक्य आहे तितक्या संपूर्णपणें आणि सुसंगतपणें, अमलांत आणली गेली म्हणजे तिचें भांडवली लोकशाहीतून कामगारांच्या लोकशाहींत रूपांतर होतें. शासनसंस्थेचें, म्हणजे एका विशिष्ट वर्गाला दडपून टाकण्याकरितां उपयोगांत आणल्या जाणाऱ्या यंत्राचें रूपांतर, रूढ अर्थानें शासनसंस्था नसलेल्या संघटनेंत होतें.

अजून सुद्धां भांडवलदारांना दडपून टाकण्याची, त्यांचा प्रतिकार मोडून काढण्याची जरुरी असतेच. कम्यूनला तर याची जास्तच जरुरी

होती, आणि जितक्या निग्रहानें ही गोष्ट करावयास पाहिजे होती तितक्या निग्रहानें कम्यूननें ती केली नाहीं; हें त्यांच्या पराभवाचें एक कारण आहे. गुलामगिरी, भू-दास पद्धति आणि मजुरीची गुलामगिरी. या ज्या समाजांत आस्तित्वांत होत्या त्या समाजांतून दडपशाही करणारी संस्था अल्पसंख्यांकांची असे. आतां स्वतः बहुजनसमाजच ही संस्था बनतो. आपल्यावर जुलूम करणारांना दडपून टाकण्याचें कार्य बहुसंख्य जनताच करूं लागल्यानें, दडपशाही करण्याकरितां 'खास संघटित शक्तीची' जरुरी लागत नाहीं. याच अर्थानें शासनसंस्था विरून जाऊं लागते. विशेष हक्क असलेल्या अल्पसंख्यांकांच्या खास संघटना (विशेष हक्क असलेली नौकरशाही, लष्कर इत्यादि) करीत असलेले कार्य आतां बहुसंख्य जनताच करते. आणि शासनसंस्थेची जितकीं जितकीं जास्त कामें बहुजनसमाजाकडे येतात तितकी तितकी शासन-संस्थेच्या आस्तित्वाची जरुरी कमी कमी होत जाते.

या बाबतींत कम्यूननें केलेल्या अनेक गोष्टींपैकीं सरकारी नौकरांना मिळणारे भत्ते, आणि त्यांचे आर्थिक हक्क नाहींसे करणें, सर्व सरकारी नौकरांचा पगार कामगाराला मिळणाऱ्या 'मजुरी' इतका ठेवणें इत्यादि ज्या गोष्टींना मार्क्सनें विशेष महत्त्व दिलें त्या ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. त्यावरून, भांडवली लोकशाहीचें कामगारांच्या लोकशाहींत, पिळवणूक करणाऱ्या वर्गाच्या लोकशाहीचें पिळल्या जाणाऱ्या वर्गाच्या लोकशाहींत, शासनसंस्थेचें, म्हणजे एका विशिष्ट वर्गावर दडपशाही करणाऱ्या 'खास' शक्तीचें, बहुसंख्य जनतेच्या म्हणजे कामगार शेतकऱ्यांच्या 'सर्वसाधारण शक्तींत' रूपांतर होत असल्याचें स्पष्टपणें दिसून येतें. याच मुद्यावरील, आणि शासनसंस्थेच्या दृष्टीनें तर अतिशयच महत्त्वाच्या मुद्यावरील मार्क्सची शिकवण विसरली गेली आहे! बहुजनसमाजाकरितां लिहिलेलीं मार्क्सवादावरील जीं अनेक पुस्तकें आहेत त्यांत या मुद्याचा उल्लेखही नसतो. ख्रिश्चन धर्म, राजधर्म बनल्यानंतर, ज्याप्रमाणें ख्रिश्चन लोक, त्या धर्माच्या 'मूळ आणि साध्या स्वरूपांतील' लोकशाही तत्त्व आणि क्रान्तिकारक प्रवृत्ति विसरून गेले

त्याचप्रमाणें मार्क्सवादातील हा मुद्दा सुद्धां जुन्या विचारसरणींतील ' साधे-पणाचा ' परिणाम आहे असें मानून, त्याविषयीं मुग्धता स्वीकारणें हें 'शिष्टसम्मत' मानलें जात आहे.

मोठ्यांत मोठ्या सरकारी अधिकाऱ्यांचा पगारसुद्धां कमी करणें, ही प्राथमिक अवस्थेंतील लोकशाहीची मागणी वाटते. आजच्या संधिसाधू-पणाचा जनक आणि एकेकाळीं 'सोशल डेमोक्रॅट' असलेला एडवर्ड बर्नस्टिन यानें या 'प्राथमिक' लोकशाहीचा, भांडवलदारांप्रमाणेंच, उपहास करण्यांत आपली बुद्धि बरेच वेळा खर्च केली आहे. सर्व संधिसाधू आणि काउट्स्कीचे अनुयायी, यांच्याप्रमाणेंच बर्नस्टिनच्याही हें लक्षांत आलें नाहीं कीं, लोकशाहीची तिच्या प्राथमिक स्वरूपांत प्रस्थापना केल्याशिवाय, आपणांस भांडवली पद्धतींतून समाजवादाकडे जातां येणार नाहीं. (कारण त्याशिवाय बहुसंख्य जनता नव्हे तर आम जनता शासन-संस्थेचें कार्य कसें करूं शकेल ? ). आणि तो दुसरी ही ही गोष्ट विसरतो कीं, भांडवशाही आणि भांडवली संस्कृति यावर आधारलेली 'प्राथमिक' लोकशाही, आणि इतिहासपूर्व आणि भांडवलशाही पूर्व कालांतील 'प्राथमिक' लोकशाही या एक नसतात. मोठ्या प्रमाणावरील उत्पादन, मोठमोठे कारखाने, आगगाड्या, पोस्ट, तारायंत्र इत्यादि गोष्टी भांड-वलशाहीनें निर्माण केल्यानें, शासनसंस्थेचीं सर्व कामें इतकीं सोपीं झालीं आहेत कीं, साधे हिशेब ठेवणें, व्यवस्था पहाणें आणि देखरेख करणें एवढ्यांतच तीं सामावणें शक्य झालें आहे. त्यामुळें कोणत्याहि सुशिक्षित व्यक्तीकडून तीं करून घेतां येतील, कामगाराला मिळणाऱ्या मजुरी इतका पगार देऊन करून घेतां येतील, आणि त्यामुळें सरकारी नोकरांना मिळणाऱ्या सवलती आणि त्यांचा 'सरकारी मोठेपणा' नष्ट करतां येईल ( आणि केलाच पाहिजे ).

एकुण एक सर्व अधिकाऱ्यांच्या निवडणुकी करणें, त्यांना ' परत बोलाविण्याचा' अधिकार जनतेला देणें आणि त्यांचे पगार कामगाराला मिळणाऱ्या मजुरी इतके खालीं आणणें, या साध्या आणि उघड उघड लोकशाहीला धरून असणाऱ्या गोष्टी केल्यानेंच कामगार आणि बहुसंख्य

शेतकरी यांच्या हितसंबंधांत एकता निर्माण होईल. त्याचप्रमाणें भांडवलशाहींतून समाजवादाकडे नेणारा मार्ग, म्हणूनही त्याचा उपयोग होईल. या सर्व गोष्टींचा संबंध समाजाच्या फक्त राजकीय पुनर्घटनेशीं आहे. परंतु ' लुबाडणारे लुबाडले जाण्याची ' क्रिया सुरू असतांना किंवा ती सुरू करण्याची पूर्व–तयारी होत असतांना, म्हणजेच उत्पादनाच्या साधनांवरील खासगी मालकीचें रूपांतर सामाजिक मालकींत होत असतांनाच या योजनांचा खरा अर्थ आणि त्याचें महत्त्व समजून येईल.

मार्क्स म्हणतो, " खडें सैन्य आणि अम्मलबजावणी खातें ही सर्वांत जास्त खर्चाचीं दोन्ही खातीं रद्द करून, भांडवली क्रांतीची ' स्वस्त सरकारची ' घोषणा पॅरीस कम्यूननेंच प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविली. "

मध्यम वर्गांतल्या निरनिराळ्या गटांतल्या प्रमाणेंच, शेतकरी वर्गांतीलही फारच थोडे लोक समाजांत 'वर' येतात किंवा भांडवलशाहींतील रूढ अर्थानें 'पुढें येतात.' म्हणजेच सुखवस्तु, भांडवलदार बनतात किंवा शाश्वती आणि विशेष हक्क असलेल्या नोकऱ्या मिळवितात. ज्या भांडवली देशांत शेतकरी-वर्ग अस्तित्वांत असतो ( आणि बहुतेक सर्व भांडवली देशांत तो असतोच ) त्या देशांतील बहुसंख्य शेतकरी सरकारी यंत्राखालीं भरडले जात असतात, आणि म्हणूनच चालू सरकार उखडून टाकून त्याचे जागीं ' स्वस्त ' सरकार प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा असते. परंतु हें कार्य फक्त कामगारच करूं शकतात, आणि हें कार्य करून ते, शासनसंस्थेची समाजवादी पद्धतीवर पुनर्घटना करण्याचे मार्गावर पहिलें पाऊल टाकतात.

### ३ विधिमंडळ-पद्धतीचा ( Parliamentarism ) नाश

मार्क्स म्हणतो, " कम्यून हें ' काम करणारें ' मंडळ होणार होतें, नुसतें विधिमंडळ नव्हे. कायदे करणें आणि त्यांची अम्मलबजावणी करणें हीं दोन्ही कामें कम्यूनच करणार होतें... "

" सत्ताधारी वर्गातील कोणत्या व्यक्तींनीं आपले प्रतिनिधी म्हणून विधिमंडळांत बसावें आणि आपलेवर दडपशाही करावी हे दर तीन किंवा

सहा वर्षांनीं ठरवितां येणें, एवढाच प्रौढमतदान पद्धतीचा उपयोग होण्याचें ऐवजीं, मालकाला ज्याप्रमाणें ‘ वैयक्तिक ’ मतांचा उपयोग आपल्या खासगी धंद्यांतील मॅनेजर आणि नौकर यांची निवड करण्याकरितां होतो त्याप्रमाणें बहुजन समाजाला कम्यून–पद्धतीखालीं ‘ प्रौढमतदानाचा ’ उपयोग व्हावयाचा होता. ”

आज सर्वत्र बोकाळलेला अतिरेकी–राष्ट्रवाद आणि संधिसाधूपणा यामुळें मार्क्सनें १८७२ सालीं केलेलें विधिमंडळ–पद्धतीचें वरील विवेचन सुद्धां मार्क्सवादाच्या विसरलेल्या सिद्धान्तांतच जमा झालें आहे. कामगार वर्गाशीं बेइमान झालेले मंत्रिमंडळांतील मंत्री, धंदेवाईक विधिमंडळवादी, तसेंच आजचे ‘ व्यवहारी ’ सोशालिस्ट यांनीं विधिमंडळ–पद्धतीवर टीका करण्याचें कार्य अराज्यवाद्यांकडे सोपविलें आहे. आणि याच विचित्र सबबीवर, विधिमंडळ–पद्धतीवरील सर्वच टीकेवर ते ‘अराज्यवादीपणाचा ’ आरोप करीत आहेत ! ! तेव्हां, विधिमंडळ पद्धत आस्तित्वांत असलेल्या आजच्या पुढारलेल्या देशांतील कामगारांना श्चेडिमन, डेव्हिड, लीजन, सेवट्स, रेनॅडयूल्स, हेंडरसन, व्हॅंडरव्हल्ड, ब्रॅंटिंग इत्यादि सोशालिस्टांची चीड येऊन ते जास्त जास्त अराज्यवादी सिंडिकॅलिस्टांच्या-हा पंथही संधिसाधूपणाचाच एक नमुना असला तरी–आहारीं जात आहेत, याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

प्रूकेनॉव्ह आणि काउट्स्की यांचे प्रमाणें मार्क्सला क्रान्तिकारक विरोधविकास–वाद हें केवळ खेळणें, एक निरर्थक शब्दजाल, वाटत नव्हतें. परिस्थिति ज्या वेळेला क्रान्तीला विरोधी असेल त्या वेळीं विधिमंडळ–पद्धतीच्या कोंडवाडयाचा सुद्धां उपयोग करून घेतला पाहिजे, हें न समजणाऱ्या अराज्यवाद्यांना विरोध कसा करावयाचा हें मार्क्सला माहीत होतें. एवढेंच नव्हे तर विधिमंडळपद्धतीवर कामगार वर्गाच्या दृष्टिकोनांतून टीका कशी करावी याचेंही ज्ञान मार्क्सला होतें.

“ सत्ताधारी वर्गांतील कोणत्या व्यक्तींनीं आपले प्रतिनिधी म्हणून विधिमंडळांत बसावें आणि आपलेवर दडपशाही करावी हें दर तीन किंवा सहा वर्षांनीं ठरविण्याचा अधिकार ” हेंच विधिमंडळपद्धतीचें खरें स्वरूप

आहे; मग ती घटनात्मक सनदशीर राजेशाही असो किंवा लोकशाही गणराज्य असो.

परंतु आपण शासनसंस्थेचा विचार करीत आहोंत, आणि तिच्यासंबंधीं कामगार वर्गाचें जें कार्य आहे त्या दृष्टीनें पहातां विधिमंडळ हें शासनसंस्थेचें एक अंग मानलें पाहिजे. हें जर खरें तर मग प्रश्न असा कीं, या विधिमंडळ पद्धतींतून मार्ग कसा काढावयाचा ? तिचा त्याग कसा करतां येईल ?

आम्ही पुन्हा सांगतों कीं, मार्क्सचें कम्यूनच्या अनुभवावर आधारलेले जे सिद्धान्त आहेत त्यांचा आजच्या ' सोशल–डेमोक्रॅट्सना ' इतका विसर पडला आहे कीं, विधिमंडळपद्धतीवर प्रतिक्रान्तिकारक आणि अराज्यवादी या व्यतरिक्त इतर दृष्टिकोनांतून केलेली टीका त्यांना (सोशालिझमशीं द्रोह करणाऱ्यांना असें वाचावें ) कळतच नाहीं.

प्रतिनिधिक संस्था आणि निवडणूकीचें तत्त्व यांना मूठमाती देणें हा कांहीं विधिमंडळ पद्धत नाहींशी करण्याचा मार्ग नाहीं, तर प्रतिनिधिक संस्थांचें ' चर्चामंडळांतून ' ' काम–करणाऱ्या मंडळांत ' रूपांतर करणें हा तसें करण्याचा मार्ग आहे. " कम्यून हें विधिमंडळ नव्हें तर काम करणारी संस्था–कायदे करणारी आणि त्यांची अम्मलबजावणी करणारी संस्था–असणार होतें. "

" विधिमंडळ नव्हें तर काम करणारी संस्था "—आजच्या विधिमंडळवादी सोशल डेमोक्रॅटिक कुत्र्यांना हें रोखठोक उत्तर आहे. अमेरिकेपासून स्विझरलंड पर्यंत, फ्रान्सपासून इंग्लंडपर्यंत, आणि नॉर्वे इत्यादि कोणतेंही, विधिमंडळपद्धत अस्तित्वांत असलेलें राष्ट्र घ्या, आपणांस असें आढळून येईल कीं या राष्ट्रांतून प्रत्यक्ष राजकारणाचें काम पडद्याआड होत असतें आणि तें निरनिराळ्या खात्यांचे चिटणीस, कायदे पंडित आणि लष्करांतील सर्वश्रेष्ठ अधिकारी यांचेंकडून केलें जात असतें. विधिमंडळाचें कार्य निव्वळ चर्चा करून सामान्य जनतेची फसवणूक करणें हें असतें. ही गोष्ट इतकी खरी आहे कीं, रशियांतील भांडवली लोकशाही गणराज्यांत, अजून खरें विधिमंडळ अस्तित्वांत

आलें नसतांना सुद्धां, तेथें विधिमंडळ पद्धतींतील हे सर्व दोष स्पष्ट झाले आहेत. सडलेल्या मध्यमवर्गीय विचारसरणीच्या स्कोन्लेव्ह, सरटेलिस, चरनॉव्ह आणि व्हेकसेंटिव्हस इत्यादि पुढाऱ्यांनीं तिरस्करणीय 'विधि-मंडळ वृत्तीनें' सोव्हियट संघटनांना सुद्धां भारून टाकलें आहे; आणि त्यांचे फक्त चर्चा-मंडळांत रूपांतर केलें आहे. आमदार 'सोशालिस्ट' मंत्री सोव्हियट मधून मोठमोठीं भाषणें आणि ठराव करून भोळ्या–भाबड्या जनतेला फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. सरकारांतही सतत अलटापालट आणि घडामोड सुरू आहे; आणि त्याचा हेतु शक्य तितक्या जास्त सोशल डेमोक्रॅट्सना आणि मेन्शेविकांना पैशाच्या आणि मानाच्या जागेवर बसण्याची एकएकदां तरी संधी देणें, आणि जनतेचें लक्ष इतरत्र वेधून ठेवणें हा आहे. खऱ्याखुऱ्या राज्यकारभाराचें काम मात्र पडद्याआड कायदेपंडित आणि सेनानायक यांचे मार्फत चालूच आहे.

अधिकारारूढ सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'डायलो नरोदा' या मुख-पत्रानें आपल्या एका अग्रलेखांत, उच्च वर्गाला,–या वर्गांतील सारेच लोक राजकीय वेश्या–व्यवसायांत गुंतलेले असतात,—साजेशा अनुपमेय स्पष्टवक्तेपणानें अशी कबुली दिली होती कीं, जीं खातीं 'सोशालिस्ट' मंत्र्यांच्या ताब्यांत आहेत त्या खात्यांत सुद्धां पूर्वीचीच नोकरशाही चौकट कायम आहे; त्यांचें कार्यही जुन्याच पद्धतीनें चालू आहे, आणि ही नोकरशाही क्रान्तिकारक कार्यक्रम खुशाल उधळून लावीत आहे. परंतु ही कबुली जरी त्यांनीं दिली नसती तरी सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी आणि मेन्शेविक यांनीं मंत्रिमंडळ बनविण्याच्या कार्यात जें सहकार्य केलें त्याचा इतिहास हें सिद्ध करीत नाहीं काय ? यांत वैशिष्ट्य एवढेंच कीं, मंत्रिमंडळांतील केडेट्सच्या संगतींत चरनॉव्ह, रेसनॉव्ह, झेंझेनॉव्ह इत्यादि, 'डायलो नरोदा' चे संपादक इतके निर्लज्ज बनले आहेत कीं, ते आपल्या खात्यांतही सर्व गोष्टी आहेत तशाच कायम राहिल्या आहेत असें बेशरमपणानें जाहीर करीत आहेत. जणू काय ही एक गम्मतच आहे ! सोशालिझमची भाषा भोळ्या बहुजनसमाजाला फसविण्याकरितां, आणि

नौकरशाही आणि कायद्याची चौकट भांडवलदारांच्या फायद्याकरितां ! 'सन्माननीय' संमिश्र मंत्रिमंडळाचें हेंच वैशिष्ट्य असतें.

भांडवली पद्धतींतील लांचखाऊ आणि कुजलेल्या विधिमंडळ पद्धतीचे जागीं कम्यूननें अशा संस्थांची प्रस्थापना केली असती कीं, ज्यांत मतस्वातंत्र्य आणि चर्चास्वातंत्र्य हें जनतेला फसविण्याचें एक साधन राहिलें नसतें. कारण विधिमंडळांतील सभासदांना स्वत:लाच काम करावें लागलें असतें, आपले कायदे आपणच अमलांत आणावे लागले असते, प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचा कसा उपयोग होतो हेंही त्यांनाच पहावें लागलें असतें आणि ते मतदारांना प्रत्यक्षपणें जबाबदार राहिलें असतें. कम्यूनच्या व्यवस्थेखालीं प्रातिनिधिक संस्था अस्तित्वांत राहिल्या असत्या परंतु एक विशिष्ट पद्धत या दृष्टीनें विधिमंडळपद्धत, कायदे करणें आणि त्यांची अम्मल बजावणी या दोन कामांची विभागणी या दृष्टीनें, आणि आमदारांना मिळणारे विशेष सामाजिक हक्क या दृष्टीनें, अस्तित्वांत राहिली नसती. लोकशाही, फार काय कामगारांची लोकशाहीसुद्धां, प्रातिनिधिक संस्थाशिवाय, अस्तित्वांत येऊंच शकणार नाहीं. परंतु भांडवलशाही समाजावरील टीका म्हणजे वायफळ बडबड नसेल, 'भांडवलदारांची सत्ता उखडून टाकण्याची' घोषणा, मेन्शेविक, सोशालिस्ट–रेव्होल्यूशनरी, श्विन्डेमन्स, लीजन्स , सेंबाट्स, व्हेंडरव्हल्डे यांचे प्रमाणें कामगारांचीं मतें मिळविण्याकरितां केलेला केवळ 'स्टंट' नसून, खरोखरच आपली तशी इच्छा असेल तर विधिमंडळपद्धतीशिवाय लोकशाहीचा विचार करणें आपणांस शक्य आहे आणि तसा विचार आपण केलाही पाहिजे.

कम्यूनमध्यें आणि कामगारांच्या लोकशाहींत, आवश्यक असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाचा विचार करतांना मार्क्सनें त्यांची तुलना एकाद्या 'मालकाच्या हाताखालीं असलेल्या किंवा साधारणपणें कोणत्याही भांडवली धंद्यांत काम करणाऱ्या 'कामगार, फोरमन, कारकून' इत्यादि नौकरांचे कामाबरोबर केली आहे हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

एका नवीन समाजाची 'स्वप्नरम्य कल्पना' करणें, किंवा अशी

समाजव्यवस्था ‘ शोधून काढणें ’ या दृष्टीनें मार्क्समध्यें कल्पना–रम्यत्वाचा अंशही नाहीं. मार्क्सनें जुन्या समाजांतून जन्म पावत असलेल्या नव्या समाजाचा, जुन्या समाजाचे नव्या समाजांत रूपांतर होत असतांना त्याला प्राप्त होणाऱ्या निरानिराळ्या अवस्थांचा, एक नैसर्गिक परिवर्तन या दृष्टीनें विचार केला. कामगारांच्या प्रत्यक्ष चळवळींतून मिळणाऱ्या अनुभवाचें परिशीलन करून त्यानें, त्यापासून, व्यवहारांत उपयोगी पडतील असे सिद्धांत काढण्याचा प्रयत्न केला. पिळल्या गेलेल्या वर्गाच्या मोठमोठ्या चळवळींतून प्रत्यक्ष ज्ञान मिळविण्यास, सर्व मोठमोठ्या क्रांतिकारक विचारवन्ताप्रमाणेंच मार्क्सही कचरला नाहीं. त्यानें कम्यूनच्या प्रत्यक्ष अनुभवांतून ज्ञान मिळविलें, कम्यून लढविणाऱ्यांना वावदुकपणानें नुसतीं व्याख्यानें दिलीं नाहींत. ( उलट प्लेकेनॉव्हनें सांगितलें कीं, ‘जनतेनें सशस्त्र उठाव करावयास नको होता.’ किंवा सरटेलिस् म्हणतो कीं, ‘ प्रत्येक वर्गानें आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत ’ ).

नौकरशाही ताबडतोब सर्व ठिकाणीं आणि संपूर्ण नाहींशी करण्याची कल्पनासुद्धां करणें शक्य नाहीं. तें एक निव्वळ स्वप्न होईल. परंतु नौकरशाही यंत्राचे ताबडतोब ‘ तुकडे ’ करणें आणि त्या जागीं असें यंत्र निर्माण करण्यास आरंभ करणें कीं, ज्यामुळें सर्व नौकरशाही शेवटीं नाहींशी होईल, ही कांहीं स्वप्नसृष्टि नाहीं. हें कम्यूनच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. आणि असा ‘ आरंभ ’ ताबडतोब करणें हें क्रान्तिकारक कामगारांचें प्रत्यक्ष आणि तातडीचें कार्य आहे.

भांडवली समाजव्यवस्थेंत राज्यकारभार चालविण्याचें काम सोपें होतें. त्यामुळें अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या ‘ विशेष ’ सवलती नाहींशा करणें शक्य होतें, आणि कामगार वर्गाची, सर्व समाजाकरितां ‘ फोरमन, कामगार आणि कारकून ’ कामाला लावण्याचें कार्य करणारी संघटना ( सत्ताधारी वर्ग म्हणून ) निर्माण करणें एवढेंच काम रहातें.

आम्ही कल्पनावादी नाहीं. राज्यव्यवस्थेची सर्व जबाबदारी, सर्व ताबेदारी, एकदम नाहींशी करण्याच्या स्वप्नसृष्टींत आम्हीं रंगून जात नाहीं. कामगारांच्या हुकूमशाहीचें कार्य काय याची नीट जाणीव नस-

त्यानें निर्माण झालेल्या या अराज्यवादी स्वप्नसृष्टीला मार्क्सवादांत मुळींच स्थान नाहीं. आणि खरें पहातां तिच्यामुळें, समाजवादी क्रान्ति, मानवी स्वभाव बदलेपर्यंत पुढें ढकलली जाते. नव्हे, मानवी स्वभाव आहे तसा असतांना, ताबेदारी, हुकूमत, ' फोरमन आणि कारकून ' यांचे-शिवाय चालत नाहीं असा मानवी स्वभाव असतांना आम्हांला समाजवादी क्रान्ति हवी आहे.

मात्र ही ताबेदारी पिळल्या गेलेल्या सर्व जनतेच्या सशस्त्र पुढारी वर्गाची, कामगार वर्गाची, करावी लागणार. सरकारी अधिकाऱ्यांच्या ' विशिष्ट वडेजावाची ' जागा ' कामगार आणि मॅनेजर ' यांच्या साध्या आणि सर्वसाधारण कामानें तावडतोब घेतली जावी अशी उपाययोजना तावडतोब करतां येणें शक्य आहे कारण हें काम शहरांत राहणाऱ्या कोणत्याही सुशिक्षित व्यक्तीला करतां येतें आणि कामगाराला मिळणाऱ्या मजुरीच्या ' वेतनांत ' करतां येतें. आणि तशी उपाययोजना आपण केलीच पाहिजे.

आम्हीं कामगार, भांडवलशाहीनें जें निर्माण केलें आहे त्याच्या पायावर, कामगार असतांना आम्हाला मिळालेल्या अनुभवाच्या जोरावर आणि सशस्त्र कामगारांच्या राजकीय शक्तीच्या जोरावर, पोलादी शिस्त निर्माण करून, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाची ' संघटित ' उभारणी करूं आणि सरकारी अधिकाऱ्यांना आमच्या सूचना अमलांत आणणारे, आम्हाला जबाबदार असणारें, माफक पगाराचे आणि केव्हांही परत बोलवितां येतील असे, मॅनेजर बनवून टाकूं. ( अर्थात् निरनिराळ्या खात्यांतील तज्ञांच्या सहाय्यानें ). कामगार म्हणून आमचें हेंच कर्तव्य आहे. येथूनच आम्हाला कामगार क्रान्तीला आरंभ करतां येईल, आणि तसा आम्ही केला पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या पायावर एकदां असा आरंभ झाला कीं, सर्वच नोकरशाही हळूं हळूं आणि आपोआप विरून जाईल, आणि क्रमाक्रमानें अशी ' सुव्यवस्था ' ( सरकारी परिभाषेतील लटकी सुव्यवस्था नव्हे ) निर्माण होईल कीं, तेथें मजुरी रूपी गुलामगिरी अस्तित्वांत रहाणार नाहीं; ज्यांत अधिकार चालविणें—आणि

हिशेब ठेवणें हीं कामें इतकीं सोपीं होतील कीं, तीं आळीपाळीनें सर्वांनाच करतां येतील; पुढें पुढें तीं अंगवळणीं पडतील आणि शेवटीं त्यांना समाजांतील विशिष्ट गटाचें 'विशिष्ट काम' म्हणून निराळें स्थान रहाणार नाहीं.

गेल्या शतकाच्या सातव्या दशकांतील एक विनोदी व्यक्ति सोशल-डेमोक्रॅटिक समाजवादी संघटनेचें उदाहरण म्हणून पोस्ट खात्याकडे बोट दाखवीत असे. आणि तें उदाहरण बरोबर होतें. आजचें पोस्ट खातें हें सरकारी भांडवलशाहीचा मक्तेदारी धंदा असल्याप्रमाणें चालविलें जातें. साम्राज्यशाही- सर्वच खातीं हळूं हळूं याच पद्धतीवर संघटित करीत आहे. या पद्धतींत कामानें पिचलेल्या आणि उपाशी पोटीं कामगाराचें उरावर तीच भांडवली नोकरशाही कायम असते. परंतु यांतच सामाजिक देखरेख करण्याच्या पद्धतीची रूपरेषा तयार असते. भांडवलदारांची सत्ता उलथून टाका, पिळणूक करणाऱ्या लोकांचा प्रतिकार सशस्त्र कामगारांच्या पोलादी शक्तीनें चिरडून टाका, आजच्या समाजांतील नोकरशाही नेस्तनाबूद करा; म्हणजे तुमचे हातांत अत्यंत तज्ञ लोकांची एक संघटना येईल. या संघटनेंत 'ऐतखाऊ' असणार नाहींत, ती कामगारांना चालवितां येईल, त्यांना स्वतःलाच 'तज्ञ, मॅनेजर आणि हिशेबनीस' यांची निवड करतां येईल, त्या सर्वांना—खरें म्हणजे सर्वच सरकारी अधिकाऱ्यांना——कामगारांच्या मजुरी इतकें वेतन देतां येईल, हें आपलें प्रत्यक्ष कार्य आहे आणि सर्व सार्वजनिक खात्यांचें बाबतींत तें ताबडतोब करतां येणें शक्यही आहे. कम्यूननें सुरू केलेलें प्रत्यक्ष कार्य (विशेषतः शासनसंस्थेसंबंधींचें) ध्यानांत घेऊन ठरविलेला, सर्व श्रमजीवी वर्गाची पिळणुकींतून मुक्तता करण्याचा हाच मार्ग आहे.

सर्व समाजाची अर्थ व्यवस्था पोस्टखात्याच्या पद्धतीवर संघटित करणें हें आपलें ताबडतोबीचें कार्य आहे. त्यामुळें सर्व तज्ञ, मॅनेजर, हिशेबनीस आणि एकंदर सर्वच सरकारी अधिकारी, यांना कामगारांच्या मजुरी इतकें वेतन देतां येईल आणि ते सर्व सशस्त्र कामगार-वर्गाच्या ताब्यांत आणि हुकमतीखालीं रहातील. अशा आर्थिक व्यवस्थेवर उभारलेल्या

अशा प्रकारच्या शासनसंस्थेची आपणांस जरुरी आहे. विधिमंडळपद्धत नाहींशी करूनही प्रातिनिधिक संस्था कायम ठेवण्याचा हाच मार्ग आहे. आणि या संस्थांना भांडवलदार वर्गांनीं आपलें जें वटीक बनविलें आहे त्या परिस्थितींतून कामगार वर्गाची मुक्तताही याच मार्गानें होइल.

## ४ राष्ट्रीय एकजुटीची संघटना

"राष्ट्रीय पुनर्घटनेची रूपरेषा देतांना कम्यूननें असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, अगदीं लहान खेडेगांवांतील संघटनेचें स्वरूपही कम्यून हेंच असावें... परंतु अशा रीतीनें संघटना निर्माण करण्यास कम्यूनला वेळच मिळाला नाहीं..." पॅरीस येथें जी 'राष्ट्रीय–सभा' भरणार होती तिचें सर्व प्रतिनिधी 'कम्यून' मार्फतच निवडून यावयाचे होते.

"... मध्यवर्ति सरकारकडे जीं थोडीफार कामें राहतात तीं सुद्धां नष्ट करण्याचा 'कम्यून्स'चा हेतु होता, असा खोटा प्रचार केला जातो. परंतु हीं महत्त्वाचीं कामें कम्यूनमार्फत आणि संपूर्णपणें जबाबदार प्रतिनिधींच्या मार्फत केलीं जावयाचीं होतीं...राष्ट्रीय एकता नष्ट करावयाची नव्हती, तर कम्यूनच्या पद्धतीवर तिची पुनर्घटना व्हावयाची होती; आणि राष्ट्रीय ऐक्याचें प्रतीक मानली जाणारी, राष्ट्रापासून अलग आणि राष्ट्रापेक्षांही श्रेष्ठ असलेली, परंतु वस्तुतः समाजावरील बांडगुळाप्रमाणें असणारी आजची शासनसंस्था नाहींशी करून त्या बेगडी ऐक्याला खरें वास्तव स्वरूप दिलें जावयाचें होतें. जुन्या शासनसंस्थेचें केवळ दडपशाही करण्यास उपयोगी पडणारे विभाग कापून टाकून, तिची न्याय्य कामें समाजापेक्षांही श्रेष्ठ बनलेल्या अधिकाऱ्यांचेकडून काढून घेऊन, तीं समाजाला जबाबदार असलेल्या प्रतिनिधींच्याकडे सोपविलीं जावयाचीं होतीं."

मार्क्सचे वरील विचार आजच्या सोशल डेमोक्रॅटिक संधिसाधूंना किती प्रमाणांत समजले नाहींत (ते समजून घेण्याची त्यांना इच्छाच नाहीं असें म्हणणें जास्त योग्य होईल) हें तत्त्वच्युत बर्नस्टिनचें, "सोशालिझमचीं तत्त्वें आणि सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें कर्तव्य" या नांवाचें अति प्रसिद्ध पुस्तक वाचल्यास समजून येईल. वर दिलेल्या

मार्क्सच्या उताऱ्यासंबंधीं बर्नस्टिन लिहितो; "...या कार्यक्रमाचा राजकीय गाभा, त्याचीं महत्वाचीं अंगोपांगें यांत आणि प्रूधाँच्या राजकीय 'विकेन्द्रीकरणाच्या' कल्पनेंत अत्यंत साम्य आहे;...मार्क्स आणि 'मध्यमवर्गीय' ( या विशेषणांतील अयोग्यपणा दाखविण्याकरितांच बर्नस्टिननें हा शब्द अवतरण चिन्हांत घातला आहे, — लेनिन ) प्रूधाँ, यांच्यांत इतर प्रश्नांचे बाबतींत कितीही फरक असला तरी या प्रश्नांचे बाबतींत त्यांचे विचारसरणींत अत्यंत साम्य आहे." बर्नस्टिन पुढें लिहितो. "स्थानिकसंस्थांचें महत्व वाढत आहे हें खरें, परंतु मार्क्स आणि प्रूधाँ म्हणतात त्याप्रमाणें आजची शासनसंस्था नष्ट करून तिच्यांतील अन्तर्भूत संस्थांचें स्वरूप, राष्ट्राचें प्रतिनिधित्व ठरविण्याची जुनी पद्धत संपूर्णपणें नाहींशी होईल, इतकें बदलणें ( कम्यूनच्या प्रतिनिधींचें जिल्हा किंवा प्रांतिक विधिमंडळ बनविणें आणि या विविधमंडळाच्या प्रतिनिधीचें राष्ट्रीय विधिमंडळ बनविणें ) हें लोकशाहीचें पाहिलें कर्तव्य आहे असें मला वाटत नाहीं." [ बर्नस्टिन, 'प्रेमिसेस' पा. १३४–१३६; जर्मन प्रत ]

"बांडगूळ असलेल्या सरकारी शक्तीचा नाश करणें," या प्रश्नावरील मार्क्सच्या विचारसरणीची प्रूधाँच्या 'राजकीय विकेन्द्रीकरणाच्या' कल्पनेशीं तुलना करणें हा अकलेचा एक अजब नमुना आहे. परंतु ही गोष्ट चुकून घडलेली नाहीं. या संधिसाधूंच्या हें लक्षांतच येत नाहीं कीं, या ठिकाणीं मार्क्स, केन्द्रित विरुद्ध विकेन्द्रित राजसत्ता, या प्रश्नाचा विचार करीत नसून, सर्व भांडवली राष्ट्रांत अस्तित्वांत असलेल्या भांडवली सरकारी यंत्राचा नाश कसा करावयाचा या प्रश्नाचा विचार करीत आहे. सभोंवतालच्या निर्बुद्ध मध्यमवर्गीयांच्या समाजांत आणि सुधारणावादाच्या डबक्यांत जेवढें दिसेल तेवढेंच म्हणजे फक्त स्थानिक-स्वराज्य संस्था !— या संधिसाधूंच्या डोक्यांत शिरते, कामगार क्रान्तीचा विचार कसा करावयाचा हें सुद्धां, ते विसरून गेले आहेत.

हें हास्यास्पद खरें; परंतु आश्चर्य असें कीं, बर्नस्टिनच्या या मुद्याला कोणीही विरोध केला नाहीं. बर्नस्टिनच्या मतांचें पुष्कळांनीं, विशेषतः

राशियांत प्लेकेनॉव्हनें आणि युरोपमध्यें काउट्स्कीनें, खंडन केलें. परंतु वरील प्रश्नाचे बाबतींत बर्नस्टिननें मार्क्सवादाला जें 'विकृत' स्वरूप दिलें त्या विरुद्ध मात्र दोघांपैकीं एकानेंही शब्द काढला नाहीं.

क्रान्तिकारक पद्धतीनें विचार करणें, आणि क्रान्तिसंबंधीं विचार करणें, याची आणि संधिसाधूंची इतकी फारकत झाली आहे कीं, राजकीय 'विकेन्द्रीकरणा'ची कल्पना मार्क्सला चिकटवून ते त्याची, अराज्यवादाचा संस्थापक प्रूधाँ याचेशीं तुलना करतात. आणि काउट्स्की आणि प्लेकेनॉव्ह, क्रान्तिकारक मार्क्सवादाच्या सिद्धांताचें संरक्षक बनूं पहाणारे हे 'सनातनी' मार्क्सवादी, त्या विरुद्ध एक शब्दही काढीत नाहींत ! मार्क्सवाद आणि अराज्यवाद यांचेमधील फरकाला अत्यंत विकृत स्वरूप देण्याची काउट्स्कीवादी आणि इतर संधिसाधू यांची जी विशिष्ट पद्धत आहे तिचें मूळ या ठिकाणीं आहे. त्याचा विचार आपण नंतर करूं.

कम्यूनच्या अनुभवाचें मार्क्सनें केलेलें जें विवेचन आम्हीं वर उधृत केलें आहे त्यांत विकेन्द्रीकरणाचा अंशही नाहीं. जे मुद्दे बर्नस्टिनच्या ध्यानांत आले नाहींत त्याच मुद्यांचे बाबतींत मार्क्स आणि प्रूधाँ यांचें मतैक्य आहे आणि ज्या प्रश्नांचे बाबतींत मार्क्स आणि प्रूधाँ यांचें एकमत आहे असं बर्नस्टिन म्हणतो, त्याच मुद्यावर मार्क्स आणि प्रूधाँ यांच्यांत संपूर्ण मतभेद आहे !

आजचें 'सरकारी यंत्र' मोडून टाकणें आवश्यक आहे, या प्रश्नावर मार्क्स आणि प्रूधाँ यांचें एकमत आहे. मार्क्सवादी आणि अराज्यवादी (प्रूधाँ आणि बाकूनिन् हें दोघेही) यांच्यांत हें जें साम्य आहे त्याकडे लक्ष देण्याची जरुरी संधिसाधू आणि काउट्स्कीवादी यांना वाटत नाहीं, कारण या प्रश्नाचे बाबतींत त्यांची मार्क्सवादाशीं फारकत झालेली आहे.

मार्क्सचें, प्रूधाँ आणि बाकूनिन् यांचेबरोबर 'विकेन्द्रीकरणाच्या' प्रश्नावरच–आणि कामगारांच्या हुकूमशाहीच्या प्रश्नावरसुद्धां–मतभेद होते. अराज्यवादाकडे बघण्याच्या मध्यमवर्गीय दृष्टिकोनांतून विचार केला म्हणजे राजकीय केन्द्रीकरणाचा सिद्धान्त तर्कशुद्धपणेंच निघतो. मार्क्स

राजकीय केन्द्रीकरणाचा पुरस्कर्ता होता. वर जे त्याचे विचार उधृत केले त्यांत विकेन्द्रिकरणाशीं विसंगत असें कांहीं नाहीं. शासनसंस्थेवर ज्यांचा मध्यमवर्गीय 'अंधविश्वास' असतो त्यांना मात्र भांडवली शासनसंस्थेचा नाश करणें म्हणजे केन्द्रीकरणाचा नाश करणें होय असें वाटतें.

परंतु कामगार आणि गरीब शेतकरी यांनीं जर सत्ता ताब्यांत घेतली, स्वतःची कम्यून्स संघटित केलीं, आणि भांडवलशाही नेस्तनाबूद करण्या-करितां, भांडवलदारांचा प्रतिकार हाणून पाडण्याकरितां, आणि आग-गाड्या, कारखाने, जमीन इत्यादि उत्पादनाचीं सर्व साधनें राष्ट्राच्या, सबंध समाजाच्या, मालकीची करण्याकरितां या सर्व कम्यून्सनीं जर प्रत्यक्ष कार्यांत एकजूट केली तर तें केन्द्रीकरण होणार नाहीं काय? खरें सुसंगत लोकशाही केन्द्रीकरण हेंच नव्हे काय? कामगारशाही केन्द्री-करण म्हणजे या पेक्षां दुसरें काय असणार?

स्वखुषीचें केन्द्रीकरण, कम्यून्सनी स्वखुषीनें आपलें विलिनीकरण करून 'एक राष्ट्र' निर्माण करणें, भांडवलशाही सत्ता आणि भांडवली राज्ययंत्र नष्ट करण्याकरितां कामगारांच्या कम्यून्सनीं स्वखुषीनें एकत्र येणें, या गोष्टी शक्य आहेत असें बर्नस्टिनला वाटत नाहीं. इतर संधि-साधूंच्या प्रमाणें बर्नस्टिनला सुद्धां, केन्द्रीकरण ही कांहीं तरी समाजा-पासून अलग असलेली, आणि नौकरशाही आणि लष्कर यांचे मार्फत समाजावर लादलेली आणि कायम ठेवली गेलेली गोष्ट आहे, असें वाटतें.

आपल्या विचारांना विकृत स्वरूप दिलें जाण्याची शक्यता आहे हें जाणूनच कीं काय, मार्क्सनें असें मुद्दाम सांगितलें आहे कीं, 'कम्यूनला राष्ट्रीय ऐक्य नाहींसें करावयाचें होतें, त्यांना मध्यवर्ती सत्ता नष्ट करावयाची होती' असा जो प्रचार बुद्धया केला जातो तो खोटा आहे. स्वखुषीचें लोकशाही-कामगारशाही केन्द्रीकरण आणि भांडवलशाही-लष्करशाही—नौकरशाही केन्द्रीकरण या दोहोंमधील फरक स्पष्ट करण्या-करितांच मार्क्सनें, 'राष्ट्राच्या ऐक्याची...संघटना करणें' असा शब्द-प्रयोग केला आहे.

परंतु ज्यांनीं ऐकावयाचें नाहीं असें ठरविलें त्यांचेपेक्षां जास्त बहिरे कोण असणार ? आणि आजच्या सोशल डेमोक्रॅटिक संधिसाधूंना एक गोष्ट निश्चित ऐकावयास नको आहे, आणि ती म्हणजे 'राज्य-शक्तीचा विमोड' समाजवृक्षावरील हें 'बांडगूळ' तोडून टाकणें ही होय.

## ५ बांडगुळाप्रमाणें असलेली शासनसंस्था नष्ट करणें

या विषयावर मार्क्सनें जें लिहिलें त्यांतलें कांहीं आम्ही वर उधृत केलेंच आहे. आतां त्या विषयींचें त्याचें म्हणणें पूर्णपणें मांडलें पाहिजे.

मार्क्स म्हणतो, "अगदीं नवीन ऐतिहासिक निर्मितीचें असें वैशिष्ट्य असतें कीं, जुन्या किंवा नष्ट झालेल्या ज्या सामाजिक संस्थांशीं तिचें थोडेंफार साम्य असतें, त्या संस्थेची ही नव्यानें निर्मिती, प्रतिकृती, आहे असा गैरसमज निर्माण होतो. पॅरीस कम्यूनच्या बाबतींतही असेंच झालें आहे. आजच्या राजकीय सत्तेचा विमोड करणारी ही कम्यून्स, मध्ययुगिन कम्यून्सची पुनर्निर्मिती...किंवा माँटेस्क्यू किंवा जिरॉडिस यांच्या कल्पनेप्रमाणें लहान संस्थानांच्या संघराज्याची निर्मिती...किंवा केन्द्रीकरणांविरुद्ध चाललेल्या प्राचीन लढ्याची तीव्रतर स्वरूपांत पुनर्निर्मिती आहे असा गैरसमज सर्वत्र पसरलेला आहे. समाजावर पोसल्या जाणाऱ्या आणि समाजाच्या स्वतंत्र प्रगतीला अडथळा करणाऱ्या शासनसंस्थारूपी बांडगुळानें ज्या सामाजिक शक्ति आत्मसात् केल्या होत्या त्या सर्व शक्ति कम्यून्सच्या घटनेनें समाजाला परत मिळवून दिल्या असत्या. या एकाच कृतीनें फ्रान्सच्या पुनरुज्जीवनाला आरंभ झाला असता...कम्यूननें शेतकऱ्यांना, जिल्ह्यांतील मोठ्या शहरांच्या बौद्धिक पुढारीपणाखालीं आणले, आणि तेथें त्यांची आणि त्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण करणाऱ्या नैसर्गिक विश्वस्तांची–कामगार वर्गाची–गांठ घालून दिली. कम्यून्सच्या अस्तित्वांतच स्थानिक स्वराज्य; संस्थांची स्वायत्तता अभिप्रेत आहे. मात्र पूर्वी या स्वायत्ततेचा उपयोग, नष्ट केलेल्या शासनसंस्थेवरील एक प्रकारचें बंधन म्हणून होई, ती परिस्थिति आतां नव्हती."

कम्यूनच्या अनुभवाचें मूल्यमापन आणि विवेचन करतांना मार्क्सनें शासनसंस्थेसंबंधीं, 'बांडगूळ' असलेल्या शासनसंस्थेचा 'नाश करणें,' 'पराभूत झालेली शासनसंस्था तोडणें,' 'ती मोडून काढणें' असे शब्द योजले आहेत.

हें सर्व जवळ जवळ पन्नास वर्षांपूर्वी लिहिलें गेलें आहे आणि आज विकृत स्वरूप न दिलेला, खरा मार्क्सवाद म्हणजे काय हें लोकांना समजावें म्हणून मार्क्सच्या या लिखाणाचें जणूं काय उत्खनन करावें लागत आहे. मार्क्सनें जी महान् क्रान्ति आपल्या डोळ्यांनीं पाहिली आणि तिच्या अनुभवाचें जें सार त्यानें काढलें तें आज दुसरी महान् कामगार–क्रान्ति समीप आली असतांना, विसरलें गेलें आहे.

"कम्यूनचे जे अनेक अर्थ लावले गेले आणि ज्या अनेक निरनिराळ्या हितसंबंधांच्या लोकांनीं आपल्याला सोईस्कर असा निष्कर्ष त्यांपासून काढला त्यांवरून कम्यून हें शासनसंस्थेचें पूर्णपणें प्रसरणशील राजकीय स्वरूप होतें हें सिद्ध होतें, उलट तिचीं पूर्वींचीं सर्व स्वरूपें निश्चितपणें दडपशाही करणारीं होतीं. कम्यूनचें वैशिष्ट्य खालीलप्रमाणें होतें. कम्यून हें, उत्पादन करणारे वर्ग आणि उत्पादनावर मालकी हक्क सांगणारे वर्ग यांच्या लढ्यांतून निर्माण झालेलें सरकार, मुख्यतः कामगार वर्गाचें सरकार होतें. आणि कामगार वर्गाचें आर्थिक विमोचन निश्चितपणें घडवून आणणाऱ्या राजकीय स्वरूपाचा तो शोध होता."

"हें शेवटचें वैशिष्ट्य जर त्यांत नसतें तर कम्यूनची घटना अशक्य झाली असती, तें एक स्वप्न ठरलें असतें."

ज्याखालीं समाजाची समाजवादी पायावर पुनर्घटना घडून येईल अशीं राजकीय 'स्वरूपें' शोधून काढण्याचा प्रयत्न सर्व कल्पनावादी करीत होते. अराज्यवाद्यांनीं राजकीय 'स्वरूपांचा' प्रश्न डावलूनच टाकला. आजच्या सोशल डेमोक्रॅटिक संधिसाधूंनीं विधिमंडळाधिष्ठित लोकशाही-शासनसंस्थेचीं जीं निरनिराळीं भांडवलशाही राजकीय स्वरूपें आहेत तींच अखेरचीं आणि सर्वश्रेष्ठ मानलीं; त्या 'मूर्तीला' आळवतांना त्यांनीं आपलें डोकें फोडून घेतलें; आणि ज्यांनीं हीं स्वरूपें नष्ट कर-

ण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर या संधिसाधूंनीं 'अराज्यादी' म्हणून हल्ला चढविला.

साम्राज्यवादाच्या आणि राजकीय लढ्यांच्या इतिहासावरून मार्क्सनें असा सिद्धान्त काढला कीं, शासनसंस्था ही नष्टच होणार आहे, आणि तिचें नष्ट होत जात असतांनाचें (शासनसंस्था आस्तित्वांत असणें आणि ती संपूर्णपणें नष्ट होणें या मधील संक्रमण कालांतील) स्वरूप 'अधिकारारूढ कामगार वर्गाची राजकीय संघटना' हें रहाणार आहे. परंतु या भावी अवस्थेंतील राजकीय स्वरूपें 'शोधून' काढण्याचा प्रयत्न मार्क्सनें केला नाहीं. फ्रान्सच्या इतिहासाचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणें, त्याचें पृथक्करण करणें, आणि त्यापासून १८५१ सालापर्यंत निघणारे सिद्धान्त–'परिस्थिती झपाट्यानें शासनसंस्था नष्ट करण्याकडे धावत आहे'–स्पष्टपणें पुढें मांडणें, याच मार्क्सनें आपल्या मर्यादा ठरवून टाकल्या होत्या.

यानंतर कामगारांची क्रांतिकारक चळवळ जेव्हां पुन्हां एकदां उफाळून वर आली, तेव्हां जरी ती पराभूत झाली, फार अल्पकाल टिकली, आणि तिच्यांत कांहीं उघड दोष होते तरी मार्क्सनें तिच्यांत जीं नवीं राजकीय स्वरूपें निर्माण झालीं त्यांचा अभ्यास करावयास आरंभ केला.

ज्या राजकीय स्वरूपाखालीं कामगार वर्गाचें आर्थिक विमोचन घडून येणार आहे त्या 'कम्यूनचा' कामगार क्रांतीनें अखेर शेवटीं शोध लाविला.

कम्यून हा, भांडवली राज्ययंत्र मोडून काढण्याचा, कामगार क्रांतीनें केलेला पहिला प्रयत्न असून शिवाय तें मोडलेल्या राज्ययंत्राची जागा घेणारें नवें राजकीय स्वरूप होतें.

१९०५ आणि १९१७ सालीं रशियांत झालेल्या क्रांत्यांनीं, कम्यूननें सुरू केलेलें कार्य, निराळ्या कालांत आणि निराळ्या परिस्थितींत कसें पुढें चालविलें आहे आणि तें मार्क्सच्या तेजस्वी ऐतिहासिक विवेचनाला कसें धरून आहे हें आपण पुढें पाहूं.

## प्रकरण चवथें

# पुढें चालू—एंगल्सनें केलेलीं पूरक स्पष्टीकरणें

कम्यूनच्या अनुभवाचें वैशिष्ट्य काय या प्रश्नाची मूलभूत भूमिका मार्क्सनें सांगितली. एंगल्सनें या विषयाकडे पुन्हां पुन्हां वळून मार्क्सच्या विवेचनाचें आणि निष्कर्षांचें स्पष्टीकरण केलें आहे. असें करतांना कित्येक वेळेला एंगल्सनें या प्रश्नाच्या इतर बाजूंवर इतका झगझगीत प्रकाश टाकला आहे कीं, त्याचा स्वतंत्रपणें विचार करणेंच योग्य होईल.

### १ घरांचा प्रश्न

'घरांचा प्रश्न' या आपल्या पुस्तिकेंत एंगल्सनें कम्यूनचा अनुभव ध्यानांत घेऊन, शासनसंस्थेसंबंधीं क्रान्तीचें कर्तव्य काय या प्रश्नाची पुन्हां पुन्हां चर्चा केली आहे. या विवेचनांत त्यानें आजची शासन-संस्था आणि कामगारांची शासनसंस्था यांचेंमधील साम्य ज्यामुळें या दोघींना शासनसंस्था म्हणणें शक्य होतें आणि फरक, शासनसंस्था नष्ट होण्याच्या संक्रमणकालांतील तिचें स्वरूप, यांचें स्पष्टीकरण केलें आहे.

"मग हा अपुऱ्या घरांचा प्रश्न कसा सोडवावयाचा ? आजच्या समाजांत इतर सामाजिक प्रश्न जसे सोडविले जातात; त्याचप्रमाणें, म्हणजे अर्थशास्त्रांतील 'मागणी आणि पुरवठा' या नियमाला अनुसरूनच हा प्रश्न सोडविला जातो. परंतु त्यामुळें हा प्रश्न पुन्हां पुन्हां निर्माण होतो; मूलतः सुटत नाहीं. सामाजिक क्रान्ति होत असतांना हा प्रश्न कसा सोडविला जाईल, हें त्या त्या वेळच्या विशिष्ट परिस्थितीवर तर अवलंबून राहीलच परंतु त्याचबरोबर कांहीं दूरगामी गोष्टींशींही हा प्रश्न निगडित आहे. त्यांपैकीं शहरें आणि खेडीं यांचेमधील फरक नाहींसा करणें ही एक विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. भविष्यकालीन समाजाचें एक कल्पनारम्य चित्र रंगाविणें हा आमचा हेतु नसल्यानें या ठिकाणीं याचा जास्त विचार करणें योग्य होणार नाहीं. परंतु एक गोष्ट निश्चित आहे कीं, आज भासणारा घरांचा तुटवडा नाहींसा करण्याइतकीं घरें मोठमोठ्या शहरां-

तून आहेत, मात्र त्यांचा त्या दृष्टीनें, व्यवस्थित रीतीनें उपयोग केला गेला पाहिजे. आजच्या घरमालकांचा मालकी हक्क काढून घेऊन, त्या घरांतून ज्यांना आज रहावयास जागा नाहीं किंवा जे अत्यंत दाटी-दाटीनें रहात आहेत, अशांना रहावयास जागा देणें, या एकाच मार्गानें हा प्रश्न सुटूं शकेल. आजच्या शासन संस्थेला सैनिकांस रहावयास जागा देण्याकरितां मालकी हक्क रद्द करणें जितकें सोपें जातें, तितकेंच कामगारांनीं राजकीय सत्ता जिंकून घेतल्याबरोबर, सामाजिक गरजेमुळें निर्माण झालेला वरील प्रश्न सोडविणें त्यांना सोपें जाईल." [ पा. २२ ].

शासनसंस्थेचें स्वरूप काय असावें या संबंधीं येथें चर्चा केलेली नाहीं तर तिच्या कार्याचें स्वरूप काय असेल यासंबंधीं चर्चा आहे. घरांवरील मालकी हक्क काढून घेणें आणि ती दुसऱ्याला रहावयास देणें ही गोष्ट आजच्या सरकारच्या हुकूमानेंही होऊं शकते. आणि तांत्रिक दृष्टीनें विचार केल्यास कामगारांचें सरकारही ही गोष्ट करूं शकेल. परंतु त्याच बरोबर हेंही स्पष्ट आहे कीं, भांडवलदारांशीं अत्यंत घनिष्ट संबंध असलेलें आजचें अम्मलबजावणी खातें–आजची नौकरशाही–कामगारसरकारचे हुकूम अमलांत आणावयास नालायक ठरेल.

"...शेवटीं हें सांगितलें पाहिजे कीं, 'सर्व श्रमसाधनांचा एकदम कबजा घेणें' 'कामगारांनीं सर्व धंदाच ताब्यांत घेणें' आणि प्रूधाँचें क्रमशः ताब्यांत घेणें' या परस्पर विरोधी गोष्टी आहेत. 'क्रमशः ताब्यांत घेण्याच्या' क्रियेंत कामगार 'घराचा, जमिनीच्या तुकड्याचा, श्रमसाधनांचा' व्यक्तिशः मालक बनतो. उलट पहिल्या पद्धतीनें 'घरें, जमीन आणि श्रमसाधनें' यावर कामगारवर्गाची समायिक मालकी निर्माण होते. आणि म्हणून संक्रमणकालांत तरी या वस्तूंचा उपयोग एकाद्या व्यक्तीला किंवा एकाद्या संस्थेला 'फुकट' करूं दिला जाईल अशी शक्यता नाहीं. ज्याप्रमाणें जमिनीवरील मालकी हक्क नष्ट करणें म्हणजे खंड नष्ट करणें नव्हे, तर वेगळ्या स्वरूपांत तो समाजाला देणें आहे, त्याच प्रमाणें हीही गोष्ट आहे. तेव्हां श्रमसाधनांवर कामगारांनीं

प्रत्यक्ष कबजा प्रस्थापित केल्यानें ' भाडेकऱ्याचें ' नातें आस्तित्वांतच रहात नाहीं असें नाहीं. " [ पान ६९ ].

वरील उताऱ्यांत उल्लेख केलेल्या, शासनसंस्था ' विरून ' जाण्याच्या पाठीमागील आर्थिक कारणांचा विचार आपण पुढील प्रकरणांत करूं. या ठिकाणीं एंगल्सनें अत्यंत काळजीपूर्वक शब्दयोजना केली आहे. तो म्हणतो कीं, कामगारांच्या सरकारला ' निदान संक्रमणकालांत तरी ' घरांचा उपयोग ' फुकट करून देतां येईल ' अशी शक्यता नाहीं. सर्व समाजाच्या मालकीची असलेलीं घरें निरनिराळया स्वतंत्र कुटुंबांना रहावयास द्यावयाचीं म्हटलीं कीं त्यांत भाडें वसूल करणें, थोडें फार नियंत्रण ठेवणें, आणि घरें देण्याबद्दल कांहीं नियम ठरविणें, या गोष्टी येतातच. हें सर्व करण्याकरितां एका विशिष्ट स्वरूपाच्या शासनसंस्थेची जरुरी असते. परंतु ही शासनसंस्था, सरकारी अधिकाऱ्यांना विशेष हक्काचें स्थान असलेले लष्करी आणि नौकरशाही यंत्र असण्याचें कारण नाहीं. कांहींही भाडें न घेतां घरें वापरूं देण्यासारखी परिस्थिती निर्माण होईपर्यंतचा काल हा शासनसंस्था विरून जाण्याशी निगडीत झालेला आहे.

पॅरीस कम्यूनच्या अनुभवानंतर, ब्लॅन्क्वीच्या अनुयायांनीं मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा जो स्वीकार केला त्यासंबंधीं लिहितांना एंगल्सनें हीं तत्त्वें खालील शब्दांत मांडलीं आहेत.

" ...सर्व वर्ग आणि त्यांचेबरोबर शासनसंस्थाही नाहींशी करण्याकरितां कामगारांनीं 'राजकारण' करण्याची आणि 'कामगारांची हुकूमशाही' प्रस्थापित करण्याची आवश्यकता असते. " [ पा ५५ ]

वृथा शब्दच्छल करणाऱ्या टीकाकारांना आणि मार्क्सवाद 'नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधलेल्या भांडवलदारांना, ' शासनसंस्था नष्ट करण्यास' येथें दिलेली मान्यता, आणि 'अॅन्टी डयूहरिंग' या पुस्तकांतील मागें एकें ठिकाणीं उद्धृत केलेल्या उताऱ्यांत याच कल्पनेवर 'अराज्यवादी' म्हणून केलेली टीका ही एंगल्समधील विसंगति आहे असें वाटेल. या संधिसाधूंनीं एंगल्सवर सुद्धां ' अराज्यवादित्वाचा' शिक्का मारल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण आन्तरराष्ट्रीयवाद्यांचेवर ' अराज्य-

वादी ' म्हणून टीका करण्याची अतिरेकी-राष्ट्रवादी-समाजवाद्यांत हल्लीं प्रथाच पडत चालली आहे.

वर्ग नाहींसे झाले कीं शासनसंस्थाही नाहीशीं होईल हीच मार्क्स-वादाची सतत शिकवण आहे. ' शासनसंस्था हळूं हळूं विरून जाण्या-संबंधीं ' अँटी ड्यूहरिंग ' मध्यें जो प्रसिद्ध उतारा आहे त्यांत 'शासन-संस्था नाहींशीं केली पाहिजे' या मताला पाठिंबा दिल्याबद्दल अराज्य-वाद्यांचेवर टीका केलेली नाहीं तर 'शासनसंस्था एका रात्रींत नाहींशीं केली पाहिजे,' असें प्रतिपादन करण्याबद्दल टीका केली आहे.

शासनसंस्था नष्ट करण्याच्या प्रश्नावर मार्क्सवाद आणि अराज्यवाद यांच्यांत जे मतभेद आहेत, त्यांना आज सर्वसम्मत ' सोशल डेमो-क्रॅटिक ' सिद्धान्तांतून विपर्यस्त स्वरूप दिलें गेलें आहे. अशा वेळेला मार्क्स आणि एंगल्स यांचा अराज्यवाद्यांचे बरोबर एकदां जो वाद झाला त्याकडे लक्ष देणें अस्थानी होणार नाहीं.

## २ अराज्यवाद्यांचे बरोबर झालेला वादविवाद

हा वादविवाद १८७३ सालीं झाला. मार्क्स आणि एंगल्स यांनीं ' स्वायत्ततावादी कीं सत्ताविरोधी ' या नांवाची एक लेखमाला ' इटॅ-लियन सोशल ' या मासिकांत लिहून प्रूधाँच्या अनुयायांवर टीका केली. या लेखांचें पुनर्मुद्रण १९१३ सालीं ' न्यू-झेट ' या जर्मन मासिकांत कर-ण्यांत आलें.

अराज्यवादी आणि त्यांनीं राजकीय चळवळी करण्यास केलेला विरोध या संबंधीं मार्क्स उपहासानें लिहितो; " कामगार वर्गाच्या राज-कीय लढ्यानें हिंसक स्वरूप धारण केलें आणि कामगारांनीं भांडवल-दारांचे हुकूमशाहीचे जागीं कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित केली कीं त्यांचे हातून तत्त्वच्युतीचा महान् गुन्हा ( ! ) घडतो ! कारण काय तर आपल्या क्षुद्र, नीच, दैनंदिन गरजा भागविण्याकरितां आणि भांडवल-दारांचा विरोध मोडून काढण्याकरितां ते शासनयंत्राचा एकदम नाश करून, आणि शस्त्रें खालीं ठेऊन स्वस्थ बसण्याचे ऐवजीं त्या राज्य-

यंत्राला ते क्रान्तिकारक आणि संक्रमणकालाला योग्य असें स्वरूप देतात." [ कित्ता भाग. ३२ पा. ४० ]

अराज्यवाद्यांना विरोध करतांना मार्क्सनें शासनसंस्था 'अशा रीतीनें नष्ट' करण्याच्या कल्पनेविरुद्धच झगडा केला आहे. 'वर्ग नाहींसे झाले कीं शासनसंस्था नाहींशीं होईल,' किंवा 'वर्ग नष्ट केल्यानंतर शासन-संस्था नष्ट करतां येईल' या सिद्धान्तांचे विरुद्ध मार्क्सनें हल्ला चढविला नाहीं तर 'कामगारांनीं शस्त्रांचा, संघटित शक्तीचा, म्हणजेच शासन-संस्थेचा–जिचा उपयोग भांडवलदारांचा प्रतिकार मोडून काढण्याकडे करितां येईल–त्याग करावा,' या कल्पनेविरुद्ध हल्ला चढविला.

अराज्यवाद्यांचे विरुद्ध त्यानें केलेल्या लढ्यास विपर्यस्त स्वरूप दिलें जाऊं नये म्हणूनच मार्क्सनें 'कामगार वर्गाला क्रान्तिकारक आणि संक्र-मणकालाला अनुरूप असें स्वरूप असलेल्या शासनसंस्थेची' जरूरी असते, या मुद्यावर भर दिला आहे. कामगार वर्गाला फक्त कांहीं कालच शासन-संस्थेची जरूरी असते. 'शासनसंस्था नष्ट करणें हें ध्येय असावें' याबद्दल आमचा अराज्यवाद्यांशीं मतभेद नाहीं. आमचें असें म्हणणें आहे कीं, ज्याप्रमाणें वर्ग नाहींसे करण्याकरितां कांहीं काल पिळल्या गेलेल्या वर्गाची हुकूमशाही आवश्यक लागते त्याचप्रमाणें वरील ध्येय साध्य करून घेण्याकरितां कांहीं काल शासनशक्तींचीं हत्यारें, साधनें आणि मार्ग यांचा पिळणाऱ्या वर्गाच्या विरुद्ध उपयोग करणें हेंही आवश्यक असतें. अराज्यवाद्यांचे विरुद्ध घेतलेली भूमिका मार्क्सनें अत्यंत स्पष्ट आणि स्वच्छ शब्दांत मांडली आहे; भांडवलदारांचें जूं झुगारून दिल्या-नंतर कामगार वर्गानें 'शस्त्र खालीं ठेवावें" कीं भांडवलदारांचा प्रतिकार मोडून काढण्याकरितां त्यांचा उपयोग करावा ? परंतु एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर शस्त्रांचा पद्धतशीरपणानें केलेला उपयोग म्हणजेच शासनसंस्थेचें संक्रमणकालांतील स्वरूप नव्हें काय ?

प्रत्येक 'सोशल–डेमोक्रॅटनें' स्वतःला खालील प्रश्न विचारून पहावा. 'अराज्यवाद्यांचे' विरुद्ध वाद करतांना शासनसंस्थेच्या प्रश्नांची मांडणी आपण वरील प्रमाणें करतों कां ? निदान ठिकठिकाणीं 'दुसऱ्या

इंटरनॅशनलचे' जे अधिकृत सोशालिस्ट पक्ष आहेत त्यांतील बहुतेक पक्ष या प्रश्नाची मांडणी वरीलप्रमाणें करतात काय ?

या प्रश्नाची चर्चा एंगल्सनें जास्त विभागवार आणि सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेंत केली आहे. स्वतःला 'अधिकार-विरोधी' म्हणविणाऱ्या आणि सर्व प्रकारचा अधिकार, ताबेदारी आणि सत्ता यांना विरोध करणाऱ्या प्रूधाँच्या अनुयायांच्या गोंधळलेल्या विचारसरणीवर एंगल्सनें उपहासगर्भ टीका केली आहे. तो म्हणतो "आगगाडी, आगबोट किंवा एकादा कारखाना अशा सारखा, यंत्राचा उपयोग केला जाणारा, पुष्कळ लोकांच्या पूर्वनियोजित सहकार्यावर अवलंबून असलेला आणि तांत्रिक गुंतागुंतीचा, कोणताही औद्योगिक व्यवसाय घ्या. तो थोड्या फार ताबेदारीशिवाय किंवा अधिकाराशिवाय चालणें शक्य नाहीं, हें उघड नाहीं काय ? "

तो पुढें म्हणतो, " एकाद्या कट्टर 'अधिकार–विरोधका' समोर जर मीं हे मुद्दे मांडले तर तो मला असें उत्तर देईल कीं, 'तुम्ही म्हणतां तें खरें आहे. परंतु या ठिकाणीं आम्हीं आमच्या प्रतिनिधींना दिलेल्या अधिकाराचा प्रश्न नसून त्यांचेवर सोपविलेल्या 'कामगिरीचा' प्रश्न आहे !' या लोकांना असें वाटतें कीं अशा रीतीनें नांव बदललें कीं मूल स्वरूपही बदलून जातें..."

अशा रीतीनें एंगल्सनें, अधिकार आणि स्वायत्तता हे सापेक्ष शब्द आहेत, त्यांच्या उपयोगाच्या मर्यादा सामाजिक प्रगतीच्या निरनिराळ्या अवस्थांबरोबर बदलत असतात, आणि अधिकार आणि स्वायत्तता या स्वयंपूर्ण आहेत असें मानणें हा मूर्खपणा आहे, हें दाखवून दिल्यानंतर आणि यंत्राच्या उपयोगांचें आणि मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांचें क्षेत्र वाढत आहे असें सांगितल्यानंतर तो 'अधिकारांच्या प्रश्नाच्या' सर्वसाधारण चर्चेवरून शासनसंस्थेच्या प्रश्नाकडे वळला आहे.

तो लिहितो, "भविष्यकालीन समाजसंघटनेंत 'अधिकाराचें' क्षेत्र उत्पादन संबंधांना अवश्यक तेवढ्याच मर्यादेंत राहील. एवढेंच म्हणून जर 'स्वायत्ततावादी' थांबतील तर त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आम्हीं

समजूं शकूं. परंतु ज्या सत्य परिस्थितीमुळें ‘ अधिकाराची ’ अवश्यकता निर्माण होते ती परिस्थिति ते विसरतात आणि शब्दावरच भांडत बसतात.

“ जे ‘ अधिकार-विरोधी ’ आहेत ते राजकीय सत्तेविरुद्ध, शासन-संस्थेविरुद्ध, केवळ आरडा ओरडच करून कां थांबत नाहींत ? आगामी सामाजिक क्रान्तींत शासनसंस्था आणि तिच्या बरोबर सर्वच राजकीय सत्ता नाहींशी होणार आहे; म्हणजेच सार्वजनिक कार्याचें ‘ सरकारी ’ स्वरूप नष्ट होऊन त्याचें रूपांतर खऱ्या सामाजिक हितावर लक्ष ठेऊन ‘ देखरेख करण्याच्या कामांत ’ होईल, याबद्दल सर्व सोशालिस्टांचें एकमत आहे. परंतु ‘ अधिकार-विरोधकांची ’ अशी मागणी आहे कीं, शासन-संस्थेला अस्तित्वांत आणणारी परिस्थिति नाहीशीं करण्याचे आधींच शासनसंस्था तावडतोब नाहींशी करावी. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, ‘ सर्व प्रकारचा अधिकार नष्ट करणें हें सामाजिक क्रान्तीचें पहिलें कार्य असलें पाहिजे.’

“ या लोकांनीं क्रान्ति कधीं पाहिली आहे काय ? क्रान्ति ही निश्चितपणें सर्वांत जास्त ‘ अधिकारयुक्त ’ असते. यांत जनतेचा एक भाग, दुसऱ्या भागावर, आपली इच्छा, बंदूक, बायनेट आणि तोफा इत्यादि शस्त्रांच्या सहाय्यानें लादीत असतो; हीं सर्वच साधनें अत्यंत ‘ अधिकारयुक्त ’ असतात. आणि जो पक्ष यशस्वी होईल त्या पक्षानें, ज्या शस्त्रांनीं प्रतिक्रान्तिकारकांच्या मनांत भीति उत्पन्न केली त्याच शस्त्रांच्या सहाय्यानें, आपली सत्ता कायम ठेविली पाहिजे. जनतेच्या सशस्त्र शक्तीचा उपयोग जर पॅरीस कम्यूननें भांडवलदारांच्या विरुद्ध केला नसता तर तें एक दिवस तरी टिकलें असतें काय ? उलट या शक्तीचा उपयोग पुरेसा केला नाहीं म्हणूनच आपण कम्यूनला दोष देत नाहीं काय ? तेव्हां ‘ अधिकार–विरोधकांना ’ आपण काय बोलत आहोंत हें समजत तरी नसावें–असें असेल तर ते सर्वत्र गोंधळ निर्माण करीत आहेत–किंवा समजून उमजून तरी ते बोलत असावेत. अशी परिस्थिति असेल तर ते कामगारांच्या कार्याचा विश्वासघात करीत आहेत.

म्हणजे कोणत्याही परिस्थितींत ते प्रतिगाम्यांनाच मदत करीत आहेत." [ पा० ३९ ].

वरील उताऱ्यांत जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांचा विचार, शासनसंस्था विरून जात असतांनाच्या कालांतील राजकीय प्रश्नांच्या परस्परसंबंधांची चर्चा करतांना केला पाहिजे. ( तसा तो पुढील प्रकरणांत केला आहे ). वर उपस्थित केलेले प्रश्न असे; एकः जनतोपयोगी कामें सरकारी कामें न रहातां त्यांचे जनतेच्या देखरेखीखालीं चाललेल्या कामांत रूपांतर होणें. आणि दोनः राजकीय शासनसंस्था. हा दुसरा शब्दप्रयोग, ज्याच्या अर्थाबद्दल बराच गैरसमज होण्याची शक्यता आहे, शासनसंस्था विरून जाण्याच्या क्रियेला उद्देशून वापरला आहे. मरणोन्मुख शासनसंस्था विरून जात असतांना, एका विशिष्ट अवस्थेंत, तिला ' बिन-राजकीय शासनसंस्था ' म्हणतां येणें शक्य आहे.

वरील उताऱ्यांतील सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे, अराज्यवाद्यांचे विरुद्ध आपली बाजू मांडण्याची एंगल्सची पद्धत. एंगल्सचें शिष्यत्व पत्करूं पहाणाऱ्या ' सोशल डेमोक्रॅट्सनीं,' १८७३ सालानंतरही सदर प्रश्नाची, ' अराज्यवाद्यांचे ' बरोबर, पुष्कळ वेळां चर्चा केली आहे. परंतु ती चर्चा त्यांनीं मार्क्सवादी करतात तशी किंवा जशी मार्क्सवाद्यांनीं करावयास पाहिजे तशी, केली नाहीं. ' शासनसंस्था नष्ट करण्यासंबंधीं अराज्यवाद्यांची जी कल्पना आहे त्यांत गोंधळ आहे आणि ती क्रांतिकारक नाहीं–'अशा रीतीनें एंगल्सनें तो प्रश्न मांडला आहे. क्रांति, तिचा उदय व विकास आणि जुलूम, सत्ता, अधिकार, राज्ययंत्र यांचे संबंधीं तिचें विशिष्ट कार्य यांचा विचार करण्याची सुद्धां अराज्यवाद्यांची तयारी नसते.

'सोशल डेमोक्रॅट्स'च्या कडून 'अराज्यवाद्यांवर' केल्या गेलेल्या टीकेला आज, 'आम्हीं शासनसंस्था मानतों आणि अराज्यवादी मानीत नाहींत' असलें ग्राम्य आणि बाष्कळ स्वरूप प्राप्त झालें आहे. थोडाफार विचार करणारे क्रान्तिकारक कामगार, अशा बाष्कळपणामुळें सहाजीकच दूर जातात. एंगल्सचें म्हणणें यापेक्षां निराळें आहे. समाजवादी क्रान्तीचा

परिणाम म्हणून शेवटीं शासनसंस्थाच नाहींशी होईल ही गोष्ट सर्व सोशालिस्टांना मान्य आहे या मुद्यावर एंगल्सनें भर दिला आहे. त्यानंतर त्यानें प्रत्यक्ष क्रान्तीच्या प्रश्नाची चर्चा केली आहे. हाच प्रश्न, सोशल-डेमोक्रॅट्स आपल्या नेहमींच्या संधिसाधूपणाला अनुसरून डावलतात, आणि या प्रश्नाचा 'विचार' करण्याचें कांहीं अंशीं, फक्त अराज्यवाद्यांवरच सोपवून देतात. एंगल्सनें मात्र या प्रश्नाची चर्चा करतांना सरळ मूळ मुद्यालाच हात घातला आहे. तो विचारतो, "पॅरीस कम्यूननें शासनसंस्थेच्या क्रान्तिकारक शक्तीचा, अधिकारारूढ वर्ग या दृष्टीनें कामगारांच्या सशस्त्र संघटनेचा, जास्त उपयोग करावयास नको होता काय?"

क्रांतिकालांत कामगारांचें प्रत्यक्ष कर्तव्य काय हा प्रश्न आजचे सोशल डेमोक्रॅट्स तिरस्कारानें बाजूला तरी सारतात किंवा 'थांबा म्हणजे दिसेल' असें म्हणून तो डावलण्याचा तरी प्रयत्न करतात. अशा सोशल-डेमोक्रॅट्संवर, त्यांनीं कामगार वर्गाला क्रान्तीचें शिक्षण देण्याच्या आपल्या कर्तव्याशीं बेइमानी केली, अशी जी टीका अराज्यवादी करतात ती बरोबरच असते. शेवटच्या कामगारक्रान्तीच्या अनुभवाचा उपयोग एंगल्सनें, 'बँका आणि शासनसंस्था यांचे बाबतींत कामगारांनीं काय करावें,' या प्रश्नाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याकडे करून घेतला.

### ३ बेबेलला लिहिलेलें पत्र

एंगल्सनें १८ ते २८ मार्च १८७५ रोजीं बेबेलला जें पत्र लिहिलें त्यांत मार्क्स-एंगल्स यांच्या लिखाणांतील शासनसंस्थेसंबंधीचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आला आहे. सदर मुद्दा असलेला त्या पत्रांतील भाग आम्हीं खालीं उधृत केला आहे. जातां जातां हें सांगणें जरूर आहे कीं सदर पत्र बेबेलनें १९११ सालीं—त्याला पत्र मिळाल्यानंतर ३६ वर्षांनीं—आपल्या आठवणींच्या दुसऱ्या खंडांत प्रसिद्ध केलें.

मार्क्सनें ब्रेकला लिहिलेल्या प्रसिद्ध पत्रांत ज्या 'गोथा कार्यक्रमावर' टीका केली आहे त्याच कार्यक्रमावर एंगल्सनें बेबेलला लिहिलेल्या पत्रांत

टीका केली आहे. विशेषतः शासनसंस्थेच्या प्रश्नाचा उल्लेख करून एंगल्स लिहितो :

" ' स्वतंत्र जनतेच्या ' शासनसंस्थेचें रूपांतर ' स्वतंत्र ' शासनसंस्थेंत केलें जातें. व्याकरण दृष्ट्या ' स्वातंत्र ' शासनसंस्था याचा अर्थ, जी शासनसंस्था जनतेपासून स्वतंत्र आहे ती, म्हणजे 'अनियंत्रित शासनसंस्था असा होतो. पॅरीस कम्यून नंतर शासनसंस्थेसंबंधींची सर्व भाषा आपण सोडूनच दिली पाहिजे; कारण त्या शब्दाच्या खऱ्या अर्थानें कम्यून हें शासनसंस्था नव्हतें. अराज्यवाद्यांनीं ' जनतेची शासनसंस्था ' हा शब्द प्रयोग आमचे तोंडावर टाकण्याचा प्रयत्न फार वेळेला केला आहे. परंतु मार्क्सनें प्रूधाँला उत्तर देण्याकरितां लिहिलेल्या पुस्तकांत ( तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य ) आणि त्यानंतर कम्यूनिस्ट जाहिरनाम्यांत असें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, समाजवादी समाजरचना निर्माण झाल्यानंतर, शासनसंस्था आपोआपच विरून जाऊन नाहींशी होईल. तेव्हां शासनसंस्था, ही क्रान्तिकालांत–युद्धकालांत–आपल्या विरोधकांना आपल्या शक्तीच्या जोरावर दडपून टाकण्याकरितां उपयोगांत आणली जाणारी, संक्रमणशील संस्था असल्यानें ' स्वतंत्र ' जनतेच्या शासनसंस्थेची भाषा निव्वळ मूर्खपणाची ठरते. कामगारवर्ग शासनसंस्थेचा उपयोग 'स्वातंत्र्याकरितां करीत नाहीं तर आपल्या शत्रूंना दडपून टाकण्याकरितां करतो. आणि खऱ्या अर्थानें ' स्वातंत्र्य ' अस्तित्वांत आलें म्हणजे शासनसंस्थेचें खऱ्या अर्थानें अस्तित्वही नाहींसें होतें. म्हणून आम्हीं असें सुचवितो कीं, या कार्यक्रमांत प्रत्येक ठिकाणीं ' शासनसंस्था ' या शब्दाचे ऐवजीं, ' कम्यून ' या फ्रेंच शब्दाला ' जेमेनवेसेन ' ( जमात ) हा जो जर्मन प्रतिशब्द आहे, तो वापरावा. "( कित्ता. पा. ३२२ ).

आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, वरील पत्रांत उल्लेख केलेल्या कार्यक्रमावरच, मार्क्सनेंही, कांहीं आठवड्यानंतर लिहिलेल्या एका पत्रांत ( या पत्राची तारीख ५ मे १८७५ आहे ) टीका केली आहे. आणि दुसरें असें कीं या कालांत एंगल्स, मार्क्सबरोबर लंडनमध्येंच रहात होता. तेव्हां जर्मन कामगारांच्या पुढाऱ्यांनीं आपल्या कार्यक्रमांतून ' शासन-

संस्था ' हा शब्द काढून टाकून त्याचे ऐवजीं ' कम्यून ' हा शब्द योजावा असें सुचवितांना एंगल्सनें वरील उताऱ्यांत जो 'आम्हीं' असा शब्द वापरला आहे तो निःसंशय मार्क्सच्या आणि स्वतःच्या वतीनें वापरला आहे.

भांडवलदारांना सोयिस्कर असें विकृत स्वरूप दिल्या गेलेल्या आजच्या मार्क्सवादाच्या पुढाऱ्यांना आम्हीं जर ' अशा रीतीनें त्यांनीं आपल्या कार्यक्रमांत दुरुस्ती करावी ' असें सुचविलें तर ते आम्हांला ' अराज्यवादी ' ठरवून आमचे विरुद्ध केवढी आरडाओरड करतील !

पण त्यांच्या आरडाओरडीकडे कोण लक्ष देतो ! मात्र या त्यांच्या ओरडण्याबद्दल त्यांना भांडवलदारांचेकडून नक्की शाबासकी मिळेल.

आम्हीं मात्र आमचें कार्य करीतच राहूं. सत्याच्या जास्तींत जास्त जवळ रहाण्याकरितां, मार्क्सवादाला दिलें जाणारें विकृत स्वरूप नष्ट होऊन तो शुद्ध स्वरूपांत पुन्हां प्रस्थापित व्हावा म्हणून, आणि कामगार वर्गानें स्वतःच्या स्वातंत्र्याकरितां चालविलेल्या लढ्याचें मार्गदर्शन योग्य प्रकारें करितां यावें म्हणून, आपण आपल्या पक्षाच्या कार्यक्रमांत सतत बदल करीत असतांना, मार्क्स–एंगल्स यांनीं वेळोवेळीं दिलेला सल्ला ध्यानांत घेतला पाहिजे. मार्क्स–एंगल्स यांच्या सल्ल्याला विरोध करणारे निदान बोल्शेविक पक्षांत तरी कोणी आढळणार नाहींत. जर थोडी अडचण आलीच तर ती शब्दाचे बाबतींत येईल. 'जमात' या अर्थी जर्मन भाषेंत दोन शब्द आहेत. पैकीं एंगल्सनें वापरलेला शब्द 'जमात' या अर्थी नसून 'जमातींचा समूह', 'जमात पद्धत' अशा अर्थी आहे. रशियन भाषेंत अशा अर्थी शब्दच नसल्यानें आपल्याला फ्रेंच भाषेंतील ' कम्यून ' शब्दाचाच उपयोग, जरी त्यांत कांहीं उणेपणा असला तरी, करावा लागेल.

"कम्यून खऱ्या अर्थानें शासनसंस्था नव्हतें" या एंगल्सच्या विधानांत एक अत्यंत महत्त्वाचा तात्त्विक मुद्दा आहे. आतांपर्यंत केलेल्या विवेचनानंतर हा मुद्दा स्पष्ट होईलच. कम्यूनचें 'शासनसंस्था' हें स्वरूप नाहींसें होण्यास आरंभ झाला होता, याचें कारण असें कीं, कम्यूनला

बहुसंख्य जनतेला दडपून ठेवावयाचें नव्हतें तर जनतेच्या अल्पसंख्य विभागाला ( पिळणाऱ्या वर्गाला ) दडपून टाकावयाचें होतें; आणि कम्यूननें दडपशाही करणाऱ्या ' खास संघटनेचे जागीं, ' आम-जनतेची प्रस्थापना केली होती. वरील सर्व गोष्टी, तिच्या खऱ्या अर्थानें, शासन-संस्थेच्या कक्षेबाहेरच्या आहेत. कम्यून जर टिकून राहिलें असतें तर, शासनसंस्थेचे सर्व अवशेष आपोआप विरून गेले असते. शासनसंस्थेच्या निरनिराळ्या शाखा 'नष्ट' करण्याची जरूरी राहिली नसती, कारण ज्या मानानें शासनसंस्थेच्या निरनिराळ्या शाखांकडून केलें जाणारें काम कमी कमी झालें असतें त्या मानानें त्या शाखांचें अस्तित्वही नाहींसें झालें असतें.

" अराज्यवाद्यांनीं 'जनतेची शासनसंस्था' हा शब्दप्रयोग फार वेळेला आमचे तोंडावर टाकला आहे " असें म्हणतांना एंगल्सच्या डोळ्या-समोर, बाकूनिन आणि विशेषतः त्यानें जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षावर केलेली टीका होती. 'स्वतंत्र जनतेची शासनसंस्था' ही कल्पना जितकी हास्यास्पद आणि समाजवादाला सोडून आहे, तितकीच ' जन-तेची शासनसंस्था ही कल्पनाही आहे;' आणि एवढ्याच दृष्टीनें बाकू-निननें केलेले हल्ले बरोबर होते असें एंगल्सनें कबूल केलें आहे. वरील पत्रांत एंगल्सनें, जर्मनींतील सोशल डेमोक्रॅट आणि अराज्यवादी यांचे-मधील झगडा योग्य मार्गावर आणण्याचा, त्या झगड्याला तत्त्वशुद्ध पाया देण्याचा आणि त्यांतील शासनसंस्थेसंबंधींचे सुधारणावादी गैरसमज दूर करण्याचा, प्रयत्न केला. परंतु एंगल्सचें हें पत्र छत्तीस वर्षें कपाटांत दडपून ठेवलें गेलें. आपल्याला असेंही आढळून येईल कीं, ज्या चुकांचे विरुद्ध एंगल्सनें धोक्याची सूचना दिली त्याच चुका काउट्स्की अट्टाहासानें करीत आहे.

एंगल्सच्या पत्राला बेबेलनें ता. २१ सप्टेंबर १८७५ रोजीं उत्तर दिलें. त्यांत त्यानें, एंगल्सनें 'कार्यक्रमावर' केलेल्या टीकेशीं आपण पूर्णपणें सहमत असल्याचें आणि लिबनिकची, त्याच्या तडजोडवादी वृत्तीबद्दल आपण कानउघाडणी केल्याचें, लिहिलें होतें. परंतु आपण जर बेबेलचें 'आमचें ध्येय' हें पुस्तक वाचलें, तर त्यांत त्यानें, शासनसंस्थे-

संबंधीं केलेलीं विधानें पूर्णपणें चूक आहेत, असें आपणांस आढळून येईल.

"वर्गीयसत्तेवर आधारलेल्या शासनसंस्थेचें रूपांतर 'जनतेच्या शासनसंस्थेंत' केलें पाहिजे." (पा. १४)

वरील विधान बेबेलच्या पुस्तकाच्या नवव्या आवृत्तींत आहे. अशा रीतीनें शासनसंस्थेसंबंधीची, पुन्हां पुन्हां मांडली गेलेली संधिसाधू मतें, जर्मनींतील सोशल डेमोक्रॅट्सनीं आत्मसात केली यांत आश्चर्य कांहींच नाहीं. एंगल्सचें क्रान्तिकारक विवेचन विनधोकपणें, कडीकुलपांत दडपून ठेवल्यानंतर, आणि जनतेला क्रान्तीपासून दूर ठेवणाऱ्या परिस्थितीची त्याला जोड मिळाल्यानंतर, असें घडणें सहाजीकच होतें.

## * ४ एअरफर्ट कार्यक्रमाच्या मसुद्यावर टीका

मार्क्सवादाच्या शासनसंस्थेवरील सिद्धान्तांचा विचार करतांना, एंगल्सनें २९ जून १८९१ रोजीं, काउटस्कीला एक पत्र लिहून त्यांत एअरफ़र्ट कार्यक्रमावर जी टीका केली—ही पुढें दहा वर्षांनीं 'न्यू झेट्' मासिकांत छापून प्रसिद्ध करण्यांत आली—तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ही टीका त्यानें मुख्यतः सोशलडेमोक्रॅटिक् पक्षाची, शासनसंस्थेच्या रचनेसंबंधीं, जीं संधिसाधू मतें होतीं त्यांवर केलेली आहे.

याच टीकालेखांत एंगल्सनें आर्थिक प्रश्नाबाबतही एक सूचक विधान केलें आहे. त्यावरून भांडवलशाहींत होणाऱ्या बदलाकडे त्याचें किती बारीक लक्ष होतें आणि त्यामुळें आजच्या, साम्राज्यशाही कालांत कोणते प्रश्न निर्माण होतील याबद्दल अंदाज बांधणें त्याला कसें शक्य झालें, हें आपणांस दिसून येईल. उदाहरणार्थ : भांडवलशाहीचें वैशिष्ट्य दाखविण्याकरितां, कार्यक्रमांत उपयोगांत आणलेल्या 'नियोजनाचा अभाव' या शब्द योजनेबद्दल एंगल्स लिहितोः—

* (जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या एअरफर्ट येथें १८९१ सालीं भरलेल्या कॉंग्रेसमध्यें पास झालेला कार्यक्रम).

" जॉइंट स्टॉक कंपन्या सोडून आपण एकदां, सर्व उद्योगधंद्यांत मक्तेदारी आणि सत्ता प्रस्थापित करणाऱ्या ट्रस्टकडे वळलों म्हणजे खासगी उत्पादनच नव्हे तर ' नियोजनाचा अभाव'ही नाहींसा होतो."
[ न्यू-झेट्, भाग२०-२१, सन १९०१-०२, पा० ८ ]

भांडवलशाहीच्या आजच्या साम्राज्यशाही अवस्थेचें तात्विक दृष्ट्या मूल्यमापन करतांना जी सर्वांत महत्वाची गोष्ट—भांडवलशाहीचें मक्तेदारी भांडवलशाहींत झालेलें रूपांतर—ध्यानांत घेणें जरूर असतें, तिचा उल्लेख या ठिकाणीं आहे. येथें योजलेला भांडवलशाही हा शब्द महत्वाचा आहे, कारण 'मक्तेदारी भांडवलशाही' किंवा 'राज-मक्तेदारी—भांडवलशाही ( State monopoly capitalism )' ही भांडवलशाही नसते एवढेंच नव्हे तर तिला 'राज-समाजवाद' ( State socialism ) किंवा असें कांहीं तरी नांव द्यावयास हरकत नाहीं, या भांडवली, सुधारणावादी, चुकीच्या मताचा हल्लीं पुष्कळच प्रचार होत असतो. अर्थात् संपूर्ण नियोजन, ट्रस्टनीं आस्तित्वांत आणलें नाहीं, आणीत नाहींत, आणि पुढेंही कधीं आणूं शकणार नाहींत. भांडवलाधिपती कितीही मोठ्या प्रमाणावर नियोजन करोत, एकंदर उत्पादनाचें अंदाजपत्र त्यांनीं राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पायावर तयार केलेलें असो आणि तें कितीही व्यवस्थितपणें पार पाडण्याचा प्रयत्न ते करोत—समाजव्यवस्था शेवटीं भांडवलशाहीच असते, भांडवलशाहीची नवी अवस्था हें खरें परंतु शेवटीं निश्चितपणें भांडवलशाहीच. ही नव्या अवस्थेंतील भांडवलशाही आणि समाजवाद यांचेमधील ' सान्निध्य ' हा, क्रान्ति अनवश्यक झाल्याचा, भांडवलशाहीच जास्त आकर्षक असल्याचा, पुरावा न वाटतां, समाजवादी क्रान्तीची सन्निधता, सहजता, शक्यता आणि निकड सिद्ध करणारा पुरावा, प्रत्येक खऱ्या कामगार-प्रतिनिधीला, वाटला पाहिजे. सर्व संधिसाधू मात्र याच्या विरुद्ध प्रचार करण्यांत गुंतलेले असतात.

आतां आपण परत शासनसंस्थेच्या प्रश्नाकडे वळूं. सदरं पत्रांत एंगल्सनें तीन महत्वाच्या सूचना केल्या आहेत पहिली, गणराज्याबद्दल;

दुसरी, राष्ट्रीयत्व आणि शासनसंस्थेचें स्वरूप यांच्या परस्पर संबंधांबद्दल; आणि तिसरी, स्थानिक स्वराज्याबद्दल.

एंगल्सनें, एअरफर्ट कार्यक्रमावर केलेल्या टीकेचा, गणराज्य हा मध्य-बिंदू केला आहे. आन्तरराष्ट्रीय सोशल डेमॉक्रसींत, एअरफर्ट कार्यक्रमाला किती महत्व प्राप्त झालें आहे आणि दुसऱ्या इंटरनॅशनलमध्यें तो कसा आदर्श मानला जातो हें लक्षांत घेऊन आपण जर ही टीका एंगल्सनें दुसऱ्या इंटरनॅशनलच्या संधिसाधु धोरणावरच केली आहे असें म्हटलें तर ती मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. एंगल्स म्हणतो,

" या मसुद्यांत ज्या राजकीय मागण्या आहेत त्यांत एक मोठा दोष आहे. जें म्हणावयास पाहिजे तें त्यांत **म्हटलेलें नाहीं.** " ( जाड ठसा एंगल्सचा )

एंगल्सनें पुढें हें स्पष्ट केलें आहे कीं, जर्मन राष्ट्राची घटना ही १८५० सालच्या प्रतिगामी घटनेची प्रतिकृती आहे. आणि रीशटॅग ( जर्मन विधिमंडळ ) हें बुल्यम लेबनिच म्हणतो त्याप्रमाणें, " एकतंत्री-पणाची लज्जा रक्षण करणारी चिंधी आहे. " त्याचप्रमाणें, " जी घटना लहान लहान संस्थानांना आणि जर्मन संस्थानांच्या संघराज्याला काय-देशीर मान्यता देते, त्या घटनेखालीं 'श्रमाचीं सर्व साधनें राष्ट्राच्या माल-कीची करण्याची कल्पना हास्यास्पद आहे. "

सदर कार्यक्रमांत, जर्मनींत गणराज्य स्थापन करण्याची मागणी घालणें, कायद्याच्या बंधनामुळें अशक्य होतें; हें माहीत होतें म्हणूनच तो म्हणतो, " परंतु याला हात लावणें धोक्याचें आहे. " पण सर्वांचें समाधान करणारें हें कारण सांगून तो स्वस्थ बसला नाहीं.

तो म्हणतो, "......परंतु कोणत्या कां रीतीनें होईना, यावर हल्ला हा केलाच पाहिजे...सोशल-डेमोक्रॅटिक् पक्षाच्या प्रचार आणि प्रसिद्धी खात्यांतून आज किती संधिसाधू लोक घुसले आहेत हें पाहिलें म्हणजे आजच या गोष्टीची इतकी कां जरूरी आहे हें आपल्या ध्यानांत येईल. 'सोशालिस्ट विरोधी कायदे' पुन्हां लादले जाण्याच्या भीतीनें, आणि पूर्वी या कायद्यांचा अम्मल चालू असतांना कांहीं गोष्टी अजाणतेपणानें आणि

अवेळीं बोलल्या गेल्यामुळें झालेल्या परिणामांची आठवण होऊन, जर्मनीमध्यें पक्षाला आज जें कायदेशीर स्थान आहे तें, पक्षाच्या सर्वच मागण्या 'शांततेच्या मार्गानें' पुऱ्या करण्यास समर्थ आहे, असें एका-एकीं वाटूं लागलें आहे."

जर्मनींतील सोशल डेमोक्रॅट्सनीं, 'सोशालिस्ट–विरोधी कायदे' पुन्हां लागू केले जातील या भीतीनेंच केवळ, ही भूमिका घेतली आहे; या मुख्य गोष्टीवर भर देऊन एंगल्सनें याला, स्पष्टपणें संधिसाधूपणा म्हटलें आहे. त्यानें असेंही सांगितलें कीं, गणराज्य किंवा स्वातंत्र्य यांना अस्तित्व नाहीं म्हणूनच शांततेच्या मार्गाचीं सुखस्वप्नें रेखाटणें हास्यास्पद आहे. परंतु एंगल्सनें आपल्याला बांधून न घेण्याची काळजी घेतली आहे. त्यानें हें मान्य केलें आहे कीं, एकाद्या गणराज्यांत किंवा संपूर्ण स्वातंत्र्य असलेल्या एकाद्या देशांत, समाजवाद शांततेच्या मार्गानें येईल अशी 'कल्पना' (परंतु केवळ कल्पनाच ) करणें शक्य आहे. परंतु जर्मनी-बद्दल तो म्हणतो,

" जर्मनींत, जेथें सरकार सर्व सत्ताधारी आहे आणि रीशटॅग आणि इतर प्रातिनिधिक सभा यांचे हातांत कवडीचीही सत्ता नाहीं, तेथें अशी घोषणा करणें–आणि कारण नसतांना करणें–म्हणजे एकतंत्रीपणाचा नागवेपणा आपण आपल्या हातांनीं झांकण्यासारखें आहे. "

हा एंगल्सचा आदेश कडीकुलपांत दडपून ठेवणाऱ्या जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक् पक्षाच्या बहुसंख्य अधिकृत पुढाऱ्यांनीं, एकतंत्रीपणाची लज्जा रक्षण करणारी लंगोटी आपणच असल्याचें सिद्ध केलें आहे.

" असल्या धोरणानें शेवटीं त्यांच्या पक्षाची वाताहात मात्र होईल. राजकारणाचें सर्व साधारण तात्त्विक प्रश्न पुढें करून, पहिल्या मोठ्या राजकीय अरिष्टानंतर, या महान् घटनेनंतर, जे तांतडीचे आणि प्रत्यक्ष व्यावहारिक प्रश्न एकदम पुढें आले, त्यांचेकडे दुर्लक्ष करण्यांत येत आहे. याचा परिणाम अत्यंत निर्णायक प्रसंगीं आपल्या पक्षाचें पुढारीपण एकदम नाहींसें होणें, आणि अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर कधींही चर्चा

न केली गेल्याकारणानें त्या प्रश्नाबद्दल पक्षांत अत्यंत फाटाफूट आणि गोंधळ रहाणें, याशिवाय दुसरा काय शक्य आहे ?...

" अशा रीतीनें तात्कालिक फायद्याकरितां, मोठे आणि महत्वाचे मूलभूत प्रश्न विसरणें, अन्तिम परिणामांकडे दुर्लक्ष करून क्षणिक विजयाकरितां लढा देणें आणि प्रयत्न करणें, आणि वर्तमानकालाकरितां चळवळीच्या भविष्याचा बळी देणें, या गोष्टी प्रामाणिकपणानें केल्या गेल्या असल्या तरी त्या संधिसाधूपणाच्याच आहेत आणि संधिसाधूपणाच्याच रहातील. आणि प्रामाणिक संधिसाधूपणा हा तर जास्तच धोक्याचा असतो.

" सर्वांत खरी गोष्ट कोणती असेल तर ती ही कीं, आपल्या पक्षाच्या आणि कामगार वर्गाच्या हातांत येणाऱ्या सत्तेचें बाह्यस्वरूप लोकशाही गणराज्य हेंच असणार आहे. महान फ्रेंच राज्यक्रान्तीनें दाखवून दिल्याप्रमाणें कामगारांच्या हुकूमशाहीचें हेंच विशिष्ट स्वरूप असतें..."

लोकशाही गणराज्य हा कामगारांच्या हुकूमशाहीच्या आधींचा टप्पा आहे, ही मार्क्सच्या एकंदर लिखाणांतून मध्यवर्ती धाग्याप्रमाणें आढळणारी कल्पना एंगल्सनें या ठिकाणीं विशेष स्पष्टपणें मांडली आहे. अशा गणराज्यांत भांडवलाचें अधिपत्य, आणि म्हणूनच बहुजनसमाजाची पिळणूक आणि वर्गयुद्ध, हीं किंचित्‌ही कमी झालेलीं नसलीं तरी, त्या परिस्थितींत सहाजिकच वर्गयुद्धाचा विस्तार, प्रगति, खोली आणि तीव्रता हीं इतक्या मोठ्या प्रमाणांत वाढतात कीं, पिळल्या गेलेल्या वर्गाच्या मूलभूत मागण्या पूर्ण होण्याची शक्यता निर्माण झाल्याबरोबर त्या शक्यतेची पूर्तता अटळपणें कामगारांच्या हुकूमशाहींत, कामगारांनीं सर्व दलित जनतेचें पुढारीपण स्वीकारण्यांत होते. मार्क्सवादाचे जे सिद्धान्त 'दुसरी इंटरनॅशनल' 'विसरली' आहे, त्यांतच याचांही समावेश होतो. या त्यांच्या विसरभोळेपणाचें, १९१७ सालांतील रशियन क्रान्तीच्या पहिल्या सहा महिन्यांतील मेन्शेविक पक्षाच्या इतिहासानें, चांगलेंच प्रदर्शन केलें आहे.

गणराज्यांचें संघराज्य ( Federal Republic ) या प्रश्नाचा विचार करतांना एंगल्स् निरनिराळें राष्ट्रीयत्व असलेल्या जनतेसंबंधीं लिहितोः

" आजच्या जर्मनीच्या जागीं काय येणार? (आजच्या जर्मनीची प्रतिगामी राजेशाही घटना आणि तितक्याच प्रतिगामी लहान लहान राज्यांत तिची विभागणी यामुळें ज्या वैशिष्टयांना ' प्रशियानिझम् ' म्हणतात ती सर्व जर्मनींत सामावून जाण्याचे ऐवजीं त्यांना स्वतंत्र आणि कायम स्वरूप मात्र दिलें जात आहे ). कामगार वर्ग, एकजिनसी आणि अविभाज्य गणराज्याचाच फक्त उपयोग करूं शकेल असें माझें मत आहे. अमेरिकेसारख्या प्रचंड देशांत अजूनही फेडरल गणराज्याची आवश्यकता आहे. परंतु अमेरिकेच्या पूर्वेकडील कांहीं संस्थानांतून ती आजच प्रगतीच्या मार्गांतील अडथळा बनली आहे. इंग्लंडमध्यें सुद्धां—जेथें दोन बेटांत चार राष्ट्रीयत्वाचे लोक रहातात आणि जेथें एक पार्लमेंट असूनसुद्धां तीन निरनिराळे कायदे चालतात—हें स्वरूप प्रगतीपरच ठरेल. लहानशा स्विझरलंडमध्यें तें आतांच प्रगतीच्या मार्गांतील अडथळा बनलें आहे, आणि स्विझरलंड, युरोपमधील राष्ट्रमालिकेंत एक निष्क्रीय राष्ट्र म्हणून रहाण्यास तयार आहे म्हणूनच केवळ हा अडथळा तेथें सहन केला जात आहे. जर्मनींत जर स्विझरलंड प्रमाणें संघराज्य (Federation) निर्माण झालें तर ती घटना प्रतिगामीच ठरेल. संघराज्य (Federation) आणि एकराज्य (unitary state)यांत दोन महत्वाचे फरक आहेत. एकः संघराज्यांत सामील झालेल्या प्रत्येक राज्याला किंवा प्रांताला आपलें स्वतंत्र दिवाणी आणि फौजदारी कायदे आणि न्यायालयें असतें. दोनः संघराज्यांत लोकनियुक्त विधिमंडळाबरोबरच दुसरें एक निरनिराळ्या राज्यांच्या प्रतिनिधींचें बनलेलें विधिमंडळ असतें आणि त्यांत सर्व लहान मोठ्या राज्यांना आणि प्रांतांना, राज्य किंवा प्रांत म्हणून प्रतिनिधित्व असतें. "

जर्मनीमध्यें संघराज्य ही एकजिनसी एकराज्याची ( Complete

unitary State ) संक्रमणावस्था ठरणार आहे. म्हणून १८६६-७०* सालांत 'वरून लादली गेलेली' क्रांति आतां उलटवून चालणार नाहीं तर तिला 'खालच्या चळवळीची' जोड दिली पाहिजे.

शासनसंस्थेच्या निरनिराळ्या स्वरूपाकडे एंगल्सनें दुर्लक्ष केलें नाहीं. प्रत्येक निरनिराळ्या स्वरूपांच्या प्रत्यक्ष आणि ऐतिहासिक वैशिष्टयावरून प्रत्येक स्वरूप कशांतून निर्माण झालें आणि त्याचें रूपांतर कशांत होत आहे हें पहाण्याचे दृष्टीनें एंगल्सनें प्रत्येक बदलत्या स्वरूपाचा सूक्ष्म अभ्यास केला.

मार्क्सप्रमाणेंच एंगल्सनेंही, कामगार आणि कामगार–क्रांति यांच्या दृष्टीनें लोकशाही केंद्रीकरणावर, एकमेव आणि अविभाज्य गणराज्यावर भर दिला. फेडरल गणराज्य हें तो, अपवादात्मक आणि प्रगतीला अडथळा आणणारें स्वरूप मानी; किंवा राजेशाहीचें केंद्रित गणराज्यांत रूपांतर होत असतांनाचें संक्रमणकालांतील स्वरूप, या विशिष्ट परिस्थितींतच फक्त प्रगतीपर स्वरूप, मानी. या विशिष्ट परिस्थितींतच राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नाला महत्व प्राप्त होतें.

लहान लहान संस्थानांच्या प्रतिक्रान्तिकारक स्वरूपांवर, आणि कांहीं विशिष्ट वेळेला या स्वरूपावर चढविलेल्या राष्ट्रीयत्वाच्या बुरख्यावर अत्यंत सडेतोड टीका करून सुद्धां मार्क्स आणि एंगल्स यांनीं राष्ट्रीयत्वाचा प्रश्न डावलण्याचा प्रयत्न कधींच केला नाहीं. जर्मनी आणि पोलंड येथील मार्क्सवाद्यांचे हातून मात्र, त्यांना त्यांच्या लहान लहान

---

* या ठिकाणीं एंगल्सनें विभक्त जर्मनीचा, 'वरून' लष्कराचे जोरावर, एकजिनसी जर्मनी बनविण्याचा जो प्रयत्न प्रशियांतील अधिकारी गटाकडून चालला होता, त्याचा उल्लेख केला आहे. १८६६ सालीं प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यांत जें युद्ध झालें त्यांतून जर्मन संस्थानांचें 'उत्तर–जर्मन–कॉनफेडरेशन' निर्माण झालें; आणि १८७० सालांतील प्रशिया आणि फ्रान्स यांच्या युद्धांतून प्रशियाच्या प्रभुत्वाखालीं जर्मन साम्राज्य निर्माण झालें. )

संस्थानांतील अप्रगल्भ आणि संकुचित राष्ट्रवादाला रास्त विरोध करावा लागत असल्यानें, ही चूक होत आहे.

भौगोलिक दृष्ट्या अलग भूप्रदेश, एक भाषा आणि बरेंच वर्षांचा इतिहास, यामुळें इंग्लंडच्या निरनिराळ्या लहान विभागांतून राष्ट्रीयत्वाचा प्रश्न सुटला असावा असें वाटतें. परंतु या देशाचे बाबतींतसुद्धां एंगल्सनें 'राष्ट्रीयत्वाचा प्रश्न सुटलेला नाहीं' ही प्रत्यक्ष परिस्थिति ध्यानांत घेऊन, इंग्लंडमध्यें 'फेडरल–गणराज्याची' स्थापना ही प्रगतीपर घटना आहे, असा निर्वाळा दिला. अर्थात् असें करण्यांत, त्यांचा हेतु, फेडरल गणराज्यावर टीका करण्याचें सोडून देणें किंवा केंद्रित आणि एकत्रित लोकशाही गणराज्याकरितां प्रचार आणि तीव्र लढा करण्याचें सोडून देणें, हा मुळींच नव्हता.

"लोकशाही केन्द्रीकरण" हा शब्द एंगल्सनें, भांडवलदार आणि मध्यमवर्गीय तत्वज्ञ किंवा अराज्यवादी वापरतात त्या नौकरशाही अर्थानें वापरलेला नाहीं. एंगल्सला अभिप्रेत असलेल्या अर्थानें त्यांत, राष्ट्राच्या एकजुटीचें संरक्षण करण्याकरितां कम्यून्सनीं स्वखुषीनें संघटित होण्याइतकी स्थानिक स्वायत्तता आणि सर्व नौकरशाहीचा, त्याचप्रमाणें 'वरून हुकूम सोडण्याच्या पद्धतीचा,' संपूर्ण नाश, या दोहोंचाही अन्तर्भाव होऊं शकतो. मार्क्सवादाच्या शासनसंस्थेवरील कार्यक्रमात्मक सिद्धांतांचें विवेचन करतांना एंगल्स म्हणतो,

"म्हणून केन्द्रित गणराज्य—परंतु आजच्या फ्रान्समधील गणराज्यासारखें मात्र नव्हे. कारण हें फ्रान्समधील गणराज्य म्हणजे १७९८ सालांतील साम्राज्यच आहे, फक्त त्यांत राजा नाहीं एवढेंच. १७९२ ते १७९८ या कालांत, फ्रान्समधील प्रत्येक प्रांताला आणि प्रत्येक कम्यूनला, अमेरिकेंतल्या प्रमाणें संपूर्ण स्वायत्तता होती—आणि आपल्यालाही हेंच हवें आहे. स्थानिक स्वायत्तता संघटित कशी करावयाची आणि ती नौकरशाहीशिवाय कशी चालवावयाची हें अमेरिकेनें आणि फ्रान्समधील पहिल्या गणराज्यानें आपणांस दाखवून दिलें; आणि कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इतर इंग्लिश वसाहती आजही दाखवून देत आहेत. अशा प्रका-

रच्या प्रांतिक आणि स्थानिक स्वायत्ततेंत, स्विझरलंडमधील संघराज्य पद्धतीपेक्षां किती तरी जास्त स्वातंत्र्य असतें, कारण अशा संघराज्यांतील प्रांतावर 'बंडची' ( एकंदर संघराज्य ) हुकूमत पुष्कळच कमी असते हें खरें परंतु त्याचप्रमाणें तें जिल्हा आणि कम्यून यांचे पासूनही स्वतंत्र असतात. जिल्हा आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक प्रांतिक सरकारनें करण्याची पद्धत—ही पद्धत इंग्रजी भाषा बोलल्या जाणाऱ्या राष्ट्रांतून अस्तित्वांत नाहीं—आणि त्याच बरोबर प्रशियांतील लँड्रेट वगैरेही ( कॉमिसार, पोलीस अधिकारी, गव्हर्नर आणि 'वरून' नेमले जाणारे सर्व अधिकारी ) आपणांस नष्ट केले पाहिजेत."

वरील विवेचनाला अनुसरून एंगल्सनें एअरफर्ट मसुद्यांतील स्थानिक स्वायत्ततेसंबंधीच्या कलमाचा तर्जुमा खालीलप्रमाणें सुचविला आहे.

"प्रांतांना ( जिल्ह्यांना आणि जमातींना ) संपूर्ण स्वायत्तता देणें, त्याकरितां तेथील अधिकाऱ्यांची प्रौढमतदान पद्धतीनें निवडणूक करणें, आणि वरिष्ठ सरकारनें नेमलेले सर्व प्रांतिक आणि इतर अधिकारी रद्द करणें."

तथाकथित क्रान्तिकारक आणि तथाकथित लोकशाहीचे तथाकथित प्रतिनिधी, या प्रश्नाचे बाबतींत ( आणि केवळ याच नव्हे ) लोकशाही-पासून निर्लज्जपणानें किती दूर गेले आहेत हें मी पूर्वीच–'प्रवदाच्या' २८ मे १९१७ च्या ( नं. ६ ) अंकांत, हा अंक सोशालिस्ट मंत्री असलेल्या केरेन्स्की सरकारनें जप्त केला आहे—दाखवून दिलें आहे. परंतु ज्यांनीं आपणांस साम्राज्यशाही मांडवलशाहीशीं 'संमिश्र मंत्रिमंडळाच्या' रूपानें बांधून घेतले आहे, त्यांचेवर या टीकेचा कांहींच परिणाम झाला नाहीं हें साहजिकच होय.

केन्द्रित गणराज्यापेक्षां, फेडरल गणराज्यांत जास्त स्वातंत्र्य असतें, असा जो समज सर्वत्र आणि विशेषतः मध्यमवर्गीय डेमोक्रॅट्सच्यांत पसरला आहे, तो खोटा असल्याचें एंगल्सनें प्रत्यक्ष पुराव्यानिशी सिद्ध केलें आहे, ही अत्यंत महत्वाची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. १७९२ ते १७९८ या कालांतील फ्रान्समधील केंद्रित गणराज्य आणि

स्वित्झरलंडमधील फेडरल गणराज्य या दोन उदाहरणांनीं, त्यांचा समज बरोबर नाहीं हें एंगल्सनें दाखवून दिलें आहे. फेडरल गणराज्यापेक्षां खऱ्या अर्थानें, लोकशाही केन्द्रित गणराज्यामध्यें किती तरी जास्त स्वातंत्र्य होतें. तेव्हां प्रांतांना आणि जिल्ह्यांना, इतिहासाला माहीत असलेलें जास्तीत जास्त स्वातंत्र्य, केन्द्रित गणराज्यानें दिलें, फेडरल गणराज्यानें नाहीं.

या गोष्टींकडे आणि खरें म्हणजे फेडरल आणि केन्द्रित गणराज्य आणि स्थानिक स्वराज्य या सर्वच प्रश्नांकडे आपल्या चळवळींत आणि प्रचारांत फार थोडें लक्ष दिलें गेलें आहे आणि दिलें जात आहे.

## ५ एंगल्सनें १८९१ सालीं मार्क्सच्या 'फ्रान्समधील यादवी' या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना

'फ्रान्समधील यादवी' या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेची तारीख १८ मार्च १८९१ असून ती प्रथम 'न्यू-झेट्' मध्यें प्रसिद्ध झाली. या प्रस्तावनेंत एंगल्सनें शासनसंस्थेवरील दृष्टिकोनासंबंधींच्या निरनिराळ्या प्रश्नांवर मनोरंजक टीका केली आहे. त्याच बरोबर पॅरीस कम्यूनमध्यें जो अनुभव मिळाला त्याचाही त्यानें गोषवारा काढला आहे. पॅरीस कम्यूननंतर लोटलेल्या वीस वर्षांत लेखकाला जो अनुभव मिळाला त्याच्या पार्श्वभूमीवर हा गोषवारा काढला असल्यानें त्याला विशेष महत्त्व आहे; तसेंच, मुख्यत: जर्मनींत सर्वत्र पसरलेल्या 'शासनसंस्थेवरील अंधविश्वासाविरुद्ध' त्याचा रोख आहे. असा हा गोषवारा शासनसंस्थेच्या प्रश्नावरील मार्क्सवादाचा 'अखेरचा शब्द' मानावयास हरकत नाहीं.

फ्रान्समधील प्रत्येक क्रान्तीनंतर कामगारांच्या हातांत शस्त्रें आलीं आहेत असें सांगून एंगल्स म्हणतो,

"...म्हणून कामगारांच्या हातांतील शस्त्रें काढून घेणें हें राजसत्ता हातीं आलेल्या भांडवलदार वर्गाचें पहिलें कर्तव्य ठरतें. म्हणूनच कामगारांनीं यशस्वी रीतीनें घडवून आणलेल्या प्रत्येक क्रान्तीनंतर पुन्हां लढा होऊन त्यांत कामगारांचा पराभव झालेला आहे."

भांडवलशाही क्रान्त्यांच्या अनुभवांचा हा गोषवारा जितका थोडक्यांत, तितकाच अर्थपूर्ण आहे. एकंदर गोष्टीचें सार आणि त्याच बरोबर शासनसंस्थेच्या प्रश्नाचेंही सार ( दडपलेल्या वर्गाजवळ शस्त्रें आहेत कीं नाहींत ), येथें अत्यंत स्पष्टपणें काढण्यांत आलें आहे. भांडवलशाही तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेले प्राध्यापक आणि मध्यमवर्गीय डेमोक्रॅट याच महत्वाच्या प्रश्नाकडे नेहमीं दुर्लक्ष करीत असतात. भांडवलशाही क्रांतीचें हें गुपित वावदुकपणानें बोलून दाखविण्याचा 'मान' १९१७ सालीं, रशियन क्रांतीचें वेळीं मेन्शेविक–आणि मार्क्सवादीसुद्धां–टर्स्टेली यानें मिळविला. ९ जूनच्या आपल्या इतिहास-प्रसिद्ध भाषणांत त्यानें पेट्रोग्रॅडच्या कामगारांना निःशस्त्र करण्याचा भांडवलदारांचा निर्णय जाहीर केला. मात्र हा निर्णय घेणें 'राष्ट्राच्या' हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे आणि तो आपण स्वतःच घेतला आहे असें सांगण्यास तो कचरला नाहीं.

१९१७ सालांतील रशियन क्रांतीचा इतिहास लिहिणाऱ्यांना, टर्स्टेलीच्या पुढारीपणाखालीं सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी आणि मेन्शेविक गट, क्रांतिकारक कामगारांच्या विरुद्ध जाऊन भांडवलदारांना कसे मिळाले याचा उत्तम पुरावा टर्स्टेलीच्या ९ जूनच्या भाषणांत सांपडेल.

एंगल्सनें अनुषंगानें केलेलें दुसरें विधान–याचाही संबंध शासनसंस्थेशीं आहेच—धर्मासंबंधीं आहे. जर्मनींतील सोशल डेमोक्रॅट, संधिसाधू बनल्यामुळें त्यांची जसजशी अधोगती होऊं लागली तसतसे ते 'धर्म हा खाजगी प्रश्न आहे' या वाक्याचा अप्रबुद्धपणें पुन्हां पुन्हां विपरीत अर्थ लावूं लागले, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. 'धर्माचा प्रश्न' क्रांतिकारक कामगारपक्षाच्या दृष्टीनेंही खासगीच (!) असतो असा वरील वाक्याचा अर्थ लावण्यांत आला. अशा रीतीनें कामगारांच्या क्रांतिकारक कार्य-क्रमाचा जो विश्वासघात केला जात होता त्याचाच एंगल्सनें निषेध केला आहे. आपल्या पक्षांत संधिसाधूपणा शिरूं लागल्याचीं चिन्हें एंगल्सला १८९१ सालीं अस्पष्टपणें दिसूं लागलीं होतीं, आणि म्हणूनच या प्रश्नावरील आपलें मतही त्यानें अत्यंत सावधगिरीनें दिलें आहे.

"....कम्यून हें निर्विवादपणें कामगारांचें, आणि कामगारांच्या अधिकृत पुढाऱ्यांचें, बनलेलें असल्यानें त्याच्या कार्यक्रमावर निश्चितपणें कामगारवर्गाचा ठसा उमटला आहे. कामगारांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून ज्या सुधारणा कायद्यानें करणें जरुर होतें उदाहरणार्थ, शासनसंस्थेच्या दृष्टीनें धर्म ही संपूर्णपणें खाजगी आणि वैयक्तिक बाब आहे, हें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत आणणें; परंतु जे कायदे करण्यास रिपब्लिकन भांडवलदार घाबरल्यामुळें धजावले नाहींत ते सुधारणांचे कायदे कम्यूननें करून टाकले. त्याचबरोबर कामगारांच्या प्रत्यक्षपणें हिताचे आणि कांहीं अंशी जुन्या समाजव्यवस्थेला मारक असलेले असेही कांहीं कायदे त्यांनीं पास केले."

'शासनसंस्थेचे दृष्टीनें' हे शब्द अधोरेखित करण्यांत एँगल्सचा हेतु जर्मन सुधारणावाद्यांच्यावर हल्ला चढविणें हाच होता. 'पक्षाच्या दृष्टीनें सुद्धां' धर्म ही खाजगी बाब आहे, असें म्हणून जर्मन सुधारणावाद्यांनीं कामगारांच्या क्रान्तिकारक पक्षाला, आत्यंतिक 'मतस्वातंत्र्याच्या' नांवाखालीं क्षुद्र सुधारणावादी बनविलें आहे. हे संधिसाधू धर्माला, तसा प्रत्यक्ष उल्लेख न करितां, मान्यता देण्यास तयार असतात; परंतु जनतेला गुंगींत टाकणाऱ्या या धर्मरूपी अफूविरुद्ध पक्षानें चालविलेला लढा मात्र ते सोडून देतात.

जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा तत्त्ववेत्ता पुढारी काउट्स्की यानें १९१३ सालीं लिहिलेल्या लेखांत 'चर्च सोडण्याच्या' चळवळी संबंधीं जीं उडवाउडवीचीं विधानें केलीं आहेत त्यामुळें, पक्षाचीं दारें संधिसाधूपणाला उघडीं केलीं गेलीं. तसेंच त्या विधानांत, पुढें १९१४ सालीं, त्या पक्षाचा जो किळसवाणा अधःपात झाला त्याची कारणपरंपरा शोधून काढण्यास पुरेल एवढी सामुग्री, त्या पक्षाचा इतिहास लिहिणाऱ्यांना सापडेल.

परंतु कम्यून होऊन गेल्यानंतर वीस वर्षांनीं, त्यापासून मिळालेल्या शिकवणीचें समालोचन, एँगल्सनें क्रान्तिकारक कामगारांचें करितां कसें केलें तें आपण पाहूं.

एंगल्सनें ज्यांना विशेष महत्त्व दिलें त्या गोष्टी खालील प्रमाणें.

"...जुन्या केन्द्रित सरकारची सैन्य, पोलीस, सरकारी अधिकारी, हीं दडपशाहीचीं खास साधनें नेपोलियननें १७९८ सालीं निर्माण केलीं. त्यानंतर प्रत्येक नव्या सरकारनें हें एक 'चांगलें हत्यार' म्हणून आपल्या ताब्यांत घेऊन त्याचा उपयोग आपल्या विरोधकांच्या विरुद्ध केला आहे. या दडपशाहीच्या साधनांचा पॅरीसमध्यें जसा पाडाव झाला तसाच तो इतरत्रही व्हावयाचा होता.

"कम्यूनला हें प्रथम पासूनच मान्य करावें लागलें कीं, कामगारवर्ग एकदां सत्ताधारी बनल्यानंतर त्याला जुन्याच शासनसंस्थेचा उपयोग करतां येणार नाहीं. नुकतीच जिंकून घेतलेली सत्ता पुन्हां नाहींशी होऊं नये म्हणून कामगार वर्गानें एकीकडे, आपल्या विरुद्ध उपयोगांत आणली गेलेलीं दडपशाहीचीं जुनीं सर्व साधनें नष्ट करून टाकलीं पाहिजेत; आणि दुसरीकडे, आपल्याच प्रतिनिधींच्या आणि अधिकाऱ्यांच्यापासून आपलें संरक्षण करण्याकरितां, या सर्वांना कोणत्याही वेळीं, निरपवाद 'परत बोलावण्याचें' तत्त्व लागू केलें पाहिजे...."

शासनसंस्था ही शासनसंस्थाच रहाते, म्हणजे समाजाचे भाग आणि जनतेचे नौकर असलेल्या अधिकाऱ्यांचें समाजाच्या मालकांत रूपांतर करणें हें शासनसंस्थेचें वैशिष्ट्य राजेशाही प्रमाणेंच लोकशाही गणराज्यांत सुद्धां कायमच रहातें. या मुद्यावर एंगल्सनें पुन्हां पुन्हां भर दिला आहे.

"शासनसंस्था आणि तिचीं खातीं यांचें समाजाच्या नौकरांतून समाजाच्या मालकांत रूपांतर होऊं नये—मागील सर्व क्रान्त्यांत असें रूपांतर अपरिहार्य असे—म्हणून कम्यूननें दोन मार्गांचा अवलंब केला. एक: सर्व नौकरवर्गाची—सनदी, न्याय, शिक्षण इत्यादि सर्व खात्यांतील—प्रौढमतदान पद्धतीनें निवडणूक करण्याचें ठरवून, या अधिकाऱ्यांना केव्हांही परत बोलाविण्याचा अधिकार ( Right of re-call ) मतदार संघाला दिला. दोनः सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांना, सर्वसाधारण कामगाराच्या मजुरी इतके वेतन देण्यास आरंभ केला. कम्यूनच्या कोणत्याही

अधिकाऱ्याला ६००० फ्रँकपेक्षां जास्त पगार नव्हता. यामुळें नौकरी मिळविणें, आणि बढती मिळावी म्हणून वशिलेबाजी करणें, या वृत्तीला परिणामकारक रीतीनें आळा घातला गेला. शिवाय प्रतिनिधी आणि प्रातिनिधिक संस्था यांचेवर इतरही पुष्कळ बंधनें लादलीं होतीं तीं निराळींच......."

सुसंगत लोकशाहीचें समाजसत्तावादांत रूपांतर होऊं लागण्याची आणि त्यांतूनच समाजवादाची प्रत्यक्ष मागणी सुरू होण्याची जी मर्यादा आहे, तेथें एंगल्स या ठिकाणीं येऊन पोंचला आहे. कारण शासनसंस्था नाहींशी करण्याकरितां, सनदी नौकरांच्या कामाचें रूपांतर, साध्या हिशेब ठेवण्याच्या आणि देखरेख करण्याच्या, कामांत झालें पाहिजे. जें काम प्रारंभीं समाजांतील पुष्कळ व्यक्तींना करतां येईल आणि शेवटीं तर समाजांतील प्रत्येक व्यक्तीला करतां येईल. आणि बढती मिळविण्याकरितां वशिलेबाजी करण्याची प्रवृत्ति नाहींशी करण्याकरितां मानाच्या परंतु कमी पगाराच्या सरकारी नौकऱ्यांचा उपयोग, बँकांतून किंवा जॉइंट–स्टॉक कंपन्यांतून फार मोठ्या पगाराच्या नौकऱ्या मिळविण्याकरितां केला जाणें अशक्य केलें पाहिजे. सर्व स्वतंत्र भांडवलशाही राष्ट्रांतून ही गोष्ट सरसहा चालू आहे.

प्रत्येक राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाच्या हक्कावर चर्चा करतांना कांहीं मार्क्सवादी असा चुकीचा मुद्दा मांडतात कीं हा हक्क मिळणें भांडवलशाहीखालीं अशक्य आहे; आणि समाजवाद प्रस्थापित झाल्यानंतर त्याची जरूरी रहाणार नाहीं. एंगल्सनें असें म्हटलेलें नाहीं. वरवर शहाणपणाचें वाटणारे परंतु वस्तुतः अत्यंत चुकीचें असलेलें हें विधान कोणत्याही लोकशाही संस्थेसंबंधीं–सरकारी अधिकाऱ्यांचा पगार कमी असावा या तत्त्वासंबंधीं' सुद्धां–करतां येईल. आपण असेंही म्हणूं शकतों कीं, संपूर्ण आणि सुसंगत लोकशाही, भांडवलशाही अस्तित्वांत असेपर्यंत अशक्य आहे; आणि समाजवाद प्रस्थापित झाल्यानंतर ती हळूंहळूं विरूनच जाणार आहे !

'माणसाच्या डोक्यावरचा आणखी एक केस कमी झाला तर त्याला

टक्कल पडेल कां?' या जुन्या विनोदाप्रमाणेंच हाही निरर्थक वितंडवाद आहे.

लोकशाहीची तर्कशुद्धपणें शेवटपर्यंत प्रगति करणें, या प्रगतीला योग्य अशीं स्वरूपें शोधून काढणें आणि प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचा उपयोग करून पहाणें, हा समाजक्रान्तीच्या लक्ष्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. या प्रत्येकाचा अलगपणें विचार केल्यास कोणत्याच लोकशाहींतून समाजवाद निर्माण होणार नाहीं. परंतु रोजच्या व्यवहारांत लोकशाहीचा 'अलगपणें' विचार केला जात नाहीं. तिचा इतर गोष्टींबरोबरच विचार होतो. तिचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो, त्यांत होणाऱ्या बदलाला चालना मिळते आणि उलट तिचेवरही आर्थिक प्रगतीचा परिणाम होतो. जीवन्त समाजाच्या प्रगतीचा विरोधविकासवादी मार्ग हाच असतो.

एंगल्स पुढें म्हणतो :

"जुन्या शासनसंस्थेचा नाश करून त्याचे जागीं नव्या आणि खऱ्या-खुऱ्या लोकशाही शासनसंस्थेची संस्थापना करणें, या मुद्यांचें विवेचन 'फ्रान्समधील यादवी' या ग्रंथाच्या तिसऱ्या भागांत केलें आहे. परंतु त्यांतील कांहीं मुद्यांची या ठिकाणीं चर्चा करणें जरूर आहे. कारण विशेषतः जर्मनींत, शासनसंस्थेवरील अंधविश्वासाला तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतून, भांडवलदारांच्या—आणि कांहीं कामगारांच्या सुद्धां-सर्वसाधारण विचारसरणींत स्थान प्राप्त झालें आहे. तत्त्वज्ञान्यांच्या कल्पनेप्रमाणें, शासनसंस्था ही 'कल्पनेचें साकार स्वरूप' किंवा, 'परमेश्वराचें पृथ्वीवरील राज्य' असतें. आणि तत्त्वज्ञानाच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास, 'हें असें स्वरूप आहे कीं, ज्या मार्फत सनातन सत्य आणि सनातन न्याय यांचा या पृथ्वीवर आविष्कार होत असतो' किंवा 'व्हावयास पाहिजे.' वरील कल्पनेंतूनच शासनसंस्थेबद्दल आणि तिच्याशीं संबंधित असलेल्या सर्व गोष्टींबद्दल अंध आदर निर्माण होतो. लहान वयापासूनच सर्वांची अशी समजूत करून दिलेली असते कीं,'समाजाच्या आणि सर्व सामाजिक हिताच्या ज्या गोष्टी आहेत, त्यांची आजपर्यंत जशी व्यवस्था केली गेली

तशीच, म्हणजे शासनसंस्था आणि लठ्ठ पगाराचे सरकारी नौकर यांचेमार्फत, पुढेंही झाली पाहिजे. या समजुतीमुळेंच अशी अंधश्रद्धा निर्माण होणें सुलभ जाते. लोकांना मात्र असें वाटतें कीं, वंशपरंपरागत राजेशाहीची कल्पना सोडून देऊन, लोकशाही गणराज्याची घोषणा करण्यांत आपण फार मोठें धैर्य दाखवीत आहोंत आणि फार पुढचा टप्पा गाठींत आहोंत. परंतु खरें पहातां राजेशाहींत काय किंवा लोकशाही गणराज्यांत काय, शासनसंस्था ही एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर दडपशाही करण्याचें साधन असतें. वर्गीय सत्तेकरितां यशस्वी रीतीनें लढा लढल्यानंतर कामगारांकडे वारसा हक्कानें आलेली ही एक वाईट गोष्ट असते. आणि नव्या आणि स्वतंत्र परिस्थितींत जन्माला आलेली नवीन पिढी शासनसंस्थारूपी हें गबाळ अडगळींत फेंकून देईपर्यंत, यांतील वाईट भाग, कम्यून प्रमाणेंच, शक्य तितक्या लवकर कापून टाकणें कामगार वर्गाला भाग पडतें."

राजेशाहीचे जागीं गणराज्याची स्थापना करतांना मार्क्सवादाच्या शासनसंस्थेवरील सर्वसाधारण शिकवणीचा विसर पडूं न देण्याबद्दल एंगल्सनें जर्मन लोकांना बजावलें होतें. त्याची ही सूचना म्हणजे जणूं काय सरटेलिस आणि चर्नोव्ह यांनाच केलेला उपदेश आहे असें वाटतें. कारण 'संमिश्र मंत्रिमंडळाच्या' कारभारावरील त्यांच्या निष्ठेवरून त्यांचा शासनसंस्थेवर असलेला अंधविश्वास आणि अंधभक्ति हीं स्पष्ट दिसूं लागलीं आहेत !

आणखी दोन मुद्दे. एक : राजेशाहींत काय किंवा गणराज्यांत काय 'शासनसंस्था ही शेवटीं एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर दडपशाही करण्याचें साधन असतें' असें एंगल्सनें म्हटलें आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, अराज्यवादी प्रतिपादन करतात त्याप्रमाणें 'दडपशाहीच्या स्वरूपाला' कामगारांच्या दृष्टीनें कांहींच महत्त्व नसतें. उलट वर्गीय लढ्याचें आणि वर्गीय दडपशाहीचें स्वरूप जितकें विस्तृत, स्वतंत्र आणि स्पष्ट असतें, तितका त्याचा, वर्ग नष्ट करण्याच्या लढ्यांत, कामगारवर्गाला जास्त फायदा होतो.

दोन : शासनसंस्थारूपी सर्व गबाळ अडगळींत फेकून देण्याचें कार्य नवी पिढीच कां करूं शकेल ? हा प्रश्न लोकशाहीचा लढा जिंकण्याशीं निगडित झालेला आहे आणि आतां आपण त्याचाच विचार करूं.

## ६ लोकशाहीचा लढा जिंकण्यासंबंधीं एंगल्सचे विचार

'सोशल डेमोक्रॅट' हा शब्द शास्त्रीय दृष्टीनें कसा चूक आहे याची चर्चा करतांना एंगल्सनें वरील प्रश्नाची चर्चा केली आहे.

१८७० ते १८८० या कालांत निरनिराळ्या विषयांवर आणि विशेषतः आंतरराष्ट्रीय प्रश्नावर लिहिलेल्या आपल्या लेखांच्या संकलित आवृत्तीस लिहिलेल्या प्रस्तावनेंत ( या प्रस्तावनेची तारीख २ जान्युअरी १८९२ आहे, म्हणजे ती त्याच्या मृत्यूपूर्वी दीड वर्षे लिहिलेली आहे ) एंगल्स म्हणतो कीं, या त्याच्या सर्व लिखाणांत त्यानें सोशल डेमोक्रॅटिक या शब्दाऐवजीं ' कम्यूनिस्ट ' असा शब्द वापरला आहे, त्याचें कारण असें आहे कीं, त्यावेळीं फ्रान्समध्यें प्रूधाँचे अनुयायी आणि जर्मनींत लासेलचे अनुयायी स्वतःला ' सोशल–डेमोक्रॅट ' म्हणवीत.

" म्हणून आमच्या विशिष्ट दृष्टिकोनाचा निदर्शक म्हणून असा भोंगळ शब्द वापरणें मार्क्सच्या आणि माझ्या दृष्टीनें अशक्य होतें. आज परिस्थिती बदलली आहे आणि म्हणून ज्या पक्षाचा आर्थिक कार्यक्रम सर्व साधारणपणें, सोशालिस्ट नाहीं, तर कम्यूनिस्ट आहे आणि ज्याचें राजकीय ध्येय सर्वच शासनसंस्था, आणि म्हणून लोकशाही सुद्धां, नाहींशी करण्याचें आहे, अशा पक्षाला हें नांव ( सोशल डेमोक्रॅट ) यथायोग्य नसलें तरी चालण्यासारखें आहे. परंतु जे पक्ष **खरेच राजकीय** असतात त्यांची नांवें यथायोग्य कधींच नसतात, कारण पक्ष वाढत जातो आणि नांव मात्र तेंच रहातें. " ( जाड ठसा एंगल्सचा )

विरोधविकासवादी एंगल्स शेवटपर्यंत आपल्या तत्त्वज्ञानाशीं प्रामाणिकच राहिला. तो म्हणतो, आमचे जवळ पक्षाकरितां एक सुरेख आणि शास्त्रीय दृष्टीनें अत्यंत योग्य असें नांव होतें. परंतु आमचे जवळ खराखुरा पक्षच नव्हता—म्हणजे बहुसंख्य कामगारांचा पक्ष नव्हता. आज एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं, असा पक्ष आहे, परंतु त्याचें नांव

शास्त्रीय दृष्ट्या बरोबर नाहीं. परंतु कांहीं हरकत नाहीं. आपल्या पक्षाची जर सारखी प्रगति होत राहिली, त्याचें नांव शास्त्रीय दृष्टीनें यथार्थ नाहीं ही गोष्ट जर दडवून ठेवली गेली नाहीं, आणि जर तें नांव पक्षाच्या योग्य दिशेनें होणाऱ्या प्रगतीच्या आड येणार नसेल तर हें नांवहि चालेल.

कांहीं विनोदप्रिय लोक आमचें सांत्वन करण्याकरितां, एंगल्सप्रमाणें असें म्हणतील कीं, आपल्याजवळ खराखुरा पक्ष आहे, त्याची प्रगतीही उत्तम रीतीनें चालू आहे, तेव्हां आपल्याला 'बोल्शेविक' या नांवासारखें घाणेरडें आणि निरर्थक—कारण १९०३ सालांतील ब्रूसेल्स–लंडन कॉंग्रेसमध्यें आपण बहुसंख्य होतो या अकल्पिक घटनेचें तें केवळ प्रतीक आहे—नांवही चालेल....आपल्या पक्षाचें नांव बदलावें अशी सूचना मी एप्रिल महिन्यांत केली होती. परंतु त्यानंतर जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत आपल्या पक्षावर रिपब्लिकन आणि 'क्रान्तिकारक' मध्यमवर्गीय लोकशाहीवाले यांनीं जी दडपशाही केली त्यामुळें 'बोल्शेविक' या नांवाला सर्वत्र मोठेपणा आणि मान मिळत आहे; त्याचप्रमाणें हा दडपशाहीचा काल आपल्या पक्षाच्या बाढींतील ऐतिहासिक प्रगतीचा काल ठरला आहे, त्यामुळें एप्रिलमध्यें केलेल्या सूचनेवर भर द्यावा असें मला आज वाटत नाहीं. फार तर मी आपल्या कॉम्रेड्सना एक तडजोड सुचवूं शकेन. आपण आपल्या पक्षाला कम्यूनिस्ट पक्ष असें म्हणूं, मात्र बोल्शेविक हें नांव कंसांत घालूं म्हणजे झालें....

परंतु पक्षाच्या नांवाच्या प्रश्नापेक्षां, शासनसंस्थेकडे बघण्याचा क्रान्तिकारक कामगारांचा दृष्टिकोन काय असावा, हा प्रश्न जास्त महत्वाचा आहे.

शासनसंस्थेसंबंधीं जे मुद्दे नेहमीं पुढें केले जातात त्यांत जी चूक न करण्याबद्दल एंगल्सनें इशारा दिला होता आणि जिचा उल्लेख आम्हीं वर केला आहे, तीच चूक सतत केली जात आहे. शासनसंस्था नाहींशी करणें म्हणजे लोकशाहीसुद्धां नाहींशी करणें आहे. आणि शासनसंस्था हळूं हळूं विरून जाणार म्हणजे लोकशाहीसुद्धां हळूं हळूं विरून जाणार हें विसरलें जातें.

प्रथमदर्शनीं हें विधान विचित्र आणि अर्थहीन वाटेल, आणि

कांहींच्या मनांत अशीही शंका निर्माण होईल कीं, ज्या समाजांत बहु-मताचा निर्णय अल्पमतवाल्यांना मान्य करावा लागणार नाहीं अशा एकाद्या समाजव्यवस्थेची तर आम्ही अपेक्षा करीत नाहीं ना ! कारण शेवटीं या तत्त्वाला मान्यता देणें म्हणजेच लोकशाही नाहीं काय ?

नाहीं. बहुमताच्या निर्णयाला अल्पमतवाल्यांनीं मान्यता देणें, आणि लोकशाही या दोन्ही गोष्टी एक नाहींत. लोकशाही ही, अल्पमतवाल्यांना बहुमताची जी ताबेदारी स्वीकारावी लागते, त्याला मान्यता देणारी ' शासनसंस्था ' आहे. म्हणजेच ती, एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर, समाजांतील एका विभागानें दुसऱ्या विभागावर, पद्धतशीरपणें दडपशाही करण्याचें एक साधन आहे.

शासनसंस्था नष्ट करणें; सर्व प्रकारची संघटित आणि पद्धतशीर दडपशाही, सर्वसाधारण व्यक्तीवर केला जाणारा कोठल्याही प्रकारचा जुलूम नष्ट करणें हें आपलें अंतिम ध्येय आहे. बहुमताच्या निर्णयाला अल्पमतवाल्यांनीं मान्यता दिली पाहिजे, हें तत्त्व ज्या समाजांत पाळलें जाणार नाहीं असा समाज निर्माण करण्याची आमची मुळीच कल्पना नाहीं. परंतु आमची अशी खात्री आहे कीं, समाजवाद स्थापन करण्याची खटपट करीत असतांना, त्याचीच कम्यूनिझममध्यें परिणती होईल आणि त्यामुळें सर्वसाधारण मनुष्यावर दडपशाही करण्याची, एका माणसानें दुसऱ्या माणसाची, समाजाच्या एका विभागानें दुसऱ्या विभागाची गुलामगिरी स्वीकारण्याचें कारण रहाणार नाहीं. कारण कोणत्याही प्रकारची जबरदस्ती आणि ताबेदारी यांचे अस्तित्वाशिवाय, सामाजिक जीवनाचे प्राथमिक नियम पाळण्याची माणसाला संवय होईल.

या संवयींच्या मुद्यावर भर देण्याकरितांच एंगल्सनें, ' नव्या आणि स्वतंत्र सामाजिक व्यवस्थेंत वाढलेल्या ' आणि ' शासनसंस्थेचें संपूर्ण गबाळ'–लोकशाही गणराज्यासुद्धां सर्व प्रकारची शासनसंस्था–'अडगळींत' फेकून देईल, अशा नव्या पिढीचा उल्लेख केला आहे.

याचें विवेचन करण्याकरितां प्रथम शासनसंस्था विरून जाण्याचा आर्थिक पाया काय असतो या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

## प्रकरण पांचवें

# शासनसंस्था विरून जाण्याच्या क्रियेची आर्थिक पार्श्वभूमि

'गोथा कार्यक्रमाचें' परीक्षण या आपल्या लेखांत मार्क्सनें या प्रश्नाची संपूर्ण चर्चा केली आहे ( हा लेख मार्क्सनें ता. ५ मे १८७५ रोजीं ब्रेकला पत्र म्हणून लिहिला. हें पत्र १८९१ सालीं 'न्यू झेट्ट' मध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें. याची स्वतंत्र रशियन आवृत्ति प्रसिद्ध झाली आहे ). या महत्त्वाच्या लेखांत कम्युनिझमची प्रगति आणि शासनसंस्था विरून जाणें यांच्या परस्पर संबंधाच्या विवेचनाचा भाग आहे. परंतु त्याच लेखांत लासेलवरील टीकेचा जो वादविवादात्मक भाग आहे त्यानें या भागाला जणूं काय झांकून टाकलें आहे.

### १ या प्रश्नाची मार्क्सनें केलेली मांडणी

मार्क्सनें ५ मे १८७५ रोजीं ब्रेकला लिहिलेलें पत्र आणि गेल्या प्रकरणांत चर्चा केलेलें एंगल्सनें बेबेलला ता. १८ मार्च १८७५ रोजीं लिहिलेलें पत्र, या दोन्ही पत्रांची बरवर तुलना करणाराला असें वाटणें संभवनीय आहे कीं, एंगल्सपेक्षां मार्क्स हा जास्त ' शासनसंस्थेच्या बाजूचा होता ' आणि शासनसंस्थेच्या प्रश्नाबद्दल या दोन लेखकाच्यांत बराच मतभेद होता.

एंगल्सनें आपल्या पत्रांतून बेबेलला असें सुचविलें आहे कीं, ' शासन-संस्थेबद्दलची सर्व बडबड आपण आतां थांबविली पाहिजे ' आणि 'कार्यक्रमांतील शासनसंस्था हा शब्द काढून टाकून त्याचे जागीं ' कम्यून ' हा शब्द घातला पाहिजे. ' एंगल्सनें असेंही जाहीर केलें कीं, खऱ्या अर्थानें कम्यून हें शासनसंस्थाच नव्हतें. याचे उलट मार्क्स मात्र ' कम्यूनिस्ट ' समाजांतील भविष्यकालांतील शासनसंस्थेसंबंधीं चर्चा करीत आहे. जणू-

काय कम्यूनिझम आस्तित्वांत आल्यानंतर सुद्धां शासनसंस्थेची जरूरी लागेल हें त्याला मान्य होतें.

परंतु अशी कल्पना करून घेणें मूलतःच चूक आहे. आपण जरा वारिक विचार केल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, शासनसंस्था आणि शासनसंस्थेचें 'विरून' जाणें या दोन्ही प्रश्नावर मार्क्स आणि एंगल्स याचें संपूर्ण मतैक्य होतें. आणि वर जें मार्क्सचें वाक्य उधृत केलें आहे तें फक्त शासनसंस्थेच्या 'विरून जाण्याच्या' क्रियेला उद्देशूनच लिहिलें आहे.

भविष्यकालांत शासनसंस्था कधीं विरून जाईल याची निश्चित वेळ सांगण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. आणि ही विरून जाण्याची क्रिया फार काल चालणार असल्यानें अशी वेळ सांगणें अशक्यही आहे. मार्क्स आणि एंगल्स यांच्यांत वरवर जो मतभेद वाटतो त्याचें कारण असें आहे कीं, ते दोघे दोन निरनिराळ्या विषयांची चर्चा करीत होते. शासनसंस्थेसंबंधींचीं चालू मतें किती चुकीचीं आणि असमंजसपणाचीं आहेत, आणि बऱ्याच प्रमाणांत लासेलचीं मतेंही अशीच होतीं, हें अत्यंत स्पष्टपणें आणि सरळपणें बेबेलला दाखवून देणें हा एंगल्सचा हेतु होता. उलट मार्क्स 'कम्युनिस्ट समाजाच्या विकासाच्या' प्रश्नासंबंधीं लिहीत असतांना त्यानें वरील प्रश्नाची केवळ जातां जातां चर्चा केली आहे.

आजच्या भांडवलशाहीचें विकासवादी सिद्धान्तांच्या दृष्टिकोनांतून अत्यंत सुसंगत, संपूर्ण, विचारनिष्ट आणि निर्दोष रीतीनें केलेलें विवेचन म्हणजेच मार्क्सचें तत्त्वज्ञान होय. तेव्हां अर्थात् याच दृष्टिकोनांतून भांडवलशाहीचा आगामी नाश आणि भविष्यकालीन कम्यूनिझमची भविष्यकालीन प्रगति याचें विवेचन करणें हा मार्क्सपुढें प्रश्न होता.

भविष्यकालीन कम्यूनिझमच्या भविष्यकालीन प्रगतीचा प्रश्न कशाच्या आधारावर सोडवावयाचा ?

कम्यूनिझमची निर्मिति भांडवलशाहींतून झाली, भांडवशाहींतच ऐतिहासिक नियमांना अनुसरून तिची प्रगति झाली आणि भांडवलशाहीनेंच निर्माण केलेल्या सामाजिक शक्तींचा तो परिणाम आहे, ही वस्तुस्थिति

ह्याच आपला आधार आहे. जें कधीं समजूंच शकणार नाहीं त्याबद्दल कांहींतरी कल्पना करून घेऊन त्याच्या जोरावर एक स्वप्नसृष्टि निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा मार्क्समध्यें लवलेशही नाहीं. एकादा प्राणिशास्त्रज्ञ, प्राणिविश्वांतील एकाद्या नवीन आढळलेल्या प्राण्याचें उत्पत्तिस्थान आणि त्याच्यांत झालेल्या बदलाच्या अवस्था या जर माहीत असतील, तर त्या प्राण्याच्या विकासाच्या प्रश्नाचा तो जसा विचार करील त्याच पद्धतीनें मार्क्सनें कम्यूनिझमच्या प्रश्नाचा विचार केला आहे.

शासनसंस्था आणि समाज यांच्या परस्पर संबंधाबद्दल जो गोंधळ 'गोथा-कार्यक्रमा' नें निर्माण केला तो प्रथम दूर करण्याच्या हेतूनें मार्क्स लिहितो :

"आजची समाजव्यवस्था ही भांडवली समाजव्यवस्था आहे. कमी जास्त प्रमाणांत मध्ययुगीन परिस्थितीची सरमिसळ असलेली, प्रत्येक राष्ट्राच्या विशिष्ट ऐतिहासिक प्रगतीनुरूप थोडाफार फरक असलेली आणि कमीजास्त प्रमाणांत प्रगति झालेली ही समाजव्यवस्था सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून अस्तित्वांत आहे. उलट प्रत्येक राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादेंत 'आजची शासनसंस्था' निरनिराळ्या प्रकारची आहे. स्विझरलंडपेक्षां प्रशिया-जर्मनीच्या साम्राज्यांत ती निराळी आहे; आणि इंग्लंडपेक्षां अमेरिकेंत तिचें स्वरूप निराळें आहे. म्हणून 'आजची शासनसंस्था' ही केवळ कल्पना आहे.

"परंतु निरनिराळ्या पुढारलेल्या देशांतील निरनिराळ्या शासनसंस्थांचीं स्वरूपें कितीही निरनिराळीं असलीं तरी त्या सर्वांत एक गोष्ट समान आहे.: त्या सर्व भांडवली समाजपद्धतीवर आधारलेल्या आहेत; निरनिराळ्या देशांत या भांडवलशाहीची प्रगति कमीजास्त झालेली आहे एवढेंच. या वस्तुस्थितीमुळें कांहीं अत्यंत महत्वाच्या बाबतींत त्यांच्यांत साम्य आहे. या दृष्टीनें, ज्या शासनसंस्थेचा 'आजचा पाया'-भांडवली समाज-नाहींसा झाला आहे अशा भविष्यकालांतील शासनसंस्थेशीं फरक दाखविण्याचे हेतूनें 'आजची शासनसंस्था' असा शब्दप्रयोग करण्यास हरकत नाहीं.

"मग प्रश्न असा निर्माण होतो कीं, कम्यूनिस्ट समाज अस्तित्वांत आल्यानंतर शासनसंस्थेंत काय फरक होतील? किंवा आजच्या शासन-संस्थेच्या कामांशीं साम्य असलेलीं कोणतीं कामें त्या शासनसंस्थेंत अस्तित्वांत रहातील? या प्रश्नाचें उत्तर शास्त्रीय पद्धतीनेंच दिलें पाहिजे. जनता आणि शासनसंस्था हे दोन शब्द कितीही निरानिराळ्या रीतीनें एकत्र आणले तरी त्यामुळें या प्रश्नाचें उत्तर मिळण्यास थोडीसुद्धां मदत होत नाहीं...."

अशा रीतीनें 'जनतेची–शासनसंस्था' यासंबंधीं केल्या जाणाऱ्या चर्चेचा उपहास करून मार्क्सनें या प्रश्नाची व्यवस्थित मांडणी केली आहे; आणि आपणांस जणूं काय अशी सूचना दिली आहे कीं, शास्त्रीय पद्धतीनें उत्तर देण्याकरितां शास्त्रसिद्ध गोष्टींवरच आपण अवलंबून राहिलें पाहिजे.

विकासवादाच्या सिद्धान्तांनीं, सर्वसाधारण शास्त्रांनीं, एक गोष्ट निश्चितपणें सिद्ध केली आहे आणि ती ही कीं, ऐतिहासिकदृष्ट्या, भांडवलशाही आणि कम्यूनिझम यांचेमध्यें एक विशिष्ट टप्पा, एक संक्रमणावस्था, असलीच पाहिजे. हा शास्त्रीय सिद्धान्त कल्पनावादी विसरून गेले होते आणि समाजवादी–क्रान्तीला घाबरणारे संधिसाधू तो आजही विसरले आहेत.

## २ भांडवलशाही आणि कम्यूनिझम यांचेमधील संक्रमणकाल

मार्क्स पुढें म्हणतो, "भांडवलशाही आणि कम्यूनिस्ट समाजव्यवस्था यांचे दरम्यान असा काल असतो कीं ज्या कालांत पहिलीचें दुसरींत, क्रान्तिकारक मार्गानें परिवर्तन होत असतें. या कालाला अनुरूप असा राजकीय संक्रमणाचाही काल असतो. आणि या कालांतील शासन-संस्थेचें स्वरूप 'कामगार वर्गाची क्रान्तिकारक हुकूमशाही' हेंच फक्त असूं शकतें."

वरील सिद्धान्त मार्क्सनें, आजच्या भांडवली समाजांतील कामगार वर्गाच्या कार्याचें पृथक्करण, त्या समाजाच्या प्रगतीबद्दलची शास्त्रीय

माहिती आणि कामगार आणि भांडवलदार यांच्या हितसंबंधांतील अटळ विरोध, यावरच आधारलेला आहे.

या प्रश्नाची मांडणी प्रथमतः खालीलप्रमाणें केली होती. आपली मुक्तता करून घेण्याकरितां, कामगारांनीं, भांडवलदारांना उखडून टाकलें पाहिजे, राजकीय सत्ता हस्तगत केली पाहिजे आणि आपली क्रान्तिकारक हुकूमशाही प्रस्थापित केली पाहिजे.

या ठिकाणीं हा प्रश्न जरा निराळ्या पद्धतीनें मांडला आहे. 'कम्यूनिझमकडे जात असलेल्या भांडवलशाहीचें कम्यूनिझममध्यें रूपांतर 'राजकीय संक्रमणाच्या' कालाशिवाय अशक्य आहे; आणि या कालांतील शासनसंस्थेचें स्वरूप 'कामगार वर्गाची क्रान्तिकारक हुकूमशाही' या शिवाय वेगळें कांहीं असणें अशक्य आहे.

या हुकूमशाहीचे आणि लोकशाहीचे संबंध कसे असतात ?

आपण हें पाहिलें आहे कीं, कम्यूनिस्ट जाहीरनाम्यांत 'कामगार वर्गाची शास्ता वर्ग म्हणून प्रस्थापना करणें' आणि 'लोकशाहीचें युद्ध जिंकणें' या दोन कल्पना फक्त एकत्र आणल्या आहेत. आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून भांडवलशाहीचें कम्यूनिझममध्यें रूपांतर होत असतांना, लोकशाहींत कसा कसा बदल होईल हें निश्चितपणें ठरविणें शक्य आहे.

भांडवली समाजांत भांडवलशाहीच्या प्रगतीला अत्यंत अनुकूल परिस्थिति अस्तित्वांत असतांना जास्तींत जास्त लोकशाही, लोकशाही गणराज्यांतच अस्तित्वांत असते. परंतु ही लोकशाही भांडवली पिळणुकीच्या मर्यादित चौकटीमुळें नेहमींच मर्यादित असते. त्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत ती फक्त अल्पसंख्याकांची, 'आहेरे' वर्गाची, श्रीमंतांची लोकशाही असते. जुन्या ग्रीसमधील गणराज्यांत ज्या प्रकारचें स्वातंत्र्य असे त्याच प्रकारचें म्हणजे गुलामांच्या मालकांचें स्वातंत्र्य, भांडवली समाजांत असते. भांडवलशाही पिळणुकीमुळें आजचा 'मोल-मजुरीचा' गुलाम, 'ददात' आणि दारिद्रय यामुळें इतका पिचला गेलेला असतो कीं, त्याला 'लोकशाहीचा विचार करण्यास वेळ नसतो' आणि

'राजकारणाचाही विचार करण्यास ' वेळ नसतो. शांततेच्या काळांतील, दैनंदिन पोटापाण्याच्या प्रश्नामुळें बहुसंख्य जनतेला सामाजिक आणि राजकीय जीवनांत भाग घेणें अशक्य असतें.

वरील विधानाची सत्यता, जर्मनींतील परिस्थितीनें, सर्वांत चांगली सिद्ध केली आहे. या देशांत घटनात्मक कायदेशीरपणाचें ( Constitutional legality ) अस्तित्व फार काल–१८७१ ते १९१४, पन्नास वर्षें–टिकून राहिलें; आणि या कालांत तेथील डेमोक्रॅट्सनीं या कायदेशीर अस्तित्वाचा उपयोग इतर कोठल्याही देशापेक्षां जास्त चांगल्या रीतीनें करून घेऊन जगांतील इतर कोठल्याही राष्ट्रांतल्यापेक्षां जास्त कामगारांना एका राजकीय पक्षांत संघटित केलें.

भांडवलशाही समाजांत, राजकीय दृष्ट्या जागृत आणि कार्यप्रविण असलेल्या या मोलमजुरीच्या गुलामांचें आतांपर्यंत जास्तींत जास्त प्रमाण किती होतें ? एक कोटी पन्नास लक्ष कामगारांपैकीं सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सभासद असलेले कामगार दहा लक्ष ! आणि एक कोटी दहा लक्षापैकीं 'युनियनमध्यें' संघटित झालेले कामगार तीस लक्ष !

भांडवलशाही समाजांतील लोकशाही म्हणजे अत्यंत थोड्या अल्पसंख्यांकांची लोकशाही, श्रीमंत वर्गाची लोकशाही असते. भांडवलशाहींतील लोकशाहीच्या तंत्राकडे आपण जर थोडें बारकाईनें पाहिलें तर प्रत्येक ठिकाणीं लोकशाहीवर बंधनें घातलीं गेल्याचें आपणांस आढळून येईल; उदाहरणार्थ, मतदानाच्या हक्कावर बारीक सारीक–तथाकथित बारीक सारीक—बंधनें ( स्थायिकत्वाची अट, स्त्रियांना मताधिकार नसणें इ. ); प्रातिनिधिक संस्थांचें तंत्र; एकत्र जमण्याचे मार्गांत प्रत्यक्ष अडथळे ( सार्वजनिक इमारतींत भिकाऱ्यांना ( ! ) मज्जाव ); वर्तमानपत्रांवरील भांडवलदारांचें प्रभुत्व इत्यादि. ज्यांना ददात म्हणजे काय हें माहीत नसतें, ज्यांचा दडपलेल्या वर्गाच्या सामुदायिक दैनंदिन जीवनाशीं कधींही संबंध आलेला नसतो ( आणि शंभरांतील नव्वद नव्हें तर नव्याण्णव भांडवलशाही संपादक आणि राजकारणी व्यक्ति याच वर्गांतील असतात ); त्यांना हीं बंधनें, या अटी, हे अपवाद, गरिबांच्या

मार्गातील हे अडथळे म्हणजे विशेष कांहीं नाहीं असें वाटतें. परंतु साकल्यानें हीं सर्व बंधनें गरिबांना लोकशाहींतून वगळून टाकतात आणि त्यांना लोकशाहींत प्रत्यक्ष भाग घेणें अशक्य करून टाकतात.

भांडवलशाही लोकशाहीचें हें मूलभूत तत्त्व मार्क्सला उत्तम रीतीनें समजले होतें. म्हणूनच कम्यूनच्या अनुभवाचें विवेचन करतांना तो म्हणतो कीं, ' दडपणाऱ्या वर्गातील कोणत्या व्यक्तींनीं पार्लमेंटमध्यें आपले प्रतिनिधी म्हणून जावें आणि आपल्यावर दडपशाही करावी हें दर कांहीं वर्षांनीं ठरविण्याचा अधिकारच फक्त, दडपल्या गेलेल्या कामगार वर्गाला दिलेला असतो ! '

निसर्गतःच संकुचित असलेल्या आणि तिच्यांतून गरिबांना निश्चितपणें वगळलेलें असल्यानें पूर्णपणें बेगडी आणि दिखाऊ असलेल्या, या भांडवलशाही लोकशाहीची, 'संपूर्ण' लोकशाहीकडे प्रगति, नेमस्त प्राध्यापक आणि संधिसाधू मध्यमवर्गीय सांगतात त्याप्रमाणें, आपोआप, प्रत्यक्षपणें आणि शांततेच्या मार्गानें होत नाहीं. तें अशक्य आहे. ही कम्युनिझमकडे प्रगति, कामगारांच्या हुकूमशाहीशिवाय इतर कोणत्याही मार्गानें होत नाहीं. कारण, पिळणाऱ्या भांडवलदारांचा विरोध इतर कोणीही आणि इतर कोणत्याही मार्गांनीं मोडून काढूं शकत नाहीं.

परंतु कामगारांच्या हुकूमशाहीचा–जुलूम करणाऱ्यांना दडपून टाकण्याकरितां, पिळल्या गेलेल्या जनतेच्या आघाडीवर असलेल्या वर्गाची शास्ता वर्ग म्हणून संघटना–परिणाम लोकशाही केवळ विस्तृत होणें एवढाच होणार नाहीं. लोकशाहीची प्रचंड प्रमाणांत वाढ होऊन ती पहिल्यांदाच, श्रीमंतांची नव्हे तर गरिबांची, बहुजनसमाजाची लोकशाही होईल; परंतु त्याच बरोबर जुलूम आणि पिळणूक करणाऱ्यांच्या स्वातंत्र्यावर, कामगारांची हुकूमशाही अनेक बंधनें घालील. मानवजातीची मोल-मजुरीरूपी गुलामगिरींतून मुक्तता करण्याकरितां भांडवलदारांना दडपून टाकलें पाहिजे, त्यांचा विरोध आपल्या सामर्थ्याच्याच जोरावर मोडून काढला पाहिजे. कारण ज्या ठिकाणीं अत्याचार आणि दडपशाही आहे त्या ठिकाणीं स्वातंत्र्य आणि लोकशाही अस्तित्वांत असणें शक्य नाहीं.

वाचकांच्या लक्षांत असेल कीं एंगल्सनें बेबेलला लिहिलेल्या पत्रांत ही गोष्ट अत्यंत उत्तम रीतीनें मांडली आहे. तो म्हणतो,

"...कारण कामगारवर्ग शासनसंस्थेचा उपयोग 'स्वातंत्र्या'करितां करीत नाहीं तर आपल्या शत्रूंना दडपून टाकण्याकरितां करतो आणि खऱ्या अर्थानें स्वातंत्र्य अस्तित्वांत आलें म्हणजे शासनसंस्थेचें खऱ्या अर्थानें अस्तित्वही नाहींसें होतें."

बहुसंख्य जनतेला लोकशाही, आणि जनतेला पिळणाऱ्या आणि जनतेवर जुलूम करणाऱ्या वर्गांना सामर्थ्याच्या जोरावर दडपून टाकणें, हाच फरक भांडवलशाहीचें कम्यूनिझममध्यें रूपांतर होत असतांना, लोकशाहींत होतो.

कम्यूनिस्ट समाजांत भांडवलदारांचा विरोध संपूर्णपणें मोडून काढलेला असतो, भांडवलदार अस्तित्वांत राहिलेले नसतात आणि समाजांतील निरानिराळे वर्गही नष्ट झालेले असतात (म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक उत्पादनाच्या साधनांशीं असलेल्या संबंधांत कांहींही फरक नसतो), त्यामुळें त्या ठिकाणीं 'शासनसंस्था...अस्तित्वांत रहात नाहीं' आणि 'स्वातंत्र्य अस्तित्वांत असल्याचें सांगता येतें.' खरी संपूर्ण लोकशाही, अपवाद–विरहित लोकशाही अस्तित्वांत असणें आणि अस्तित्वांत आणणें फक्त याच वेळेला शक्य होतें. लोकशाही विरून जाण्यास त्यानंतरच आरंभ होतो. कारण साधी गोष्ट अशी आहे कीं भांडवलशाहीच्या गुलामगिरींतून, भांडवलशाही पिळणुकींतील भयानकपणा, अमानुषता, अनैसर्गिकता आणि नीचपणा यांपासून, मुक्तता झाल्यानंतर मगच सामाजिक व्यवहाराचे प्राथमिक नियम–जे नियम आज शेकडों वर्षे माहीत आहेत आणि प्राथमिक पाठ्यपुस्तकांतून ज्यांची हजारों वेळेला उजळणी होत आहे–कोणत्याही तऱ्हेची सक्ति, दडपशाही किंवा ताबेदारी यांचेशिवाय आणि शासनसंस्था म्हणून संबोधल्या जाणाऱ्या, दडपशाही करण्याकरितां लागणाऱ्या, विशिष्ट यंत्राची मदत घेतल्याशिवाय आचरणांत आणण्याची लोकांना हळूं हळूं संवय होईल.

शासनसंस्था 'विरून जाणें' हा शब्दप्रयोग फार बरोबर आहे. कारण

त्यांत, या क्रियेंतील ' हळूं हळूं होणारा बदल ' आणि तिच्यांतील स्वयं-स्फूर्तता, ही दोन्हींही व्यक्त होतात. ही गोष्ट फक्त संवयीनेंच होऊं शकेल आणि होईल. कारण आपल्या रोजच्या व्यवहारांत लाखों वेळेला आपण असें पहातों कीं, जर पिळणूक नसेल, चीड निर्माण होण्यासारखें जर कांहीं नसेल, निषेध आणि बंडखोरी यांना उत्तेजन मिळेल आणि दडपशाही करण्याची आवश्यकता निर्माण होईल असें जर कांहीं नसेल, तर सामाजिक व्यवहारांतील आवश्यक नियम पाळण्याची लोकांना फार लवकर संवय होते.

म्हणून भांडवलशाही समाजांत जी लोकशाही असते तीं मर्यादित, तिरस्करणीय आणि खोटी असते; ती फक्त अल्पसंख्यांकांकरितां, श्रीमंता करितां असते. कामगार वर्गाची हुकूमशाही–भांडवलशाही आणि कम्यूनिझम यांचे मधील संक्रमणावस्था—जनतेकरितां, बहुसंख्य लोकांचे करितां लोकशाही निर्माण करील; आणि त्याच बरोबर अल्पसंख्यांकांना —पिळणाऱ्यांना—दडपून टाकील. खरी संपूर्ण लोकशाही फक्त कम्यू-निझमच निर्माण करूं शकेल, आणि ती जितकी जास्त संपूर्ण होत जाईल तितकी जास्त ती अनवश्यक होत जाईल आणि शेवटीं आपोआप ' विरून ' जाईल.

वेगळ्या शब्दांत सांगावयाचें तर : एका वर्गानें दुसऱ्या वर्गाला आणि ' विशेषतः अल्पसंख्याकांनीं बहुसंख्याकांना दडपून ठेवण्याचें विशिष्ट यंत्र ' या खऱ्या अर्थानें शासनसंस्था फक्त भांडवलशाहीतच अस्तित्वांत असते. सहाजीकच पिळल्या गेलेल्या बहुसंख्य जनतेवर, पिळणाऱ्या अल्पसंख्य जनतेनें दडपशाही करणें हें कार्य यशस्वी रीतीनें करावयाचें असेल तर ती दडपशाही अत्यंत क्रूरपणानें आणि रानटी-पणानें करावी लागते आणि त्याकरितां रक्ताच्या नद्या वहाव्या लागतात. अशा रीतीनें रक्तामांसाचा चिखल तुडवीतच मानव जातीला गुलामगिरीं-तून, भूदासपद्धतींतून आणि मोलमजुरीरूपी गुलामगिरींतून आपला मार्ग आक्रमावा लागला आहे.

भांडवलशाही आणि कम्यूनिझम यांच्या संक्रमणकालांतही दडपशाही

आवश्यकच असते; मात्र आतां ती पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेकडून पिळणाऱ्या अल्पसंख्य जनतेवर केली जाते. दडपशाही करण्याकरितां उपयोगी पडणाऱ्या खास यंत्राची—शासन संस्थेची—जरूरी अजूनसुद्धां लागतेच; परंतु आतां ती संक्रमणावस्थेतील शासनसंस्था असते आणि त्यामुळें ती खऱ्या अर्थानें शासनसंस्था नसते. 'कालच्या' मोलमजुरी करणाऱ्या गुलामांनीं, पिळणाऱ्या अल्पसंख्यांकावर दडपशाही करणें हें कार्य इतकें सोपें, साधें आणि नैसर्गिक असतें कीं, त्याकरितां जुन्या ऐतिहासिक कालांतील गुलामांचे, भूदासांचे आणि कामगारांचे उठाव चिरडून टाकण्याकरितां जितका रक्तपात करावा लागला त्यापेक्षां कितीतरी कमी रक्तपात करावा लागेल. इतक्या प्रचंड बहुसंख्य जनतेला प्राप्त झालेली ही लोकशाही, हें कार्य इतकें सहज करील कीं, त्याकरितां एकाद्या खास यंत्राची आवश्यकता रहणार नाहीं. पिळवणूक करणारांना बहुजनसमाजाला दडपून ठेवावयाचें असेल तर त्याकरितां अत्यंत गुंतागुंतीचें यंत्र तयार करणें त्यांना भागच पडतें. परंतु जनता मात्र, 'अत्यंत साध्या' यंत्राचा उपयोग करून किंवा फार काय, कोणत्याही 'यंत्राचा' किंवा एकाद्या 'खास संघटनेचा' उपयोग न करतां सुद्धां, फक्त 'आम जनतेची सशस्त्र संघटना' (जरा भविष्यकालांत दृष्टि टाकून बोलावयाचें तर कामगार आणि सैनिक यांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियट्सप्रमाणें) निर्माण करून पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्याकांना दडपून टाकील.

शेवटीं शासनसंस्था पूर्णपणें अनवश्यक करण्याचें कार्यही कम्यूनिझमच करतो. कारण त्या अवस्थेंत दडपशाही करणारे कोणीच—कोणी म्हणजे एकादा वर्ग किंवा ज्याच्या विरुद्ध पद्धतशीर लढा दिला पाहिजे असा जनतेचा एकही विभाग—शिल्लक रहात नाहीं. आम्ही कांहीं स्वप्नसृष्टींत वावरत नाहीं; तेव्हां एकाद्या व्यक्तीकडून 'अतिरेक होणें' शक्य आहे, आणि असे अतिरेक दडपून टाकावे लागतील हें आम्ही मुळींसुद्धां अमान्य करीत नाहीं. परंतु पहिली गोष्ट अशी कीं, त्याकरितां विशिष्ट साहित्याची, दडपशाही करणाऱ्या खास यंत्राची, जरूरी रहाणार नाहीं. आजच्या समाजांत सुद्धां कोणताही सुसंस्कृत जनसमूह, भांडणाऱ्या

दोन व्यक्तींना जितक्या सहजपणें आणि चटकन् बाजूला करतो, किंवा एकाद्या स्त्रीवर अत्याचार होत असतांना मध्यें पडतो, तितक्याच सहजपणें आणि चटकन्, सशस्त्र जनता हें कार्य करूं शकेल. दुसरी गोष्ट अशी कीं, आम्हांला हें माहीत आहे कीं, सामाजिक व्यवहाराच्या नियमांचें उल्लंघन करण्यांत जो अतिरेक होतो त्याची प्रमुख सामाजिक कारणें, बहुजनसमाजाची होणारी पिळणूक, त्यांची 'गरजू' परिस्थिति आणि त्यांचें दारिद्र्य, हीं एकदां नाहींशी केली म्हणजे हे अतिरेकही हळूं हळूं नाहींसे होतील. ही गोष्ट किती लवकर होईल आणि कोणत्या क्रमानें होईल हें आम्हीं सांगूं शकत नाहीं, परंतु हे अतिरेक 'विरून' जातील याबद्दल आमची खात्री आहे. आणि ते विरून गेल्यावर शासनसंस्थासुद्धां 'विरून' जाईल.

कल्पनासृष्टींत न वावरतां मार्क्सनें या भविष्यकालाचें, कम्यूनिस्ट समाजाच्या खालच्या आणि वरच्या अवस्थांतील ( टप्प्यांतील ) फरकांचे, आज करतां येईल त्यापेक्षां जास्त स्पष्टपणें वर्णन केलें आहे.

## ३ कम्यूनिस्ट समाजाची प्रथमावस्था

सोशालिझमखालीं कामगारांना त्यांच्या श्रमाचा 'संपूर्ण' 'कांहींही कमी केलें न जातां' मोबदला मिळेल अशी जी लासेलची कल्पना होती ती चूक असल्याचें सिद्ध करण्याकरितां मार्क्सनें 'गोथा कार्यक्रमावरील टीकेंत' या प्रश्नाची सविस्तर चर्चा केली आहे. त्यांत मार्क्सनें असें दाखवून दिलें आहे कीं, समाजाच्या सर्व सामायिक श्रमाचा कांहीं भाग, उत्पादनाच्या पुढील प्रगतीसाठीं आणि खराब झालेल्या यंत्रांच्या जागीं नवीं यंत्रें आणण्याकरितां, गंगाजळी म्हणून बाजूला काढून ठेवावा लागेल, त्याचप्रमाणें उपभोगाच्या वस्तूंचा कांहीं भागही, राज्यकारभाराचे खर्चाकरितां आणि शाळा, दवाखानें आणि वृद्ध नागरिक यांच्या उपयोगाकरितां वेगळा काढून ठेवावा लागेल.

लासेलच्या, 'कामगाराला त्याच्या श्रमाचा संपूर्ण मोबदला मिळेल' असल्या अस्पष्ट, दुर्बोध आणि मोघम शब्दरचनेऐवजी, मार्क्सनें शांतपणें विचार करून, सोशालिस्ट समाजाला आपला कारभार कसा चालवावा

लागेल याबद्दलची निश्चित कल्पना दिलेली आहे. ज्या समाजांत भांडवलशाही शिल्लक राहिली नाहीं त्या समाजांतील जीवन परिस्थिती कशी असेल याबद्दलचें वास्तववादी विवेचन मार्क्सनें केलें आहे, तो म्हणतो:

" या ठिकाणीं (कामगारांच्या पक्षाच्या कार्यक्रमाचें विवेचन करतांना) आपल्याला, स्वतःच्या पायावर प्रगति झालेल्या, स्वयंभू कम्युनिस्ट समाजाचा विचार करावयाचा नसून भांडवली समाजांतून निर्माण झालेल्या आणि म्हणून ज्या समाजाच्या पोटीं तो निर्माण झाला, आणि ज्या जुन्या समाजाच्या आर्थिक, बौद्धिक, नैतिक इत्यादि सर्व जन्मखुणा ज्याच्या अंगावर अजून आहेत, अशा कम्यूनिस्ट समाजाचा विचार करावयाचाआहे."

आणि ' भांडवलशाही समाजाच्या उदरांतून नुकत्याच जन्माला आलेल्या, आणि ज्याच्या अंगावर जुन्या समाजाच्या जन्मखुणा अजून कायम आहेत ' अशा या कम्युनिस्ट समाजालाच मार्क्स कम्युनिस्ट समाजाची ' पहिली ' किंवा खालची अवस्था म्हणतो.

या परिस्थितींत उत्पादनाचीं साधनें कांहीं व्यक्तींच्या खाजगी मालकीचीं राहिलेलीं नसतात, तर त्यावर सर्व समाजाची मालकी निर्माण झालेली असते. समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें सामाजिक आवश्यक श्रमाचा आपला वाटा उचलल्यानंतर त्या व्यक्तीला त्या श्रमाबद्दल, समाजाकडून एक दाखला दिला जाईल. या दाखल्याच्या जोरावर त्याला समाजाच्या उपभोगाच्या वस्तूंच्या साठ्यांपैकीं त्यानें केलेल्या श्रमाच्या प्रमाणांत वस्तू मिळतील; तेव्हां श्रमाचा कांहीं भाग सामाजिक निधि म्हणून बाजूला काढून ठेवल्यानंतर प्रत्येक कामगाराला त्यानें समाजाला जितकें दिलें तितकें परत मिळेल.

अशा रीतीनें बाह्यत: तरी ' समानतेचें ' राज्य प्रस्थापित होईल.

परंतु अशी समाजव्यवस्था ( याला सोशालिझम म्हणतात आणि यालाच मार्क्स कम्यूनिझमची पहिली अवस्था म्हणतो ) डोळ्यासमोर ठेऊन जेव्हां लासेल यालाच ' समान वाटणीं ' म्हणतो आणि 'समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा' ' श्रमाच्या उत्पादनाचा सारखा भाग घेण्याचा ' ' सारखा हक्क ' तो हाच असें सांगतो त्या वेळेला मात्र तो चूक करीत

असतो. आणि ही त्याची चूक मार्क्सनें दाखवून दिली आहे.

मार्क्स म्हणतो, या ठिकाणीं ‘ समान हक्क ’ निश्चित आहे, परंतु अजूनसुद्धां तो भांडवलशाहींतील समान हक्क आहे आणि इतर सर्व हक्काप्रमाणेंच या समानतेच्या हक्कापाठीमागेंही असमानता अभिप्रेत आहे. निरनिराळया लोकांना, जे लोक समान नाहींत, सारखे नाहींत, त्यांना सारखेच नियम लावणें याला ‘ हक्क ’ म्हणतात. आणि म्हणून खरें पहातां ‘ समान हक्क ’ हा समानतेचा भंग आहे, तो अन्याय आहे. या विधानावरून असा निष्कर्ष निघतो कीं, प्रत्येकानें सारखेच सामाजिक श्रम केल्यानंतर त्याला खरोखरच सामाजिक उत्पादनाचा सारखा भाग मिळतो.

परंतु सर्व माणसें कांहीं सारखीं नसतात, एकादा सशक्त असतो तर दुसरा अशक्त, एकादा विवाहित तर दुसरा अविवाहित, एकाला जास्त मुलें तर दुसऱ्याला कमी. यावरून मार्क्सनें खालील निष्कर्ष काढला आहे.

“...समान उत्पादन आणि म्हणून उपभोगाच्या वस्तूंच्या सामाजिक साठ्यांतील सारखा वाटा, यामुळें खरें पहातां एकाला दुसऱ्यापेक्षां जास्त मिळेल, एक दुसऱ्यापेक्षां श्रीमंत होईल. हे सर्व दोष टाळण्याकरितां हक्क समान असण्याचे ऐवजीं असमान असले पाहिजेत....”

म्हणून कम्यूनची पहिली अवस्था ‘ न्याय आणि समता ’ अस्तित्वांत आणूं शकत नाहीं. या अवस्थेंत संपत्तीच्या वाटणींतील विषमता-अन्याय्य विषमता—कायमच रहाते. परंतु एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीकडून पिळणूक केली जाणें मात्र अशक्य होतें; कारण कारखाने, यंत्रें, जमीन इत्यादि उत्पादनाच्या साधनांवर खाजगी मालकी प्रस्थापित करणें अशक्य झालेलें असतें. सर्वसाधारण न्याय आणि सर्वसाधारण समता याबद्दल लासेलच्या मध्यमवर्गीय कल्पनांत जो गोंधळ होता तो काढून टाकतांना मार्क्सनें कम्यूनिस्ट समाजाच्या प्रगतीच्या मार्गाचें दिग्दर्शन केलें आहे. उत्पादनाचीं साधनें खाजगी मालकीचीं असण्यांत जो अन्याय आहे तोच प्रथमतः नाहींसा करणें, या समाजाला भाग

पडतें. परंतु उपभोगाच्या वस्तूंचा वाटा 'केलेल्या श्रमाच्या' ( गरजेच्या नव्हे ) प्रमाणांत मिळण्यांत जो अन्याय आहे तो एकदम नाहींसा करणें शक्य होत नाहीं.

भांडवलशाहीचे भाट बनलेले अर्थशास्त्रज्ञ, भांडवलशाहीचे प्राध्यापक आणि 'आमचे' टुगॉन–बॉर्नोव्हस्की यांचेकडून नेहमीं अशी टीका केली जाते कीं, सोशालिस्ट, माणसामाणसांतील फरक लक्षांत न घेतां 'असमानता' नाहींशी करण्याच्या मृगजळामागें धावत असतात. ही टीका म्हणजे भांडवली तत्त्वज्ञानी किती अज्ञानी आहेत याचा पुरावा आहे.

माणसामाणसांत निसर्गतःच असणारी विषमता मार्क्सनें बारकाईनें विचारांत घेतली आहे, एवढेंच नव्हें तर त्यानें हेंही ध्यानांत घेतलें आहे कीं, केवळ उत्पादनाचीं सर्व साधनें समाजाच्या मालकीचीं केलीं ( याला सोशालीझम म्हणतात ) म्हणजे 'वाटपांतील' दोष, भांडवली हक्कांतील 'विषमता' नाहींशी होत नाहीं. उत्पादित वस्तूंचें 'वाटप' जोंपर्यंत 'केलेल्या श्रमाच्या प्रमाणांत' होतें तोंपर्यंत ही विषमता कायमच रहाते.

मार्क्स पुढें म्हणतो, "भांडवली समाजाच्या उदरांतून असह्य आणि प्रदीर्घ यातना नंतर जन्माला आलेल्या कम्यूनिस्ट समाजाच्या पहिल्या अवस्थेंत हे दोष अटळ असतात. समाजाची आर्थिक चौकट आणि त्यावर अवलंबून असलेली सांस्कृतिक प्रगति यांच्या मर्यादा ओलांडून, 'हक्क' पलीकडे कधींच जाऊं शकत नाहींत."

म्हणून कम्यूनिस्ट समाजाच्या पहिल्या अवस्थेंत (यालाच सोशालिझम म्हणतात ) 'भांडवलशाहींतील हक्क' संपूर्णपणें नाहींसे केले जात नाहींत, तर कांहीं अंशीं, ज्या प्रमाणांत आर्थिक बदल झालेला असेल त्या प्रमाणांत, म्हणजेच फक्त उत्पादनाच्या साधनांच्या बाबतींत, नाहींसे केले जातात. 'भांडवलशाही हक्कांत' उत्पादनाच्या साधनांना खाजगी मालमत्ता म्हणून मान्यता दिलेली असते. सोशालिझम त्यांचे सामायिक

मालकींत रूपांतर करतो. एवढ्या, आणि फक्त एवढ्याच अर्थानें, भांडवलशाही हक्क रद्द केले जातात.

उरलेल्या विभागांतून त्यांचें अस्तित्व कायमच असतें; उत्पादित वस्तूंचें वाटप आणि समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींत होणारी श्रमांची वाटणी यांचे नियंत्रक ( निर्णायक ) या दृष्टीनें ते हक्क कायमच असतात. 'जो श्रम करणार नाहीं त्याला खावयास मिळणार नाहीं' हें पहिलें सोशालिस्ट तत्त्व व्यवहारांत आलेलेंच असतें. ' सारख्या श्रमाला उत्पादित वस्तूंचा सारखा वाटा ' हें दुसरें सोशालिस्ट तत्त्वही व्यवहारांत आलेलें असतें. परंतु हा कांहीं कम्यूनिझम नाहीं आणि त्यामुळें, विषम व्यक्तींना, विषम श्रमाचे ( खऱ्या अर्थानें विषम ) मोबदल्यांत उत्पादित वस्तूंचा समान भाग देण्याचा भांडवली हक्क नष्ट होत नाहीं.

मार्क्स म्हणतो कीं, हा ' दोष ' आहे. परंतु कम्यूनिझमच्या पहिल्या अवस्थेंत तो टाळतां येणार नाहीं. आपल्याला जर केवळ कल्पनासृष्टींत विहार करावयाचा नसेल, तर भांडवलशाही उखडून टाकल्याबरोबर, जनता ' आपल्या हक्काची विशिष्ट कल्पना ' सोडून देऊन सबंध समाजाकरितां काम करूं लागेल अशी समजूत करून घेऊन चालणार नाहीं. आणि खरें पहातां असा बदल घडून येण्यास आवश्यक असलेली आर्थिक परिस्थिति, भांडवलशाही नाहींशी झाल्याबरोबर ताबडतोब निर्माणही होत नाहीं.

अजून तरी 'हक्का' संबंधींची 'भांडवली हक्का' व्यतिरिक्त दुसरी कल्पना निर्माणच झालेली नसते. एवढ्याच कारणाकरितां अजूनही शासनसंस्थेची जरुरी असते. ही शासनसंस्था उत्पादनाच्या साधनांच्या समायिक मालकीचें संरक्षण करण्याबरोबरच श्रमांची समानता आणि उत्पादित वस्तूंच्या वाटपांतील समानता यांचेंही संरक्षण करते.

एकही भांडवलदार, आणि कोणताच वर्ग अस्तित्वांत न राहिल्यानें, दडपून टाकला पाहिजे असा वर्गही अस्तित्वांत रहात नाहीं आणि तेवढ्या अर्थानें शासनसंस्थाही 'विरून' जाते.

परंतु अजूनही शासनसंस्था संपूर्णपणें विरून जात नाहीं. कारण विष-

मतेला प्रत्यक्ष व्यवहारांत, मान्यता देणाऱ्या 'भांडवली हक्कांचें' संरक्षण करावेंच लागतें. शासनसंस्था 'संपूर्णपणें' विरून जाण्यास 'संपूर्ण' कम्यूनिझम अस्तित्वांत येणेंच आवश्यक असतें.

## ४ कम्यूनिस्ट समाजाची वरची अवस्था

मार्क्स पुढें म्हणतो, "कम्यूनिस्ट समाजाच्या वरच्या अवस्थेंत ज्या वेळेला श्रमविभागामुळें प्रत्येक व्यक्तीला करावी लागणारी आणि त्याला गुलाम बनविणारी ताबेदारी आणि त्याचबरोबर बौद्धिक आणि शारीरिक श्रम यांचेमधील परस्पर विरोध नाहींसा होईल, श्रमांचें जीवनधारणेचें साधन हें स्थान नष्ट होऊन ते जीवनाची प्राथमिक आवश्यकता बनतील, मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीबरोबरच त्याच्या उत्पादनशक्तींतही वाढ होईल आणि सामाजिक संपत्तीचे प्रवाह पूर्णत्वानें भरून वाहूं लागतील, त्याच वेळेला 'भांडवली हक्कांचें' संकुचित क्षितिज ओलांडून समाज पुढें जाऊं शकेल. आणि 'प्रत्येकापासून त्याच्या शक्तीप्रमाणें आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणें' ही घोषणा त्याला व्यवहारांत उतरवितां येईल.

'शासनसंस्था' आणि 'स्वातंत्र्य' हे दोन शब्द एकत्र आणण्याच्या वेडेपणावर एंगल्सनें जी विदारक टीका केली आहे ती बरोबर होती हें आतां आपल्या ध्यानांत येईल. ज्या ठिकाणीं 'शासनसंस्था' अस्तित्वांत आहे त्या ठिकाणीं 'स्वातंत्र्य' अस्तित्वांत असूं शकत नाहीं. आणि ज्या ठिकाणीं 'स्वातंत्र्य' आहे त्या ठिकाणीं 'शासनसंस्था' अस्तित्वांत राहूं शकत नाहीं.

शासनसंस्था संपूर्णपणें विरून जाण्यास जो आर्थिक पाया लागतो तो निर्माण होण्यास कम्यूनिस्ट समाज प्रगतीच्या इतक्या वरच्या अवस्थेला पोंचावा लागतो कीं, त्या ठिकाणीं बौद्धिक आणि शारीरिक श्रम यांचेमधील विरोध, आजच्या सामाजिक विषमतेचें एक महत्त्वाचें कारण, नाहींसें झालेलें असतें. केवळ उत्पादनाच्या साधनांचे सामाजिक संपत्तींत रूपांतर करून आणि भांडवलदारांची संपत्ति हरण करून हें कार्य होत नाहीं.

मात्र भांडवदारांची संपत्ति हरण केल्यानें उत्पादन शक्तींची प्रचंड

प्रमाणांत वाढ होण्यास मदत होईल. आजची भांडवलशाही या प्रगतीला किती मोठ्या प्रमाणांत अडथळा करीत आहे, हें ध्यानांत घेऊन आणि आधुनिक तंत्रपद्धतीच्या आजच्या अवस्थेंतसुद्धां, केवढी मोठी प्रगति करतां येते, हें लक्षांत घेऊन, आम्हीं निश्चितपणानें असें म्हणूं शकतों कीं, भांडवलदारांची संपत्ति हरण केल्यानंतर मानवी समाजाच्या उत्पादन शक्तीची फार मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. परंतु या वाढीचा वेग काय असेल ? श्रमविभागणीच्या मर्यादेच्या पलीकडे पोंचण्याइतकी, शारीरिक आणि बौद्धिक श्रमांतील विरोध नष्ट करण्याइतकी किंवा श्रमांना 'जीवनाची प्राथमिक गरज' बनाविण्याइतकी प्रगति होण्यास किती काळ लागेल हें आम्हांस सांगतां येत नाहीं आणि सांगतां येणें शक्यही नाहीं.

वरील कारणांकरितां, 'शासनसंस्था विरून जाईल' एवढेंच निश्चितपणें म्हणणें आम्हांस शक्य आहे. या गोष्टीला लागणारा दीर्घकाल आणि कम्यूनिझमच्या वरच्या अवस्थेच्या प्रगतीच्या वेगावर ती अवलंबून असणें या महत्वाच्या गोष्टींचा केवळ उल्लेख करून, या विरून जाण्याला वेळ किती लागेल आणि विरून जाण्याचें निश्चित स्वरूप काय असेल हे प्रश्न आम्हीं सोडून दिले आहेत. कारण या प्रश्नांना उत्तर देण्याइतकी सामुग्री आज आमच्याजवळ नाहीं.

'प्रत्येकापासून त्याच्या शक्तीप्रमाणें आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणें,' हें तत्त्व ज्या वेळेला प्रत्यक्ष व्यवहारांत येईल, म्हणजेच सामाजिक व्यवहाराचे मूलभूत नियम पाळण्याची लोकांना संवय होईल आणि श्रमाची उत्पादन-शक्ति इतकी वाढेल कीं, प्रत्येकजण 'आपल्या ताकदीप्रमाणें काम' स्वखुषीनें करील, त्याच वेळेला शासनसंस्था संपूर्णपणें विरून जाईल. त्या नंतरच 'आपण दुसऱ्यापेक्षां अर्धा तास जास्त काम तर केलें नाहीं !' किंवा 'आपल्याला इतरांपेक्षां कमी पगार तर मिळाला नाहीं ना !' असा चिक्कू सावकाराला शोभेल असा विचार प्रत्येकाला करावयास लावणाऱ्या 'भांडवली हक्काच्या' संकुचित मर्यादा ओलांडून आपल्याला पलीकडे जातां येईल. त्यानंतर उत्पादनाचा किती भाग प्रत्ये-

कानें घ्यावा यावर नियंत्रण ठेवण्याची जरुरी रहाणार नाहीं आणि प्रत्येक-जण आपल्या ' गरजेप्रमाणें ' वाटेल तेवढें घेऊं शकेल.

असा समाज ही स्वप्नसृष्टि आहे असें म्हणणें, आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या श्रमावर थोडें फार बंधन ठेवल्याखेरीज समाजापासून कितीही मोटारी आणि बाजाच्या पेट्या घेण्याचा ' हक्क ' देण्याचें ' वचन ' देणाऱ्या सोशालिस्टांचा उपहास करणें एवढें मात्र भांडवलदारांना सहज करतां येतें. अजून सुद्धां अनेक भांडवलशाही ' विद्वान ' अशा रीतीनें फक्त उपहासच करीत बसले आहेत. परंतु त्यामुळें त्यांच्या अज्ञानाचें आणि त्यांनीं पोटाकरितां केलेल्या भांडवलशाहीच्या तरफदारीचें प्रदर्शन मात्र होत आहे.

अज्ञान ! कारण कम्यूनिझमच्या प्रगतीची वरची अवस्था येणार आहे असें ' वचन ' देण्याचें कोणत्याही सोशालिस्टाच्या कधींही डोक्यांत आलें नाहीं. मोठमोठ्या सोशालिस्टांनीं, ही अवस्था येणार आहे असें सांगतांना, त्या अवस्थेंत श्रमाची उत्पादनशक्ति आजच्या इतकीच राहील आणि पोमॅलोव्हस्कीच्या गोष्टींतील शिष्याप्रमाणें, केवळ लहरीखातर सामाजिक संपत्तीचा नाश करणारा आणि अशक्य गोष्टींची मागणी करणारा आजचा सर्वसाधारण माणूस आहे तसाच कायम राहील, अशी कल्पना त्यांनीं कधींच करून घेतली नव्हती.

कम्यूनिझमची वरची अवस्था प्राप्त होईपर्यंत श्रमाचें आणि उपभोगाच्या वस्तूंचें प्रमाण यावर समाजाचें आणि शासनसंस्थेचें कडक नियंत्रण असावें अशीच सोशालिस्टांची मागणी आहे. परंतु या नियंत्रणाला आरंभ, भांडवलदारांची संपत्ति हिसकाऊन घेऊन, भांडवलदारांना कामगारांच्या हुकमतीखालीं आणून, झाला पाहिजे. आणि हें नियंत्रण सरकारी नोकरांचें असून चालणार नाहीं, तर ' सशस्त्र कामगारांच्या शासनसंस्थेचें ' असलें पाहिजे.

भांडवलशाहीचा पाठपुरावा करणारे भाडोत्री विद्वान ( आणि टर्सेटी चरनॉव्ह इत्यादि त्यांचे अनुयायी ) असा पाठपुरावा करतांना नेहमीं आजच्या धोरणांतील जे महत्त्वाचे प्रश्न—भांडवलदाराची संपत्ति हिसका-

ऊन घेणें, सर्व नागरिकांना एकाच मोठ्या कार्यकारी मंडळाचें ( शासन-संस्थेचे ) कामगार आणि नोकर बनविणें आणि या कार्यकारी मंडळाचें कामकाज खऱ्या लोकशाही शासनसंस्थेप्रमाणें, कामगार आणि सैनिक यांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियट सरकारप्रमाणें चालविणें—त्यांची जागा दूरच्या भविष्य कालांत काय होणार आहे या संबंधींच्या मतभेदांना आणि चर्चेला देतात.

हे भांडवली विद्वान् प्राध्यापक, त्यांचें अप्रबुद्ध अनुयायी आणि टर्सेटी आणि चरनॉव्ह यांच्यासारख्या व्यक्ती, ज्या वेळेला या अवास्तव 'स्वप्नसृष्टी'बद्दल, बोल्शेविक पक्ष जनतेला देत असलेल्या भरमसाट अभिवचनाबद्दल, किंवा समाजवाद सुरू करण्याच्या अशक्यतेबद्दल बोलतात त्या वेळेला त्यांच्या डोळ्यांसमोर कम्यूनिझमची वरची पायरी, वरची अवस्था असते. परंतु असली अवस्था 'सुरू' करण्याचें 'वचन' कोणींच कधीं दिलेलें नसतें, फार काय तसें कोणाच्या मनांतही नसतें, कारण, सर्वसाधारणपणें बोलावयाचें तर, ही अवस्था 'सुरू' करतांच येत नाहीं.

यानंतर आपण सहाजीकच सोशालिझम आणि कम्यूनिझम यांच्यांत शास्त्रीय दृष्टीनें फरक काय, या प्रश्नाकडे येतो. 'सोशल डेमोक्रॅटिक' या नांवाच्या अशास्त्रीयपणावर एंगल्सनें केलेली जी टीका वर दिली आहे, त्यांत या प्रश्नाचा उल्लेख आहे. कम्यूनिझमची पहिली किंवा खालची अवस्था आणि त्याची वरची अवस्था यांच्यांत, भविष्य कालांत, राजकीय दृष्ट्या पुष्कळच फरक असणार आहे. परंतु या फरकाची आज, भांडवलशाही समाज अस्तित्वांत असतांना, दखल घेणें हा शुद्ध वेडेपणा आहे आणि असला वेडेपणा फक्त अराज्यवादीच करूं शकतील. ( अराज्यवाद्यांचे प्रमुख मार्गदर्शक क्रोपोटकिन, ग्रेव्हसिस, कॉर्नीलोसेन यांचें 'प्रेकेनॉव्ह प्रमाणें' अतिरेकी राष्ट्रवाद्यांत किंवा गे म्हणतो त्याप्रमाणें 'अनार्को ट्रेंचिस्टांच्यांत' जें परिवर्तन झालें, त्यापासून कांहींच धडा न शिकलेले लोक अराज्यवाद्यांच्यांत अजून शिल्लक असतील तर ! अराज्यवाद्यांच्यांत मान आणि बुद्धि कायम ठेवलेले जे थोडे लोक आहेत त्यांत गे हा एक आहे ).

सोशालिझम आणि कम्यूनिझम यांचेमधील शास्त्रीय फरक स्पष्ट आहे. ज्याला साधारणपणें सोशालिझम म्हणतात, त्यालाच मार्क्स कम्यूनिझमची 'खालची' किंवा पहिली अवस्था म्हणतो. या अवस्थेंत सुद्धां उत्पादनाची साधनें समायिक ( Common ) मालकीचीं असतात म्हणून यालाही कम्यूनिझम म्हणावयास हरकत नाहीं. परंतु ही अवस्था म्हणजे संपूर्ण कम्यूनिझम नव्हे ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. मार्क्सच्या या सर्व विवेचनाचें वैशिष्टय असें आहे कीं, या ठिकाणीं सुद्धां त्यानें, भौतिक विरोध–विकास–वादी सिद्धान्तांचा, विकासाच्या सिद्धान्तांचा उपयोग केला आहे; आणि कम्यूनिझमचा विचार भांडवलशाहींतून निर्माण होणारी समाजस्थिति, याच दृष्टीनें केला आहे. निरनिराळ्या शब्दांच्या पांडित्यपूर्ण व्याख्या आणि त्यांचेवरील वादविवाद ( उदाहरणार्थ सोशालिझम म्हणजे काय ? कम्यूनिझम म्हणजे काय ! ) यांच्या भरीस न पडतां मार्क्सनें कम्यूनिझमच्या प्रगतींतील निरनिराळ्या आर्थिक अवस्थांचें पृथक्करण केलें आहे.

कम्यूनिझमच्या पहिल्या अवस्थेंत किंवा पहिल्या भागांत, कम्यूनिझम आर्थिक दृष्टया परिपक्क असत नाहीं आणि भांडवलशाही पद्धति आणि तिचे अवशेष यांपासून संपूर्णपणें मुक्तही होऊं शकत नाहीं. म्हणूनच कम्यूनिझमच्या पहिल्या अवस्थेंत ' भांडवली हक्काचें ' मर्यादित क्षितीज कायम रहाणें ही आश्चर्यकारक घटना घडून येते. उपभोगाच्या वस्तूंच्या वाटपावरील ' भांडवलशाही हक्क ' अस्तित्वांत रहातो याचा अर्थ भांडवलशाही शासनसंस्था अस्तित्वांत रहाते. कारण हक्क राबवून घेण्यास समर्थ असलेलें एकादें सामाजिक यंत्र जर अस्तित्वांत नसेल तर त्या हक्काला कांहीं अर्थच रहात नसतो.

तेव्हां कम्यूनिझमखालीं भांडवलदार अस्तित्वांत राहिले नसले तरी ' भांडवली हक्क ' कायम रहातात एवढेंच नव्हे तर भांडवली शासनसंस्थाही कायम रहाते.

हा सर्व विरोधाभास आहे, किंवा विरोधविकासवादाचें एक कोडें आहे असें वाटेल; परंतु ज्यांनीं त्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करण्याचा

प्रयत्नसुद्धां कधीं केला नाहीं ते लोक मार्क्सवादावर अशी टीका नेहमींच करीत असतात.

परंतु समाजांत काय किंवा निसर्गात काय प्रत्येक नव्या निर्मितींत जुन्याचे अवशेष आपल्याला पदोपदीं आढळून येतात. मार्क्सनें सुद्धां, केवळ लहरीखातर, कम्यूनिझममध्यें ' भांडवलशाही हक्क ' घुसडलेले नाहींत तर भांडवलशाहीच्या पोटीं जन्माला येणाऱ्या नव्या समाजांत, आर्थिक आणि राजकीय दृष्टीनें काय गोष्टी असणें अटळ आहे याचें दिग्दर्शन केलें आहे.

भांडवलशाहींतून आपली मुक्तता करून घेण्याच्या दृष्टीनें कामगार वर्गाला लोकशाहीचें पुष्कळच महत्त्व असतें. परंतु लोकशाही ही कांहीं अशी मर्यादा नाहीं कीं, जी कधींही ओलांडावयाची नाहीं ! ती सरंजामशाहींतून भांडवलशाहीकडे आणि भांडवलशाहींतून कम्यूनिझमकडे जाण्याच्या मार्गावरील एक टप्पा आहे एवढेंच.

लोकशाही म्हणजे समता. समतेचा खरा अर्थ वर्ग नाहींसे करणें हाच आहे. असा अर्थ घेतला म्हणजेच आपणांस कामगारांनीं समतेकरितां चालविलेल्या लढ्याचें वैशिष्टय आणि 'समतेचे' एक घोषणा या दृष्टीनें महत्त्व आपल्या ध्यानांत येईल. परंतु लोकशाही म्हणजे औपचारिक समता होय. आणि समाजांतील सर्व व्यक्तींना, उत्पादनाच्या साधनांवरील मालकींत समता प्राप्त झाली, किंवा श्रमाच्या आणि मिळणाऱ्या मजुरीच्या बाबतींत समता निर्माण झाली, म्हणजे मग, सहाजिकच जनतेसमोर, औपचारिक समतेच्या मर्यादा ओलांडून खऱ्या समतेकडे जाण्याचा—'प्रत्येकाला त्याच्या ताकदीप्रमाणें आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणें' हा नियम लागू करण्याचा—प्रश्न उभा राहील. मानवी समाज या वरच्या अवस्थेकडे कोणत्या टप्प्यांनीं जाईल आणि त्याकरितां तो प्रत्यक्ष व्यवहारांत काय काय गोष्टी करील हें आपणांस माहीत नाहीं, आणि माहीत असणारही नाहीं. सोशालिझम म्हणजे निर्जीव, दगडासारखे घट्ट आणि कधींही न बदलणारे असें कांहींतरी आहे अशी जी भांडवलदारांची कल्पना असते ती किती चूक असते;

आणि खरें पहातां सोशालिझम् अस्तित्वांत आल्यानंतरच सामाजिक आणि वैयक्तिक प्रत्येक बाबतींत झपाट्यानें प्रगति करण्याकरितां जनतेंत चळवळ कशी सुरू होते, आणि या चळवळींत प्रथमतः बहुसंख्य जनता सामील होऊन शेवटीं ती चळवळ सर्व समाजालाच कशी व्यापून टाकते हें लक्षांत घेणें महत्वाचें आहे.

लोकशाही हें शासनसंस्थेचेंच एक स्वरूप, तिचाच एक प्रकार आहे. म्हणून इतर शासनसंस्थांप्रमाणेंच लोकशाहीसुद्धां, एकीकडे, व्यक्तींच्या विरुद्ध पद्धतशीरपणानें उपयोगांत आणल्या जाणाऱ्या संघटित शक्तीचें प्रातिनिधीक स्वरूप असते आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला, 'सर्व नागरिक समान आहेत' आणि 'शासनसंस्थेचें स्वरूप आणि तिची अम्मलबजावणीची पद्धत कशी असावी' हें ठरविण्याचा सर्वांना सारखा हक्क आहे या तत्वांना औपचारिक रीतीनें दिलेली ती मान्यता असते. याचा निष्कर्ष असा कीं, आपल्या प्रगतीच्या एका विशिष्ट अवस्थेनंतर लोकशाही कामगारांना क्रान्तिकारक वर्ग म्हणून भांडवलदारांचे विरुद्ध संघटित करते आणि भांडवलदार–रिपाब्लिकन भांडवलदार सुद्धां–त्यांचें शासनयंत्र, खडें सैन्य, पोलीस, नौकरशाही या सर्वांना चिरडून टाकण्यांस, त्यांचे तुकडे तुकडे करण्यांस आणि शेवटीं त्यांना पृथ्वीच्या पाठीवरून नाहींसें करून त्यांच्या जागीं, जिचें रूपांतर आम जनतेच्या सशस्त्र संघटनेंत होत आहे अशा सशस्त्र कामगारांच्या संघटनेच्या स्वरूपांतील एक नवें आणि जास्त लोकशाही शासनयंत्र-परंतु शेवटीं शासनयंत्रच-प्रस्थापित करण्यांस कामगारांना मदत करते.

'परिमाणात्मक वाढीमुळें शेवटीं गुणात्मक फरक झाल्याचें' हें उदाहरण आहे. या मर्यादेला पोंचलेल्या लोकशाहींत, भांडवली समाजव्यवस्थेच्या मर्यादा ओलांडणें आणि समाजवादी समाजाची उभारणी करण्यास आरंभ होणें या गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. शासनसंस्था चालविण्यांत जर खरोखरच सर्वांनीं भाग घेतला तर भांडवलशाही आपली सत्ता ठेऊं शकत नाहीं आणि भांडवलशाहीच्या प्रगतीबरोबरच अशी परिस्थितीही निर्माण होत असते कीं, ज्यामुळें खरोखरच सर्वांना शासन-

संस्था चालविण्यांत भाग घेणें शक्य होईल. या परिस्थितींतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणें आहेत. सार्वत्रिक शिक्षण, पुढारलेल्या पुष्कळ भांडवली राष्ट्रांतून हें आज अस्तित्वांत आहे, त्याच प्रमाणें गुंतागुंतीचें आणि सामाजिक स्वरूप असलेलें पोस्टखातें, तसेंच रेल्वे, मोठमोठे कारखाने, मोठ्या प्रमाणावरील व्यापार, बँका इत्यादि प्रचंड संघटनांतून लक्षावधि कामगारांना 'कौशल्याचें आणि शिस्तीचें' शिक्षण मिळून ते तयार होणें; वगैरे.

आर्थिक परिस्थिति जर अनुकूल असेल तर भांडवलदार आणि नोकरशाही यांना झुगारून दिल्याबरोबर, एका रात्रींत उत्पादन आणि वांटप यांचें नियंत्रण करणें आणि श्रम आणि उत्पादित वस्तू यांचा हिशेब ठेवण्याचें बाबतींत त्यांची जागा घेणें सशस्त्र कामगारांना, सशस्त्र जनतेला, शक्य आहे. ( या ठिकाणीं नियंत्रण आणि हिशेब ठेवणें या कामांची आणि शास्त्रीय शिक्षण घेतलेले इंजीनियर आणि शेतीतज्ञ यांच्या कामाची गल्लत करून चालणार नाहीं. हे लोक आज भांडवलदारांचे करितां काम करीत आहेत, उद्यां ते सशस्त्र कामगारांचे हुकूम मानतील आणि त्यांचेकरितां जास्त चांगलें काम करतील ).

कम्यूनिस्ट समाजाची 'प्राथमिक' अवस्था प्रस्थापित करण्यास आणि ती व्यवस्थित चालविण्यास हिशेब ठेवणें आणि नियंत्रण करणें या दोन महत्वाच्या गोष्टींची जरुरी असते. सर्व नागरिकांना शासनसंस्थेचे पगारी नोकर बनविण्यांत येतें आणि ही शासनसंस्था सशस्त्र कामगारांची शासनसंस्था असते. सर्व नागरिक एका राष्ट्रीय शासनसंस्थेच्या 'नियंत्रण मंडळाचे' कामगार आणि नोकर बनतात. आतां जरुरी एवढ्याचीच असतें कीं, सर्वांनीं समान काम करावें—ज्याच्या त्याच्या वांट्याचें काम ज्यानें त्यानें करून टाकावें—आणि त्यांना सारखा पगार मिळावा. याकरितां जरूर लागणाऱ्या, हिशेब ठेवणें आणि नियंत्रण करणें या गोष्टी भांडवलशाहीनें इतक्या सोप्या करून ठेवल्या आहेत कीं, त्याकरितां, तपासणी करणें, नोंद ठेवणें, त्रैराशिकाचे नियम माहीत असणें आणि पावत्या देणें, एवढया मामुली गोष्टी येत असल्या कीं

काम होतें, या गोष्टी कोणीही सुशिक्षित व्यक्ति करू शकते.*

बहुसंख्य लोक, ज्या वेळेला, अशा रीतीनें सर्व ठिकाणीं स्वतंत्रपणें हिशेब ठेऊं लागतील आणि भांडवलदारांचेवर ( आतां हे नौकर बनलेले असतात ) आणि भांडवलशाहींतील संवयी कायम असलेल्या बुद्धिजीवी वर्गांवर, नियंत्रण ठेऊं लागतील त्याच वेळेला हें नियंत्रण खऱ्या अर्थानें सर्वत्र, सर्वसाधारण आणि राष्ट्रीय बनेल. त्यानंतर कोणाचीही यांतून सुटका होणार नाहीं; कारण त्यांपासून दूर जाण्यास कोठें जागाच रहाणार नाहीं.

त्या वेळेला सर्व समाज म्हणजे एकच कचेरी आणि एकच कारखाना बनलेला असेल आणि त्यांत सर्वांना सारखें काम आणि सारखा पगार मिळत असेल.

भांडवलदारांचा पराभव करून पिळणाऱ्या वर्गांना उखडून टाकल्यानंतर कामगार वर्ग जी ‘ कारखान्यांतील शिस्त ’ सर्व समाजाला लागूं करील ती ‘ शिस्त ’ हा कांहीं आपला आदर्श नाहीं; तें आपलें ध्येय नाहीं. भांडवली पिळवणुकीचा हिडिसपणा आणि ओंगळपणा यांपासून समाजाला मुक्त करून त्याला पुढील प्रगतीच्या मार्गावर नेण्याकरितां अवश्यक अशी ती गोष्ट आहे.

ज्याक्षणीं समाजांतील सर्व व्यक्ति, निदान बहुसंख्य व्यक्ति तरी, स्वतःच शासनसंस्था चालविण्यास शिकतील, हा सर्व कारभार आपल्याच हातीं घेतील, आणि अल्पसंख्य भांडवलदारांचेवर, भांडवलशाहींतील आपल्या संवयी कायम ठेवण्याची इच्छा बाळगणाऱ्या बुद्धिजीवी वर्गांवर आणि ज्यांना भांडवलशाहीनें पूर्णपणें बिघडवून टाकलें आहे अशा कामगार वर्गांवर नियंत्रण ठेवूं लागतील, त्याचक्षणीं, शासन-

* कामगारांनीं स्वतःचा हिशेब ठेवणें आणि नियंत्रण करणें एवढेंच जेव्हां शासन संस्थेचें काम राहील तेव्हां ती ‘राजकीय शासनसंस्था’ रहाणार नाहीं आणि ‘जनतोपयोगी कामें सरकारी कामें न रहातां त्यांचें जनतेच्या देखरेखीखालीं चाललेल्या कामांत रूपांतर होईल ’–( प्रकरण ४ थें भाग २ रा. ) ]

संस्थेची जरूरी पूर्णपणें नाहींशी होण्यास आरंभ होईल. लोकशाही जितकी जास्त ‘ संपूर्ण ’ तितका शासनसंस्था अनवश्यक बनण्याचा क्षण जास्त जवळ येत असतो. ‘ खऱ्या ’ अर्थानें ‘ शासनसंस्था नसलेली ’ सशस्त्र कामगारांची शासनसंस्था जितकी जास्त जास्त लोकशाही होईल तितक्या जास्त लवकर शासनसंस्थेचें प्रत्येक स्वरूप विरून जाऊं लागेल.

ज्या वेळेला सर्वच लोक स्वतंत्रपणें सामाजिक उत्पादनाची व्यवस्था पहावयास शिकतील आणि प्रत्यक्ष पहातील, स्वतंत्रपणें हिशेब ठेवतील आणि आळशी, सुखवस्तु, फसवे आणि त्यांच्याच सारखे भांडवली संस्कृतीचे इतर संरक्षक यांचेवर नियंत्रण ठेवूं लागतील, त्या वेळीं या ‘ राष्ट्रीय हिशेब ठेवणाऱ्या ’ आणि ‘ राष्ट्रीय नियंत्रणाच्या,’ चौकटींतून निसटून जाणें फार कठीण होईल; ती गोष्ट फार क्वचित् घडेल आणि त्याबद्दल शिक्षाही इतकी तडकाफडकी आणि कडक दिली जाईल (कारण सशस्त्र कामगार हा व्यवहारी माणूस असतो, भावनाप्रधान बुद्धिजीवी नव्हे, आणि तो कोणालाही आपल्याबरोबर खेळ खेळूं देत नाहीं ) कीं, लवकरच मानवी व्यवहाराचे साधे आणि मूलभूत नियम पाळण्याची मनुष्याला संवय होईल.

आणि त्यानंतर कम्यूनिझम पहिल्या अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत जाण्याच्या आणि शासनसंस्था पूर्णपणें विरून जाण्याच्या मार्गाचीं द्वारें खुलीं होतील.

[ टीप : जोसेफ स्टालिननें १९३९ च्या मार्च महिन्यांत सोव्हियट युनियनच्या अठराव्या कॉंग्रेस समोर जो अहवाल वाचला त्यांत मार्क्स आणि एंगल्स यांच्या शासनसंस्थेबद्दलच्या सिद्धान्तासंबंधीं तो म्हणतो, “ कांहीं वेळेला असें विचारलें जातें कीं...‘ आपल्या देशांत पिळणारे वर्ग नाहींसे केले गेले आहेत, सोशालिझम निर्माण करण्याचें बहुतेक कार्य झालें आहे, आपली कम्यूनिझमकडे प्रगति होत आहे; मार्क्सवादाची अशी शिकवण आहे कीं, कम्यूनिझमखालीं शासनसंस्था अस्तित्वांत रहात नाहीं. मग आपली सोशालिस्ट शासनसंस्था नाहींशी होण्यास आपण

मदत कां करीत नाहीं ? शासनसंस्थेला पुराण वस्तुसंग्रहालयांत धाडण्याची वेळ अजून आली नाहीं काय ? ”

“ हा प्रश्न विचारणाऱ्यांनीं मार्क्स आणि एंगल्स यांच्या शासनसंस्थेवरील सिद्धान्तापैकीं कांहीं सिद्धान्त तोंडपाठ केले आहेत हें स्पष्ट आहे. परंतु त्यावरून हेंही स्पष्ट होतें कीं हे प्रश्न विचारणाऱ्या कॉम्रेड्सना या सिद्धान्तांचा मूलभूत अर्थ समजला नाहीं. कोणत्या विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितींत हे निरनिराळे सिद्धान्त निर्माण झाले यांकडे त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. आणि विशेष म्हणजे त्यांना आजची आन्तरराष्ट्रीय परिस्थिति समजली नाहीं. तसेंच आपलेंभोंवतीं असलेलें भांडवलशाहीचें कडें आणि त्यामुळें आपल्या सोशालिस्ट राष्ट्राला निर्माण झालेला धोका याकडेही त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे...

“ आपण कम्यूनिझमकडे चाललों आहोंत. कम्यूनिझम अस्तित्वांत आल्यानंतरसुद्धां आपली शासनसंस्था कायमच रहाणार काय ?

“ होय रहाणार. जोंपर्यंत भांडवलदारी राष्ट्रांचें कडें मोडलें नाहीं आणि परराष्ट्राकडून होणाऱ्या लष्करी हल्ल्याचा धोका नष्ट झाला नाहीं तोंपर्यंत शासनसंस्था कायम राहील. अर्थात् अंतर्गत आणि परराष्ट्रीय परिस्थिति ज्या मानानें बदलेल त्या मानानें आपल्या शासनसंस्थेच्या स्वरूपांतही बदल होईल. ”

“ ती रहाणार नाहीं. जर भांडवली राष्ट्रांचें कडें नाहींसें होऊन त्या जागीं सोशालिस्ट राष्ट्रांचें कडें निर्माण झालें तर शासनसंस्था रहाणार नाहीं. ती विरून जाईल. ” [ जोसेफ स्टालिन—‘लेनिनवादाचीं मूलतत्त्वें पानें ६५६;६५७;६६२ ].

### प्रकरण सहावें

# संधिसाधूंनीं मार्क्सवादाला दिलेलें विकृत स्वरूप

‘ सेकंड इंटरनॅशनलचे ’, १८८९ ते १९१४ या कालांतील तत्त्ववेत्ते आणि लेखक यांना सर्वसाधारण क्रान्तीच्या प्रश्नाप्रमाणेंच, शासनसंस्था आणि सामाजिक क्रान्ति किंवा सामाजिक क्रान्ति आणि शासनसंस्था यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न कधींच अवघड वाटला नाहीं. ‘ सेकंड इंटरनॅशनल ’ संधिसाधू बनण्याची जी क्रिया सुरू होती–या क्रियेचा परिणाम शेवटीं १९१४ सालीं ही इंटरनॅशनल कोलमडून पडण्यांत झाला–त्या क्रियेचें वैशिष्ट्य असें होतें कीं, ज्या वेळेला हा प्रश्न या इंटरनॅशनलच्या पुढाऱ्यांच्या समोर प्रत्यक्ष स्वरूपांत उभा राहिला त्या वेळेला सुद्धां त्यांनीं तो डावलण्याचा प्रयत्न केला किंवा त्यांना तो समजला तरी नाहीं.

सर्वसाधारणपणें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, कामगारक्रान्ति आणि शासनसंस्था यांच्या परस्परसंबंधांचा प्रश्न डावलण्याचा परिणाम असा झाला कीं, मार्क्सवाद चुकीच्या स्वरूपांत मांडला जाऊन त्याला विकृत स्वरूप दिलें गेलें. हा प्रश्न डावलणें संधिसाधूंच्या फायद्याचेंच होतें आणि संधिसाधूपणाचा प्रसार होण्यासही हीच गोष्ट कारणीभूत झाली.

या दुर्दैवी घटनेचें वैशिष्ट्य थोडक्यांत समजून घेण्याकरितां आपण मार्क्सवादाचे दोन मोठे सैद्धान्तिक प्लेखेनॉव्ह आणि काउट्स्की यांचा विचार करूं.

## १ प्लेखनॉव्हचा अराज्यवाद्यांचे बरोबर वादविवाद

अराज्यवाद आणि सोशालिझम यांचा परस्पर संबंध काय या प्रश्नावर प्लेखनॉव्हनें ‘ अराज्यवाद आणि सोशालिझम् ’ या नांवाचें एक स्वतंत्र पुस्तक लिहिलें आहे. हें पुस्तक १८९४ सालीं जर्मनींत प्रसिद्ध झालें.

शासनसंस्थेचा सर्वसाधारण प्रश्न त्याचप्रमाणें क्रान्ति आणि शासनसंस्था यांच्या परस्पर संबंधांचा प्रश्न हे अराज्यवाद्यांचे बरोबर चाललेल्या वादांतील दोन अत्यंत जिव्हाळ्याचे, तात्कालिक आणि राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे प्रश्न होते. परंतु त्यांचेकडे संपूर्णपणें दुर्लक्ष करून प्लेखनॉव्हनें मूळ प्रश्न कसा तरी चर्चिला आहे. या पुस्तकाचे दोन भाग पडतात. एक भाग ऐतिहासिक आणि विद्वत्ताप्रचुर असून त्यांत स्टर्नर, प्रूधाँ इत्यादींच्या तत्त्वप्रणालींच्या इतिहासासंबंधीं बरीच महत्त्वाची माहिती आहे. दुसरा भाग बाष्कळ असून त्यांत, 'अराज्यवादी आणि दरोडेखोर यांच्यांत कांहीं फरक करतां येत नाहीं', या विषयावर एक ओबडधोबड प्रबंध आहे.

हें पुस्तक म्हणजे निरनिराळ्या विषयांची आश्चर्यकारक पोतडी असून, रशियांतील क्रान्तीचे पूर्वीं आणि क्रान्तिकालांत प्लेखनॉव्हचें जें वर्तन होतें त्याचीं बीजें या पुस्तकांत सापडतात. १९०५ ते १९१७ या कालांत प्लेखनॉव्हनें आपण अर्धे पंडित आणि अर्धे अप्रबुद्ध असल्याचें सिद्ध केलें आणि राजकारणांत त्यानें सतत भांडवलदारांची पाठराखण केली.

मार्क्स-एंगल्स यांनीं, अराज्यवाद्यांचे बरोबर झालेल्या आपल्या वादविवादांत, क्रान्ति आणि शासनसंस्था यांच्या परस्पर संबंधाबद्दलचीं आपलीं मतें अत्यंत स्पष्टपणें मांडल्याचें आपण पाहिलेंच आहे. 'गोथा कार्यक्रमाचें परीक्षण' या मार्क्सच्या ग्रंथाला १८९१ सालीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत एंगल्स म्हणतो, "त्या वेळेला—पहिल्या इंटरनॅशनलची हेग येथें बैठक होऊन दोन वर्षें झालीं नाहींत तोंच—आम्हीं", (मार्क्स आणि एंगल्स), "बाकुनिन् आणि इतर अराज्यवादी यांचे बरोबर तीव्र लढा देण्यांत गुंतलेले होतों."

'पॅरीस कम्यून' हें 'आपलें' होतें, तें आपल्या तत्वप्रणालीचें प्रात्यक्षिक होतें, असा अराज्यवाद्यांचा दावा होता. परंतु त्यांना 'पॅरीस कम्यूनचा' अर्थही समजला नाहीं आणि मार्क्सनें कम्यूनच्या अनुभवाचें जें विवेचन केलें तेंही समजलें नाहीं. शासनसंस्थेचें जुनें यंत्र मोडून टाकावयाचें कां,

आणि मोडल्यानंतर त्याचे जागीं काय आणावयाचें, या प्रत्यक्ष राजकीय प्रश्नांना अराज्यवादी कधींच उत्तर देऊं शकले नाहींत.

परंतु 'अराज्यवाद आणि सोशालिझम्' या प्रश्नाचा विचार करतांना, शासनसंस्थेचा प्रश्न डावलणें, कम्यूनच्या आधीं आणि नंतर झालेल्या मार्क्सवादाच्या प्रगतीकडे दुर्लक्ष करणें याचा अर्थच संधिसाधू बनणें असा आहे. या प्रश्नांचा उल्लेख सुद्धां न करणें हेंच अराज्यवाद्यांचे दृष्टीनें त्यांच्या फायद्याचें असतें. म्हणून असें करणें हा सुद्धां अराज्यवादाचाच विजय आहे.

## २ काउट्स्कीचा संधिसाधूंचे बरोबर झालेला वादविवाद

काउट्स्कीच्या एकंदर ग्रंथांपैकीं सर्वांत जास्त ग्रंथांचीं भाषांतरें रशियन भाषेंत झालेलीं आहेत. काउट्स्की जर्मनीपेक्षां रशियांतच जास्त वाचला जातो, असा जो विनोद जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक लोकांकडून केला जातो तो उगीच नाहीं. ( परंतु ज्यांनीं हा विनोद प्रथम केला त्यांना कल्पना नव्हती त्यापेक्षां यांत, ऐतिहासिक दृष्टीनें, जास्त खोल अर्थ आहे. १९०५ सालानंतर रशियांतील कामगारांच्यांत 'सोशल डेमॉक्रसी'वरील उत्तम वाङ्मयाला फार मोठ्या प्रमाणांत आणि जोरदार मागणी सुरू झाली. या ग्रंथांच्या आवृत्त्या इतर कोठल्याही देशापेक्षां रशियांत जास्त खपल्या. जणूं काय त्यांच्या मार्फत रशियांतील कामगार, जवळच्या पुढारलेल्या राष्ट्रांचा अनुभव, आपल्या देशांतील नवीन आणि तरुण कामगार–चळवळीकरितां, झपाट्यानें आत्मसात करीत होता ).

मार्क्सवादाचा बहुजन समाजांत प्रसार केल्याबद्दल काउट्स्की रशियांत प्रसिद्ध आहेच, परंतु त्याहीपेक्षां त्यानें, बर्नस्टिनच्या पुढारीपणाखालीं असलेल्या अराज्यवाद्यांचे बरोबर, जो वादविवाद केला त्याकरितां तो जास्त प्रसिद्ध आहे. परंतु एक गोष्ट कोणालाच माहीत नाहीं. आणि १९१४–१५ सालांतील जागतिक अरिष्टांच्या कालांत काउट्स्की गोंधळाच्या घाणेरड्या डबक्यांत कसा पडला आणि अतिरेकी राष्ट्रवादाचा पुरस्कार त्यानें कां केला याचें जर कारण आपल्याला शोधून काढावयाचें असेल तर आपल्याला या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार

नाहीं. ती गोष्ट अशी : फ्रान्समधील मिलरँड व जॉरिस आणि जर्मनींतील बर्नस्टिन, या प्रसिद्ध संधिसाधू पुढाऱ्यांचे विरुद्ध लेख प्रसिद्ध करण्याचे पूर्वी काउटस्कीच्या स्वतःच्या धोरणांत बराच अनिश्चितपणा दिसून येत होता. १९०० सालीं भरलेल्या ‘ इंटरनॅशनल सोशलिस्ट काँग्रेस ’ समोर काउट्स्कीनें जो एक ठराव * मांडला, तो उडवाउडवी करणारा, तडजोडवादी आणि लवचीक आहे अशी त्याचेवर टीका करणें, स्टटगार्ड येथें १९०१–१९०२ सालीं प्रसिद्ध होणाऱ्या आणि कामगारांचा क्रान्तिकारक दृष्टिकोन मांडणाऱ्या झोर्या ( प्रभात ) या मार्क्सवादी पत्राला भाग पडलें होतें. काउट्स्कीचीं जर्मनींत जीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यावरून पहातां, बर्नस्टिनला जाहीरपणानें विरोध करण्याचे आधींसुद्धां त्याचें मन बरेंच डळमळीत होतें, असें आढळून येईल.

काउट्स्कीनें अगदीं नव्यानें जो मार्क्सवादाचा पुन्हां विश्वासघात केला, त्याचा इतिहास पहात असतांना, लक्षांत घेण्यासारखी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट ही कीं, संधिसाधूंच्या बरोबर झालेल्या वादांत त्यानें ज्या रीतीनें एकंदर प्रश्नाची मांडणी केली आणि ज्या तऱ्हेनें तो हाताळला त्यावरूनच त्याची संधिसाधूपणाच्या दिशेनें ( विशेषतः शासनसंस्थेच्या प्रश्नावर ) होत असलेली अधोगती स्पष्टपणें दिसून येते.

त्यानें संधिसाधूंच्या विरुद्ध लिहिलेल्या लिखाणापैकीं पहिलें, ‘बर्नस्टिन आणि सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा कार्यक्रम,’ आपण चर्चेला घेऊं. यांत काउट्स्कीनें बर्नस्टिनच्या प्रत्येक मुद्याचें खंडन केलें आहे. परंतु त्याचें वैशिष्ट्य खालीलप्रमाणें आहे, बर्नस्टीननें ‘ सोशालिझमचें सिद्धान्त ’या आपल्या प्रसिद्ध पुस्तकांत मार्क्सवादावर ‘ ब्लॅन्कीवादाचा ’ आरोप केला आहे. ( त्यावेळेपासून रशियांतील संधिसाधूंनीं आणि भांडवलशाही उदारमतवाद्यांनीं हाच आरोप, क्रान्तिकारक मार्क्सवादाचे प्रतिनिधी

* [ काउट्स्कीनें मांडलेला हा ठराव सोशालिस्टांना भांडवली सरकारांतून भाग घेण्यास परवानगी देणारा ( कांहीं अटीवर हें खरें ) होता आणि तो सम्मत झाला. ]

आणि बोल्शेविक यांचेवर हजारदां केला आहे). हें करतांना त्यानें मार्क्सच्या 'फ्रान्समधील यादवी' या ग्रंथाचा मुख्यतः आधार घेऊन 'पॅरीस कम्यून'-बद्दलची मार्क्स आणि प्रूधाँ यांचीं मतें सारखींच होतीं असें दाखविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे; हें आपण मागें पाहिलेंच आहे. कम्यूनिस्ट जाहीरनाम्याच्या एका आवृत्तीला १८७२ सालीं प्रस्तावना लिहितांना मार्क्सनें, "अस्तित्वांत असलेलें तयार राज्ययंत्र ताब्यांत घेऊन त्याचाच उपयोग आपल्या फायद्याकरितां करणें ही गोष्ट कामगार वर्ग करूच शकत नाहीं" या निष्कर्षावर जो विशेष भर दिला आहे त्याकडे बर्नस्टिननेंही विशेष लक्ष पुरविलें आहे.

हें विधान बर्नस्टिनला इतकें आवडलें कीं त्यानें तें आपल्या पुस्तकांत तीन वेळेला उधृत केलें असून त्याचा अत्यंत विकृत अर्थ लाविला आहे.

या ठिकाणीं मार्क्सला 'कामगार वर्गानें सर्व राज्ययंत्र मोडून, तोडून, खिळखिळें ('उध्वस्त' असा शब्द एंगल्सनें वापरला आहे) करून टाकलें पाहिजे,' असें म्हणावयाचें आहे, हें आपण पाहिलेंच. परंतु बर्नस्टिनला मात्र असें वाटतें कीं, या विधानांत मार्क्सनें, कामगार वर्गाला 'सत्ता काबीज करतांना क्रान्तिकारक उत्साहाचा अतिरेक न करण्याची' सूचना दिली आहे.

मार्क्सच्या कल्पनांना यापेक्षां जास्त हिडीस आणि ओंगळ स्वरूप देणें शक्य नाहीं.

मग काउट्स्कीनें 'बर्नस्टिन वादाचें' पूर्णतया खंडन करतांना वरील प्रश्नाचे बाबतींत कोणता मार्ग स्वीकारला आहे ?

या प्रश्नाचे बाबतींत संधिसाधूंनीं मार्क्सवादाला जें विकृत स्वरूप दिलें आहे त्याच्या मुळाशीं जाण्याचा प्रयत्न काउट्स्कीनें केलाच नाहीं. 'फ्रान्समधील यादवी' या मार्क्सच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत एंगल्सनें जें, वर दिलेलें, विधान केलें तें उधृत करून काउट्स्की म्हणतो, "मार्क्सच्या मतें कामगारवर्ग तयार राज्ययंत्र फक्त ताब्यांत घेऊं शकत नाहीं; पण सर्वसाधारणपणें विचार करतां ताब्यांत घेऊं शकतो". एवढेंच ?

मार्क्सचें जें मत होतें त्याच्या अगदीं उलट मत बर्नस्टिननें मार्क्सला चिकटविलें आहे. कामगार क्रान्तीचें कार्य शासनयंत्र 'मोडून' टाकणें हें आहे, असें मार्क्सनें १८५२ सालींच सांगितलें होतें, या सत्य परिस्थितीबद्दल काउट्स्कीनें कोठें एक शब्दही लिहिला नाहीं.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, कामगार क्रान्तीचे कार्यासंबंधीं मार्क्सवादी आणि संधिसाधू यांच्यांत जो मूलभूत फरक आहे, त्याचेकडे काउट्स्कीकडून दुर्लक्ष केलें गेलें आहे.

बर्नस्टिनच्या विरुद्ध लिहितांना काउट्स्की म्हणतो, "कामगारांच्या हुकूमशाहीचा प्रश्न सोडविणें आपण बिनधोकपणानें भविष्य कालावर सोपवून देऊं." [ पा. १७२ ]

हें विधान बर्नस्टिनच्या विरुद्ध तर नाहींच, उलट त्याला ती सवलत आहे. संधिसाधूपणासमोर ती शरणागती आहे. कारण कामगार क्रांतीचें कार्य काय या संबंधींचें सर्व मूलभूत प्रश्न 'बिनधोकपणानें भविष्य कालावर सोपवून देणें' यापेक्षां दुसरी कोणतीच चांगली गोष्ट संधिसाधूंना नको असते.

१८५२ सालापासून १८९१ सालापर्यंत चाळीस वर्षे मार्क्स-एंगल्स यांनीं कामगार वर्गाला असें शिकविलें कीं, त्यानें सरकारी यंत्र मोडून टाकलें पाहिजे. आणि तरीसुद्धां, १८९९ सालीं, संधिसाधूंनीं याच प्रश्नावर मार्क्सवादाशीं केलेल्या संपूर्ण बेइमानीला तोंड देण्याचा प्रसंग आला तेव्हां काउट्स्कीनें, 'सरकारी यंत्र मोडून टाकण्याची अवश्यकता आहे किंवा नाहीं' या प्रश्नाचे जागीं 'सरकारी यंत्र मोडून टाकण्याच्या क्रियेचें स्वरूप काय असेल' हा प्रश्न लबाडीनें घुसडला. आणि मग हें प्रत्यक्ष स्वरूप 'अगोदर' समजणें शक्य नाहीं या निर्विवाद (परंतु बाष्कळ) सत्याचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला !

श्रमजीवी जनतेला क्रांतीसाठीं तयार करीत असतांना कामगारांच्या राजकीय पक्षाचें कर्तव्य काय या प्रश्नाचे बाबतींत मार्क्स आणि काउट्स्की यांच्यांत मतभेदाचा अथांग सागर पसरलेला आहे.

संधिसाधूंच्या चुकीच्या मतांचें खंडन करण्याकरितांच मुख्यतः लिहिलेल्या

काउट्स्कीच्या, जास्त परिपक्क पुस्तकाकडे आपण आतां वळूं. या पुस्तकाचें नांव ‘ सामाजिक क्रांति ’ असें आहे. यांत लेखकानें ‘ कामगार क्रांति ’ आणि ‘कामगार राज्य’ हे विषय चर्चेकरितां निवडलेले आहेत. या ग्रंथांत काउट्स्कीनें महत्त्वाची अशी पुष्कळ माहिती दिलेली आहे, परंतु शासन संस्थेचा प्रश्न तेवढा नेमका वगळला आहे. या ग्रंथांत लेखकानें सर्वत्र राजसत्ता ‘ जिंकण्याच्या ’ प्रश्नाची चर्चा केली आहे. जास्त कांहीं नाहीं. म्हणजे या बाबतींत लेखकानें अशी शब्दयोजना केली आहे कीं, ज्यामुळें संधिसाधूंना सवलत दिल्यासारखे होतें; कारण यांतून राज्ययंत्र मोडून टाकल्याशिवाय सत्ता हस्तगत करणें शक्य आहे असा अर्थ निघूं शकतो. ‘ कम्यूनिस्ट जाहीरनाम्यांतील ’ जी गोष्ट ‘ जुनी ’ झाल्याचा निर्वाळा मार्क्सनें १८७२ सालीं दिला त्याच ‘ जुन्या झालेल्या ’ गोष्टीचें १९०२ सालीं पुनरुज्जीवन करण्यांत आलें.

या ग्रंथांत ‘ सामाजिक क्रान्तीचीं स्वरूपें आणि साधनें ’ यांवरही एक स्वतंत्र प्रकरण आहे. सदर प्रकरणांत काउट्स्कीनें राजकीय सार्वत्रिक संप, यादवी युद्ध आणि आजच्या मोठमोठ्या राष्ट्रांतील नोकरशाही, लष्कर या सारखीं दडपशाहीचीं खास साधनें यांची चर्चा केली आहे. परंतु कम्यूननें जें कामगारांना शिकविलें त्याबद्दल एक शब्दही यांत नाहीं. एकूण एंगल्सनें जर्मनींतील सोशल डेमोक्रॅट्सना शासनसंस्थेबद्दल ‘ अंधश्रद्धा ’ निर्माण होऊं न देण्याबद्दल जो इषारा दिला होता तो कांहीं अनाठायी नव्हता.

विजयी झालेला कामगार वर्ग ‘लोकशाही कार्यक्रम अमलांत आणील’ असें सांगून काउटस्कीनें या कार्यक्रमांतील कांहीं कलमेंही दिलीं आहेत. परंतु भांडवली लोकशाहीला कामगार लोकशाहीनें दडपून टाकण्यासंबंधीं, १८७१ सालानें आपणांस जें कांहीं नवीन शिकविलें त्यासंबंधीं, काउट्स्की एक शब्दही लिहीत नाहीं. हा प्रश्न त्यानें खालील ‘ बाष्कळपणाच्या भरीव ’ गोष्टी लिहून निकालांत काढला आहे.

“ परंतु आजच्या परिस्थितींत आपण सत्ता हस्तगत करूं शकणार नाहीं, हें स्पष्ट आहे. क्रान्तीसंबंधीं बोलतांना, आजची राजकीय आणि

सामाजिक चौकट बदलेल असा सखोल आणि प्रदीर्घ लढा लढावा लागेल, हें गृहीत धरलेलें असतें. '

खरंच ! किती 'स्पष्ट' आहे हें. अगदीं घोडा हरभरा खातो आणि व्होल्गा नदी कॅस्पियन समुद्राला मिळते याच्या इतकें स्पष्ट आहे नाहीं ! दुर्दैव एवढेंच कीं, शासनसंस्था आणि लोकशाही यांचे बाबतींत इतर क्रान्त्यांपेक्षां कामगार क्रान्तीचें स्वरूप जास्त मूलगामी असल्याचें कोणत्या बाह्य गोष्टीवरून सिद्ध होतें, हा जो क्रान्तिकारक कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न तो डावलण्याकरितां म्हणूनच केवळ काउट्स्कीनें 'लढयाचा सखोलपणा' ही भारदस्त परंतु निरर्थक शब्दयोजना केली आहे.

काउट्स्की, संधिसाधूंचे विरुद्ध लढा जाहीर केल्याची कितीही घोषणा करीत असला, 'क्रान्तीच्या कल्पनेचें महत्व किती आहे' यावर भर देत असला ( परंतु कामगाराला प्रत्यक्ष क्रान्तीचे धडे देतांना जर माणूस कचरूं लागला तर या 'कल्पनेचा' उपयोग काय ? ), किंवा 'सर्वांपेक्षां क्रान्तिकारक ध्येयवादाला जास्त महत्त्व आहे', अथवा 'ब्रिटिश कामगार हे आतां जवळ जवळ मध्यमवर्गीय बनले आहेत' असें जाहीर करीत असला तरी खरी गोष्ट अशी आहे कीं, वरील महत्त्वाचा प्रश्न डावलून काउट्स्कीनें एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्याचे बाबतींत संधिसाधूंना सवलतच दिली आहे.

काउट्स्की लिहितो, "नौकरशाही ( ? ), ट्रेडयुनियन, सहकारी, खाजगी इत्यादि निरनिराळ्या स्वरूपाचे धंदे......समाजवादी समाजांत एकत्र असूं शकतील. आगगाडी सारखे कांहीं धंदे असे आहेत कीं, जे नौकरशाही ( ? ) संघटनेशिवाय चालूंच शकणार नाहींत. या धंद्यांतील लोकशाही संघटनेचें स्वरूप खालीलप्रमाणें असेल: कामगारांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचें 'विधिमंडळासारखें' एक मंडळ असेल. हें मंडळ कामाचे नियम तयार करील आणि नौकरशाही यंत्राच्या कारभारावर देखरेख करील. कांहीं धंद्यांचा कारभार ट्रेड युनियन्सकडे सोंपवितां येईल आणि इतर कांहीं ' सहकारी ' धंदे बनतील " [ ' सामाजिक क्रान्ति ' रशियन

भाषांतर पानें १४८ व ११५. १९०३ सालीं जिनीव्हा येथें प्रसिद्धीकरण]

ही विचारसरणी चूक आहे आणि 'पॅरीस कम्यूनच्या' अनुभवाचा आधार घेऊन मार्क्स–एंगल्स यांनीं जें स्पष्टीकरण केलें त्यापेक्षां ही पीछेहाट आहे.

तथोक्त 'नौकरशाही' संघटनेच्या दृष्टीनें, आगगाड्या आणि इतर मोठ्या प्रमाणांवरील यांत्रिक उत्पादन, मोठमोठे कारखाने, मोठमोठीं दुकानें किंवा मोठ्या प्रमाणांवरील भांडवली शेती, यांत कांहींही फरक नसतो. 'तांत्रिक' ( Technique ) दृष्टीनें या सर्व धंद्यांत अत्यंत कडक शिस्त, आणि प्रत्येकानें आपलें नेमून दिलेलें काम बिनचूकपणें करणें या गोष्टींची अवश्यकताच असते. कारण असें जर नसेल तर तो धंदा चालणार नाहीं; व यंत्रें आणि कच्चा माल यांचा नाश होईल. या सर्वच धंद्यांत "कामगार आपले प्रतिनिधी निवडतील आणि त्यांचें विधिमंडळा-सारखें एक मंडळ बनेल."

परंतु महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, 'विधिमंडळासारखें हें मंडळ' 'भांडवली' विधिमंडळासारखें असणार नाहीं. भांडवली विधिमंडळाच्या पलीकडे ज्याची कल्पनाशक्ती जाऊंच शकत नाहीं त्या काउट्स्कीच्या कल्पनेप्रमाणें, हें विधिमंडळ "कामाचे नियम करणें आणि नौकरशाही यंत्रावर देखरेख करणें," एवढेंच काम करून थांबणार नाहीं. सोशालिस्ट समाजांतील कामगार प्रतिनिधींचें बनलेलें हें 'विधिमंडळ' 'कामाचे नियम करून एकंदर कामावर देखरेख' तर ठेवीलच परंतु ही कारभार पहाण्याची पद्धत नौकरशाही असणार नाहीं. कामगारांनीं सत्ता हस्तगत केल्यानंतर ते जुन्या नौकरशाही राज्ययंत्राचे तुकडे तुकडे करतील, तें यंत्र मुळासकट उखडून टाकतील, त्याचा मागमूसही राहूं देणार नाहींत; आणि त्याचे जागीं कामगारांचें आणि व्यवस्थापकांचें एक नवें यंत्र तयार करतील आणि हें यंत्र नौकरशाही बनूं नये म्हणून, मार्क्स–एंगल्स यांनीं विस्तारानें विवेचन केलेल्या खालील गोष्टी करतील : ( १ ) सर्व अधिकाऱ्यांना 'निवडणुकीचें' आणि 'परत बोलावण्याचें' तत्त्व लागूं करणें; ( २ ) सर्वांना सर्वसाधारण मजुराच्या मजुरी इतकें वेतन देणें; ( ३ ) ताबडतोब सर्वां-

नींच नियंत्रण आणि देखरेख करण्यास आरंभ करणें; यामुळें कांहीं काल सर्वच नौकरशहा बनतील आणि म्हणूनच कोणीही नौकरशहा बनणार नाहीं.

" कम्यून हें काम करणारें मंडळ—एकाच वेळेला कायदे करणारें आणि त्यांची अम्मलबजावणी करणारें मंडळ—बनणार होतें, केवळ ' कायदे—मंडळ ' नव्हे ", या मार्क्सच्या विधानाचा काउट्स्कीनें कधीं विचारच केला नाहीं.

लोकशाही ( परंतु बहुसंख्य जनतेकरितां नाहीं ) आणि नौकरशाही ( बहुजन समाजाच्या विरुद्ध असणारी ) यांची सांगड घालणारी ' भांडवलशाही विधिमंडळ पद्धत, ' आणि प्रस्थापित झाल्यावरोबर तावडतोब, नौकरशाहीला मुळासकट उखडून टाकण्याकरितां उपाय योजना करणारी, या योजना शेवटपर्यंत नेऊन नौकरशाहीचा संपूर्ण नाश करणारी आणि जनतेची संपूर्ण लोकशाही प्रस्थापित करणारी कामगारांची लोकशाही यांचे मधील फरक काउट्स्कीला समजलाच नाहीं.

या ठिकाणीं, काउट्स्कीच्या मनांत वसत असलेली शासनसंस्थेबद्दलची अंधश्रद्धा आणि नौकरशाहीवरील त्याचा अंधविश्वास ही उघड झालीं आहेत.

आतां आपण काउट्स्कीनें संधिसाधूंच्या विरुद्ध लिहिलेल्या शेवटच्या आणि उत्कृष्ट ग्रंथाकडे वळूं. या ग्रंथाचें नांव ' सत्ता हस्तगत करण्याचा मार्ग ' असें आहे. ( माझ्या माहितीप्रमाणें या ग्रंथाचें रशियन भाषांतर झालेलें नाहीं. कारण हा ग्रंथ १९०९ सालीं, रशियांत दडपशाहीनें उच्चांक गांठला असतांना, प्रसिद्ध झाला. ) १८९९ सालीं, बर्नस्टिनच्या विरुद्ध लिहिलेल्या लेखांत, काउट्स्कीनें क्रान्तीच्या कार्यक्रमाचा 'सर्वसाधारणपणें' विचार केला; १९०२ सालीं लिहिलेल्या 'सामाजिक क्रान्ति' या पुस्तकांत त्यानें, ' क्रांति कोणत्या परिस्थितींत घडून येते हें लक्षांत न घेतां,' क्रान्तीचें कार्य काय या प्रश्नाचा 'सर्वसाधारणपणें' विचार केला; परंतु या शेवटच्या ग्रंथांत तसें कांहीं न करतां, त्यानें, ज्या प्रत्यक्ष घटनांमुळें क्रान्तिकाल जवळ येत आहे हें मान्य करणें आपणांस

भाग पडते, त्या घटनांचा विचार केला आहे. आणि त्या दृष्टीनें या ग्रंथांत काउट्स्कीनें पुष्कळच प्रगति केली आहे.

या बाबतींत, साम्राज्यशाही आणि वाढती वर्गीय तेढ या दोन विशेष महत्त्वाच्या घटनांकडे लेखकानें प्रकर्षानें लक्ष वेधलें आहे. तो म्हणतो, "पश्चिम युरोपमधील १७८९ ते १८७१ या क्रान्तिकाला-नंतर, पूर्व युरोपमध्यें तसाच क्रान्तिकाल १९०५ नंतर सुरू झाला आहे." "जागतिक युद्ध भयानक वेगानें जवळ येत आहे;" "अपरिपक्व क्रान्तीची भाषा यापुढें कामगार करूं शकत नाहींत;" "आपण क्रान्तिकालांत प्रवेश केला आहे;" "क्रान्तियुग सुरू होत आहे."

या घोषणा अगदीं स्पष्ट आहेत. परंतु लढाईचे पूर्वी सोशल डेमो-क्रॅटिक पक्षापासून काय अपेक्षा होत्या आणि लढाई सुरू झाल्यानंतर या पक्षाचा, काउट्स्कीसकट, किती अधःपात झाला याचें प्रमाण म्हणून, काउट्स्कीच्या वरील ग्रंथाचा उपयोग होईल. आपण विचार करीत असलेल्या ग्रंथांत काउट्स्की म्हणतो, "आजच्या परिस्थितींत आपण ( सोशल डेमोक्रॅटिक पक्ष ) आहोंत त्यापेक्षां जास्त नेमस्त वाटण्याची भीति निर्माण झाली आहे." परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत 'जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पक्ष' वाटला त्याच्यापेक्षां पुष्कळ जास्त प्रमाणांत नेमस्त आणि संधिसाधू असल्याचें आढळून आलें.

यांतील विशेष गोष्ट अशी कीं, जो ग्रंथ, काउट्स्कीच्या स्वतःच्या म्हणण्याप्रमाणें, त्यानें मुख्यतः राजकीय क्रान्तीचें विवेचन करण्याकरितां लिहिला आणि ज्यांत त्यानें क्रांतिकाल सुरू झाल्याची निश्चित घोषणा केली, त्या ग्रंथांत सुद्धां काउट्स्कीनें शासनसंस्थेचा प्रश्न पुन्हां संपूर्णपणें डावलला आहे.

अशा रीतीनें हा प्रश्न डावलणें, ही चुकवाचुकव, ही दुटप्पी भाषा, या सर्वांचा संकलित अंतिम परिणाम म्हणजे काउट्स्कीनें संधिसाधूपणा-समोर घातलेलें संपूर्ण लोटांगण होय. या शरणागतीचा आतां आपणांस विचार करावयाचा आहे.

जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षानें, काउट्स्कीच्या मार्फतीनें जणूं

काय असें जाहीर केलें आहे कीं, ' आमचीं मतें क्रांतिकारक आहेत ' ( १८९९ ); 'विशेषतः कामगारांनीं सामाजिक क्रांति करणें अटळ आहे,' हें आम्हीं मान्य करतों ( १९०२ ); ' नवा क्रांतिकाल जवळ येत आहे ' हेंही आम्हांला मान्य आहे ( १९०९ ) आणि तरी सुद्धां ' शासनसंस्थेसंबंधीं कामगार क्रांतीचें कार्य काय हा प्रश्न आज निर्माण झाला असतांना आम्हीं, मार्क्सनें फार पूर्वी १८५२ सालीं जें लिहिलें त्याच्याही पाठीमागें जाणार आहोंत. ' ( १९१२ )

काउट्स्कीचा पेनिकॉक बरोबर जो वादविवाद झाला त्यांत वरील प्रश्न इतक्याच स्पष्ट आणि सरळ स्वरूपांत मांडला गेला होता.

## ३ काउट्स्की आणि पेनिकॉक यांचा वादविवाद

काउट्स्कीला विरोध करतांना पेनिकॉक हा जर्मनींतील ' लेफ्ट रॅडिकल ' गटाचा प्रतिनिधी म्हणून बोलत होता. या गटांत रोझा लक्झंबर्ग, कार्ल रेडेक वगैरे लोक होते. ' क्रांतिकारक मार्गाचा अवलंब केला पाहिजे ' अशी या गटाची मागणी होती; आणि त्यांची अशी खात्री होती कीं, काउट्स्की हा तत्त्वशून्यपणानें मार्क्सवाद आणि संधिसाधूपणा यांत हेलकावे खाणाऱ्या ' मध्यम ' मार्गाकडे झुकत आहे. या त्यांच्या मताची सत्यता लढाई सुरू झाल्याबरोबर पटून आली आणि या कालांत या, चुकीनें मार्क्सवाद मानला जात असलेल्या, ' मध्यम मार्गाचें '–काउट्स्कीवादाचें–तिरस्करणीय आणि हिडिस स्वरूप स्पष्ट झालें.

' जनतेचा उठाव आणि क्रांति ' या शीर्षकाखालीं, शासनसंस्थेच्या प्रश्नावर लिहिलेल्या लेखांत ( ' न्यू झेट ' १९१२. भाग ३० ) पेनिकॉकनें कॉउट्स्कीच्या धोरणाचें वर्णन, ' निष्क्रीय जहालवाद ' किंवा ' निष्क्रीय होऊन थांबण्याचें धोरण' असें केलें आहे. पेनिकॉक म्हणतो, " काउट्स्कीला क्रांतीच्या ' गतीचा ' विसर पडला आहे. "

अशा रीतीनें या प्रश्नाची मांडणी करून, पेनिकॉक, आपण विचार करीत असलेल्या, कामगार क्रांतीचें शासनसंस्थेसंबंधीं कर्तव्य काय या प्रश्नाकडे आला आहे.

तो म्हणतो, " कामगारांचा भांडवलदारांचे विरुद्ध चाललेला लढा हा कांहीं केवळ ' राजसत्तेकरितां ' चाललेला लढा नाहीं तर तो राजसत्तेच्या विरुद्ध लढा आहे......कामगारांच्या सत्तेच्या साधनांच्या जोरावर शासनसंस्थेचीं सत्तेचीं साधनें मोडून टाकणें, तीं नाहींशीं करणें हा कामगार क्रांतीचा गाभा आहे...शासनसंस्थेची संघटना ज्या वेळेला संपूर्णपणें मोडली जाईल, त्याच वेळेला हा लढा थांबेल. बहुसंख्याकांची संघटना आपलें श्रेष्ठत्व, सत्ताधारी अल्पसंख्याकांची संघटना नष्ट करूनच सिद्ध करील. "

पेनिकॉकनें ज्या पद्धतीनें आपले विचार मांडले आहेत ती पद्धत चूक आहे; परंतु त्यांतून स्पष्ट अर्थ निघूं शकतो. याला काउट्स्कीनें काय उत्तर दिलें आहे ?

काउट्स्की म्हणतो, " आतांपर्यंत सोशल डेमोक्रॅट आणि अराज्य-वादी यांच्यांत असा फरक होता कीं, पहिल्यांना राजसत्ता जिंकावयाची होती व दुसऱ्यांना तिचा नाश करावयाचा होता. पेनिकॉकला आतां दोन्ही हवें आहे. "

पेनिकॉकच्या विवेचनांत निश्चितपणा आणि वास्तवता यांचा जरी अभाव असला—या लेखांत इतरही दोष आहेत, परंतु त्यांचा आपल्या चालू विषयांशीं संबंध नाहीं—तरी पेनिकॉकनें निर्माण केलेल्या प्रश्ना-पाठीमागची जी तात्त्विक भूमिका आहे तिचा काउट्स्कीनें बरोबर उल्लेख केला आहे, आणि या मूलभूत तात्त्विक प्रश्नावर मार्क्सवादाची भूमिका संपूर्णपणें सोडून काउट्स्की पूर्णतया संधिसाधूंच्या गोटांत शिरला आहे. सोशल डेमोक्रॅट आणि अराज्यवादी यांच्यांतील काउट्स्कीनें सांगितलेला फरक चूक आहे; आणि असें करण्यांत त्यानें मार्क्सवादाला ग्राम्य आणि विकृत स्वरूप दिलें आहे.

मार्क्सवाद आणि अराज्यवाद यांचेमधील फरक खालील प्रमाणें आहे. ( १ ) मार्क्सवाद्यांचें ध्येय शासनसंस्था नाहींशी करणें हेंच आहे. परंतु त्यांना हें माहीत आहे कीं, समाजवादी क्रान्तीनंतर ज्या वेळेला वर्ग नाहींसे होतील तेव्हांच आपलें हें ध्येय साध्य होईल, आणि समाज-

वादाच्या प्रस्थापनेचाच परिणाम असा होईल कीं, शासनसंस्था विरून जाईल. अराज्यवाद्यांना शासनसंस्था कोणत्या परिस्थितींत विरून जाते याची कल्पना नसल्यानें, त्यांना शासनसंस्था ताबडतोब, एका रात्रींत, नाहींशी करावयाची आहे. ( २ ) कामगारांनीं राजकीय सत्ता हस्तगत केल्यानंतर त्यांनीं शासनसंस्थेचें जुनें यंत्र संपूर्णपणें मोडून टाकलें पाहिजे आणि त्याचें जागीं, कम्यूनच्या पद्धतीवर, कामगारांच्या सशस्त्र संघटनेचें नवें शासनयंत्र प्रस्थापित केलें पाहिजे असें मार्क्सवाद्यांचें मत आहे. शासनसंस्थेचें यंत्र मोडून टाकलें पाहिजे, अशी अराज्यवाद्यांचीही मागणी आहे. परंतु त्याचें जागीं कामगार वर्ग कशाची प्रस्थापना करणार, आपल्या क्रान्तिकारक शक्तीचा कामगार वर्ग कसा उपयोग करणार याबद्दल त्यांना कांहींच निश्चित कल्पना नाहीं. फार काय, क्रान्तिकारक कामगारांनीं राजकीय सत्तेचा उपयोग करावा हें सुद्धां अराज्यवाद्यांना मान्य नाहीं; म्हणजेच त्यांना कामगारांची क्रान्तिकारक हुकूमशाही मान्य नाहीं. ( ३ ) अस्तित्वांत असलेल्या शासनसंस्थेचा उपयोग करून घेऊन कामगारवर्गाला क्रान्तीकरितां तयार केलें पाहिजे अशी मार्क्सवादाची शिकवण आहे. अराज्यवाद्यांना ही कल्पनाच त्याज्य वाटते.

या ठिकाणीं, मार्क्सवादाची बाजू पेनिकॉकच बरोबर मांडीत आहे, काउट्स्की नव्हे. कारण मार्क्सची अशीच शिकवण आहे कीं, राजकीय सत्ता केवळ जिंकून घेऊन—शासनसंस्थेचें जुनें यंत्र कामगारांच्या नव्या हातांत येणें या अर्थानें—कामगाराचें भागणार नाहीं; तर त्यांनीं हें यंत्र मोडून टाकलें पाहिजे आणि त्याचें जागीं नवें प्रस्थापित केलें पाहिजे.

काउट्स्की मात्र मार्क्सवाद सोडून संधिसाधूंच्या गोटांत शिरत आहे; कारण संधिसाधूंना संपूर्णपणें अमान्य असणारी, शासनसंस्थेचा नाश करण्याची, कल्पना काउट्स्कीच्याही विचारसरणींतून नाहींशी झाली आहे. यामुळें ‘ जिंकणें ’ याचा अर्थ ‘ बहुमत मिळविणें ’ असा लावणें संधिसाधूंना शक्य झालें आहे.

मार्क्सवादाला दिलेलें विकृत स्वरूप झांकण्याकरितां, काउट्स्कीनें

मोठ्या विद्वत्तेचा आव आणून, आणि मार्क्सच्या लिखाणांतील कांहीं उतारे उधृत करून हातचलाखीचा खेळ चालविला आहे. मार्क्सनें १८५० सालीं असें म्हटलें कीं, "कामगारांच्या हातांत सर्व सत्तेचें केन्द्रीकरण होणें आवश्यक आहे." आणि काउट्स्की, आपला विजय झाल्याचा आव आणून विचारतो; 'पेनिकॉकला केन्द्रीकरण नष्ट करावयाचें आहे काय ?'

संघराज्य आणि एकराज्य ( Unitary state ) या प्रश्नावर मार्क्सची आणि प्रूधाँची मतें सारखींच आहेत हें सिद्ध करण्याकरितां, बर्नस्टिननें जशी हातचलाखी केली तशीच हातचलाखी काउट्स्की या ठिकाणीं करीत आहे.

काउट्स्कीनें उधृत केलेलें विधान या ठिकाणीं कोठेंच लागूं पडत नाहीं. जुन्या शासनयंत्राइतकेंच केन्द्रीकरण, नव्या शासनयंत्रांतही शक्य असतें. कामगारांनीं जर आपली सर्व सशस्त्र शक्ति स्वखुषीनें एकत्र आणली तर ते सुद्धां केन्द्रीकरणच होईल. मात्र जुन्या केन्द्रित शासन-संस्थेच्या सत्तेचा–लष्कर, पोलीस, नौकरशाही इत्यादींचा–संपूर्ण नाश हाच या नव्या केन्द्रीकरणाचा पाया असतो. मार्क्स–एंगल्स यांच्या कम्यूनसंबंधींच्या प्रसिद्ध विधानाकडे दुर्लक्ष करून प्रस्तुत विषयांशीं संबंध नसलेले उतारे उधृत करण्यांत काउट्स्कीची वागणूक फसवेगिरी करणाऱ्या व्यक्तीसारखीच आहे.

काउट्स्की म्हणतो, "पेनिकॉकला कदाचित् शासनसंस्थेतील अधिकारी नाहींसे करावयाचे असतील ? परंतु आपल्या पक्षांत किंवा ट्रेड-युनियनमध्येंही आपलें अधिकाऱ्यांच्या शिवाय चालत नाहीं मग राज्यकार-भाराची गोष्ट तर दूरच राहो. शासनसंस्थेंतील अधिकारी नाहींसे करावेत अशी मागणी आपण आपल्या कार्यक्रमांत केलेली नाहीं तर त्यांची निवडणूक व्हावी अशी आपली मागणी आहे.......'भविष्य कालांतील' शासनसंस्थेच्या अम्मलबजावणी खात्याचें स्वरूप काय असेल याची चर्चा आपण या ठिकाणीं करीत नाहीं, तर आपला राजकीय लढा राजकीय सत्ता हस्तगत करण्याचें आधींच तिचा नाश करूं शकेल काय या प्रश्नाचा

आपण विचार करीत आहोंत. ( जाड ठसा काउट्स्कीचा ) कोणत्या खात्याचे मंत्री आणि कोणते अधिकारी आपण नाहींसे करूं शकूं ?" ( यानंतर शिक्षण, न्याय, अर्थ, युद्ध इत्यादि खात्यांची यादी आहे ). "नाहीं ! सरकार विरुद्ध आपला जो लढा चालला आहे त्यामुळें यांतील एकहि खातें आपण नाहींसें करूं शकणार नाहीं......गैरसमज होऊं नये म्हणून मी पुन्हां सांगतों कीं, सोशल डेमॉक्रसीचा विजय झाल्यानंतर 'भविष्य कालांत' शासनसंस्थेचें स्वरूप काय असेल याची चर्चा आपण या ठिकाणीं करीत नाहीं तर आपल्या विरोधानें आपण सध्याच्या शासनसंस्थेंत काय बदल घडवून आणूं शकूं याचा विचार करीत आहोंत". [ पा० ७२५ ].

ही उघड उघड हातचलाखी आहे. पेनिकॉकनें क्रान्तीचा प्रश्न निर्माण केला आहे. त्याच्या लेखाचें शीर्षक आणि त्यांतील, आम्हीं वर उधृत केलेला भाग यावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे. परंतु काउट्स्कीनें 'विरोधी पक्षाच्या' प्रश्नावर उडी मारून, क्रान्तिकारक दृष्टिकोनाचे जागीं संधिसाधू दृष्टिकोनाची प्रस्थापना केली आहे. तो म्हणतो, 'आज आपण विरोधी पक्ष आहोंत, सत्ता जिंकून घेतल्यानंतर आपलें काय होणार तें आपण नंतर पाहूं.' याचा अर्थ क्रान्ति अदृश्य झाली ! आणि संधिसाधूंना नक्की हेंच हवें होतें.

'विरोधी पक्ष' आणि सर्वसाधारणपणें राजकीय लढा यांचा आपल्या प्रस्तुत विषयाशीं कांहीं संबंध नाहीं. आपण क्रान्तीसंबंधीं बोलत आहोंत. क्रान्तीचा अर्थ असा आहे कीं, 'कामगार वर्ग संपूर्ण शासनयंत्र आणि अम्मलबजावणी खातें, यांचा नाश करील आणि त्यांचे जागीं सशस्त्र कामगारांच्या नव्या यंत्राची प्रस्थापना करील'. काउट्स्कीच्या विधानावरून त्याची मात्र निरनिराळया खात्यांच्या मंत्र्यावर अंधश्रद्धा आहे हें स्पष्ट होत आहे. परंतु या मंत्र्यांची जागा, कामगार आणि सैनिक यांच्या प्रतिनिधींच्या, सार्वभौम आणि सर्व शक्तिमान् सोव्हियट्सच्या अधिकाराखालीं असणाऱ्या तज्ञांच्या, समितीनें घेण्यास काय हरकत आहे ? "

मंत्र्यांची खातीं रहातील कां त्यांची जागा 'तज्ञांची समिती' किंवा दुसरी एकादी संघटना घेईल; हा मुळीं प्रश्नच नाहीं आणि या प्रश्नाला महत्वही नाहीं. प्रश्न असा आहे कीं, जुनें शासनयंत्र ( जें हजारों धाग्यांनीं भांडवलदारांशीं निगडित झालेलें आहे, आणि सरकारी चाकोरी आणि मंदपणा यांनीं भरलेलें आहे. ) रहाणार कीं त्याचा नाश करून त्याचें जागीं नवें शासनयंत्र आणलें जाणार? जुन्या शासनयंत्राच्या सहाय्यानें नवा वर्ग आपली हुकूमत चालवील असा क्रान्तीचा अर्थ नाहीं; तर नवा वर्ग जुनें शासनयंत्र मोडून टाकील आणि नव्या शासनयंत्राच्या सहाय्यानें आपला अधिकार, आपली हुकूमत गाजवील, असा क्रान्तीचा अर्थ आहे. मार्क्सवादाच्या या मूलभूत सिद्धान्ताकडे काउट्स्कीनें दुर्लक्ष तरी केलें आहे किंवा त्याचा अर्थ तरी त्याला समजला नाहीं.

त्यानें सरकारी अधिकाऱ्यांच्या संबंधीं जो प्रश्न निर्माण केला आहे त्यावरून काउट्स्कीला कम्यूनपासून काय धडा घ्यावयाचा आणि मार्क्सची त्या संबंधीं काय शिकवण आहे हें समजलेंच नाहीं हें सिद्ध होतें. "आपल्या पक्षांत काय किंवा ट्रेड युनियनमध्यें काय, अधिकाऱ्यांशिवाय आपलें भागणारच नाहीं..."

भांडवलशाही अस्तित्वांत असतांना, भांडवलदारांच्या हातांत सत्ता असतांना, आपले अधिकाऱ्यांशिवाय चालणारच नाहीं; कारण कामगारवर्ग दडपलेला असतो, आणि कष्ट करणाऱ्या जनतेला भांडवलशाहीनें गुलाम करून ठेवलेलें असतें. भांडवलशाहींतील मजुरीची गुलामी पद्धत, बहुजनसमाजाचें दारिद्र्य आणि हाल, यामुळें लोकशाही मर्यादित, संकुचित, छाटलेली आणि विकृत असते. या कारणानें आणि फक्त याच कारणानें भांडवलशाही समाजांतील आजच्या राजकीय आणि औद्योगिक संघटनेंतील अधिकारी लांचखाऊ बनतात—किंवा जास्त बरोबर म्हणजे लांचखाऊ बनण्याची शक्यता असते—आणि त्यांच्यांत नोकरशहा बनण्याची—जनतेपासून अलग झालेल्या, जनतेवर असणाऱ्या आणि विशेष हक्क प्राप्त झालेल्या व्यक्ती बनण्याची—प्रवृत्ति निर्माण होते.

हें नोकरशाहीचें वैशिष्ट्य आहे. आणि जोंपर्यंत भांडवलदारांची संपत्ति हिसकावून घेऊन त्यांची सत्ता झुगारून दिली गेली नाहीं तोंपर्यंत कामगारवर्गांतील अधिकारीसुद्धां कांहीं प्रमाणांत 'हुकूमशहा' बनतीलच.

काउट्स्कीच्या मताप्रमाणें, सोशालिस्ट समाजांत निवडलेले अधिकारी रहाणार म्हणजे नोकरशहा रहाणार, आणि म्हणजे नोकरशाही सुद्धां रहाणारच. परंतु येथेंच त्याची चूक होत आहे. सोशालिस्ट समाजांतील अधिकारी हुकूमशहा असणार नाहींत हें सिद्ध करण्याकरितांच मार्क्सनें कम्यूनचें उदाहरण घेतलें आहे. अधिकाऱ्यांच्या निवडणुकी करण्याच्या तत्त्वाबरोबरच, त्यांना परत बोलविण्याच्या अधिकाराचें तत्त्व ज्या प्रमाणांत अमलांत येईल, त्यांच्या पगाराचें मान सर्वसाधारण कामगाराच्या मजुरी इतकें खालीं आणण्यांत येईल, आणि विधिमंडळाची जागा कार्य करणाऱ्या मंडळानें–कायदे करणें आणि त्यांची अम्मलबजावणी करणें हीं दोन्ही कामें एकाच वेळीं करणाऱ्या संघटनांनीं–घेतली जाईल, त्या प्रमाणांत त्यांचें नोकरशाही रूपही नाहींसें होईल.

काउट्स्कीनें पेनिकॉकच्या विरुद्ध मांडलेले सर्व मुद्दे आणि विशेषतः 'आपल्या पक्षांत किंवा ट्रेड युनियन मध्येंही आपलें अधिकाऱ्यांशिवाय चालत नाहीं' हा आश्चर्यकारक मुद्दा; हें सर्व, पूर्वी बर्नस्टिननें 'सर्व-साधारण मार्क्सवादावर' केलेल्या टीकेची पुनरावृत्ति आहे. 'सोशालिझमचीं मूलतत्त्वें' या आपल्या प्रतिगामी पुस्तिकेंत बर्नस्टिननें 'प्राथमिक स्वरूपांतील लोकशाहीवर,' 'तर्कदुष्ट लोकशाहीवर' अधिकारयुक्त आदेश, बिनपगारी अधिकारी, मध्यवर्ती दुर्बल असलेल्या प्रातिनिधिक संस्था इत्यादि शब्दांनीं हल्ला चढविला आहे. 'प्राथमिक स्वरूपांतील लोकशाही' 'कुचकामी असते' हें दाखविण्याकरितां बर्नस्टिननें उदाहरणादाखल, ब्रिटिश ट्रेड–युनियनच्या अनुभवाचें, वेब पतिपत्नींनीं केलेलें विवेचन पुढें केलें आहे. तो म्हणतो, "संपूर्ण स्वातंत्र्याच्या" (पा. १३७) वातावरणांत झालेल्या सत्तर वर्षांच्या प्रगतीनंतर, ब्रिटिश ट्रेड युनियन्सची अशी खात्री झाली कीं, 'प्राथमिक स्वरूपांतील लोकशाही'

निरुपयोगी असते, आणि म्हणून त्यांनीं तिच्या जागीं ' आधुनिक लोकशाहीचीं,' म्हणजे विधिमंडळ पद्धत आणि नौकरशाही यांची सांगड घालणाऱ्या लोकशाहीची, स्थापना केली.

खरें पहाता ब्रिटिश ट्रेड युनियन्सची प्रगति ' संपूर्ण स्वातंत्र्याच्या वातावरणांत ' न होतां संपूर्णपणें भांडवलशाही गुलामगिरीच्या वातावरणांत झाली आहे. या परिस्थितींत चालू समाज पद्धतींतील वाईट गोष्टी, जबरदस्ती, खोटेपणा, ' वरच्या ' सरकारी कामांतून गरीब जनतेला वगळणें इत्यादि गोष्टी ' टाळणें अशक्य असतें. ' सोशालिस्ट समाजांत, लोकशाहीच्या प्राथमिक स्वरूपाचा, पुष्कळ प्रमाणांत पुनरुद्धार होईलच. कारण पुढारलेल्या समाजाच्या इतिहासांत प्रथमच बहुसंख्य जनता, निवडणुकी आणि मतदान यांतच केवळ नव्हें, तर राजकारणाच्या दैनंदिन प्रत्यक्ष घडामोडींत स्वतंत्रपणें भाग घेऊं लागेल. सोशालिस्ट समाजांत, अधिकार चालविण्याच्या कामांत, सर्वच लोक क्रमाक्रमानें भाग घेतील आणि शेवटीं त्यांना अधिकार चालविण्यास कोणीच नसण्याची संवय होईल.

गुणदोषांचें सूक्ष्म विवेचन करणाऱ्या आपल्या अगाध बुद्धिमत्तेच्या जोरावर मार्क्सनें, कम्यूननें केलेल्या प्रत्यक्ष व्यावहारिक गोष्टी, मूलग्राही बदल घडवून आणणाऱ्या आहेत हें जाणलें. या आमूलाग्र बदलाची संधिसाधूंना भीति वाटत असते, आणि त्यांच्या भ्याडपणामुळें, आणि भांडवलदारांपासून संपूर्णपणें फुटून निघण्याच्या त्यांच्या अनिच्छेमुळें, या गोष्टी समजून घेण्याची संधिसाधूंना इच्छा होत नाहीं. उलट अराज्यवाद्यांना, त्यांच्या घाईमुळें आणि फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक बदल होण्यास आवश्यक असणाऱ्या परिस्थितीच्या परिपूर्ण ज्ञानाचा त्यांच्यात अभाव असल्यामुळें या गोष्टी समजून घेण्याची त्यांना इच्छा होत नाहीं. " जुन्या शासनयंत्राचा नाश करण्याचा विचार सुद्धां आपण करतां कामा नये, मग मंत्रि आणि अधिकारी यांचेशिवाय आपलें चालू शकेल अशी आशा करण्यास काय जागा आहे ? " विचारशक्ति पूर्णपणें नष्ट झालेले संधिसाधू हा मुद्दा मांडतात. या लोकांचा क्रान्तीवर, क्रान्तीच्या ' कल्प-

कतेवर' विश्वास नसतो एवढेंच नव्हें तर, खरें म्हणजे त्यांना ( आपल्या मेन्शेविक आणि सोशल डेमोक्रॅट्सप्रमाणें ) क्रान्तीची भीति वाटत असते.

अराज्यवाद्यांचें ( प्रामाणिक अराज्यवाद्यांचे, क्रोपोट्किन प्रमाणें भांडवलदारांचा पदर धरून जाणाऱ्या अराज्यवाद्यांचे नव्हे ) असें म्हणणें असतें कीं, “ आपण फक्त शासनयंत्र मोडून टाकण्याचा विचार केला पाहिजे. पूर्वीच्या क्रान्त्यांतून प्रत्यक्ष मिळालेल्या अनुभवाचें आणि जें मोडून टाकलें त्याचे जागीं काय आणावयाचें आणि कसें आणावयाचें या प्रश्नांचें विवेचन करण्याची जरूरी नाहीं. ” याचा परिणाम असा होतो कीं, अराज्यवाद्यांचे डावपेच, जनतेच्या चळवळीची प्रत्यक्ष परिस्थिति लक्षांत घेऊन, प्रत्यक्ष प्रश्न सोडविण्याचा बेडर, न्यायनिष्ठुर आणि क्रान्तिकारक प्रयत्न करण्याचे हेतूनें आंखलेले नसतात, तर ते निराशाजन्य असतात.

मार्क्सनें आपल्याला दोन्ही प्रकारच्या चुका टाळण्यास शिकविलें आहे. जुनें शासनयंत्र मोडून टाकतांना अमर्याद धडाडी दाखविण्याचें शिक्षण त्यानें आपल्याला दिलें आहे आणि त्याचबरोबर खालीलप्रमाणें प्रत्यक्ष स्वरूपांत प्रश्नाची मांडणी करण्याचें शिक्षणही त्यानें आम्हांस दिलें आहे : लोकशाही विस्तृत करण्याकरितां आणि नोकरशाही उखडून टाकण्याकरितां अशा अशा सुधारणा करून, कम्यूनला नवें, कामगारांचें शासनयंत्र निर्माण करण्यास, फारच थोड्या आठवड्यांत आरंभ करणें शक्य झालें. कम्यूनच्या निर्मात्यांपासून आम्हीं क्रांतिकारक धडाडी शिकूं आणि त्यांनीं ज्या गोष्टी केल्या त्या व्यावहारिक दृष्ट्या तांतडीच्या आणि ताबडतोब शक्य असलेल्या गोष्टींची रूपरेषा आहेत, हें लक्षांत घेऊन, आणि त्याच मार्गानें पुढें जाऊन, आम्हीं नोकरशाहीचा संपूर्ण नाश घडवून आणूं.

त्या मार्गानें गेल्यास शासनसंस्थेचा नाश होईल या बद्दल आमची खात्री आहे. कारण सोशालिस्ट समाजांत कामाचे तास कमी होतील, जनतेच्या नवीन पद्धतीच्या जीवनाला आरंभ होईल, आणि बहुजन

समाजाला अशी परिस्थिती प्राप्त होईल कीं ज्यामुळें, निरपवाद सर्वांना ' शासनसंस्थेचें काम ' पहातां येईल. त्यामुळेंच शेवटीं शासनसंस्था विरून जाईल.

काउट्स्की म्हणतो, "शासनसत्ता नष्ट करणें हा सार्वत्रिक संपाचा उद्देश असूं शकत नाहीं. एकाद्या विशिष्ट प्रश्नावर सरकारकडून सवलती मिळविणें आणि विरोधी सरकारच्या ऐवजी, कामगारांच्या दडपणाखालीं दबेल असें सरकार प्रस्थापित करणें हाच फक्त त्याचा हेतु असतो...... परंतु त्याचा ( कामगारांनीं विरोधी सरकारवर मिळविलेल्या विजयाचा ) परिणाम कधींही, कोणत्याही परिस्थितींत, शासनसत्तेचा नाश होणें, हा होऊं शकत नाहीं. शासनसत्तेंत अन्तर्भूत असणाऱ्या निरनिराळ्या शक्तींच्या परस्पर संबंधांत थोडा फार फरक घडून येणें, एवढांच त्याचा परिणाम होईल... पार्लमेंटमध्यें बहुमत मिळवून राजकीय सत्ता जिंकावयाची आणि पार्लमेंट-लाच सरकार बनवावयाचें हें आपल्या राजकीय लक्ष्याचें आतांपर्यंत ध्येय होतें, आणि या पुढेंही तेंच ध्येय राहील." [पानें ७२६,७२७,७३२]

अत्यंत नीच संधिसाधूपणाचें हें विशुद्ध स्वरूप आहे; आणि क्रांतीला शाब्दिक मान्यता देऊन कृतींत मात्र तिचा विश्वासघात करणें आहे. ' कामगारांच्या दडपणाखालीं दबेल ' अशा सरकारच्या पलीकडे काउट्स्कीची नजर जाऊंच शकत नाहीं. कम्युनिस्ट जाहीरनाम्यानें, १८४७ सालीं, ' सत्ताधारी बनलेल्या कामगार वर्गाच्या संघटनेची ' घोषणा करून जी भूमिका घेतली त्यापासून ही अधोगती आहे, ही माघार आहे.

हें करण्याकरितां काउट्स्कीला, श्चिडमन, प्लेखनॉव्ह, व्हेंडरव्हल्डे, यांच्या बरोबरच, त्याची आवडती ' एकजूट ' करावी लागेल; कारण ' कामगारांच्या दडपणाखालीं दबेल ' असें सरकार प्रस्थापित करण्या-करितां लढा देण्याची या सर्वांची तयारी आहे.

आम्हीं मात्र सोशालिझमशीं विश्वासघात करणाऱ्या या लोकांपासून फुटून वेगळे निघणार आहोंत, आणि जुन्या शासनसत्तेचा संपूर्ण नाश करून कामगारांचेंच सरकार प्रस्थापित करण्याकरितां लढा देणार आहोंत. त्यांच्यांत आणि आमच्यांत हाच तर मोठा फरक आहे.

"शासनसत्तेंत अन्तर्भूत असणाऱ्या निरनिराळ्या शक्तींच्या परस्पर संबंधांत फरक घडवून आणण्यासाठीं," "पार्लमेंटमध्यें बहुमत मिळविण्यासाठीं," आणि "पार्लमेंटलाच सरकार बनविण्यासाठीं" प्रयत्न करण्यास एका पायावर तयार असलेलें लेजिन्स, डेव्हिड, प्लेखनॉव्ह, पेट्रोसॉव्ह, सरटेलिस, चरनॉव्ह, इत्यादींची सुखदायक संगत काउट्स्कीलाच लखलाभ होवो. त्यांचें ध्येय मोठें चांगलें आहे; कारण तें संधिसाधूंना मान्य होण्यासारखें आहे, आणि सर्व गोष्टी भांडवलशाहीच्या आणि विधिमंडळयुक्त गणराज्याच्या चवकटींत ठेवणारें आहे.

आम्हीं मात्र या संधिसाधूंच्या पासून फुटून निघणार, आणि "शक्तींच्या परस्पर संबंधांत बदल घडवून आणण्याकरितां" नव्हे, तर भांडवलदारांची सत्ता झुगारून देण्याकरितां, भांडवली विधिमंडळपद्धत मोडून टाकण्याकरितां, कम्यूनच्या पद्धतीचें लोकशाही गणराज्य किंवा कामगार आणि सैनिक यांच्या प्रतिनिधींचें सोव्हियट गणराज्य प्रस्थापित करण्याकरितां, कामगारांच्या क्रान्तिकारक हुकूमशाहीकरितां, लढा देणार आहोंत. या लढ्यांत सर्व वर्गजागृत कामगार आम्हाला पाठिंबा देतील याची आम्हांस खात्री आहे.

× × ×

आन्तरराष्ट्रीय सोशालिस्ट पक्षांत, काउट्स्कीच्या उजव्या बाजूला, जर्मनींतील 'सोशालिस्ट' मासिकाचा लेखकवर्ग (यांत स्कॅन्डिनेव्हियांतील स्टॉनिंग आणि क्रॅटिंग, तसेंच लेजिन, डेव्हिड, कोल्ब आणि इतर बरेच लोक येतात); फ्रान्स आणि बेल्जियममधील जॉरिस आणि व्हॅंडरव्हल्डे यांचे अनुयायी; इटलींतील उजव्या गटाचे ट्यूरेटी, ट्रेव्हिस इत्यादि प्रतिनिधि; इंग्लंडमधील 'फेबियन सोशालिस्ट' आणि 'स्वतंत्र पक्षाचे' लोक (खरें पहातां नेहमींच नेमस्तांचेवर अवलंबून असलेला 'स्वतंत्र मजूरपक्ष' सुद्धां) हे सर्व गट आणि पक्ष आहेत. विधिमंडळांत आणि पक्षाच्या प्रसिद्धिवाङ्मयाच्या कार्यांत बराच मोठा आणि बरेचवेळेला महत्वाचा भाग घेणारे हे लोक, कामगारांच्या हुकूमशाहीला जाहीर विरोध करतात; आणि उघडपणें संधिसाधूपणाचें धोरण स्वीकारतात.

या लोकांच्या मताप्रमाणें ‘कामगारांची हुकूमशाही’ हा लोकशाहीचा ‘नकार’ ( negation ) असतो ! ! खरें पहातां या लोकांच्यांत आणि मध्यमवर्गीय लोकशाहीवाल्यांच्यांत मूलतः कांहींच फरक नसतो.

वरील सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन, आम्ही असें निश्चितपणें म्हणूं शकतों कीं, बहुसंख्य अधिकृत प्रतिनिधींचा विचार करितां, ‘दुसरी इंटरनॅशनल’ संधिसाधूपणाच्या चिखलांत खोल रुतली आहे. ‘कम्यून’ मधून मिळालेला अनुभव संपूर्णपणें विसरला गेला आहे असें नव्हें तर त्याला विकृत स्वरूप दिलें गेलें आहे. कामगारांनीं उठाव करून, जुनें शासनयंत्र मोडून टाकून त्याचें जागीं नवें यंत्र प्रस्थापित करण्याची व कामगारांच्या राजकीय सत्तेलाच समाजाच्या समाजवादी पुनर्घटनेचा पाया बनविण्याची वेळ जवळ आली आहे. परंतु कामगारांना याचें शिक्षण देण्याचें ऐवजीं याच्या अगदीं उलट शिकवण दिली जात आहे; आणि ‘सत्ता काबीज करणें’ या शब्दांचा अर्थ, संधिसाधूपणाला अनेक वाटा मोकळ्या रहातील अशा रीतीनें, लावला जात आहे.

आजच्या साम्राज्यशाही राष्ट्रांतील स्पर्धेमुळें, शासनसंस्थेच्या लष्करी यंत्राची फार मोठ्या प्रमाणांत वाढ होऊन त्याचा प्रचंड राक्षस बनला आहे. आणि जगावर, जर्मनी आणि इंग्लंड या पैकीं कोणी ( कोणत्या फायनान्स भांडवलानें ) सत्ता गाजवावी हें ठरविण्याकरितां लक्षावधि लोकांचा बळी दिला जात आहे. अशा वेळीं कामगारक्रान्ति आणि शासनसंस्था यांच्या परस्परसंबंधांच्या प्रश्नाला जें विकृत स्वरूप दिलें जात आहे, तो प्रश्न दडपून टाकण्याचे जे प्रयत्न चालू आहेत, त्यांना फार महत्त्व आहे.

---

## प्रकरण ७ वें

# राशियांतील १९०५ आणि १९१७ सालांतील क्रांत्यांचा अनुभव

प्रस्तुत विषय इतका मोठा आहे कीं, त्यावर अनेक ग्रंथ लिहितां येतील आणि लिहिले पाहिजेत. आम्हीं मात्र या ठिकाणीं, क्रान्तिकालांत कामगारवर्गाचीं शासनसंस्थेसंबंधीं काय कर्तव्यें आहेत, या प्रश्नासंबंधीं, या क्रान्त्यांत जो महत्त्वाचा अनुभव आला त्याचाच फक्त विचार करणार आहोंत.

[ या ठिकाणीं हस्तलिखीत पूर्ण झालें आहे ]

× × ×

### पहिल्या आवृत्तीला पुरवणी

ही पुस्तिका १९१७ सालच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत लिहिली आहे. " रशियांतील १९०५ आणि १९१७ सालांतील क्रान्त्यांचा अनुभव " या सातव्या प्रकरणाचा आराखडाही मी तयार केला होता. परंतु शीर्षकापलीकडे या प्रकरणाची एकही ओळ मी लिहूं शकलों नाहीं; कारण राजकीय घटनांनीं—१९१७ सालांतील ऑक्टोबर क्रान्तीच्या पूर्वकालांतील घटनांनीं—माझ्या कामांत अडथळा निर्माण केला. असा अडथळा स्वागतार्हच आहे. पण त्यामुळें या पुस्तिकेच्या पुढील भागाचे ( " रशियांतील १९०५ आणि १९१७ सालांतील क्रान्त्यांचा अनुभव " ) लेखन मात्र फार काल दूर ढकलावें लागणार आहे. परंतु क्रान्तीच्या अनुभवावर लिहिण्यापेक्षां ' क्रान्तीच्या अनुभवांतून प्रत्यक्षपणें जाणें ' नेहमींच जास्त सुखदायक आणि हितकारक असतें.

पेट्रोग्रॅड, ३० नवंबर १९१७. लेखक

परिशिष्ट पहिलें

# मार्क्सवादाच्या शासनसंस्थेवरील सिद्धांतांत स्टालिननें घातलेली भर

( सोव्हियट रशियांतील कम्यूनिस्ट पक्षाच्या अठराव्या काँग्रेससमोर स्टालिन यानें सेंट्रल कमेटीच्या कामासंबंधीं केलेल्या रिपोर्टांतील शासन-संस्थेसंबंधींचा भाग. मार्च १९३९ )

कांहीं वेळेला असा प्रश्न विचारला जातो कीं, "आपण पिळणारे वर्ग नाहींसे केले आहेत; आपल्या देशांत आतां विरोधी वर्ग अस्तित्वांत राहिला नाहीं; दडपून टाकलें पाहिजे असे आतां कोणी उरले नाहीं; म्हणून आतां शासनसंस्थेची जरूरी राहिली नाहीं, ती नष्टच झाली पाहिजे—मग आपल्या सोव्हियट शासनसंस्थेच्या नष्ट होण्याच्या क्रियेला आपण मदत कां करीत नाहीं ? ती नष्ट व्हावी असे प्रयत्न आपण कां करीत नाहीं ?

शासनसंस्थेची ही अडगळ टाकून देण्याची वेळ अजून आली नाहीं काय ? "

किंवा, "आपल्या देशांतील पिळणारे वर्ग नाहींसे झाले आहेत; सोशालिझम निर्माण करण्याचें बहुतेक कार्य पूर्ण झालें आहे; आपली कम्यूनिझमकडे प्रगति होत आहे–मार्क्सवादाची अशी शिकवण आहे कीं, कम्यूनिझमखालीं शासनसंस्था अस्तित्वांत रहात नाहीं. मग आपली सोशालिस्ट शासनसंस्था नाहींशी होण्यास आपण मदत कां करीत नाहीं ? शासनसंस्थेला पुराणवस्तुसंग्रहालयांत धाडण्याची वेळ अजून आली नाहीं काय ? "

हा प्रश्न विचारणाऱ्या कॉम्रेड्सनीं, मार्क्स आणि एंगल्स यांच्या शासनसंस्थेवरील सिद्धान्तांपैकीं कांहीं सिद्धांत तोंडपाठ केले आहेत हें स्पष्ट आहे. परंतु त्यावरून हेंही स्पष्ट होतें कीं, हे प्रश्न विचारणाऱ्यांना या सिद्धांतांचा मूलभूत अर्थ समजला नाहीं; कोणत्या विशिष्ट ऐति-

हासिक परिस्थितींत हे निरनिराळे सिद्धांत निर्माण झाले याकडे त्यांनीं लक्ष दिलेलें नाहीं. विशेष म्हणजे त्यांना आजची आन्तरराष्ट्रीय परिस्थिति समजली नाहीं आणि आपले भोंवतीं असलेले भांडवली राष्ट्रांचें कडें आणि त्यामुळें आपल्या सोशालिस्ट राष्ट्राला निर्माण झालेला धोका याकडेही त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे. या प्रश्नावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रश्न विचारणारे कॉम्रेड्स् आपल्या भोंवतीं असलेलें भांडवली राष्ट्रांचें कडें, त्याचप्रमाणें भांडवली शासनसंस्था आणि आपल्या देशांत गुप्त हेर, खुनी आणि घातपाती कृत्यें करणारे लोक धाडून आपल्यावर ससैन्य स्वारी करण्यास योग्य संधीची वाट पहात टपून बसलेल्या या शासनसंस्थेच्या इतर शाखा, यांचें स्थान आणि त्यांचें महत्त्व यांना क्षुल्लक लेखत आहेत. त्याचप्रमाणें आपली सोव्हियट शासनसंस्था आणि आपल्या सोव्हियट राष्ट्राचें परचक्रापासून संरक्षण करण्यास अत्यंत आवश्यक असलेलें तिचें लष्कर, तसेंच शिक्षेची अम्मलबजावणी करणारे आणि हेरगिरी करणारें तिचें खातें, यांचें स्थान आणि त्यांचें महत्वही ते क्षुल्लक लेखीत आहेत. आपण हें मान्य केलें पाहिजे कीं क्षुल्लक लेखण्याची ही चूक ज्यांचा वर उल्लेख केला त्याच कॉम्रेड्सकडून फक्त होत आहे असें नाहीं, तर आपण सगळेचजण थोडया फार प्रमाणांत ही चूक करीत आहोंत. आतां जो पुरावा पुढें आला आहे त्यावरून हें सिद्ध झालें आहे कीं ट्रॉट्स्की आणि बुखारिन यांची विचारसरणी मानणारे पुढारी, ऑक्टोबर क्रांतीच्या अगदीं पहिल्या दिवसापासून परराष्ट्राच्या हेरखात्याचे नौकर बनले होते, आणि आपलीं कटाचीं कृत्यें करीत होते. तरी सुद्धां त्यांच्या हेरगिरीच्या आणि कटाच्या कारवायांची माहिती आपल्याला नुकतीच म्हणजे १९३७–१९३८ सालीं झाली हें आश्चर्य नाहीं काय? इतकी गंभीर गोष्ट आपल्या लक्षांत कशी आली नाहीं? या चुकीला कारण काय? या प्रश्नाला नेहमींचें उत्तर असें आहे कीं, या लोकांचा इतका अधःपात झाला असेल अशी कल्पनासुद्धां करणें आपल्याला शक्य नव्हतें. परंतु हें कांहीं आपल्या चुकीचें कारणही होऊं शकत नाहीं, आणि सबबही होऊं शकत नाहीं, कारण शेवटीं चूक ती चूकच. मग

या आपल्या घोडचुकीचें कारण काय ? याचें एकच कारण आहे. आपल्या भोंवतीं असलेल्या भांडवलशाहीच्या संघटनेची ताकद आणि तिचे परिणाम आणि मनुष्याच्या कमकुवतपणाचा, त्यांच्यांतील मिथ्याभिमानाचा आणि इच्छाशक्तीच्या दौर्बल्याचा फायदा घेऊन, त्यांना आपल्या हेरागिरीच्या जाळ्यांत गुंतवून, त्यांच्या करवीं सोव्हियट शासनसंस्थेची अंगोपांगें वेढून टाकणाऱ्या भांडवलशाहीच्या हेरखात्याला कमी महत्व देण्याची प्रवृत्ति हेंच याचें कारण आहे. त्याचप्रमाणें आपल्या सोव्हियट शासनसंस्थेच्या संघटनेचें, आपल्या हेरखात्याचें महत्व आणि स्थान यांना कमी लेखण्याची, आपल्या हेरखात्यालाच कमी महत्व देण्याची प्रवृत्ति, तसेंच सोव्हियट शासनसंस्थेंत हेरखात्याला अत्यंत कमी महत्वाचें, क्षुद्रस्थान असतें आणि सोव्हियट हेरखातें आणि सोव्हियट शासनसंस्था यांची रवानगी लवकरच पुराणवस्तुसंग्रहालयांत करावी लागणार आहे असल्या प्रकारची बडबड हेंच याचें कारण आहे.

ही कमी महत्त्व देण्याची प्रवृत्ति कशामुळें निर्माण-झाली असावी ?

ती निर्माण होण्याचें कारण असें आहे कीं, मार्क्सवादाचे शासनसंस्थेवरील जे सर्वसाधारण सिद्धान्त आहेत त्यांचें संपूर्ण विवेचन केलें गेलें नसल्यानें तें अपूर्ण आहेत. शासनसंस्थेबद्दलच्या तात्त्विक भूमिकेसंबंधीं आपण जो अक्षम्य निष्काळजीपणा दाखविला यामुळेंच ही प्रवृत्ति निर्माण झाली. खरी गोष्ट अशी आहे कीं, राज्यकारभार हांकण्याचे बाबतींत आपल्याला गेल्या वीस वर्षांत जो अनुभव मिळालेला आहे त्यावरून त्या बाबतींत कांहीं निश्चित् सर्वसाधारण सिद्धान्त बांधणें आपणांस शक्य होईल इतकी सामुग्री आपल्या जवळ आहे आणि आपल्या जवळ जर इच्छाशक्ति असेल तर एकंदर मार्क्सवादी तत्वज्ञानांतील ही उणीव भरून काढणें आपणांस शक्य आहे. मार्क्सवादी तत्वज्ञानांत भर घालणें हें रशियांतील मार्क्सवाद्यांचें कर्तव्य आहे, असा जो अत्यंत महत्वाचा आदेश लेनिननें आपल्याला दिला तो आपण विसरलों आहोंत. यासंबंधीं लेनिन म्हणतो :

" मार्क्सवादी तत्वज्ञान हें संपूर्ण आणि न बदलणारे आहे असें आम्ही

मानीत नाहीं. उलट आमची अशी खात्री आहे कीं 'सोशालिस्ट' तत्त्वज्ञानाची आतां कोठें कोनशीला बसविली गेली आहे, आणि सोशालिस्टांना जर जीवन प्रवाहाबरोबर रहावयाचें असेल तर त्यांनीं त्याची सर्व बाजूंनीं वाढ केली पाहिजे. आमचें असें निश्चित् मत आहे कीं, मार्क्सवादाची स्वतंत्रपणें प्रगति करण्याची रशियांतील सोशालिस्टांना तर विशेषच जरुरी आहे, कारण त्या तत्त्वज्ञानांत फक्त सर्वसाधारण मार्गदर्शन करणारे नियम सांगितलेले आहेत आणि प्रत्यक्षपणें तें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया या देशांत निरनिराळ्या रीतीनें लागूं पडतात." [ लेनिन, संकलित लेख. रशियन आवृत्ती; भाग २ रा. पा. ४९२ ].

उदाहरणार्थ, सोशालिस्ट समाजांतील शासनसंस्थेच्या प्रगतीसंबंधीं एंगल्सनें मांडलेला प्रसिद्ध सिद्धान्त पहा. एंगल्स म्हणतो :

"दडपून टाकण्यासारखा वर्गच समाजांत अस्तित्वांत राहिला नाहीं, आणि उत्पादनांतील अनागोंदीपणामुळें निर्माण झालेली प्रत्येक व्यक्तीची जीवनाकरीतां चाललेली धडपड आणि वर्गीयसत्ता यापासून निर्माण होणारे तीव्र संघर्ष नाहींसे केले गेले म्हणजे असा वर्ग रहातही नाहीं, म्हणजे मग सहाजीकच त्याकरितां अवश्यक असणाऱ्या विशिष्ट शक्तीची म्हणजेच शासनसंस्थेची जरुरी रहात नाहीं. समाजाची खरीखुरी प्रतिनिधी या नात्यानें, समाजाच्या नांवानें उत्पादनाची साधनें ताब्यांत घेणें ही जी पहिली गोष्ट शासनसंस्था करते तीच गोष्ट शासनसंस्था या स्वतंत्र नात्यानें तिची शेवटची कृति ठरते. सामाजिक संबंधांच्या एकामागून एक निरनिराळ्या क्षेत्रांत राजकीय हस्तक्षेप अनावश्यक होऊं लागतो आणि शेवटीं आपोआप बंद होतो. जनतेवर गाजविल्या जाणाऱ्या सत्तेची जागा, वस्तूंवरील देखरेख आणि उत्पादन क्रियेचें मार्गदर्शन यांनीं घेतली जाते. शासनसंस्था 'नष्ट' केली जात नाहीं तर ती विरून जाते." [ एंगल्स–ॲंटी ड्यूहरिंग पा. ३१४–३१५ ]

एंगल्सचा हा सिद्धान्त बरोबर आहे काय ?

आहे. परंतु त्याकरितां खालच्या दोहोंपैकीं कोणती तरी एक गोष्ट गृहीत धरली पाहिजे. एक, आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडे दुर्लक्ष करून, संशो-

घनाच्या सोयीकरितां एकादा देश आणि त्या देशाची शासनसंस्था आन्तरराष्ट्रीय प्रश्नापासून अलग करून, त्या देशाच्या अन्तर्गत प्रगतीच्या दृष्टीनेंच फक्त सोशालिस्ट शासनसंस्थेचा विचार करणें किंवा दुसरें, सर्व देशांतून किंवा बहुतेक देशांतून सोशालिझम यशस्वी झाला आहे असें मानणें; भांडवलशाहीचे ऐवजीं सोशालिस्ट राष्ट्रांनीं आपण वेढलें गेलों आहोंत आणि परराष्ट्राकडून हल्ला होण्याची भीति राहिली नसल्यानें लष्कर आणि शासनसंस्था बलिष्ठ करण्याची आवश्यकता राहिली नाहीं असें मानणें.

परंतु सोशालिझम जर एकाच देशांत यशस्वी झाला असेल आणि त्यामुळें आन्तरराष्ट्रीय परिस्थितीपासून स्वतंत्रपणें त्याचा विचार करणें शक्य नसेल तर काय करावयाचें ? या प्रश्नाला एंगल्सच्या वरील सिद्धांतापासून उत्तर मिळत नाहीं. खरें म्हणजे एंगल्सनें सदर प्रश्नाचा या दृष्टीनें विचारच केलेला नसल्यानें त्या प्रश्नाला त्यानें उत्तर देणेंही शक्य नव्हतें. एंगल्सनें असें गृहीत धरलेलें आहे कीं, जगांतील सर्व देशांत निदान बहुतेक देशांत तरी सोशालिझम एकाच वेळेला प्रस्थापित झालेला आहे. म्हणून एंगल्स एकाद्या विशिष्ट देशांतील विशिष्ट सोशालिस्ट शासनसंस्थेचा विचार करीत नसून, बहुसंख्य देशांत सोशालिझम प्रस्थापित झाला आहे अशी कल्पना करून तो सोशालिस्ट शासनसंस्थेच्या सर्वसाधारण प्रगतीचा विचार करीत आहे. “ बहुसंख्य देशांत सोशालिझम प्रस्थापित झाला आहे असें गृहीत धरल्यानंतर कामगारांच्या शासनसंस्थेंत, सोशालिस्ट शासनसंस्थेंत, काय काय बदल होतील” असा एंगल्सचा प्रश्न आहे. एंगल्सच्या प्रश्नाचें हें सर्वसाधारण स्वरूप आपण ध्यानांत घेतलें म्हणजेच आपणांस तो आपल्या विवेचनांत, आन्तरराष्ट्रीय परिस्थिति आणि आन्तराष्ट्रीय प्रश्न यांच्यापासून इतका संपूर्णपणें अलग होऊन कां विचार करतो हें समजेल.

यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, एंगल्सचा वर दिलेला सर्वसाधारण सोशालिस्ट शासनसंस्थेच्या भवितव्याबद्दलचा सर्वसाधारण सिद्धान्त, ज्या एकाच देशांत आणि कांहीं प्रमाणांत सोशालिझम यशस्वी झाला

आहे त्या देशाच्या, विशिष्ट परिस्थितीला लावतां येणार नाहीं. जो सोशालिस्ट देश भांडवली जगानें वेढला गेला आहे, आणि ज्याला परराष्ट्राकडून लष्करी हल्ला होण्याची भीति आहे तो देश आन्तरराष्ट्रीय परिस्थितीकडे संपूर्णपणें दुर्लक्ष करून आपला विचार करूंच शकत नाहीं. अशा राष्ट्राजवळ, सुसज्ज अद्यावत् लष्कर, शिक्षेची अम्मलबजावणी करणाऱ्या सुसंघटित संस्था आणि जोरदार हेरखातें या गोष्टी असाव्याच लागतात—अर्थात् अशा राष्ट्राला सोशालिझमचें परराष्ट्रापासून संरक्षण करण्याकरितां स्वतःची बलिष्ठ शासनसंस्थाही असावी लागते.

५०।५५ वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या मार्क्सवादाच्या प्रणेत्यांनीं भविष्यकालांत प्रत्येक निरनिराळ्या राष्ट्राच्या इतिहासांत घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा विचार केला पाहिजे होता असें म्हणणें योग्य होणार नाहीं. एकाद्या देशांत पुढील ५०।१०० वर्षांत निर्माण होणाऱ्या प्रत्येक तात्त्विक प्रश्नाला मार्क्सवादाच्या प्रणेत्यांनीं उत्तर देऊन ठेवावयास पाहिजे होतें असें म्हणणें वेडेपणाचें होईल. अर्थात् कांहींना असें वाटेल कीं, असें झालें असतें तर बरें झालें असतें कारण मग आपल्याला, मार्क्सवादाच्या वारसदारांना, त्या संपूर्ण सिद्धान्तांचें रवंथ करीत स्वस्थ बसतां आलें असतें. (हंशा) आजच्या मार्क्स-लेनिनवाद्यांनीं मार्क्सवादाचे सर्वसाधारण सिद्धान्त केवळ तोंडपाठ न करतां त्यांनीं मार्क्सवादाच्या मूल–तत्त्वांचा गाढ अभ्यास करावा; आपल्या देशांतील सोशालिझमच्या वीस वर्षांच्या अस्तित्वांत आपल्याला जो अनुभव मिळाला तो विचारांत घेण्यास त्यांनीं शिकावें आणि शेवटीं या अनुभवाच्या आणि मार्क्सवादाच्या मूल–तत्त्वांच्या अभ्यासाच्या सहाय्यानें मार्क्सवादाच्या सर्वसाधारण सिद्धांतांना निश्चित् स्वरूप देऊन, त्यांत सुधारणा करून, त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करण्यास त्यांनीं शिकावें, अशी आपण त्यांचेकडून अपेक्षा करणें योग्य होईल. लेनिननें 'शासनसंस्था आणि क्रांन्ति' हा आपला प्रसिद्ध ग्रंथ १९१७ च्या ऑगस्ट महिन्यांत म्हणजे ऑक्टोबर-क्रान्तीच्या आणि सोशालिस्ट शासनसंस्था प्रस्थापित होण्याच्या कांहीं महिने आधीं लिहिला. हा ग्रंथ लिहिण्यांत लेनिनचा हेतु, मार्क्स-एंगल्स यांच्या शासनसंस्थेवरील सिद्धां-

तांना विकृत आणि ग्राम्य स्वरूप देण्याची जी क्रिया संधिसाधूंनीं चालविली होती त्यापासून मार्क्सवादाचें संरक्षण करणें, हाच होता. 'शासनसंस्था आणि क्रान्ति' या ग्रंथाचा दुसरा भाग लिहिण्याची तयारी लेनिन करीत होता, आणि,या दुसऱ्या भागांत १९०५ आणि १९१७ सालीं रशियांत झालेल्या क्रान्त्यांत जो अनुभव मिळाला त्याचें समालोचन करण्याची त्याची इच्छा होती. या दुसऱ्या भागांत, आपल्या देशांतील सोव्हिएट सरकारच्या अस्तित्वाच्या कालांत जो अनुभव मिळाला त्याच्या आधारावर शासनसंस्थेच्या सिद्धांतांत भर घालून त्यांत वाढ करण्याचा लेनिनचा हेतु होता, यांत शंकाच नाहीं. लेनिनच्या मृत्यूमुळें त्याला हें कार्य पुरें करतां आलें नाहीं. परंतु लेनिन जें पुरें करूं शकला नाहीं तें आपण, त्याच्या शिष्यांनीं पुरें केलें पाहिजे. [दीर्घ टाळ्या]

परस्परविरोधी वर्गांत समाजाची विभागणी झाल्यामुळें शासनसंस्था निर्माण झाली आणि ती पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्याकांच्या हितरक्षणाकरितां, पिळल्या गेलेल्या बहुसंख्य जनतेला दडपून ठेवण्याकरितां निर्माण झाली. शासनसंस्थेच्या सत्तेचे आधारस्तंभ सहसा, लष्कर, शिक्षेची अम्मलबजावणी करणाऱ्या संस्था, हेरखातें आणि तुरुंग हेच असतात. शासनसंस्थेचें कार्य मुख्यतः दोन प्रकारचें असतें; एक : देशांतील पिळल्या गेलेल्या बहुसंख्य जनतेला दाबांत ठेवणें (हें सर्वांत महत्त्वाचें कार्य) आणि दोन : आपल्या राष्ट्राबाहेरच्या इतर राष्ट्रांना लुबाडून आपल्या राष्ट्राच्या भूप्रदेशाच्या मर्यादा वाढविणें– अर्थात् सत्ताधारी वर्गाच्या हिताकरितां–आणि बाहेरच्या राष्ट्रांच्या हल्ल्यापासून आपल्या राष्ट्राचें संरक्षण करणें. (हें दुय्यम महत्वाचें काम). गुलामगिरी अस्तित्वांत असतांनाच्या कालांत आणि सरंजामशाहीच्या कालांत ही परिस्थिति होती. आज भांडवलशाहीखालीं सुद्धां हीच परिस्थिती आहे.

भांडवलशाही झुगारून देण्याकरितां, भांडवलदारांची सत्ता हिरावून घेणें, त्यांची संपत्ती हिसकाऊन घेणें एवढ्याच गोष्टींची जरूरी होती असें नव्हे तर सर्व भांडवलशाही शासनयंत्र, तिचें लष्कर, तिची नोकर-

शाही, तिचे पोलीस यांचा नाश करून त्यांचे जागीं नव्या, कामगारांच्या शासनसंस्थेची, सोशालिस्ट शासनसंस्थेची संस्थापना करणें ही गोष्टही आवश्यक होती. आणि आपल्याला हें माहीत आहे कीं हीच गोष्ट बोल्शेविकांनीं केली. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, कामगारांच्या नव्या शासनसंस्थेनें, आपल्या नव्या कामगार–शासनसंस्थेला आवश्यक असलेली परंतु, जुनी शासनसंस्था करीत असलेलीं कामें करूंच नयेत. किंवा त्याचा असाही अर्थ होत नाहीं कीं, आपल्या सोशालिस्ट शासन-संस्थेच्या स्वरूपांत कधींही बदल होऊं नये आणि जीं कामें ती आपल्या प्राथमिक अवस्थेंत करीत होती तींच कामें तिनें शेवटपर्यंत करीत रहावें. खरें म्हणजे ज्या मानानें आपल्या राष्ट्राची प्रगति झाली आणि आन्तर-राष्ट्रीय परिस्थितींत बदल झाला त्या मानानें आपल्या शासनसंस्थेचें स्वरूप बदलत आलें आहे आणि पुढेंही बदलत जाईल.

लेनिन म्हणतो : " भांडवली शासनसंस्थेचीं निरनिराळीं अनेक स्वरूपें आहेत; परंतु या सर्वांचा गाभा, त्यांचें खरें मूलस्वरूप एकच आहे. या सर्व शासनसंस्था कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें शेवटीं ' भांडवल-दारांची हुकूमशाही ' असतात. त्याचप्रमाणें भांडवलशाही आणि कम्यू-निझम यांच्या संक्रमणकालांतसुद्धां, शासनसंस्थेला निरनिराळीं अनेक स्वरूपें प्राप्त होतील; परंतु त्यांचें अंतिम स्वरूप, त्यांचा गाभा शेवटीं एकच असेल ती ' कामगारांची हुकूमशाही ' असेल. "

लेनिनचें हें म्हणणें बरोबरच आहे.

ऑक्टोबर क्रान्तीपासून आपल्या शासनसंस्थेची प्रगति दोन टप्प्यांनीं झाली आहे.

पहिला टप्पा ऑक्टोबर क्रान्तीपासून पिळणूक करणारे वर्ग पूर्णपणें नाहींसे होईपर्यंतच्या कालाचा आहे. या कालांत खालील प्रमुख कामें करावयाचीं होतीं. ज्या वर्गांची सत्ता झुगारून दिलेली होती त्या वर्गांचा विरोध मोडून काढणें, आपल्यावर हल्ला करणाऱ्या निरनिराळया राष्ट्रांपासून आपल्या देशाचें संरक्षण करणें, शेती आणि उद्योगधंदे यांची पुनर्घटना करणें आणि भांडवलशाही अवशेष पूर्णपणें नष्ट होण्यास आवश्यक अस-

णारी परिस्थिती निर्माण करणें. या उद्देशानुसार या कालांत आपल्या शासनसंस्थेनें दोन प्रमुख गोष्टी केल्या. पहिली गोष्ट, ज्या वर्गाचे हातून आपण सत्ता हिसकून घेतली त्या आपल्या देशांतील वर्गांना दडपून टाकणें. या कार्याचे बाबतींत आपल्या शासनसंस्थेंत आणि जुन्या शासनसंस्थेंत बरकरणी साम्य होतें, कारण बंडखोरांना शासन करणें हें जुन्या शासनसंस्थेचेंही कार्य होतें. परंतु फरक असा होता कीं, आपली शासनसंस्था कष्ट करणाऱ्या बहुसंख्य जनतेच्या हितरक्षणाकरितां पिळणाऱ्या अल्पसंख्याकांवर दडपशाही करीत होती, उलट जुनी शासनसंस्था पिळणाऱ्या अल्पसंख्यांकांच्या हिताकरितां पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेवर दडपशाही करीत होती. शासनसंस्थेचें दुसरें कार्य स्वदेशाचें परचक्रापासून संरक्षण हें होतें. या बाबतींतही तिचें जुन्या शासनसंस्थेशीं बरकरणी साम्य होतें. कारण जुनी शासनसंस्थाही लष्कराचे जोरावर स्वदेशाचें संरक्षण करीत होती. परंतु महत्त्वाचा आणि मूलभूत फरक असा होता कीं, आपली शासनसंस्था कामगाराला मिळालेल्या यशाचें परकीय हल्ल्यापासून संरक्षण करीत होती, उलट जुनी शासनसंस्था पिळणाऱ्या अल्पसंख्याकांच्या संपत्तीचें आणि त्यांच्या विशेष हक्कांचें संरक्षण करीत होती. आपल्या शासनसंस्थेला तिसरेंही एक कार्य करावयाचें होतें. नव्या सोशालिस्ट अर्थव्यवस्थेच्या कोंवळ्या अंकुराची जोपासना करण्याकरितां आर्थिक संघटना करणें; सर्व जनतेला सांस्कृतिक शिक्षण देणें आणि सोशालिझमच्या प्रस्थापनेला आवश्यक असलेली वृत्ति जनतेंत बाणविण्याचा प्रयत्न करणें. परंतु त्या कालांत या तिसऱ्या कार्याची फारशी प्रगति झाली नाहीं.

दुसरा कालखंड : शहरें आणि खेडीं यांतून भांडवलशाहीचे सर्व अवशेष संपूर्णपणें उखडून टाकल्यापासून सोशालिस्ट अर्थव्यवस्थेचा संपूर्ण विजय होऊन आपण नवी घटना स्वीकारीपर्यंतचा काल. या कालांतील प्रमुख उद्दिष्ट सर्व देशभर सोशालिस्ट अर्थव्यवस्था प्रस्थापित करणें, भांडवलशाहीचे उरलेसुरले अवशेष नष्ट करणें, सांस्कृतिक क्रान्ति घडवून आणणें आणि स्वदेशसंरक्षणाकरितां अद्यावत् लष्कर तयार

करणें हीं होतीं. वरील उद्दिष्टांना अनुसरून आपल्या शासनसंस्थेच्या कार्यांतही बदल झालेला आहे. पिळणूक संपूर्णपणें नाहींशी झाल्या-कारणानें पिळणूक करणारे कोणी अस्तित्वांत राहिले नाहींत आणि म्हणून ज्यांना दडपून टाकले पाहिजे असेंही कोणी शिल्लक राहिलें नाहीं. त्यामुळें स्वदेशांतच लष्करी दडपशाही करण्याचें शासनसंस्थेचें कार्य थांबलें, तें नष्ट झालें. या दडपशाही करण्याच्या कार्याचे ऐवजीं शासन-संस्थेला, सोशालिस्ट संपत्तीचे चोरांचेपासून आणि सामाजिक संपत्तीची नासधूस करणाऱ्यांपासून, संरक्षण करण्याचें नवें कार्य निर्माण झालें. परचक्रापासून स्वदेशाचें संरक्षण करण्याचें शासनसंस्थेचें कार्य संपूर्णपणें कायम राहिलें आणि म्हणून लाल सैन्य व लाल आरमारही संपूर्णपणें कायम राहिलें. त्याचप्रमाणें, परराष्ट्रीय हेरखात्याकडून आपल्या देशांत धाडले जाणारे हेर, खुनी आणि घातपाती कृत्यें करणारे लोक यांचा शोध करून त्यांना शासन करण्याकरितां आवश्यक असणारें, शिक्षेची अम्मलबजावणी करणारें खातें आणि आपलें हेर खातें हीं सुद्धां संपूर्णपणें कायम राहिलीं. आर्थिक पुनर्घटनेचें आणि जनतेला सांस्कृतिक शिक्षण देण्याचें शासनसंस्थेचें कार्यही आहे तसेंच कायम राहिलें आणि त्याची संपूर्ण वाढ झाली. आतां आपल्या देशाचे प्रमुख अन्तर्गत कार्य, शांततेच्या मार्गानें आर्थिक संघटना करणें आणि सर्व जनतेला सुसंस्कृत करणें हें आहे. आपलें सैन्य, शिक्षेची अम्मलबजावणी करणाऱ्या संस्था आणि आपलें हेर खातें यांचा आतां आपल्या राष्ट्राच्या अन्तर्गत व्यवहारांत कांहीं उपयोग राहिला नसून त्यांचा रोख फक्त परकीय शत्रूंविरुद्ध आहे.

आतां आपली शासनसंस्था संपूर्णपणें नवी आणि सोशालिस्ट शासन-संस्था आहे, आजपर्यंतच्या इतिहासांत तिला तोड नाहीं आणि पहिल्या अवस्थेंतील सोशालिस्ट शासनसंस्थेपेक्षां हिचें स्वरूप आणि कार्य किती तरी निराळें आहे.

परंतु प्रगति येथेंच थांबूं शकत नाहीं. आपण कम्यूनिझमकडे चाललों

आहेत. कम्यूनिझम अस्तित्वांत आल्यानंतरसुद्धां आपली शासनसंस्था कायमच रहाणार काय ?

होय रहाणार ! जोंपर्यंत भांडवलदारी राष्ट्रांचे कडें मोडलें नाहीं, आणि परराष्ट्राकडून होणाऱ्या लष्करी हल्ल्याचा धोका नष्ट झाला नाहीं तोंपर्यंत शासनसंस्था कायमच राहील. अर्थात् अन्तर्गत आणि परराष्ट्रीय परिस्थिति ज्यामानानें बदलेल त्या मानानें आपल्या शासनसंस्थेच्या स्वरूपांतही बदल होईल.

परंतु जर भांडवली राष्ट्रांचें कडें नष्ट होऊन त्याचें जागीं सोशालिस्ट राष्ट्रांचे कडें निर्माण झालें तर शासनसंस्था रहाणार नाहीं. ती विरून जाईल.

सोशालिस्ट शासनसंस्थेच्या प्रश्नाचें स्वरूप हें असें आहे.

# परिशिष्ट दुसरें

## क्रांतीसंबंधीं एंगल्सचे विचार

### १

" १८७१ सालांतील ' पॅरीस–कम्यूननें ' केलेल्या कार्याकडे आणि त्याच्या ऐतिहासिक महत्वाकडे आज, वीस वर्षांनीं, पुन्हां पाहिलें म्हणजे आपणांस असें आढळून येईल कीं, ' फ्रान्समधील यादवी ' या ग्रंथांत मार्क्सनें जी माहिती दिली आहे त्यांत थोडी भर घालणें आवश्यक आहे.

"...आज आपणांस असें दिसतें कीं, आर्थिक बाबतींत ज्या गोष्टी कम्यूननें करावयास पाहिजे होत्या त्याकडे दुर्लक्ष केलें गेलें. ' बँक ऑफ फ्रान्स ' च्या दारासमोर क्रांतिकारक जमाव आदरयुक्त भीतीनें स्तंभित होऊन थबकून कसा राहिला हें समजणें सर्वांत कठीण आहे. ही त्यांचे हातून झालेली सर्वांत मोठी राजकीय चूक होती. कम्यूनच्या हातांत बँक असणें, या गोष्टीला हजार ओलीस व्यक्तींच्यापेक्षांही जास्त महत्व होतें. त्याचा परिणाम असा झाला असता कीं, फ्रान्समधील भांडवलदारांनीं, व्हर्सालिस येथील सरकारवर, कम्यूनबरोबर तह करण्याकरितां दडपण आणलें असतें. परंतु खरें म्हणजे, कम्यूननें इतक्या गोष्टी बरोबर कशा केल्या हीच आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. [ ' फ्रान्समधील यादवी ' या मार्क्सच्या ग्रंथाला एंगल्सची प्रस्तावना; १८ मार्च १८९१ नॅशनल बुक एजन्सी. पा १९–२० ]

### २

"...छापे घालण्याच्या पद्धतीनें आणि जागृत नसलेल्या बहुजन समाजाचे, जागृत असलेल्या मूठभर लोकांनीं पुढारीपण करून क्रांति घडवून आणण्याचा काल आतां संपलेला आहे. समाजव्यवस्था संपूर्णपणें बदलून टाकण्याचा प्रश्न निर्माण झाला म्हणजे त्यांत सर्व जनताच गोंवली

जावी लागते आणि तिला आपण आपले प्राण कशाकरितां पणाला लावीत आहोंत याचीही जाणीव व्हावी लागते. गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासानें ही गोष्ट आपणांस शिकविली आहे...परंतु जनतेला हें कळावें म्हणून सतत आणि दीर्घकाल कार्य करावें लागतें.

"...फ्रान्समध्यें सुद्धां सोशालिस्टांना याची जास्त जास्त प्रमाणांत जाणीव होऊं लागली आहे कीं, बहुजन समाजाचा, या ठिकाणीं शेत-करी वर्गाचा, पाठिंबा मिळविल्याशिवाय त्यांना मिळणारा विजय टिकून रहाणार नाहीं. [ 'फ्रान्समधील वर्गयुद्ध' या मार्क्सच्या ग्रंथाला एंगल्सची प्रस्तावना. ६ मार्च १८९५. बर्मन पब्लिशिंग हाऊस. पा० २०–२१ ]

परिशिष्ट तिसरें

# क्रान्तिकालासंबंधीं लेनिनचें विवेचन

## १

"क्रान्तीचा मूलभूत नियम खालीं दिल्याप्रमाणें आहे व सर्व क्रांत्यांत आणि विशेषतः विसाव्या शतकांत रशियामध्यें घडून आलेल्या तिन्ही क्रान्त्यांत या नियमाची सत्यता सिद्ध झाली आहेः—पिळल्या गेलेल्या आणि दडपलेल्या जनतेला, जुन्या पद्धतीनें जगणें अशक्य आहे याची जाणीव होणें आणि तिनें फेरबदल घडवून आणण्याची मागणी करणें, एवढीच गोष्ट क्रान्ति घडवून आणण्यास पुरेशी नाहीं; पिळणाऱ्या वर्गांना जुन्या पद्धतीनें जगणें व राज्य करणें अशक्य होणें हीहि गोष्ट क्रांति घडून येण्यास आवश्यक असते. 'खालच्या वर्गांना' जुनी पद्धत जेव्हां नकोशी होते व 'वरच्या वर्गांना' जुनी पद्धत चालूं ठेवणें जेव्हां अशक्य होतें, तेव्हांच क्रान्ति विजयी होऊं शकते. हेंच सत्य दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—राष्ट्रव्यापी अरिष्टप्रसंग निर्माण झाल्याशिवाय ( पिळणारे आणि पिळले जाणारे असे दोघेही या अरिष्टांत सांपडल्याशिवाय ) क्रांति शक्य नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं क्रान्तीसाठीं पुढील परिस्थिति आवश्यक आहेः—(१) बहुसंख्य कामगारांना ( निदान वर्गजागृत, विचारशील व राजकीयदृष्ट्या कार्यप्रवण कामगारांच्यापैकीं बहुसंख्यांकांना ) क्रान्तीची आवश्यकता पटली असली पाहिजे आणि ते क्रान्तीसाठीं आपल्या प्राणाचें बलिदान करण्यास तयार असले पाहिजेत. ( २ ) राज्यकर्त्या वर्गांवर राज्यकारभार चालविण्याच्या बाबतींत असा आणीबाणीचा प्रसंग ओढवलेला असला पाहिजे कीं त्यामुळें मागासलेली जनतासुद्धां राजकारणाच्या आखाड्यांत खेचली जाईल, सरकार कमजोर होईल व त्याचें त्वरित उच्चाटन करणें क्रांतिकारकांना शक्य होईल. श्रमजीवी आणि दडपल्या गेलेल्या वर्गांतील राजकीय लढा देण्यास समर्थ असलेल्या, परंतु आतांपर्यंत निष्क्रीय अस-

लेल्या, व्यक्तींच्या संख्येंत अत्यंत झपाट्यानें, दसपट नव्हे तर शंभरपट वाढ ही प्रत्येक खऱ्या क्रांतिकालाची खूण आहे." ( जहाल साम्यवाद –बाल्यावस्थेंतील रोग, नॅशनल बुक एजन्सी. पा. ८३–८४ )

२

लेनिन म्हणतो कीं पुढील परिस्थिति जर अस्तित्वांत असेल तर निर्णायक लढा देण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला असें समजावें.

"आपणांस विरोध करणारे सर्व वर्ग एकमेकांची डोकीं फोडण्यांत पुरेसे गढून गेले आहेत, त्यांचे हातपाय पुरेसे जखडले गेले आहेत आणि त्यांच्या आवाक्याबाहेर असलेला लढा लढावा लागत असल्यानें त्यांचें सामर्थ्य पुरेसें क्षीण झालें आहे.

"डळमळीत व अस्थिर वृत्तीचे मधल्या थरांतील लोक–म्हणजे भांडवलदार नव्हेत तर मध्यमवर्गीय लोक आणि मध्यमवर्गीय लोकसत्तावादी–पुरेसे बदनाम झाले आहेत, त्यांचें खरें स्वरूप जनतेला कळून चुकलें आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांच्या धोरणाचा दिवाळखोरपणा उघडकीस आल्यामुळें त्यांची नाचक्की झाली आहे.

"भांडवलदार वर्गाविरुद्ध अत्यंत निर्धारानें आणि धिटाईनें क्रांतिकारक उठाव झाल्यास त्याला पाठिंबा दिला पाहिजे अशी भावना एकंदर कामगार वर्गात निर्माण झाली आहे आणि ती झपाट्यानें वाढत आहे.

"ही परिस्थिति जर अस्तित्वांत असेल तर क्रान्ति परिपक्व झाली असें समजावें. वरील गोष्टी आपण जर नीट लक्षांत घेतल्या आणि आपण जर योग्य वेळ साधली तर क्रांति विजयी झालीच पाहिजे." [ लेनिनचे लेख भाग १० पान १३७–१३८ ].

—

E 281

दोन उपयुक्त पुस्तकें

1 वैवाहिक जीवन

2 आईबाप व मुलें

लेखक व प्रकाशक

**के. पी. भागवत**

( ८४६ सदाशिव, पुणें २ )

प्रत्येकीं किं. ] सर्वत्र मिळतात [ रुपये ४